म. ग्र. सं. ठाणे
विषय प्रवास
ग्रं. क्र. ५६९

REFBK-0020762

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(क्र. मा. पद्दा)
५०००–३–८४

# काश्मीर कन्हय्या

प्र. प्रवास ५६८
२०७६२
११।९।७५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
रा. क्र. ५६८
प्रवास २०७६२
११।९।७५
शाखा (स्थळ प्रत)

लेखक

न्यायमूर्ति श्री राम केशव रानडे

REFBK-0020762

REFBK-0020762

प्रकाशक

स्वाध्याय मण्डळ, पारडी

पहिली आवृत्ति

शके १८९४ सन १९७३

मूल्य ६ रुपये

प्रकाशक आणि मुद्रक—

व. श्री. सातवळेकर

भारत मुद्रणालय, स्वाध्याय-मंडळ,

पोस्ट- 'स्वाध्याय मंडळ (पारडी)'

पारडी (जि. वलसाड)

# प्रकाशकाचे चार शब्द

न्या. राम केशव रानडे ह्यांनी सपत्नीक काश्मीरची सहल केली, त्यावेळी त्यांनी आपले बालमित्र प्रा. डॉ. ग. वा. तगारे ह्यांना जी बारा पत्रे लिहिली, ती आम्ही पुरुषार्थ मासिकात क्रमशः प्रसिद्ध केली. ती पत्रे इतकी लोकप्रिय झाली की लोकांच्या आग्रहावरून त्या बारा पत्रांचे पुस्तक आम्ही प्रकाशित करत आहो.

आपल्याकडे प्रवास-वाङ्मय फार कमी आहे. पाश्चात्य विद्वान म्हणतात की खरें प्रवास वाङ्मय ते की ज्यामध्ये केवळ वृत्त असत नाही तर विचार देखील असतो.

ह्या पुस्तकांत न्या. रानडे ह्यांनी नुसते प्रवासाचे वृत्त दिले नाही तर इतके बहुमोल विचार दिले आहेत की त्यामुळे आपल्या जीवनांत मांगल्याचा प्रकाश पडतो व आपली खात्री होते की—

चारित्र्याशिवाय चरित्र शोभून दिसत नाही, पावित्र्याशिवाय पांडित्य शोभून दिसत नाही व माधुर्याशिवाय सामर्थ्य शोभून दिसत नाही.

ह्या पुस्तकांत काश्मीरचे सर्वंकष वर्णन आहेच, पण त्याच बरोबर सुविचारांची मेजवानी आहे.

ह्या काश्मीर सहलीत शंभर प्रवासी होते. प्रवास सुरू झाल्यावर ते न्या. रानडे ह्यांना म्हणाले—

'साहेब, तुम्ही कृष्णाचे भक्त. जीवनाकडे तुम्ही कृष्णाच्या चष्म्यातून पहाता, व गीतेच्या मांडीवर बसून बोलता. ह्या प्रवासात आम्ही तुम्हाला

खूप प्रश्न विचारणार आहो व अत्यंत भाविकतेने तुमची उत्तरे ऐकणार आहो, यामुळे हा प्रवास आमच्या जीवनाचे सोने करील. म्हणूनच ह्या काश्मीर सहलीला आम्ही– काश्मीर कन्हय्या असें म्हणतो.'

ह्या बारा पत्रांत त्या रानडे ह्यांनी प्रश्नकर्त्यांना जी उत्तरे दिली ती ग्रथित करण्यात आली आहेत.

जीवनाच्या रस्त्यावरून प्रवास करत असताना माणसाला वाटते की रस्त्यावर सुखाचे गालिचे घातलेले असावेत, पण असे असत नाही या रस्त्यावर दु:खाचे काटे देखील असतात. हे काटे बोचू नयेत असे ज्याना वाटते त्यानी काश्मीर कन्हय्याचे जोडे आपल्या पायात घालून प्रवास करावा म्हणजे दु:खाचे काटे बोचणार नाहीत.

ही पत्रे प्रसिद्ध होत असताना वाचकांनी खूप पत्रे पाठवून आपला अभिप्राय कळवला. वाचक त्या पत्रांत म्हणतात—

'अंत:करणास जाऊन भिडणारे ह्या पत्रातील विचार वाचल्यामुळे आमच्या जीवनात इष्ट अशी क्रांति होते आहे व आपणाला मन:शांति प्राप्त होत आहे मानवी जीवनात मन:शांतीला जास्तीत जास्त महत्व असल्यामुळे आम्ही ही पत्रे मोठ्या आवडीने वाचतो. आमची अशी कल्पना होती की परमार्थाचे विचार रुक्ष असतात, पण ही पत्रे वाचून आमची खात्री झाली की परमार्थाचे विचार ललित साहित्यापेक्षा देखील जास्ती आल्हादकारक असतात.'

कृष्ण कन्हय्याच्या संदेशाप्रमाणे त्या. राम केशव लिखाणाचा मोबदला घेत नाहीत लोकांच्या आग्रहाखातर आम्ही हे पुस्तक मोठ्या भक्तिभावनेने प्रसिद्ध करत आहो

आमची वाचकांना अशी प्रार्थना आहे की त्यांनी ह्या पुस्तकाचा शक्य तितका प्रसार करावा व लोकांच्या जीवनात इष्ट अशी क्रांत होऊन त्यांना मन:शांति मिळण्याच्या कामी मदत करावी.

भारताचे माननीय अर्थमंत्री श्री यशवंतराव चव्हाण ह्यांना अजिबात वेळ नसताना देखील वेळात वेळ काढून त्यांनी जो अभिप्राय दिला त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहो

—प्रकाशक

## न्या. राम केशव रानडे ह्यांनी लिहिलेली पुस्तके

| | प्रकाशक |
|---|---|
| बाळ महाराज<br>भाग १।२<br>परमार्थाच्या प्रांतात | व्हीनस प्रकाशन<br>३८१ क. शनवार, पुणे ३० |
| ज्ञानेश्वरी प्रसाद<br>भाग १।२।३ | साहित्य रसमाला<br>२९२ ठाकुरद्वार<br>भीमराव वाडी समोर, मुंबई २ |
| माझी स्वप्ने<br>गीतेच्या गाभाऱ्यात | प्रसाद प्रकाशन<br>सदाशिव, पुणे ३० |
| काश्मीर कन्हय्या | स्वाध्याय मंडळ, पारडी<br>( जि. वलसाड ) गुजराथ |
| स्मृतिकालीन हिंदुस्थान | सेंट्रल लॉ हाऊस<br>टिळक रोड, नागपूर |

[ न्या. राम केशव रानडे ह्यांनी कायद्याच्या प्रांतात दोन डझन पुस्तके मराठीत लिहिली आहेत. त्याबद्दल सेंट्रल लॉ हाऊस, टिळक रोड, नागपूर ह्यांच्याकडे विचारणा करावी. ]

# भारताचे माननीय अर्थमंत्री श्री यशवंतराव चव्हाण यांचा अभिप्राय

एफ एम । एम पी । २०१८ । ९
वित्तमंत्री, भारत.
Finance minister.
India.
नवी दिल्ली
दिनांक : १५ डिसेंबर १९७२

स. न. वि. वि.

तुमचे पत्र मिळाले. मी ' काश्मीर कन्हैय्या ' ची काही प्रकरणे वाचून पाहिली. श्री. रानडे यांच्या प्रसन्न लेखनशैलीमुळे पुस्तक अतिशय वाचनीय झाले आहे. सामान्य माणसाला हे पुस्तक वाचल्यानंतर त्याला बहुश्रुतता प्राप्त झाल्यासारखे होईल, असे वाटते. कळावे.

आपला

यशवंतराव चव्हाण

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५६८


# गीता करा हो सुगीता

## न्या. राम केशव रानडे ह्यांची मुलाखत

[ आजच्या परिस्थितीत नव्या पिढीला देखील गीता मार्गदर्शक आहे. मात्र गीतेकडे पहाताना आंधळ्या भक्तीचा आश्रय न करता बुद्धिवाद व वास्तववाद ह्यांचा आधार घेऊन गीतेकडे पाहिले पाहिजे. महाराष्ट्र सेल्स टॅक्स ट्रिब्यूनल मुंबईचे मुख्य न्यायाधीश राम केशव रानडे ह्यांची "गीतेच्या गाभाऱ्यात" ही लेखमाला नितांत लोकप्रिय झाली आहे. न्या. रानडे ह्यांची गीतेसारख्या महत्त्वाच्या विषयावर घेतलेली मुलाखत वाचकांना खूप वाचनीय व विचारणीय वाटेल. ]

### तरुण पिढी

प्रश्न — गीता व तरुण पिढी ह्याबद्दल आपणाला काय वाटते ?

उत्तर — गीता ही तरुण पिढीला मार्गदर्शक आहे. शाळा कॉलेजमध्ये मी व्याख्यान देण्यास जातो. बुद्धिवादाच्या चष्म्यातून गीता सांगितली तर तरुणांना गीतेची शिकवण फार आवडते. एकदा आंतरकॉलेज वक्तृत्व स्पर्धेचा मी परीक्षक होतो खूप कॉलेज तरुण बोलले. त्यांना गीतेबद्दल आवड होती. समारोप करताना मी म्हटले—

" हल्ली राष्ट्रीय एकात्मतेची भाषा सुरु आहे. गीता ग्रंथ सर्वमानवजातीकरता आहे. जगांतील सर्वोत्कृष्ट ग्रंथ म्हणून पाश्चात्य लोक गीतेला मान देतात राष्ट्रीय एकात्मता होण्याकरता शाळाकॉलेजात गीतेत सांगितलेले नैतिक शिक्षण दिले तर विवेकानंद म्हणतात त्याप्रमाणे आपले विद्यार्थी खऱ्या अर्थाने राष्ट्रीय होतील आज महाराष्ट्रातील खूप विद्यार्थी बोलले गीतेच्या शिकवणुकीमुळे त्यानी जे विचार प्रदर्शित केले त्यामुळे असे म्हणावेसे वाटते की,

महाराष्ट्रातले हे विद्यार्थी नुसते राष्ट्रीय नाहीत तर महाराष्ट्रीय आहेत

## निधर्मी राज्य

प्रश्न— आपल्या देशाने घटना मान्य केली आहे आपले राष्ट्र निधर्मी राष्ट्र आहे. अशा परिस्थितींत कितीतरी विद्वान् म्हणतात की तरुणाना गीतेची शिकवण देता येणार नाही. आपणाला काय वाटते ?

उत्तर— घटनेप्रमाणे आपले राष्ट्र निधर्मी राष्ट्र आहे. आपण जरा घटनेचा व धर्म ह्या शब्दाचा बारकाव्याने विचार करा. धर्म हा शब्द Religion ह्या अर्थी वापरतात, त्याचप्रमाणें आपल्या पूर्वजांनी पुष्कळ वेळा धर्म हा शब्द Morality नीतिमत्ता ह्या अर्थी वापरला आहे. महाभारतात गोपालकृष्ण म्हणतात—

धारणाद्धर्ममित्याहु धर्मो धारयते प्रजाः ।
यत्स्याद्धारणसयुक्तं स धर्म इति निश्चय ।।

धर्म हा शब्द धृ म्हणजे धारण करणे ह्या धातूपासून निघाला आहे धर्माने सर्व प्रजा बद्ध होते ज्या योगाने प्रजेचे धारण होते तो धर्म होय असे निश्चत मत आहे.

ह्या ठिकाणी धर्म हा शब्द Religion ह्या अर्थी न वापरता Morality नीतिमत्ता–ह्या अर्थी वापरण्यात आला आहे. तेव्हा– गेला होता कोठे राधासुता तुझा धर्म– ह्या ठिकाणी देखील धर्म हा शब्द Religion ह्या अर्थी वापरण्यात आला नसून Morality ह्या अर्थी वापरण्यात आला आहे.

आपल्या घटनेचा अभ्यास केला म्हणजे असे दिसते की हिंदुधर्म, मुसलमान धर्म, ख्रिश्चनधर्म—असल्या धर्मांचे संस्कार शाळा—कॉलेजात विद्यार्थ्यांवर करता येणार नाहीत, पण धर्म म्हणजे नीतिमत्ता Morality—ह्या अर्थी धार्मिक संस्कार म्हणजे नैतिक संस्कार तरुण पीढीवर शाळा कॉलेजात जरूर करता येतील. विद्वानाना—आपल्याकडच्याच नव्हे तर पाश्चात्य विद्वानाना देखील वाटते की गीताग्रंथ फक्त हिंदूंच्या पुरता मर्यादित नसून तो साऱ्या मानवजातीकरता आहे व तो साऱ्या जगात नीतिमत्तेच्या बाबतीत सर्वोत्कृष्ट ग्रंथ आहे. गीतेत सांगितलेले धार्मिक संस्कार म्हणजे नैतिक संस्कार शाळा—कॉलेजातले विद्यार्थी व विद्यार्थीनी ह्यांच्या मनावर करणे आपल्या घटनेच्या विरुद्ध नाहीं.

केवळ कायदा करून सुधारणा होत नाही. सुधारेणचा रथ दोन चाकावर चालतो. एका चाकाचे नाव कायदा व दुसऱ्या चाकाचें नांव धार्मिक संस्कार.

## पाश्चात्य विद्वान्

प्रश्न— आपल्याकडील विद्वानाना गीताग्रंथ उत्कृष्ट वाटतो हे आम्हाला माहीत आहे. आपण पाश्चात्य विद्वानांच्याबद्दल बोलला. खरच का त्याना ह्या ग्रंथाबद्दल इतके प्रेम वाटते ? ह्या बाबतीत पाश्चात्य विद्वानांची नावे घेऊन खुलासा कराल कां ?

उत्तर— इमर्सनला गीतेबद्दल फार प्रेम वाटे. तो आपल्या टेबलावर नेहमी गीता ठेवीत असे. तो म्हणे—

Geeta means Empire of thought ( गीता म्हणजे विचारांचे साम्राज्य ). केसरलिंग म्हणतो—

Geeta is the greatest philosophical poem in the world's literature. ( जगाच्या वाङ्मयात सर्वोत्कृष्ट तात्त्विक कविता म्हणजे गीता ).

गीतावाचून श्लेगेल म्हणतो—

Hail to thee, author of the mighty poem, whose oracles lift up the soul in joy eneffable towards all that

is sublime, eternal and divine. Full of veneration I salute thee above all singers, and I worship uncea-singly the trace of thy foot steps.

मॅक्समुल्लर, रोमा रोलाँ, डॉ. हुम्बोल्ट वगैरे विद्वान् गीतेची फार स्तुति करतात. महात्मा गांधी लंडनला गेले असताना ते एका बड्या ग्रंथालयात गेले होते. तेथल्या ग्रंथपालाला त्यांनी विचारले—

" तुमच्या ग्रंथालयात असे कोणते पुस्तक आहे की ज्याला लोक जगातील सर्वश्रेष्ठ पुस्तक मानतात ? "

तो ग्रंथपाल म्हणाला—

" असे पुस्तक आमच्या ग्रंथालयात आहे. त्याचें नाव गीता. "

आज जगात जे विद्वान् ह्यात आहेत त्यामध्ये अग्रपूजेचा मान डॉ. टॉयनबी ह्याला देण्यांत येतो हा विद्वानाचा विद्वान्, तत्वज्ञांचा तत्त्वज्ञ, ऐंशी वर्षाच्या पुढें आहे त्याने मानवजातीचा पाच हजार वर्षांचा इतिहास लिहिला आहे शहाण्यांचा हा शिरोमणी, विद्वानांचा हा मेरुमणी व तत्त्वज्ञांचा हा मुकुटमणी म्हणतो की—

तत्त्वज्ञान व नीतिमत्ता ह्यांच्या प्रांतातले जगांतील सर्वोत्कृष्ट पुस्तक म्हणजे गीता

## महात्मा गांधी व अनुभव

प्रश्न- महात्मा गांधीनी जीवनात सत्याचे खूप प्रयोग केले. अनुभवाच्या निकषावर घासून त्यांनी जीवनाचे सिद्धांत बनवले. त्यांना गीतेबद्दल काय वाटते ? गीतेच्या गाभाऱ्यात तुम्ही वावरता तुम्हाला गीतेबद्दल काय वाटते ?

उत्तर- महात्मा गांधीनी खूप प्रयोग केले पराकाष्ठेचा अनुभव घेतला व मानवी जीवनाचे समुद्रमंथन करून जे अमृत काढले ते त्यांच्याच शब्दांत सांगायचे म्हणजे—

" गीता ग्रंथ म्हणजे मानवी जीवनातील पेच-प्रसंगांचा कोष आहे. मानवी जीवनात जेव्हा जेव्हा पेच निर्माण करणारी समस्या निर्माण होते

तेव्हा तेव्हा त्याचे उत्तर गीताग्रंथात मिळते. माझ्या जीवनातील साऱ्या समस्या गीता ग्रंथाने सोडविल्या आहेत. "

ज्ञानेश्वरीबद्दल बोलताना नामदेव म्हणतात—

नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी ।
एक तरी ओवी अनुभवावी ॥

याच चालीवर मला वाटते असे सार्थत्वाने म्हणता येईल की–

ग्रंथामाजी ग्रंथ गीता अलौकिक ।
एक तरी श्लोक अनुभवावा ॥

आपण असे लक्ष्यात घ्या की— अन्नपाणी माणसाला जगवते, पण गीतावाणी माणसाने कसे जगावे ते शिकवते

महाभारतामध्ये निरनिराळ्या खंडांचे निरनिराळे मणी आहेत त्या मण्यांचा मेरुमणी म्हणजे गीताखंड. कर्माच्या दुधाने, भक्तीच्या साखरेने व ज्ञानाच्या केशराने बनवलेले श्रीखंड म्हणजे गीताखंड.

## हृदयपरिवर्तन का निर्दालन

प्रश्न— महात्मा गांधींचा हृदयपरिवर्तनावर ( Change of heart ) फार भर होता. दुर्जनाचा कदापि नाश न करता त्याचे हृदयपरिवर्तन करावे असे कांही लोक म्हणतात कृष्णाचे मत लक्ष्यात घेऊन तुम्हाला काय वाटते ?

उत्तर— दुर्जनांचा नाश न करता त्याचे हृदयपरिवर्तन करण्याचा शक्य तितका प्रयत्न करावा, पण ते जुळले नाही तर जगाच्या कल्याणाकरिता दुर्जनाचा विनाश करणे श्रेयस्कर आहे. कृष्णशिष्टाई हा हृदय-परिवर्तनाचा महान् प्रयोग होता. कृष्णाने कौरवांच्या सभेत 'मी शांतीचा यात्रेकरु आहे. शांति होण्याकरिता माझ्याकडून मी शिकस्त करत आहे' असे म्हणून जे सुंदर भाषण केले त्या भाषणाला उपमा देणे कठीण आहे. आकाशाला उपमा आकाशाचीच, सागराला उपमा सागराचीच, त्याप्रमाणे त्या भाषणाला उपमा त्या भाषणाचीच.

ते भाषण ऐकून परशुराम, भीष्म, द्रोण, विदुर, यांनी सल्ला दिला की— शमाचा यात्रेकरु म्हणून आलेल्या कृष्णाच्या म्हणण्याला संमती देणे

उचित आहे. कृष्णाने शिकस्त केली जमलेल्या लोकांपैकी पुष्कळ लोकांनी शिकस्त केली, पण दुर्योधनाचे परिवर्तन झाले नाही. त्याचे निर्वाणीचे उत्तर असे की—

सुईच्या अग्रावर जेवढी माती राहील तेवढी देखील भूमि पांडवांना युद्धाशिवाय मिळणार नाही.

अशा परिस्थितीत कृष्णाने " तस्मात् युध्यस्व भारत " हाच सल्ला अर्जुनाला दिला.

" परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् "—

जगाच्या कल्याणाकरिता सज्जनांचे संरक्षण व दुर्जनाचा विनाश— हे देवाचे अवतारी कार्य आहे

महात्मा गांधींचा सारा भर रामराज्यावर, पण रामराज्यांत देखील रावणाचे हृदयपरिवर्तन राम करू शकला नाही, त्याला रावणाचा नाश करावा लागला ही गोष्ट विसरून चालणार नाही.

जगात खूप आश्चर्ये आहेत, पण त्या सर्वांपेक्षा मोठे आश्चर्य म्हणजे, माणसालाच माणूस समजला नाही हे होय. माणूस खरोखरीच गहन गूढ आहे. चांगले वागू लागला म्हणजे तो देवानाहि लाजवतो व वाईट वागू लागला म्हणजे तो दैत्यानाहि मागे टाकतो. डोळ्यांना पाहणे शिकवावे लागत नाही, कानाना ऐकणे शिकवावे लागत नाही, पण माणसाला मात्र माणुसकी शिकवावी लागते. माणुसकी शिकवताना हृदयपरिवर्तनाचा प्रयोग जरूर करावा, पण तो जुळला नाही तर—

दया तिचें नाव भूतांचे पालन । आणि निर्दालन कंटकांचे ।

हा महामंत्र लक्ष्यात घेऊन कुजलेला भाग शरीर–स्वास्थ्याकरिता आपरेशन करून काढून टाकतात त्याप्रमाणे समाजस्वास्थ्याकरिता दुर्जनांचा नाश करणे कल्याणकारक आहे.

प्रश्न– परमार्थाचा पाया कोणता ? गीता वाचून प्रथम लक्ष्यात ठेवण्यासारखी गोष्ट कोणती ? ह्या बाबतीत जरा विस्ताराने सांगा.

उत्तर– अहंकार नाश हा परमार्थाचा पाया आहे. 'अहंकारविमूढात्मा कर्ताहमिति मन्यते' अशी गीतेची शिकवण आहे अर्जुनाला आरंभी अहंकार झाला होता. तो शहाणपणाच्या गप्पा मारत होता पहिल्या अध्यायांत त्याने शहाणपणा दाखवणारे नवरंगी मुद्दे मांडले आहेत. अशा परिस्थितीत कृष्णाने त्याच्या नऊ मुद्यांना उत्तरे दिली आहेत. कृष्ण एवढेच म्हणाला—

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ ।

असा षंढपणा करू नकोस, जोपर्यंत अहंकार आहे तोपर्यंत तत्त्वज्ञान समजत नाही, मग अर्जुनाचा अहंकार गेला, तो कृष्णाला म्हणाला—

कार्पण्यदोषोपहतस्वभावः पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेताः ।
यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ॥

मला दैन्य प्राप्त झाले आहे, त्यामुळे माझी स्वाभाविक वृत्ति नष्ट झाली आहे. धर्माच्या बाबतीत माझ्या मनाला मोह पडला आहे मी तुझा शिष्य आहे मी तुला शरण आलों आहे जे निश्चयेकरून कल्याणकारक असेल तें मला सांग.

अशा तऱ्हेने अर्जुनाचा अहंकार नष्ट झाल्यानंतर मगच गीतेचे तत्त्वज्ञान सांगण्यास कृष्णाने सुरुवात केली आहे

परमार्थाच्या मंदिराचा दरवाजा तीन फूट उंचीचा असतो ज्याला ह्या मंदिरात जावयाचे आहे त्याने वाकूनच–नम्र होऊनच– गेले पाहिजे

मानवी जीवनाच्या डोंगरावर चढताना मनुष्य अहंकाराचे फार मोठे ओझे डोक्यावर घेऊन चढत असतो त्यामुळे त्याचा प्रवास दुःखाचा होतो. हे फार मोठे ओझे त्याने फेकून दिले तर त्याचा प्रवास सुखाचा होईल. मनुष्याला सत्तेपेक्षा वा संपत्तीपेक्षा अहंकाराचे फार प्रेम असते. चिक्कू मनुष्य पैशाला जपतो. परमार्थ आपणाला सांगतो की– अहंकाराचे चकाकणारे नाणे खोटे नाणे आहे. सुखाच्या बाजारात ते चालत नाही. फेकून द्या नम्रतेचे नाणे घ्या म्हणजे त्या नाण्याने बाजारात तुम्हाला सुख मिळू शकेल .

पाश्चात्य लोक तत्त्वज्ञानाच्या प्रातात सर्वात मोठा मान सॉक्रेटिसाला देतात. त्याना वाटते की सॉक्रेटिस तत्त्वज्ञानाचा जनक आहे. असा हा सॉक्रेटिस नितांत नम्र होता. सर्वांत शहाणा असणारा हा महात्मा मला सारे कळते असे म्हणत नाही तर त्याचे जे प्रख्यात शब्द आहेत ते असे—

As for myself, all I know is that I know nothing.

माझ्या पुरते बोलायचें म्हणजे मला काही माहित नाहीं. एवढेच मला माहित आहे.

जोपर्यंत अहकार जात नाही तोपर्यंत संतांच्या भाषेंत आपलें मडके कच्चे असते

अहकारनाशाशिवाय परमार्थ अगी बाणणें म्हणजे रामाशिवाय रामायण सागण्याप्रमाणे किंवा कृष्णाशिवाय कृष्णायन सागण्याप्रमाणे आहे

प्रश्न :— अर्जुनाला सल्ला देण्यास कृष्ण होता. आम्हाला असा कृष्ण कसा मिळणार ?

उत्तर— कृष्ण आपल्याच जवळ आहे गीतेत कृष्ण म्हणतो—

सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो ।

मी सर्वांच्या हृदयांत आहे. परमार्थमार्गात प्रवास करत असताना आपण वरच्या पायरीवर गेल्यावर आपल्या अतरंगातील दिव्यशक्ति जागृत होते. आपल्या हृदयातील देव आपणाशी बोलू लागतो. कोठेहि गेलो तरी तो आपला सांगाती असतो. हा हृदयातला देव म्हणजेच कृष्ण राम काय, कृष्ण काय, किंवा विठोबा काय—तो म्हणजे आपल्याच अतरगातील देव.

रामदास आरंभी रामालाच देव म्हणत असत, पण परमार्थात वरच्या पायरीवर गेल्यावर ते म्हणू लागले की माझा राम दाशरथी राम नसून आत्माराम आहे

नामदेव आरंभी पंढरपूरच्या विठोबालाच देव म्हणत असत. तो आपल्यापाशी बोलतो असे त्याना वाटे. पण परमार्थाच्या वरच्या पायरीवर गेल्यावर त्याना वाटू लागले की—

पाषाणाचा देव बोलत असताते ।
सांगते ऐकते मूर्ख दोघे ॥

त्यांची खात्री झाली की देह म्हणजे पंढरी व विठोबा म्हणजे हृदयातला देव

आपण असे लक्ष्यांत घ्या की रामदासांचा राम म्हणजे आत्माराम, नामदेवांचा देव म्हणजे आत्मदेव व आपला कृष्ण–वासुदेव म्हणजे आपल्या हृदयातला देव

प्रश्न— आपला हा विचार फार चांगला आहे. पण अलीकडचे किती तरी विद्वान् म्हणतात की, जगात देवच नाही. देव नाही असें म्हणण्याची फॅशनच सुरु झाली आहे. लोकाना वाटते कीं— जर कोणी म्हणाला की देव आहे तर तो गांवढळ आहे, अडाणी आहे. त्याच्या उलट जर कोणी म्हणाला की– जगात देव नाही– तर लोकाना वाटते की– हा मनुष्य सुशिक्षित आहे. आपण गीता वाचून महान् प्रयोग करता, आपणाला ह्या बाबतीत काय वाटते ?

उत्तर— मानव जीवनात साधारणतः चार अवस्था असतात. आरंभी मनुष्य देवावर विश्वास ठेवतो. त्याने त्याबद्दल फारसा विचार केलेला नसतो. इतर म्हणतात म्हणून तो देव आहे असे म्हणतो व देवाला नमस्कार करतो असें म्हणता येईल की आंधळ्या भक्तीने तो देवावर विश्वास ठेवतो.

परमार्थाच्या प्रांतात मनुष्य जेव्हा सज्ञान होतो तेव्हा देव भेटावा अशी त्याला तळमळ लागते. मानवी जीवनाची ही दुसरी अवस्था होय. मनुष्य देवाच्या भेटीसाठी खूप खूप प्रयत्न करू लागतो पण देव त्याला भेटत नाही. मग तो अशा निर्णयाप्रत येतो की–

जगात देवच नाही. मानवी जीवनाची ही तिसरी अवस्था आहे. त्या अवस्थेत असताना तुकाराम महाराज म्हणाले—

देव मला मेला. मी लोकाना ओरडून सांगणार की जगात देव नाही.

ह्या अवस्थेत असताना विवेकानंद म्हणाले—

ह्या जगात देव नाही. ह्या जगात देव आहे असे म्हणणारे लोक म्याड आहेत.

ह्या नास्तिकतेच्या अवस्थेत मनुष्य देव नाही असे म्हणत असला तरी त्याचे विचारचक्र देवाभोवती – न दिसणाऱ्या देवाभोवती फिरत असते

आस्तिक लोकांपेक्षा नास्तिक लोकच देवाबद्दल जास्त विचार करतात.

ह्या तिसऱ्या अवस्थेत माणसाचे अतःकरण विचाराच्या वादळाने ढवळून निघते आणि मग — मग — मग—

एक परम भाग्याचा क्षण येतो.

माणसाला आपल्या अत:करणातील देवाची ओळख पटते. तुज आहे तुजपाशी – अशी त्याची खात्री होते, आणि तो आनंदाच्या हिंदोळ्यावर झोके घेऊ लागतो

आता त्याची चवथी अवस्था सुरु होते गीतेते म्हटले आहे–

ईश्वर सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।

देव सर्वांच्या हृदयात आहे.

माणसाला अंत:करणातील देवाचा अनुभव येणे म्हणजे माणसाने चवथ्या अवस्थेत प्रवेश करणे.

जे विद्वान् ह्या जगांत देव नाही म्हणतात त्याचा मोठा आधार म्हणजे डॉ. सी ई एम् जोड. डॉ जोड म्हणजे— Greatest modern philosopher ( आधुनिक काळातील सर्वात मोठा तत्त्वज्ञानी ) असें म्हणण्यात येते ह्या डॉ जोडने खूप पुस्तके लिहून असे दाखवून दिले आहे की—

ह्या जगांत देव नाही. डॉ. जोड फार प्रामाणिक आहे त्याने इतकी उत्कृष्ट पुस्तके लिहिली आहेत की त्याची ती विचार–परिप्लुत पुस्तके वाचून तुम्ही देवावर विश्वास ठेवणारे असला तरी You would be also tempted to say that there is no God in this world.

तुम्हाला देखील असे म्हणण्याचा मोह होईल की– ह्या जगांत देव नाही.

अशा ह्या महान् डॉ. जोडला जीवनाच्या सध्याकाळी अंतरंगातील देव कळला

खूप पुस्तके लिहून जगात देव नाही असे दाखवून देणारा डॉ. जोड जीवनाच्या संध्याकाळी लोकाना सांगतो—

Before giving good–bye to this world, I want to give one message to the whole world.

जगाला रामराम ठोकण्यापूर्वी साऱ्या जगाला एक एक संदेश देऊन मी ह्या जगातून निघून जाणार.

जो संदेश देऊन डॉ. जोडने जगाचा निरोप घेतला तो संदेश असा—
Only– only those persons become happy who believe in God.

फक्त तेच लोक सुखी होतात की ज्यांचा देवावर विश्वास आहे.

प्रश्न– फार उत्तम फार छान. गीतेबद्दल आपण लोकाना काय संदेश देता?

उत्तर– गीता माता आहे. माऊली आहे गीता सुगीता केली की आपले जीवन सार्थक होते. संदेश असा—

आम्हा गीता असे माता ॥
गीता करा हो सुगीता ॥

प्रश्न– आपण उत्कृष्ट मुलाखत दिली. नमस्ते. आपले आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत

उत्तर– नमस्ते.

# काश्मीर कन्हय्या

## पत्र पहिले

प्रिय गणेश

सुट्टीमध्यें मी, सौभाग्यवती व माझा मामेभाऊ चिदंबर ह्यांनी काश्मीरला जाण्याचे ठरवले. निरनिराळ्या प्रवासी कंपन्यांची माहिती मागवून राजा ट्रॅव्हल्समार्फत आम्ही काश्मीर ट्रिप करण्याचे ठरवले.

आम्ही मुंबईहून पठाणकोटला गेलो. तेथूनच हे पहिले पत्र तुला पाठवत आहे

काश्मीरला जाण्यापूर्वी तू [illegible]

"काश्मीरच्या सहलीत निरनिराळ्या ठिकाणाहून तू मला पत्रें पाठीव. तुझ्या पत्रांत काश्मीरच्या सौंदर्याचे वर्णन येईलच; पण प्रवास करत असताना तुझ्या मनांत जे जे विचार येतील, लोकांना तू जे जे सांगशील त्याबद्दल सविस्तर तू लिही. तू कृष्णप्रेमाने वेडा झाला आहेस. तुला वाटते—

हे वेड सुटणार नाहीं व सुटूं ही नये.

तू म्हणतोस—

" याजसाठींच केला होता अट्टाहास. "

कृष्णप्रेमानें ओथंबलेल्या तुझ्या विचारामुळे माझ्या जीवनात मांगल्याचा प्रकाश पडत आहे व माझें जीवन सुखी होत आहे.

तरी तू मला साग्र सावत पत्रें लिही. ती मी पुनः पुन· वाचीन व माझ्या इष्टमित्रांना वाचणेंस देईन. "

गणेश

आपण लहानपणापासुन एकत्र शिकलो. खूप खूप चर्चा केली व जीवनाच्या प्रवासांत एकमेकांची मदत घेऊन वाटचाल करत आहो. मी खूप पदव्या संपादन केल्या. देवानें मला लौकिकदृष्ट्या खूप मावाचे स्थान दिलें, उत्तम प्रवचनकार म्हणून लोक मला मोठा मान देतात माझी खात्री झाली आहे की—

चारित्र्याशिवाय चरित्र शोभून दिसत नाहीं. पावित्र्याशिवाय पांडित्य शोभून दिसत नाहीं, व साधुत्वाशिवाय सामर्थ्य शोभून दिसत नाहीं.

काश्मीरला निघण्यापूर्वी मुंबईला बडया विद्वानांचा परिसंवाद झाला होता. तुला माहित आहे की—

शंकराचार्य ज्ञानोत्तर अकर्म म्हणतात, तर लो. टिळक ज्ञानोत्तरदेखील कर्म करायलाच पाहिजे असे म्हणतात. शंकराचार्यांना वाटते कीं—

सूर्यप्रकाश पडल्यावर अंधःकार राहत नाही, त्याप्रमाणें ज्ञान प्राप्त झाल्यावर कर्म राहत नाहीं.

त्या बडया विद्वानांच्या परिसंवादात किती तरी विद्वानांनी असे जोरजोरानें प्रतिपादन केले की—

शंकराचार्यांच्या अकर्मवादामुळे हिंदुस्थानचा अधःपात झाला.

\+ + +

गणेश, ह्या बाबतीत खूप वाद आहे, नुसता वाद नाही तर विवाद देखील आहे, इतकेच काय प्रवाद देखील आहे हे सर्व वाद विवाद प्रवाद पाहून लवाद नेमून निकाल करायचा झाला तर निकाल असा कीं—

शंकराचार्यांचा अकर्मवाद लोकांना कळला नाहीं. शंकराचार्यांचे अकर्म इतके उच्च उदात्त उत्तुंग, शुद्ध सात्विक मौक्तिक, व वंदनीय नमनीय कमनीय आहे की त्यामुळें—

हिंदुस्थानचे पराकोटीचे कल्याण झाले आहे

काश्मीरची राजधानी श्रीनगर आहे त्या नगराजवळ शंकराचार्य हिल आहे.

मुंबई ते पठाणकोटच्या प्रवासात शंकराचार्यांचा विषय निघाला लोक मला म्हणाले—

" साहेब, कृपा करून आम्हाला शंकराचार्यांचे चरित्र सांगा."

मी सांगू लागलो—

" शंकराचार्यांच्या वडिलांचे नाव शिवगुरु. त्यांच्या आजोबांचे नाव विद्याधिराज. शंकर ( शंकराचार्य ) चार वर्षाचा असतानाच त्याचे वडील वारले. पाचवे वर्षी त्याचे उपनयन करण्यात आले व त्याला गुरुगृही पाठवले. शंकराची बुद्धि फार तल्लख होती आठव्या वर्षी त्याला चारी वेद यायला लागले व बाराव्या वर्षी तो सर्व शास्त्रांत प्रवीण झाला

शंकर आपल्या आईला म्हणू लागला—

" मला सन्यास घेण्याची परवानगी दे."

आई म्हणाली—

" अरे, तू मला एकच मुलगा. तू संन्यासी झालास तर मला कसें बरे वाटेल ? "

आई परवानगी देईना.

एकदा शंकर नदीमध्ये स्नानास गेला असताना ओरडू लागला माता पहाते तो शंकर खोल पाण्यात गेला आहे व ओरडत आहे. आई आली असे पाहून शंकर म्हणाला—

" आई, मगराने माझा पाय धरला आहे. मला सन्यास घेण्याची परवानगी दे म्हणजे मगर माझा पाय सोडील."

आईने विचार केला —

जरी ह्याने संन्यास घेतला तरी मला ह्याचे दर्शन होईल, पण मगराने पाय सोडला नाही तर हा मला हा कायमचा अंतरेल.

असा विचार करून आईने शंकराला संन्यास घेण्याची परवानगी दिली मग मगराने पाय सोडला व शंकर तीरावर आला.

घर सोडण्यापूर्वी शंकराने आपल्या घराजवळ कृष्णाच्या मूर्तीची स्थापना केली व आईला सांगितले—

तुझा अंतकाळ समीप आला असे तुला वाटले म्हणजे तू माझे स्मरण कर म्हणजे मी तुझ्याजवळ येऊन तुझी सेवा करेन.

आईची अशी इच्छा होती की—

आपले और्ध्वदेहिक आपल्या मुलाने करावे.

शंकर म्हणाला—

" मी संन्यास घेतल्यानंतर तुझे और्ध्वदेहिक मी केले तर समाज रागावेल, पण तुझ्या प्रेमाकरता समाजाच्या रागाची पर्वा न करता मी तुझे और्ध्वदेहिक करेन. "

—शंकराचार्यांचे मातृप्रेम इतके बलवत्तर होते की संन्यास घेतल्यानंतर त्यांनी आपला शब्द पाळला. त्या बाबतींत त्यांना फार त्रास झाला, पण मातेच्या प्रेमासाठी त्यांनी सारा त्रास मोठ्या आनंदाने सहन केला.

शंकराने आपल्या मातेच्या पोषणाची सर्व व्यवस्था केली व तो प्रवास करत करत नर्मदातटाकी गोविंदनाथाच्या आश्रमात आला. गोविंदनाथांनी शंकराला उपदेश करून परमहंसाची दीक्षा दिली व सांगितले की—

धर्मप्रसाराकरता तू काशीक्षेत्री जा.

शंकराचार्य काशीक्षेत्री आले त्यांनी वैदिक धर्मप्रसाराचे कार्य उत्तम तऱ्हेने पार पाडले त्यांना बरेच शिष्य मिळाले.

आचार्य शिष्यांसह प्रवास करत करत हिमालयावर बदरिकाश्रमाला आले तेथे त्यांनी ब्रह्मसूत्रावर व ईशोपनिषदावर भाष्य केले. नंतर भगवद्गीतेवर भाष्य करून त्यांनी प्रस्थानत्रयीवरचे भाष्य संपवले.

आपले ग्रंथ आचार्यांनी आपल्या शिष्यास पढविले व वैदिक धर्मप्रसाराचे कार्य त्यांनी जोरात सुरु केले.

आचार्यांनी खूप लोकांना वादात जिंकले. त्यांचा व मंडणमिश्रांचा वाद प्रसिद्ध आहे. आचार्य नगरातून चालले असताना दोन दासी पाणी आणण्याकरता चालल्या होत्या आचार्यांनी त्यांना विचारले—

" पंडित मंडनमिश्राचे घर कोठे आहे ? "

दासीनी उत्तर दिले—

" स्वतः प्रमाण परतः प्रमाणं
कीरांगना यत्र गिरं गिरन्ति
द्वारस्थनीडांतरसन्निरुद्धा
जानीहि तन्मण्डनपंडितौकः ॥

वेद वाक्य स्वतः प्रमाण आहे किंवा परतः प्रमाण आहे ह्या विचार ज्याचे दारामध्ये पिंजऱ्यात असणाऱ्या मैना करतात ते मंडनपंडितांचे घर आहे असे समजावे.

मंडनमिश्र फार विद्वान् होते. त्यांचा व शंकराचार्यांचा जो वाद झाला तो वाद म्हणजे संस्कृत वाङ्मयातली उत्कृष्ट मेजवानी आहे

सनातनी लोक म्हणतात की- स्त्रियांना वेदाचा अधिकार नाही. पण ह्या लोकांनी लक्ष्यांत घ्यावे की—

वैदिक विचाराबद्दल शंकराचार्य व मंडनमिश्र ह्यांचा जो फार गहन वाद झाला त्याचा निकाल करण्याकरता ज्या न्यायाधीशाची नेमणूक केली गेली तो न्यायाधीश एक स्त्री होती व विशेष आश्चर्याची गोष्ट अशी कीं ही स्त्री दुसरी कोणी नसून मंडनमिश्राची पत्नी सरस्वती होती.

सर्वांत आश्चर्याची गोष्ट अशी की सरस्वती जितकी विद्वान् तितकीच निःपक्षपाती होती. ह्या आदर्श न्यायाधीश स्त्रीने असा निकाल दिला की—

शंकराचार्यांचा जय झाला असून आपल्या नवऱ्याचा पराभव झाला आहे.

मग सरस्वती आचार्यांना म्हणाली—

" पत्नी पतीचे अर्धांग आहे. तुम्ही माझ्या पतींना वादात जिंकले आहे.

आता माझ्याबरोबर वाद करा."

आचार्य म्हणाले—

"आमच्यासारख्यानी स्त्रियांच्याबरोबर वाद करणें योग्य नाही."

सरस्वती म्हणाली—

"जो आपले मत प्रस्थापित करू इच्छितो त्यानें स्त्रियाच्याबरोबर देखील वाद करणेस तयार असले पाहिजे वेदामध्यें याज्ञवल्क्य व गार्गी ह्यांचा सवाद आहे. महाभारतात जनक–सुलभा सवाद आहे याज्ञवल्क्य व जनक ह्यांचे कृत्य चुकीचे होते असे तुम्हास म्हणावयाचे आहे काय ?"

सरस्वतीचे हे बिनतोड भाषण ऐकून आचार्य तिच्याबरोबर वाद करण्यास तयार झाले

निरनिराळ्या शास्त्रांत आचार्यांनी सरस्वतीचा पराभव केला. तेव्हा कामशास्त्रांत आचार्यांचे कांही चालणार नाही, असा विचार करून सरस्वतीनें आचार्यांना विचारले—

"कला कियंत्यो वद पुष्पधन्वनः
किमात्मिका किं च पद समाश्रिता ।
पूर्वे च पक्षे कथमन्यथा स्थिति कथं
युवत्यां कथमेव पूरुषे ॥"

कामाच्या कला किती आहेत ? त्या कशा स्वरूपाच्या आहेत ? त्या कोणत्या स्थानाचा आश्रय करतात ? त्यांची पूर्वीची स्थिति व परिणाम-स्थिती कशी आहे ? स्त्री पुरुषांचे ठिकाणी त्यांचे वैलक्षण्य काय आहे ?

कामशास्त्रातले हे प्रश्न ऐकून आचार्यांनी त्याची उत्तरे देण्यास एक महिन्याची मुदत मागून घेतली मग आचार्यांनी परकायाप्रवेशसिद्धीचा उपयोग करून राजा अमरक ह्याचे देहात प्रवेश केला

त्या देहात आचार्यांनी वात्स्यायन शास्त्राचें अध्ययन करून व अनुभव घेऊन मग सरस्वतीच्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली व तिला वादात पराभूत केले

ह्या प्रख्यात वादाचा परिणाम असा झाला की मंडन मिश्र हा आचार्यांचा पट्टशिष्य झाला आचार्यांनी त्याचें नाव सुरेश्वर ठेवले.

वैदिकधर्माचा प्रसार करण्याकरता आचार्यांनी जेव्हा चारी दिशाना मठ स्थापले तेव्हा शृंगेरी मठावर त्यांनी सुरेश्वराची योजना केली.

कोणताहि मनुष्य कांही ना कांही कर्म केल्याशिवाय क्षणभर देखील राहत नाही

आचार्यांचे आयुष्य फक्त बत्तीस वर्षांचे, पण एवढ्या थोड्या आयुष्यांत त्यांनीं जे कार्य केलें ते पाहून आपण आदराने नतमस्तक होतो त्याकाळी बौद्धधर्माला राजाश्रय होता. कितीतरी अवैदिक धर्म जोर करत होते, पण आचार्यांनी पायी सारा भारतदेश हिंडून जिकडे तिकडे वैदिकधर्माची ध्वजा फडकावली. हल्लीप्रमाणे त्याकाळीं प्रवासाची साधने नव्हती तरी जीवाचे रान करून ह्या महात्म्याने अलौकिक अनुपम भव्य दिव्य कार्य केले. तें कार्य समजून घेतले म्हणजे त्या महात्म्याला वंदन करण्याकरता तुमचे हात आपोआप जोडले जातील.

धर्माची स्थापना होण्याकरिता आचार्यांनी चारी दिशांना चार मठ स्थापन केले व त्यावर एकेका शिष्याची स्थापना केली.

पहिला मठ शृंगेरी येथें स्थापन करण्यात आला व त्यावर सुरेश्वराची योजना केली.

दुसरा मठ जगन्नाथपुरी येथें स्थापन करण्यात आला व त्यावर पद्मपादाची योजना केली

तिसरा मठ द्वारका येथे स्थापन करण्यात आला व त्यावर हस्तामलक ह्याची योजना केली.

चवथा मठ बदरिकाश्रम येथें स्थापन करण्यांत आला व त्यावर त्रोटक ह्याची योजना केली.

एकदा आचार्य काशीक्षेत्री असता असा विचार आला की—

भारतामध्यें जिकडे तिकडे धर्मप्रसाराचे कार्य झाले, पण काश्मीरात कार्य झाले नाहीं. मग आचार्य शिष्यासह काश्मीरला गेले व तेथें त्यांनी धर्मप्रसाराचे उत्कृष्ट कार्य केले. आजहि त्या कार्याचे स्मारक आपणाला बघायला मिळते. काश्मीरची राजधानी श्रीनगर आहे. त्या नगराजवळ एक हजार फूट उंचीची टेकडी आहे त्या टेकडीचे नाव आहे—

शंकराचार्य हिल.

ह्या टेकडीवर शंकराचे देऊळ आहे व शंकराचार्यांचे देऊळ आहे. काश्मीरला गेल्यावर आपण तें सारे पहाणार आहो.

+

धर्मप्रसाराचे अद्वितीय कार्य करून शंकराचार्यांनी वयाच्या बत्तीसावे वर्षी गुहेत प्रवेश करून जगाला रामराम ठोकला

संन्यासधर्माची दीक्षा घेतल्यानंतर व आत्मज्ञान प्राप्त झाल्यावर आचार्यांनी जे महान् कर्म केले ते जगाच्या इतिहासात नितांत वंदनीय आहे. ते भव्य दिव्य कर्म पाहून त्यांची स्तुति करायची म्हटले तर स्तुतिदेवीला देखील शब्द अपुरे पडतील. त्या भव्य दिव्य कर्मामुळे हिंदुस्थानचे पराकोटीचे कल्याण झाले आहे

× × ×

शंकराचार्यांचे हे चरित्र ऐकून लोकांनी आचार्यांना मनोभावे नमस्कार केला व मला विचारले—

" साहेब, असें आहे तर ज्ञानोत्तर अकर्म आहे असें शंकराचार्य कसे म्हणतात ? आचार्यांनी ज्ञानोत्तर उच्च उदात्त उत्कृष्ट कर्म केले आहे मग त्यांच्या अकर्मवादाचा अर्थ काय ? . . "

मी सांगू लागलो—

" मित्र हो, हा वाद नीट समजून घ्या. लौकिक अर्थाने अकर्म ह्याचा अर्थ कर्मशून्यता असा आहे, पण तो अर्थ गीतेला अभिप्रेत नाही गीतेने काही काही शब्द विशिष्ट अर्थाने वापरले आहेत ते अर्थ नीट समजून घेतले नाहीत, तर घोटाळा होण्याचा संभव असतो.

संन्यास ह्याचा लौकिक अर्थ संसार सोडून भगवी वस्त्रें धारण करणे व भिक्षावृत्ति स्वीकारणे असा आहे, पण गीता म्हणते—

काम्यानां कर्मणां न्यास संन्यासं कवयो विदुः ।

कर्मफलाची अपेक्षा धरून केलेल्या कर्मांना काम्य कर्मे म्हणतात. काम्य कर्मांचा न्यास म्हणजे संन्यास, काम्य कर्मे न करणें म्हणजे संन्यास असे गीता म्हणते. गीतेने संन्यास ह्या शब्दाचा ज्या अर्थी उपयोग केला आहे तो अर्थ लक्ष्यात न घेता संन्यास व गीता ह्याबद्दल लौकिक अर्थाने आपण वाद करू लागलो तर साहजिक घोटाळा होईल

गीतेने अकर्म हा शब्द कोणत्या अर्थाने वापरला आहे तें आपण कृपाकरून नीट समजून घ्या.

गीता म्हणते—

नहि कश्चित् क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।

गीतेची कर्माची कल्पना फार व्यापक आहे. जोपर्यंत प्राण आहे तोपर्यंत मनुष्य काही ना काही तरी कर्म करणारच. ऐकणे, पहाणे, इतकेंच काय श्वासोश्वास घेणे हे देखील व्यापक अर्थाने कर्म आहे.

गप्प बसणें म्हणजे कर्म न करणें असे आपण लौकिक अर्थाने म्हणतो पण गीतेची कर्माची व्याख्या फार व्यापक आहे. आपण गप्प बसलो तरी आपण ऐकतो, श्वासोश्वास घेतो. गीता म्हणते हे देखील कर्मच आहे.

गीतेची कर्माची व्याख्या लक्ष्यात घेतली म्हणजे असेंच म्हणावे लागेल की आत्मज्ञान प्राप्त झाल्यावर देखील मनुष्य कर्म करतोच.

मग शंका अशी उत्पन्न होते की—

आत्मज्ञान प्राप्त झाल्यावर अकर्म सुरु होते ह्याचा अर्थ काय? अकर्म-वाचा खरा अर्थ काय आहे?

गीतेने ज्याप्रमाणे सन्यास हा शब्द लौकिक अर्थाने न वापरता पारिभाषिक अर्थाने वापरला आहे, त्याप्रमाणें गीतेनें अकर्म हा शब्द लौकिक अर्थानें न वापरतां पारिभाषिक अर्थानें वापरला आहे गीतेंत म्हटले आहे—

नैव किंचित् करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित् ।

योगयुक्त तत्ववेत्त्या मनुष्याने 'मी कांहींच करत नाही' असे समजावे.

अहंकारविमूढात्मा कर्ताहमिति मन्यते ।

अहंकाराने मूढ झाल्यामुळे आपण कर्ता आहे असें मनुष्याला वाटते.

गीता पुढे म्हणते—

त्यक्त्वा कर्मफलासंग नित्यतृप्तो निराश्रयः ।
कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किंचित्करोति सः ॥

कर्मफलाची आसक्ति ज्याने सोडली आहे, जो सदा तृप्त आहे, देवाशिवाय दुसरा आश्रय जो मानत नाही, असा मनुष्य कर्म करूनहि काहीच कर्म करत नाही— अशा मनुष्याचे कर्म अकर्म होते.

ज्याचा अहंकार गेला, कर्मफलाची आसक्ति ज्याची सुटली, आपण जें जें कर्म करतो ती ईश्वराची पूजा आहे असे समजून संतुष्ट मनाने जो कर्म करतो त्याच्या त्या कर्माला गीता "अकर्म" म्हणते. आत्मज्ञान

प्राप्त झाल्यावर शंकराचार्यांनी कर्म जरूर केले पण त्या कर्माबद्दल, बोलताना ते स्वतःच म्हणतात—

यद्यत्कर्म करोमि तत्तदखिलं शंभो तवाराधनम् ।

शंकरा, मी जें जें कर्म करतो ते ते सर्व कर्म म्हणजे तुझी पुजा आहे.

आत्मज्ञान प्राप्त झाल्यावर शंकराचार्यांनी जे कर्म केले ते गीतेच्या पारिभाषिक भाषेंत अकर्म होते.

" गीतेमध्ये अकर्माचा चौरंग आहे. ह्या चौरंगाचा एक पाय आहे अहंकारनाशाचा, दुसरा पाय आहे अनासक्तिचा, तिसरा पाय आहे सदातृप्तीचा व चवथा पाय आहे अनन्य भक्तिभावनेचा

अहंकारनाशाच्या गंधाक्षतांनी, अनासक्तीच्या फुलांनी, सदातृप्तीच्या सुपारतीने व अनन्य भक्तीच्या नैवेद्याने ईश्वराची केलेली पूजा म्हणजे अकर्म."

हें अकर्म ज्याला समजले त्याला गीता समजली. हें अकर्म ज्याला समजले त्याला कळून येते की—

आत्मज्ञान प्राप्त झाल्यावर मनुष्य कर्म जरूर करतो पण ह्या कर्माला गीतेच्या पारिभाषिक भाषेमध्ये " अकर्म " म्हणतात—

शंकराचार्यांनी ज्ञानोत्तर अशा तऱ्हेचे अकर्म केले ते अकर्म परोपकाराचे होते, ते वैदिक धर्माच्या संस्थापनेचे होते, ते भव्य रम्य दिव्य होते. त्या अकर्मामुळे हिंदुस्थानचा अधःपात होण्याच्या ऐवजी भारताचे पराकोटीचे कल्याण झाले. ... "

लोक एकदम म्हणाले— " शंकराचार्य महाराजकी जय !

वाद संपला संवाद झाला. "

× × ×

गणेश,

मुंबई ते पठाणकोट हा रेल्वेचा प्रवास बराच मोठा आहे. काश्मीर सहलीसाठीं खूप स्त्रीपुरुष आले आहेत वेळ जाण्यासाठीं मधून मधून मनोरंजक चर्चा होत होत्या.

चर्चासत्रांत वाद सुरु झाला कीं—

## स्त्री श्रेष्ठ का पुरुष श्रेष्ठ ?

स्त्रियांनीं स्त्रियांची बाजू घेतली. इंदिरा गांधी पंतप्रधान असल्यामुळें त्यांना खूप जोर आला होता.

पुरुषांनीं पुरुषांची बाजू घेतली व आपली बाजू हिरीरीने मांडली

काहीं पुरुष म्हणाले—

" अहो, प्रत्येक बाबतीत पुरुष श्रेष्ठ आहे सैंपाक हा स्त्रियांचा खास प्रांत, पण ह्या प्रांतात देखील पुरुष श्रेष्ठ आहे लग्नाची अथवा मुंजीची जेवणावळ असली म्हणजे बायकाच म्हणतात कीं—

" हें काम बाईकडे नको, चांगला आचारी पहा— "

पुरुषांनीं आपली बाजू फार जोरांत मांडली

स्त्रीच श्रेष्ठ असें म्हणणाऱ्या स्त्रीला वाटत होते कीं—

जितं मया

पुरुषच श्रेष्ठ असे म्हणणाऱ्या पुरुषाला वाटत होते कीं—

जितं मया

हा वाद खूप रंगला. कितीतरी पदवीधर स्त्रीपुरुषांनी वादात भाग घेतला. ह्या निमित्ताने बऱ्याच नवराबायकोनी परस्परांविरुद्ध जोराचे आरोप केले त्यामुळं वादाची लज्जत खूप वाढली.

हा वाद तू खूपदा ऐकला असशील. स्त्रीपुरुषानी नेहमीचे मुद्दे जोरजोरांत मांडले. नेहमीप्रमाणेंच ह्या वादाचा निकाल लागला नाहीं. वाद खूप रंगला, वेळ चांगला गेला, पण वादाचा जेव्हां निकाल लागला नाहीं, तेव्हां वादांत अहमहमिकेनें भाग घेणारे स्त्रीपुरुष मला म्हणाले—

" साहेब, तुम्ही न्यायाधीश आहा. वृद्ध आहा. आमचा वाद तुम्ही शांतपणें ऐकला आहे. आता ह्या वादाचा निकाल करा. "

मी म्हटले—

" तुमचा वाद मी मोठ्या उत्सुकतेनें ऐकला. तुमच्या इच्छेप्रमाणें मी निकाल देतो, पण एक गोष्ट लक्ष्यांत ठेवा ती ही कीं न्यायाधीश निकाल सांगत असतांना लोकानीं मध्यें बोलणेंचे नसते, किंवा न्याया-धीशाला प्रश्न विचारावयाचे नसतात. तुम्हाला ही गोष्ट मंजूर आहे कां ? "

लोक म्हणाले–

" मंजूर मंजूर. आम्ही निकाल ऐकतो मध्यें प्रश्न विचारत नाहीं किंवा बोलत नाहीं "

मी निकाल सांगू लागलो—

" मानवी जीवनाच्या एकाद्या क्षेत्राचा विचार करून निकाल करणें योग्य होणार नाही सर्व मानवी जीवन विचारात घेऊन ह्या वादाचा निकाल करणें योग्य होईल मानवी जीवनाचे चार भाग आहेत—

१ ) शारीरिक २ ) मानसिक ३ ) बौद्धिक व ४ ) आध्यात्मिक.

शारीरिक भागाचा विचार करता शक्तिच्या बाबतींत पुरुष श्रेष्ठ ठरेल तर सौंदर्याच्या बाबतींत स्त्री श्रेष्ठ ठरेल.

मानसिक भागाचा विचार करता कांही बाबतींत पुरुष श्रेष्ठ ठरेल, पण प्रेमाचा विचार करता स्त्री श्रेष्ठ ठरेल.

पुरुष पिता होतो, पण स्त्री माता होते.

पुरुषानी कितीहि वाद केला तरी त्याना देखील हे मान्य करावे लागेल की—

माता पित्यापेक्षा श्रेष्ठ आहे

मानवी जीवनाचे जे निरनिराळे प्रांत आहेत, त्या बाबतीत विचार करता काही प्रांतात पुरुष श्रेष्ठ ठरतो तर कांही प्रांतात स्त्री श्रेष्ठ ठरते. पण सर्व मानवी जीवनाचा साकल्याने विचार करता स्त्री श्रेष्ठ का पुरुष श्रेष्ठ हा वाद शिल्लक न राहता दोघाना सारखेच मार्क पडतात व निकाल करताना ' ब्रॅकेटेड ' असें म्हणावे लागते.

रामायणात बंधुप्रेमाच्या बाबतींत लक्ष्मण व भरत ह्यांची नावे घेतली जातात दोघांचा बंधुप्रेमाचा प्रकार वेगळा आहे, पण बंधुप्रेमामध्ये लक्ष्मण श्रेष्ठ का भरत श्रेष्ठ असा वाद जेव्हा निर्माण होतो, तेव्हा न्यायाधीशाच्या भूमिकेतून असाच निकाल करावा लागतो की—

दोघानाहि सारखेच मार्क द्यायला पाहिजेत व बंधुप्रेमाच्या परिक्षेत दोघानाहि ब्रॅकेटेड करायला पाहिजे.

असाच प्रकार स्त्री श्रेष्ठ का पुरुष श्रेष्ठ ह्या वादात होतो.

आपण असे लक्षात घ्या की—

मानवी जीवनाचा विचार करताना स्त्रीशिवाय पुरुषाला पूर्णत्व येत नाही व पुरुषाशिवाय स्त्रीला पूर्णत्व येत नाही. पुरुषाला ओढ असते स्त्रीची व स्त्रीला ओढ असते पुरुषाची. दोघे Supplementary नाहीत, तर Complimentary आहेत ...

तुम्हाला एक गोष्ट सांगतो—

रामकृष्ण परमहंसाचे दोन शिष्य एकदा जो जोरांत भांडू लागले. प्रत्येक जण म्हणत होता— मी श्रेष्ठ.

प्रत्येक शिष्य आपले श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्याची कोशिस करत होता. प्रत्येकाला वाटत होते कीं—

आपणच श्रेष्ठ.

शेवटीं हा वाद रामकृष्णांच्याकडे गेला. रामकृष्ण म्हणाले—

जो दुसऱ्याला श्रेष्ठ म्हणेल तो श्रेष्ठ

रामकृष्णांचे हे बोल ऐकून एक शिष्य दुसऱ्या शिष्यास म्हणाला—

" तूच श्रेष्ठ. "

दुसरा शिष्य पहिल्या शिष्यास म्हणाला—

" नाहीं तूच श्रेष्ठ. "

ह्या गोष्टीचे तात्पर्य लक्ष्यात घ्या.

जो स्त्री म्हणेल कीं पुरुष श्रेष्ठ ती स्त्री श्रेष्ठ व जो पुरुष म्हणेल कीं स्त्री श्रेष्ठ तो पुरुष श्रेष्ठ.

× × ×

माझा हा निकाल ऐकून वादांत भाग घेणारे स्त्रीपुरुष माझ्याकडे आदरानें पाहू लागले व म्हणाले—

' साहेब, तुमचा हा निकाल आम्हाला मान्य आहे— "

× × ×

एक गृहस्थ मला म्हणाले—

" साहेब, बुद्धीला चालना देणारी एकादी मजेशीर न्यायाची गोष्ट सांगा."

मी सांगू लागलो. सारे लोक ती मजेशीर गोष्ट ऐकू लागले—

" एका झाडाखालीं दोन लोक बसले होते. एका गृहस्थाजवळ पाच चपात्या होत्या. त्याने प्रत्येक चपातीचे तीन तुकडे केले व तो जेवणेस बसला. दुसऱ्या गृहस्थाजवळ तीन चपात्या होत्या व तो देखील प्रत्येक चपातीचे तीन तुकडे करून जेवणेस बसला. इतक्यात तेथें एक तिसरा गृहस्थ आला तिघांनीं सारखा फराळ केला जातांना तिसऱ्या माणसानें त्या दोघांना आठ आणे दिले व तो चालू लागला.

तो गेल्यावर पहिला गृहस्थ म्हणाला—

माझ्याकडे पाच चपात्या होत्या, तुझ्याकडे तीन चपात्या होत्या म्हणून ह्या आठ आण्यापैकीं मी पाच आणे घेतो व तू तीन आणे घे

दुसरा गृहस्थ म्हणाला—

तुला चार आणे व मला चार आणे असेंच झाले पाहिजें.

हा वाद मिटेना. शेवटी हा वाद न्यायाधीशाकडे गेला—

मी लोकांना विचारले—

" तुम्ही काय निकाल केला असता ? "

लोक म्हणाले—

" पहिल्या गृहस्थाला पाच आणे व दुसऱ्या गृहस्थाला तीन आणे हा निकाल योग्य आहे "

मी म्हटले—

" न्यायाधीशाने निकाल असा दिला की—

पहिल्या माणसाने सात आणे द्यावे व दुसऱ्या माणसाने एक आणा द्यावा.

ह्या निकालावर दुसऱ्या माणसाला देखील कांही बोलता आले नाही. "

लोक म्हणाले—

" असा कसा निकाल झाला ? "

मी सांगू लागलो—

" न्यायाधीश म्हणाला—

हें पहा तुम्ही तिघानी सारखा फराळ केला पाच चपात्यांचे पंधरा तुकडे झाले. तीन चपात्यांचे नऊ तुकडे झाले. प्रत्येकाने आठ तुकडे खाल्ले. पहिल्या गृहस्थाच्या तुकड्यापैकी सात तुकडे तिसऱ्या गृहस्थाने खाल्ले व दुसऱ्या गृहस्थाच्या तुकड्यापैकी तिसऱ्याने एकच तुकडा खाल्ला, म्हणून पहिल्या गृहस्थाने सात आणे द्यावे व दुसऱ्या गृहस्थाने एक आणा द्यावा.

हा निकाल ऐकून दुसऱ्या गृहस्थास कांही बोलता येईना —

लोक म्हणाले—

" निकाल मजेशीर असला तरी बरोबर आहे, गोष्ट फार चांगली आहे. "

× × ×

पठाणकोटला पोचण्याच्या आदल्या रात्री मी अंथरुणावर स्वस्थ पडलो होतो.

गणेश,

स्वस्थ म्हणजे स्वत मध्ये राहणारा. मनुष्य स्वतःमध्ये राहतो तेव्हा तो सुखी असतो, मनुष्य " अस्वस्थ " झाला म्हणजे तो दुःखी होतो

माझा असा अनुभव आहे की—

रात्री निजण्याच्या पूर्वी अंथरुणावर पडल्यावर ध्यानधारणेचा अभ्यास फार चांगला होतो.

ह्या बाबतीत पातंजल योगदर्शनातील खालील चार सूत्रे विशेष लक्ष्यात ठेवण्यासारखी आहेत—

( १ ) स्थिरसुखमासनम् ।

शरीर ज्या स्थितीत राहिले असता स्थिरता प्राप्त होईल व सुख वाटेल ते आसन होय

( २ ) देहाबंधस्थितस्य धारणा ।

चित्ताला कोणत्या तरी स्थानावर बांधून ठेवून स्थिर करणे म्हणजे धारणा.

( ३ ) तत्र प्रत्यैकतानता ध्यानम् ।

एका क्षणाला जी भावना चित्तात असेल ती पुढील अनेक क्षणात टिकवून एकतानता साधणे म्हणजे ध्यान

( ४ ) तदेवार्थमात्रनिर्भासं स्वरूपशून्यमिव समाधिः ।

भाव्यवस्तुशिवाय दुसरा कोणताहि अर्थ भासमान न होणे म्हणजे भाव्य वस्तूची अर्थमात्र निर्भासता. भाव्य वस्तूचे मी ध्यान करत आहे असें स्फुरण देखील न होणे म्हणजे स्वरूपशून्यता. अशा तऱ्हेने ध्येय केवळ अर्थरूपानेच भासमान होणे व त्याच्या स्वरूपाचे अनुसधान नसणे म्हणजे समाधी

× × ×

पठाणकोटला आम्ही सकाळी आलो. पठाणकोट ते श्रीनगर हा प्रवास बसचा आहे आपल्याकडे ज्याप्रमाणे एस् टी आहे त्याप्रमाणे तिकडे ह्या प्रवासासाठी काश्मीर सरकारच्या बसेस आहेत. जेवण–खाण करून आम्ही बसमध्ये बसलो. शंभर प्रवासी व नोकर चाकर ह्यासाठी राजा ट्रॅव्हेलने पाच डीलक्स बसेस रिझर्व्ह केल्या आहेत.

माझ्या मनात विचार आला—

काश्मीर भारताच्या डोक्यावर आहे त्याठिकाणी किती तरी लोक भारतापासून फुटून निघण्याची भाषा करत आहेत. दक्षिण भारतात देखील काही ठिकाणी फुटून निघण्याची भाषा आहे

भारतीय संस्कृतीच्या दृष्टीने हा प्रकार चांगला नाही.

ह्या बाबतीत मी विचार करत असताना माझें मन म्हणू लागले—

"अरे, निराश का होतोस !

दक्षिण भारतातील कांही लोक भारतीय संस्कृतीच्या विरुद्ध बोलत असले तरी तू असें लक्ष्यांत घे की—

दक्षिण भारतातल्या कांही लोकानी भारतीय संस्कृतीच्या बाबतींत महान् कार्य केले आहे. गीतेवरील महान् भाष्यकार शंकराचार्य, रंगनाथाचार्य, रामानुजाचार्य, निंबाकाचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य— हे सारे आचार्य दक्षिण भारताचे आहेत. ह्या साऱ्या आचार्यांना गीता सांगणाऱ्या कृष्णाने स्फूर्ति दिली आहे. ती स्फूर्ति घेऊन त्यानीं भारतीय संस्कृतीची ध्वजा खूप उचावली आहे. काश्मीरपासुन कन्याकुमारीपर्यंत भारतीय संस्कृतीचा दिव्य प्रवाह वाहत आहे. भारतीय संस्कृतीचा विचार करताना त्या दक्षिणेकडील महान् आचार्यांना आपण मनोभावे वदन केले पाहिजे

× × ×

भारतीय संस्कृति गीता सांगणाऱ्या गोपालकृष्णाला नमस्कार करून म्हणते—

"देव देवळांत नाही, मशिदीत नाही, चर्चमध्ये नाही तर तो प्रत्येकाच्या अंतःकरणात आहे आपण कोण ह्याची ओळख होणें हेंच खरे ज्ञान. ह्या देवाची—ह्या आत्मारामाची पूजा करायची म्हणजे आपणात माणुसकी घडवायची व दुसऱ्यात जडवायची. आत्मारामाची स्मृति हीच खरी संपत्ति, त्याची विस्मृति हीच खरी विपत्ति, आणि त्याच्या उपदेशाप्रमाणें वागणे हीच खरी संस्कृति. सकल ज्ञानाचे आगर, सकल सुखाचे भांडार, सकल तत्त्वज्ञानाचे सार आत्माराम हेचि असे"

× × ×

मी बसमध्यें बसलो. बस काश्मीर सरकारची होती, पण मी ज्या बसमध्यें बसलो होतो, त्या बसमध्यें कृष्णकन्हय्याचा सुंदर फोटो लावल

होता. ड्रायव्हरने त्या फोटोपुढे सुगंधी उदबत्ती लावली, नीरांजन लावलें, कृष्णाला मनोभावे नमस्कार केला व बस चालू केली.

माझ्या मनांत विचार आला—

मिसरी संस्कृति, सुमेरियन संस्कृति, ॲसिरियन संस्कृति, बॅबिलोनियन संस्कृति— अशा विश्वविख्यात संस्कृती कालाच्या उदरांत गडप झाल्या, पण आश्चर्याचे आश्चर्य असें की खूप हल्ले होऊनहि प्राचीन भारतीय संस्कृती अद्याप जीवत आहे. भारतीय संस्कृती सनातन आहे. सनातन म्हणजे पुरातन नव्हे तर सदा नूतन. पाश्चात्याना वाटते की— गीता सांगणारा कृष्ण जोपर्यंत भारताला स्फूर्ति देत आहे तोपर्यंत भारतीय संस्कृति अमर राहणार आहे—

आमची बस सुरु झाली लोक एकदम आनंदाने म्हणाले—

काश्मीर

मी म्हटले—

काश्मीर कन्हय्या

गणेश, बस प्रवास करत उद्या आम्ही श्रीनगरला पोचणार आहो. तेथे गेल्यावर पुढचें पत्र पाठवीन.

तुझा
राम

## पत्र दुसरे

प्रिय गणेश

आम्ही पठाणकोटहून सकाळी ११।। वाजतां डी. लक्स बसने निघालो व दुपारी १२ वाजता रावी नदी ओलांडून १० मैलावर असलेल्या लखनपूर गांवी आलो. काश्मीर प्रांतातील हे पहिले गाव.

बसमध्ये ज्ञानेश्वरांच्यावर विषय निघाल्यावर मी सांगितले—

बारोन फॉन ह्युगोल ह्याने असे म्हटले आहे की—

साधुत्व व पांडित्य एके ठिकाणी असत नाहीत.

साध्या भाषेंत ह्याचा अर्थ असा की—

जो संत आहे तो पंत असत नाही व जो पंत आहे तो संत असत नाहीं.

ज्ञानेश्वर ह्या सिद्धांताला अपवाद होते ते संत असून पंत होते.

आपण असें लक्ष्यांत घ्या की—

डोक्याने जो मोठा तो पंत, अंतःकरणाने जो मोठा तो संत पंत संतापुढें नमतो. पंत असून जो संत असतो त्याचे जीवन भाग्यवत असते. ज्ञानेश्वर संत असून पंत होते म्हणून त्यांचें जीवन भाग्यवत झाले

एक गृहस्थ म्हणाले— " ओ हो ! हें वाक्य पुन्हां सांगा. "

मी ते वाक्य पुन्हा सांगितले व त्या गृहस्थानी ते वाक्य आपल्या डायरीत टिपून घेतले.

एका गृहस्थानें शंका विचारली–

" असें म्हणतात की— ज्ञानेश्वर ज्ञानमार्गी होते, भक्तिमार्गी नव्हते. नामदेवांची भेट झाल्यावर मग ज्ञानेश्वर भक्तिमार्गी झाले नामदेवांची भेट होण्यापूर्वी ज्ञानेश्वरानी भक्तीवर जोर दिला नाही.

आपणाला ह्याबद्दल काय वाटते ? "

मी म्हटले— हें मत बरोबर नाहीं

खुलासा करताना मी सांगितले—

" अहो ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी अगोदर लिहिली मग नामदेव आणि ज्ञानेश्वर ह्यांची भेट झाली ज्ञानमार्गी ज्ञानेश्वरानी ज्ञानेश्वरीमध्ये भक्तीवर फार फार जोर दिला आहे. ते म्हणतात—

तैसे माझिये भक्तिविण । जळो ते जियालेपण ।
अगा पृथ्वीवरी पाषाण । नसती काई ॥

भक्ति नसेल तर जिवतपणा देखील जळू दे माणसाला भक्ति नसेल तर पृथ्वीवरील पाषाण धोंडे फत्तर ह्याना जी किंमत ती त्याच्या जीवनाला किंमत.

ज्ञानेश्वरांच्या भाषेंत उपमा देऊन सांगायचे म्हणजे—

तुमच्याजवळ ज्ञान आहे, कर्म आहे पण भक्ति नाही म्हणजे जो प्रकार होईल तो असा—

शेतात खप पीक आले आहे, कणसे दाटून आली आहेत पण कणसांत दाणाच नाही —

कणेंविण सोपटें कणसें दाटली घनदाटें

किंवा एकादी सुंदर नगरी आहे, रस्ते इमारती उत्तम आहेत, पण त्या नगरीत माणसेच नाहीत—

काय करावे गोमटें वोस नगर

किंवा एकादी स्त्री आहे, अप्सरेसारखी सुंदर आहे, कुबेरासारखी श्रीमंत आहे, पण तिच्यात प्राणच नाही.—

शरीर आहे सावेव परी जीवचि नाही

× × ×

हे उत्तर ऐकून तो गृहस्थ म्हणाला—

ज्ञानेश्वरानी ज्ञानेश्वरी लिहून नामदेवाची भेट होण्यापूर्वी भक्तीवर खूप जोर दिला ह्यात संशय नाही.

बसमध्ये बसलेले एक डॉक्टर मला म्हणाले—

' हे भक्तीमार्गी लोक कर्तव्य करत नाहीत, निवृत्तीमार्ग स्वीकारतात, पलायनवाद मानतात– ह्यामुळे आपल्या देशाचा अधःपात झाला आहे मला वाटते एकंदरीत भक्ती वाईटच. '

मी म्हटले—

अहो, भक्ति वाईट नाही भक्ति नीट समजून न घेणे वाईट. '

डॉक्टर म्हणाले—

तुम्ही खूप वाचले आहे. पौर्वात्य पाश्चात्य ग्रंथांचा तौलनीक अभ्यास केला आहे. भक्तीची तुमची व्याख्या मला सांगा. '

मी सांगू लागलो—

' हे पहा—

आपण तत्वज्ञानाचा कागद घेतला व अनुभवाच्या रंगाने, विचाराच्या कुचल्याने त्यावर भक्तीदेवीचे चित्र रंगविले तर ती देवी आपणाला सांगेल–

समाजसेवेच्या गवाक्षतानी, कर्तव्यकर्माच्या पुष्पानी, अहंकारनाशाच्या धूपारतीने निष्कामतेच्या नैवेद्याने अंतःकरणातील दिव्य शक्तीची केलेली पूजा म्हणजे भक्ति.

× × ×

डॉक्टर म्हणाले—

आपले जीवन चांगले होण्यास भक्तीची ही व्याख्या मला एकदम शंभर टक्के मंजूर. '

बसने आम्ही लखनपूरहून निघालो व दुपारी तीन वाजता जम्मू येथे आलो. हे गाव पठाणकोटपासून ६७ मैल लाब आहे. रावी नदी ओलांडून जम्मू शहरावरून मार्गक्रमण करीत संध्याकाळी पाच वाजता आम्ही

उधमपूर ह्या गावी आलो हे गाव पठाणकोटपासून १०९ मैल अंतरावर आहे ह्या गावी अल्पोपहाराचा कार्यक्रम झाला.

ह्या ठिकाणी काही लोकांनी मला प्रश्न विचारले. त्यांनी विचारलेले प्रश्न व मी दिलेली उत्तरे थोडक्यात अशी—

## महाराष्ट्राचे पंचप्राण

प्रश्न– महाराष्ट्राचे पंचप्राण कोणते ? ह्यावर तुम्हाला काय वाटते ?

उत्तर– महाराष्ट्राचे पंचप्राण म्हणजे—

१) ज्ञानेश्वर, २) नामदेव, ३) एकनाथ, ४) तुकाराम व ५) रामदास

महाराष्ट्रप्रांत धनधान्याच्या बाबतीत इतर प्रांतांच्या मानाने कमी सुपीक असेल, पण साधुसंतांच्या बाबतीत तो फार फार भाग्यवान आहे. ज्ञानोबापासून विनोबापर्यंत आपल्या प्रांतात संतांची अखंड परंपरा सुरु आहे.

## पुस्ती वा दुरुस्ती

प्रश्न– धुळ्याचे नानासाहेब देव ह्यांनी समर्थांचे चरित्र लिहिले आहे. त्यांत असें म्हटले आहे की—

जो संत ज्या देवाचा भक्त त्या देवाचा जेव्हा जन्म झाला त्याच वेळी त्या संताचा जन्म झाला, असे एकच संत आहेत आणि ते म्हणजे रामदास. रामदास रामाचे भक्त. रामाचा जन्म चैत्र शुद्ध ९ दिवसा बारा वाजता झाला रामदासांचा जन्म देखील त्याचवेळीं म्हणजे चैत्र शुद्ध ९ दिवसा बारा वाजता झाला असा चमत्कार इतर कोणत्याहि संताच्या बाबतींत झाला नाहीं

ह्या बाबतींत तुम्हाला काय वाटते ?

उत्तर– ह्या म्हणण्याला पुस्ती वा दुरुस्ती जोडायला पाहिजे. रामदास रामाचे भक्त. त्याप्रमाणें ज्ञानेश्वर कृष्णाचे भक्त. रामाचा जन्म चैत्र शुद्ध ९ दिवसा बारा वाजता झाला त्याचवेळीं रामदासांचा जन्म झाला कृष्णाचा जन्म श्रावण वद्य ८ रात्री बारा वाजता झाला. त्याच वेळीं ज्ञानेश्वराचा जन्म झाला.

## ज्ञानेश्वरांच्याबद्दल महाराष्ट्राची भावना

प्रश्न– संत ज्ञानेश्वर महाराष्ट्राला फार फार पूज्य आहेत आपणाला काय वाटते ?

उत्तर– संत ज्ञानेश्वर संतांचे संत, पंतांचे पंत, तत्त्वज्ञांचे तत्त्वज्ञ, विद्वानांचे विद्वान् व साहित्यिकांचे साहित्यिक आहेत.

आकाशाला उपमा आकाशाचीच, सागराला उपमा सागराचीच, त्याप्रमाणें ज्ञानेश्वरांनीं लिहिलेल्या ज्ञानेश्वरीला उपमा ज्ञानेश्वरीचीच. संस्कृतमध्यें असें म्हणता येईल—

गगनं गगनाकारं सागरः सागरोपमः ।
ज्ञानेश्वरी महाराष्ट्रे ज्ञानेश्वरीव विद्यते ॥

मारुतीने जन्मल्याबरोबर सूर्यबिंब ग्रासायला उडी मारली असें म्हणतात, त्याच चालीवर असें म्हणता येईल की—

मराठीच्या जन्मकाळी ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहून इतकी उंच उडी मारली आहे की– तितकी उंच उडी आजपर्यंत मराठीतील कोणत्याहि पुस्तकाने मारली नाही

कार्लाईलने म्हटले आहे की–

इंग्लंड एकवेळ साम्राज्य सोडेल, पण शेक्सपीअर सोडणार नाही.

ह्याच सुरावर असे म्हणता येईल की—

महाराष्ट्र एकवेळ संयुक्त महाराष्ट्र सोडेल, पण ज्ञानेश्वर सोडणार नाहीं.

## ज्ञानदेव नामदेवांची जोडी

प्रश्न– महाराष्ट्रातील संतांच्यामध्ये ज्ञानदेव नामदेवांची जोडी अपूर्व आहे. खरें आहे ना हे ?

उत्तर– अगदीं खरे आहे. असें म्हणता येईल की—

ज्ञानदेव नामदेवांची जोडी सगुण – निर्गुणाचा वाद मोडी आणि ह्यातच परमार्थाची गोडी

❊

## सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरी

**प्रश्न**– असें म्हणतात की ज्ञानेश्वरानी सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरीसारखा अलौकिक ग्रंथ लिहिला मला वाटते इतक्या लहान वयांत कोणीहि मनुष्य इतका विद्वान् झाला नाही. तुम्हाला काय वाटते ?

**उत्तर**– तुमचें मत बरोबर नाहीं आद्य श्री शंकराचार्य आठ वर्षाचे असताना त्याना चार वेद यायला लागले. बारा वर्षाचे असताना ते सर्वशास्त्रवित् झाले. सोळाव्या वर्षी त्यानी भाष्यासारखा अलौकिक ग्रंथ लिहिला व बत्तीस वर्षाचे असताना ते इहलोक सोडून गेले त्याबद्दलचा संस्कृत श्लोक असा—

**अष्टवर्षे चतुर्वेदी द्वादशे सर्वशास्त्रवित ।**
**षोडशे कृतवान् भाष्यं द्वात्रिंशे मुनिरत्ययगात् ॥**

चीनचा प्रख्यात तत्वज्ञ कन्फ्यूशिअस लहान वयातच इतका विद्वान् होता की त्याच्या सोळाव्या वर्षी त्याचे सारे गुरु म्हणाले की—

तू आता इतका विद्वान् झाला आहेस की– आता तुला शिकवायला आमच्याजवळ कांहीही नाही.

## पहाटे गीतावाचन

**प्रश्न**– आपल्या साऱ्या संताना कृष्णाने सांगितलेली गीता फार प्रिय त्याना वाटते की—

प्रत्येकाने रोज पहाटे गीता वाचावी.

तिकडच्या लोकाना गीता प्रिय वाटते कां ? या बाबतीत थोडी माहिती आपण सांगितली तर बरे होईल.

**उत्तर**– गीता साऱ्या जगांत प्रिय आहे. महात्मा गांधी लंडनमध्ये गेले होते. ते एका मोठ्या लायब्ररीत गेले. त्यानी ग्रंथपालाला विचारले— What is the book in this library, for which there is highest demand ?

( ह्या लायब्ररीत असे कोणते पुस्तक आहे की ज्याला जास्तीत जास्त मागणी आहे ? )

ग्रंथपालाने उत्तर दिले—

तें पुस्तक म्हणजे गीता ( That book is Geeta )

कार्लाईलने इमर्सनला भेट म्हणून जे पुस्तक दिले तें म्हणजे गीता. इमर्सन म्हणतो—

Geeta means empire of thought

गीता म्हणजे विचाराचे साम्राज्य

आज जगात जे हयात विद्वान् आहेत त्यामध्ये सर्वात मोठा मान डॉ. टॉयन्बीला दिला जातो. तो म्हणतो की—

गीता हें इतके उत्कृष्ट पुस्तक आहे की– जर माझ्यावर असे बंधन घातले की जवळ एकच पुस्तक ठेवायचे तर मी जे पुस्तक ठेवीन ते म्हणजे गीता

अमेरिकेत १८१७ साली जन्मलेला थोरो फार मोठा तत्त्वज्ञानी होऊन गेला. थोरोचे नाव घेतले की पाश्चात्य समाज एकदम नतमस्तक होतो.

पंडित जवाहरलाल नेहरूंना विचारण्यात आले—

' तुमची प्रकृति इतकी चांगली आहे. ह्याचे रहस्य काय ?'

नेहरू म्हणाले—

" ह्याचें रहस्य इतकेच कीं रोज उठल्यावर मी शीर्षासन करतो "

थोरोला विचारण्यात आलें—

" तुम्ही इतके मोठे तत्त्वज्ञ आहा तुमचे विचार आचार इतके चांगले आहेत ह्याचे रहस्य काय ? "

थोरो म्हणाला–

" ह्याचें रहस्य इतकेच की रोज पहाटे उठल्यावर मी गीता वाचतो. "

× × ×

मी हें सांगितल्यावर लोकांनीं एकदम टाळ्या वाजवल्या.

गणेश,

उद्यमपूरला अल्पोपहाराचा कार्यक्रम आटोपल्यावर आम्ही बसने सायंकाळीं सात वाजतां कूद गावी आलो हें गांव पठाणकोटपासून १३२ मैल आहे. कूदहून आम्ही लगेच निघालो व रात्री ८ वाजता बटोत गांवी

झालो. हें गांव पठाणकोटपासून १४५ मैल लांब आहे ह्या ठिकाणी रात्री मुक्काम करणेचा होता.

जेवण झाल्यावर आम्ही कांही मंडळी बागेत बसलो होतो तेथे निर-निराळ्या तऱ्हेचे गुलाब पाहून मन प्रसन्न होत होते. असें वाटत होते की—

हरतऱ्हेचे व लहान मोठ्या आकाराचे गुलाब पाहावे तर ते काश्मीरात.

काश्मीरला आशियाचे स्वीत्झरलंड म्हणतात. फरक इतकाच की स्वीत्झरलंडमध्ये सौंदर्य आहे ते कृत्रिम ( Man made ) आहे तर काश्मीरचे सौंदर्य म्हणजे देवाने मुक्त हस्ताने उधळलेला सौंदर्याचा खजिना ( Natural ) आहे

बरोड समुद्रसपाटीपासुन ५१७० फूट उंच आहे. त्याची तुलना यू. पी मधील मन्सूरीशी केली जाते

बरोडच्या बागेंत बसलो असतांना लोक मला म्हणाले—

" तुम्ही कृष्णाचे भक्त जीवनाकडे तुम्ही कृष्णाच्या चष्म्यातून पहाता व गीतेच्या मांडीवर बसून बोलता ह्या प्रवासात आम्ही तुम्हाला खूप प्रश्न विचारणार आहों आम्ही प्रवास करत असताना नुसते काश्मीर म्हणत नाही तर म्हणतो—

काश्मीर कन्हय्या

आम्ही जीवनाचा देखील प्रवास करतो आहोंत. हा काश्मीर कन्हय्या आमच्या जीवनाचे सोने करील व प्रवास करत असताना आम्ही मनोमनी म्हणू—

प्रवास करा सावकाश । कन्हय्या झालासे कळस ॥

× × ×

ह्या बागेंत लोकांनी मला खूप प्रश्न विचारले. एका नितांत महत्वाच्या प्रश्नावर प्रवचन देत असताना मी सांगितले—

" आता मानव चंद्रावर पोचला अंतराळाचा शोध करणें चांगलें आहे, पण सुखी होण्याकरता नुसत्या अंतराळाचा शोध करून भागणार नाही. तर अंतराळाबरोबर अंतरंगाचा देखील शोध करायला पाहिजे. आपल्यामध्ये चार प्रांत आहेत

पहिला प्रांत आहे त्याचे नाव—

## विकार

ह्या प्रांतात असताना आपण कोणतीहि गोष्ट करू नये. एका सेशन्स कोर्टामध्ये प्रकार असा होता की—

एक मनुष्य बाहेरून घरीं आला व त्याने आपल्या बायकोजवळ पाय धुवायला पाणी मागितले. बायकोने थंड पाणी आणून दिले ऊन पाणी देण्याचे ऐवजी थंड पाणी आणले म्हणून नवरा संतापला. त्याने लगेच पहार घेतली व ती बायकोच्या डोक्यात जोरात मारून तिला ठार मारले. बायको मेल्यावर मग त्याला पश्चात्ताप झाला

त्याच्यावर खुनाचा आरोप ठेवण्यात आला होता. कोर्टांत आरोपी म्हणून बसला असताना त्याच्या डोळ्यांत सारखे पाणी येत असे. आपण केवढा महान् मूर्खपणा केला म्हणून त्याला पश्चात्ताप वाटत असे.

एकादी गोष्ट घडली की प्रथम आपण विकाराच्या प्रांतात जातो. ह्या प्रांतात असताना आपण कृति करू नये. पुढच्या प्रांतात जावे. विकाराच्या पलीकडे जो प्रांत आहे त्याचें नाव—

## विचार

ह्या प्रांतात आल्यानंतर आपण विचार करू लागतो. विचार दोन प्रकारचे असतात–( १ ) कुविचार ( २ ) सुविचार.

कुविचार स्वर्गाचा देखील नरक बनवतात तर सुविचार नरकाचा देखील स्वर्ग बनवतात.

ह्या प्रांतात असताना कृति न करताना आपण पलीकडच्या प्रांतात जावे. विचाराच्या पलीकडे जो प्रांत आहे त्याचे नांव—

## विवेक

ह्या प्रांतात असताना माणसाने कृति करावी म्हणजे पश्चात्ताप होत नाही. सान्या तत्वज्ञानाचे सार सागताना असें म्हटले जाते—

श्लोकार्धेन प्रवक्ष्यामि यदुक्त ग्रंथकोटिभि. ।
ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापर ॥

कोट्यावधी ग्रंथात जे सांगितले आहे ते मी अर्ध्या श्लोकांत सांगतो. ब्रह्म सत्य आहे, जग मिथ्या आहे व जीव आणि ब्रह्म एकच आहेत

गीतेचे सार सांगताना ह्याच सुरावर असें म्हणता येईल की—

श्लोकार्धेन प्रवक्ष्यामि उक्तं कृष्णेन यत्खलु ।
ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ॥

कृष्णाने गीतेंत जे खरोखर सांगितले आहे ते मी अर्ध्या श्लोकांत सांगतो बा अर्जुना, ईश्वर सर्वांच्या अंतःकरणात आहे

आपण असे लक्ष्यांत घ्या की देव देवळांत नाहीं, मशिदीत नाही, चर्चमध्ये नाही तर तो प्रत्येकाच्या अंतःकरणात आहे

विवेकाच्या पलीकडे प्रांत आहे तो अंतःकरणाचा ह्या प्रांताचे नांव आहे—

## विराम

ह्या प्रांतात आल्यानंतर देव भेटतो तोपर्यंत नाही.

ह्या जगांत देव नाही असें म्हणण्याची फॅशन आहे एकादा मनुष्य म्हणाला की—

माझा देवावर विश्वास आहे.

तर लोक म्हणतात— हा मनुष्य अडाणी आहे. सुशिक्षित नाही. गावंढळ आहे.

एकादा मनुष्य म्हणाला की—

I don't believe in God. माझा देवावर विश्वास नाही—

तर लोकाना वाटते—

हा खूप शिकलेला दिसतो. हा विद्वान् आहे. तसाच शहाणा आहे.

देव नाही म्हणणाऱ्या शहाण्या लोकांचा सर्वात मोठा आधार म्हणजे डॉ. जोड

डॉ जोडने खूप ग्रंथ लिहून असे दाखवून दिले आहे की—

ह्या जगांत देव नाही.

डॉ. जोडला Greatest Modern Philosopher ( सर्वांत मोठा आधुनिक तत्त्वज्ञानी ) म्हणतात त्याने लिहिलेली पुस्तकें इतकी सुंदर आहेत की—

If you happen to read his books, you would be also tempted to say that there is no God in this *world*.

( जर त्याची पुस्तके वाचण्याचा योग तुम्हाला आला तर तुम्हाला देखील असे म्हणण्याचा मोह होईल की ह्या जगांत देव नाही )

इतकी सुंदर पुस्तके डॉ. जोडने लिहिली व त्याने लोकांची खात्री केली की–

ह्या जगांत देव नाही

ह्याच डॉ. जोडला जीवनाच्या सध्याकाळी गीतेत सांगितलेल्या सिद्धांताचा साक्षात्कार झाला. त्याला कळून आले की —

देव आपल्या अंत करणात आहे

डॉ. जोडला हा साक्षात्कार झाल्यानंतर थोडयाच काळांत त्याने आपली इहलोकीची यात्रा संपवली.

खूप पुस्तके लिहून ह्या जगांत देव नाही असे प्रस्थापित करणारा जोड आपला जगाला शेवटला संदेश देताना म्हणतो—

Before giving good-bye to this world, I want to give one message to the whole world

जगाला राम राम ठोकण्यापूर्वी साऱ्या जगाला एक संदेश देऊन मी येथून निघून जाणार

असे म्हणून डॉ. जोडने जगाला जो महान् संदेश दिला तो असा—

Only those persons become happy who believe in God.

तेच लोक सुखी होतात की ज्यांचा देवावर विश्वास आहे.

साधुसंत विरामाच्या प्रांतात येतात व त्याना देव भेटतो. संत लोकाना नीट समजले नाहीत म्हणजे हा संत चांगला तो संत वाईट असे म्हटले जाते. कांही कांही लोक तुकारामाना संत म्हणतात पण रामदासांचे नांव घेत

नाहीत. ह्याच्या उलट कांही लोक रामदासांना फार मानतात व तुकारामाला हीन लेखतात.

मित्र हो

अतरंगाचा शोध करताना आपणाला हे चार प्रांत लागतात. त्या बाबतीत महत्वाची वाक्ये अशी—

लोक म्हणाले

थांबा, आम्ही टिपून घेतो सावकाश सांगा.

मी सावकाश सांगू लागलो—

विकाराच्या प्रांतात विहार करतो तो दानव. विचाराच्या प्रांतात विहार करतो तो मानव विवेकाच्या प्रांतात विहार करतो तो सुमानव आणि विरामाच्या प्रांतात विहार करतो तो देवमानव.

विचाराच्या प्रांतात विहार करणारा मानव जेव्हा विवेकाच्या प्रांतात विहार करतो तेव्हा तो पंत होतो व तो जेव्हा विरामाच्या प्रांतात विहार करतो तेव्हा तो संत होतो पंत संतापुढे नमतो व जेव्हा पंत संत होतो तेव्हा जीवन भाग्यवंत होते

संतांच्याबद्दल खूपखूप वाद आहे नुसता वाद नाही तर विवाद देखील आहे, इतकेच काय तर प्रवाद देखील आहे हे सर्व वादविवाद पाहून लवाद नेमून न्यायाधीशाच्या भूमिकेतून निकाल करणेचा झाल्यास कबीरांच्या भाषेत म्हणता येईल की—

सब संत एक है

×                    ×                    ×

गणेश

रात्री बटोडला बंगल्यात मुक्काम करून आम्ही दुसरे दिवशी सकाळी ६॥ ला बसने निघालो व बटोडपासून १७ मैल दूर असलेल्या रामबनला आलो येथे सारा रस्ता चुनाब नदीच्या बाजूने जातो. ही नदी फार जोरात वहाते व ते दृश्य नितांत आल्हादकारक आहे. रामबन समुद्रसपाटीपासून २२५० फूट उंचावर आहे रामबनला पेयपानाचा कार्यक्रम झाला

त्यावेळी एका गृहस्थाने Sublimation उन्नतीकरणाबद्दल प्रश्न विचारला—

मी सांगू लागलो—

संतांच्या सहवासात आपले जीवन उन्नत होते. ह्याबाबतींत परमार्थात एक सुंदर गोष्ट आहे.

गोष्ट माणसाला फार प्रिय असते. लहान मुले गोष्ट ऐकण्याकरता फार उत्सुक असतात. गोष्टीबद्दलचे औत्सुक्य लहानापासून मोठ्यापर्यंत सर्वांना असते

मी गोष्ट सांगणार असें पाहून सारे लोक कान टवकारून ऐकूं लागले.

एक राजाराणी होते. त्याना फक्त एकुलती एक मुलगी होती मुलगा नव्हता. रात्री एक चोर राजवाड्यात शिरला व पलंगाखाली लपून बसला. राजाराणी पलंगावर बसून झोपेपूर्वी बोलत होते.

राजा राणीला म्हणाला—

आपणाला मुलगा नाही. मुलगी आहे. ती लग्नाला आली आहे. मला वाटते आपल्या मुलीचें लग्न एकाद्या साधूशी करावे व त्याला हें राज्य देऊन आपण हरि हरी म्हणत बसावे

राणी म्हणाली—

ही कल्पना फार चांगली आहे. त्यामुळे आपले व मुलीचे खरे खुरे कल्याण होईल.

राजाराणी झोपी गेले त्या पलंगाखाली लपलेल्या चोराला वाटले—

राजाराणी झोपी गेल्यावर आपण चोरी करणार होतो, पण चोरी करण्यापेक्षा आपणच साधू झालो व राजाची मुलगी आपली बायको झाली तर किती किती मजा होईल.

हा विचार प्रबळ झाला. तो चोर चोरी न करता बाहेर गेला व गावाबाहेर साधू रहात होते त्यांच्यामध्ये राहू लागला.

काही दिवसांनी राजाने आपला विचार प्रधानजीस सांगितला व आपल्या मुलीसाठीं योग्य साधू वर म्हणून पहाणेस सांगितले.

प्रधान कामगिरीवर निघाला. गावाबाहेर राहत असलेल्या साधूच्याकडे गेला व त्याने प्रत्येकाला राजाची इच्छा सांगितली.

प्रत्येक साधू म्हणू लागला—

" मला राज्य नको. राजाची मुलगी बायको नको मी आपला तपश्चर्या करत देवाची भेट घेण्याचा प्रयत्न करणार "

शेवटी त्या चोर साधूची पाळी आली. त्याने मुद्दाम थोडे आढेवेढे घेतले व मग म्हटले—

" आमच्या परमपूज्य राजेसाहेबाची इच्छाच आहे. त्याला मान देणें मी माझे कर्तव्य समजतो राजेसाहेबांच्या मुलीबरोबर लग्न करायला मी तैयार आहे. "

एक तरी साधू तयार झाला असे पाहून प्रधान खूष झाला त्याने राजवाड्यात जाऊन राजाला बातमी दिली राजवाड्यात आनंदी आनंद पसरला.

त्या साधूच्या संगतीत राहणारा तो चोर साधू विचार करू लागला—

मी राजाच्या मुलीबरोबर लग्न करायला तयार झालो. राज्य मिळणार म्हणून माझा आनंद गगनांत मावत नाहीं. पण येथील प्रत्येक साधू म्हणतो की—

मला राजाची मुलगी बायको नको व राज्य नको.

ह्याचा अर्थच हा कीं—

राजाची मुलगी पत्नी करून घेण्यात अथवा राज्य मिळण्यात जें सुख आहे त्यापेक्षा जास्त सुख ह्या साधूना मिळत आहे, म्हणूनच त्यानी प्रधान-जीला नकार दिला. मीच तेवढा खुळा दिसतो आहे; म्हणूनच ह्या साधूना मिळणारे अत्युच्च सुख सोडून मी प्रधानजीला होकार दिला

साधूंच्या सहवासामुळे त्या चोर साधूच्या विचारांचे उन्नतीकरण ( Sublimation ) झाले. त्याने लगेच प्रधानाला निरोप पाठवला—

" माफ करा मी चुकून होय म्हटले. मला राज्य नको व राजाची मुलगी बायको नको. तपश्चर्या करून देवाच्या भेटीसाठी मी प्रयत्न करणार आहे.

× × ×

ही गोष्ट ऐकून लोक म्हणाले—

' उत्कृष्ट Theory of Sublimation.

आम्हाला कळली आपले जीवन चांगले होण्यास सतसमागम फार उपयुक्त आहे सतांची पुस्तके वाचणे म्हणजे देखील संतसमागम होय असे आम्हाला वाटते. तुम्हाला काय वाटते ? '

मी म्हटले—

बरोबर आहे संताच्या वाङ्मयाचा सहवास म्हणजे देखील संतसमागम होय. असल्या सतसमागमामुळे आपले जीवन उन्नत होण्यास मदत होते '

× × ×

रामबनहून आम्ही निघालो व बनीहॉलला आलो. बनीहालच्या पुढे ' जवाहर टनेल ' आहे हा टनेल भारतसरकारने ३॥ कोटी रुपये खर्च करून १९५६ साली पुरा केला व १९५६ साली डॉ. राधाकृष्णन् ह्यांच्या हस्ते ह्याचे उद्घाटन झाले. पावणे दोन मैल लांबीचा हा बोगदा आशियात सान्यात मोठा बोगदा आहे. ह्या बोगद्याचे काम सात वर्षे चालले होते. ह्या बोगद्यामध्ये दोन मार्ग आहेत एक जाण्याकरता व एक येण्याकरता.

बोगदा सपला की खरे काश्मीर सुरु होते काश्मीर म्हणजे पृथ्वीवरील साक्षात् स्वर्ग आहे स्वर्ग मेल्यानंतर दिसतो म्हणतात, पण हा स्वर्ग आम्ही जिवतपणी पाहू शकतो. महाभारतात शेवटी पांडवांची महान् यात्रा सुरु झाली बाकीचे पांडव व द्रौपदी कडेपर्यंत गेले नाहीत युधिष्ठिर स्वर्गाच्या द्वारापर्यंत गेला. त्याच्या बरोबर एक कुत्रा होता त्या कुत्र्याला स्वर्गात प्रवेश करण्याची परवानगी मिळेला युधिष्ठिराला परवानगी मिळाली.

पृथ्वीवरील हा स्वर्ग अशी Partiality ( पक्षपात ) करत नाही. कुणीही यावे व ह्या स्वर्गात प्रवेश करावा आणि देवाने मुक्त हस्ताने उधळलेल्या सौंदर्याचा उपभोग घ्यावा

अत्युच्च आनंदाच्या वातावरणात आम्ही जवाहर टनेलमधून प्रवास करत होतो तेथून आम्ही व्हेरीनागला आलो

व्हेरी नाग येथे जहांगीर बादशहाने कमलाच्या आकारांत बांधलेले झेलम नदीचे उगम स्थान आहे शेजारी एक सुंदर उपवन आहे हे उपवन जहांगीर बादशहाने १६१२ साली बनवले

ह्या उपवनांत हिंडत असताना कांटचा विषय निघाल्यावर मी सांगितले—

कांटला काठी हातात घेऊन हिंडण्याची सवय होती तो आपल्याच विचाराच्या तंद्रीत असे, व त्या तंद्रीत हातातली काठी फिरवत असे. एकदा तो तंद्रीत असताना व हातातली काठी फिरवत असताना ती काठी एका सरदाराला लागली तो सरदार रागावला, कांटवर ओरडला व म्हणाला—

"तू कोण आहेस ?"

तंद्रीतून जागा झालेला कांट म्हणाला—

"सरदार साहेब, मी कोण आहे त्याचाच मी तपास करत आहे त्याचे बरोबर उत्तर तुम्ही दिले तर माझी सर्वी इस्टेट मी तुम्हास बक्षीस देईन"

× × ×

व्हेरी नाग पाहून आम्ही निघालो व दुपारी १२ वाजतां काजीकुंडला आलो. हे ठिकाण पठाणकोटपासून २०५ मैल लांब असून समुद्रसपाटीपासून ५६६७ फुट उंचीवर आहे. येथे आम्ही जेवण घेतले

आमच्यापैकी एक गृहस्थ फार सुपारी खायचे. ते स्वत टिळकभक्त होते मला साहित्याचार्य केळकरांच्या उद्गाराची आठवण झाली

लोकमान्य टिळक वारल्यानंतर कांही लोक त्यांच्याप्रमाणे पगडी घालू लागले तर कांही लोक त्यांच्याप्रमाणे पुणेरी जोडा घालू लागले. कांही लोक त्यांच्याप्रमाणे बंडी घालू लागले तर पुष्कळ लोक त्यांच्याप्रमाणे फार सुपारी खाऊ लागले

टिळकांचे गुण घेण्याच्याऐवजी असला प्रकार पाहून साहित्याचार्य केळकर म्हणाले—

लोकांनी लोकमान्यांचा कित्ता घेण्याच्या ऐवजी अडकित्ता घेतला.

× × ×

जेवताना मला एक गृहस्थ म्हणाला—

तुम्ही गीता सांगणाऱ्या कृष्णकन्हय्याचे खरे प्रचारक आहा तुम्ही कृष्णप्रेमाने खूप बोलता व त्याचा आमच्यावर फार परिणाम होतो

दुसरे एक गृहस्थ म्हणाले—

अहो प्रचारकाने बोलले पाहिजे बोलणाऱ्याचा माल खपतो न बोलणाऱ्याचा माल खपत नाही

मी म्हटले—

"तुम्हाला एक सुंदर वाक्य सांगू ?"

लोक म्हणाले—

"सांगा आम्ही ते वाक्य आमच्या डायरींत टिपून ठेवतो."

मी सावकाश सांगू लागलो—

"बोलणाऱ्याचे चुरमुरे सुद्धा खपतात, न बोलणाऱ्याचे मोतिचूर देखील खपत नाहीत"

"वाहवा" लोकांच्या तोंडून उत्स्फूर्त उद्‌गार निघाला.

× × ×

काजीकुंडहून आम्ही बसने निघालो. श्रीनगरला जाऊन मुक्काम करणेचे असे ठरले होते काजीकुंडहून श्रीनगर ४४ मैल लांब आहे. रस्त्यावर दुतर्फा पॉपलर वृक्षाच्या रांगाच रांगा आहेत श्रीनगरपासून अलीकडे आठ मैलावर केशराच्या मळ्याबद्दल प्रसिद्ध असलेले पांपोर गांव आहे. आम्ही गेलो त्यावेळी केशराचा सीझन नसल्यामुळे पाम्पोर गावात जाऊन केशराचे मळे पाहण्याचा योग मला आला नाही.

काजीकुंडहून श्रीनगरला जाताना मी एक मासिक वाचत होतो. रत्नागिरीस डिस्ट्रिक्ट जज्ज असताना मी ऐकले होते की—

रत्नागिरी जिल्ह्यांत एका खेड्यात एक मांत्रिक राहत होता. तो कृष्णकन्हय्याचा भक्त होता तो कोठेहि गेला तरी त्याच्या खिशांत कन्हय्याचा फोटो असे. त्यावेळी सापावरचे औषध निघाले नव्हते. त्या मांत्रिकाजवळ एक मुळी असे साप चावल्यावर तो मांत्रिक मंत्र म्हणून मुळी उगाळून देत असे व सापाचें वीष उतरत असे. विशेष गोष्ट अशी की—

कृष्णकन्हय्याची सेवा म्हणून हें काम तो मांत्रिक करत असे व त्याबद्दल एक पै देखील घेत नसे. लोकांच्यावर फार उपकार करणाऱ्या त्या मांत्रिकाला लोक मोठ्या भक्तिने नमस्कार करत पण तो मांत्रिक म्हणे—

मला नको माझ्या कृष्णकन्हय्याला नमस्कार करा.

लोक विचारीत—

"तुम्ही मंत्र म्हणून मुळी उगाळून देता व सापाचे वीष उतरवता. तुमचे मानधन किती ?"

तो मांत्रिक म्हणे—

"तुमचे व माझे भावबंधन हेंच माझे मानधन"

लोकांच्यावर पराकाष्टेचा परोपकार करणाऱ्या त्या मांत्रिकाचा कोणी सत्कार करु लागले तर तो एक गोष्ट सांगे

एकदा येसू ख्रिस्त गाढवावर बसुन चालले होते. लोक येसू ख्रिस्ताचा सत्कार करु लागले.

गाढवाला वाटले—

लोक आपलाच सत्कार करत आहेत.

ही गोष्ट सांगुन तो मांत्रिक म्हणे—

"अहो, कृष्णकन्हय्याला डोक्यावर घेऊन मी जीवनाचा प्रवास करत आहे लोक त्या कृष्णकन्हय्याचा सत्कार करतात तो सत्कार माझा आहे असें म्हणण्याचा गाढवपणा मी करावा कां ?"

मी रत्नागिरीस असताना त्या मांत्रिकाबद्दलच्या कांही गोष्टी ऐकल्या होत्या त्यावेळी तो हयात नव्हता हयात असता तर त्याला मी मुद्दाम भेटलो असतो.

बसमध्ये मी जे मासिक वाचत होतो त्यामध्ये कोकणच्या त्या मांत्रिकाची एक सत्यकथा दिली होती. ती कथा मी मोठ्या तन्मयतेने वाचू लागलो.

खेड्यात राहणाऱ्या त्या मांत्रिकाचा मुलगा एकदा फार आजारी पडला. मुलगा तापाने फणफणू लागला. खेड्यात कोणी डॉक्टर नव्हता. तो मांत्रिक

शहराकडे निघाला मुलाला खांद्यावर टाकून कृष्णाचे नाव घेत पाच मैल चालून तो शहराकडे आला व एका डॉक्टरकडे गेला मुलगा तळमळत होता. मांत्रिक डॉक्टराना म्हणाला—

‘ मुलगा फार आजारी आहे. ह्याला औषध द्या ’

डॉक्टर म्हणाले—

आत्ता मला वेळ नाही. क्लबाला जायची माझी वेळ झाली आहे. ’

मांत्रिक म्हणाला-

‘नाही म्हणू नका हा मुलगा तुमचाच मुलगा आहे असें समजा. कृपा करा. ह्याला तपासा. औषध द्या पाच मैलावरून ह्याला घेऊन मी तुमच्याकडे आलो आहे ’

डॉक्टर म्हणाले—

दुसऱ्याच्या मुलाला माझा मुलगा म्हणायला मी काही तुझ्यासारखा मूर्ख नाही ’

असे म्हणून त्या मुलाला न तपासता, त्याला औषध न देता डॉक्टर महाशय क्लबला गेले व ब्रिज खेळूं लागले

डाव रंगात आला ग्रँड स्लॅम करण्याकरता मोठ्या आनंदाने डॉक्टरानी कॉल दिला—

सेवन हार्टस्

आणि इकडे तापाने फणफणणारा तो मुलगा हार्टफेल होऊन देवाघरी गेला

डॉक्टर तिकडे आनंदाच्या हिंदोळ्यावर झोका घेत आहेत, आणि इकडे दु:खाच्या अग्निने पेटलेला मांत्रिक मुलाचे प्रेत खांद्यावर घेऊन डोळ्यातून अश्रूधारा वाहत आपल्या खेड्याकडे चालला आहे. तो मनात म्हणतो आहे—

“ ह्या बाळाला औषध सुद्धा मिळाले नाही. डॉक्टरानी ह्याला तपासून औषध दिल असतं व मग मुलगा मेला असता तर ह्या मुलासाठी प्रयत्न केला एवढं तरी समाधान लाभलं असत. हीच का शहरी संस्कृती ? डॉक्टर खूप शिकले आहेत मी तितका शिकलो नाही पण शिक्षण म्हणजे माणुसकीच

विस्मरण नव्हे खेड्यात असा प्रकार झाला नसता व्याख्यानात शहरातले सुशिक्षित लोक म्हणतात—

कृष्ण आमचा पिता, गीता आमची माता

हीच का त्या पित्याची व त्या मातेची शिकवण? ... ”

आपल्या मुलाचे प्रेत खांद्यावर घेऊन मांत्रिक घरी आलेला पाहून त्याच्या बायकोने दु:खाने हंबरडा फोडला व ती धाडकन् जमीनीवर पडली

× × ×

काही दिवस गेले त्या डॉक्टराच्या मुलाला साप चावला. त्या मांत्रिकाकडे निरोप गेला. मांत्रिक आपल्या खेड्यातून शहराकडे निघाला. शहराजवळ आल्यावर त्याचे डोके म्हणाले—

“ अरे, तू मूर्ख आहेस का? डॉक्टराने तुझ्या मुलाला औषध दिले नाही. तुझा मुलगा मेला तू का त्या मुलाला मुळी उगाळून देतोस ? मरेना का तो मुलगा ”

हा विचार आल्याबरोबर मांत्रिक मटकन् खाली बसला त्याचे पाय चालेनात.

त्याचे अंतःकरण म्हणाले—

“ अरे, डॉक्टराने पाप केले, पण त्याच्या मुलाने काय पाप केले आहे ? त्या मुलाला वाचवणें तुझे कर्तव्य नाही का ? ”

त्या मांत्रिकाचे डोके व त्याचें अंत:करण ह्यांचा झगडा सुरु झाला

डोके म्हणाले—

“ अंत:करणाचे तू ऐकू नको तुझ्या मुलाला डॉक्टराने औषध दिले नाही तू त्याच्या मुलाला विषाचे औषध देऊ नकोस तुझा मुलगा मेला. त्याचा मुलगा मरु दे. ”

अंत:करण म्हणाले—

‘ तुझे कर्तव्य काय ह्याचा विचार कर सुख येवो, दु:ख येवो; लाभ होवो, अलाभ होवो; माणसाने आपले कर्तव्य करणे म्हणजेच माणुसकी. माणुसकी म्हणजेच धर्म माणुसकीशिवाय धर्माची भाषा बोलणे म्हणजे सुराशिवाय संगीत आणि गळ्याशिवाय गाणे आहे. ’

डोके म्हणाले—

' अंत करणाला व्यवहार कळत नाही. सूडाला प्रतिसूड हा व्यवहार आहे सुडाचा प्रतिसूड घेतल्याशिवाय माणसाला समाधान मिळत नाही समाधाना-शिवाय शांति नाही आणि शांतिशिवाय कल्याण नाही '

अंत करण म्हणाले—

' माणसाने व्यवहार जरूर करायला पाहिजे, पण व्यवहाराचा पाया माणुसकी नसेल तर तो व्यवहार खरा व्यवहार होणार नाही. दया क्षमा शांति तेथे खऱ्या व्यवहाराची वसती. '

डोके म्हणाले—

' तुला मी ज्ञान सागतो जशास तसे हेंच खरे ज्ञान. '

अंतःकरण म्हणाले—

' ज्ञान भक्तियुक्त नसेल तर तें खरें ज्ञान नव्हे. भक्ति नसलेले ज्ञान म्हणजे ऐकायला न येणारा कान अरे, जशास तसे हे म्हणणे ठीक असले तरी डॉक्टराच्या मुलाने तुझा काय अपराध केला आहे ? डॉक्टराच्या अपराधाकरिता त्याच्या मुलाला शिक्षा म्हणजे का जशास तसे हा न्याय ? Duty for duty's sake कर्तव्याकरता कर्तव्य हेंच खरे ज्ञान, ह्यातच आहे समाधान, आणि हाच माणसाचा खरा मानपान डॉक्टराने आपले कर्तव्य केले नाही म्हणून तू आपले कर्तव्य करणेंचे नाही हा कुठला न्याय ? '

रोज गीता वाचणाऱ्या मांत्रिकाला आठवले—

सर्वस्य चाहं हृदि संन्निविष्टो ।

कृष्ण कन्हय्या सर्वांच्या अंत करणात आहे

गीतेतला हा विचार आठवल्यावर तो मांत्रिक मनाशीच म्हणाला—

' डोक्याचे बोल म्हणजे माझे बोल. अंतकरणाचे बोल म्हणजे कृष्ण कन्हय्याचे बोल डोके व अंतःकरण ह्यांचा जेव्हा झगडा होतो — मी व कृष्ण कन्हय्या ह्याचा जेव्हा मतभेद होतो तेव्हा ' मी ' ने कृष्ण कन्हय्याला शरण जाणे व त्याच्या उपदेशाप्रमाणे वागणें म्हणजेच गीतेचें आचरण करणें — म्हणजेच जीवनाचें कल्याण करून घेणे '

×

तो मांत्रिक म्हणाला—

नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाऽच्युत ।
स्थितोऽस्मि गतसंदेह करिष्ये वचनं तव ॥

कृष्णा, तुझ्या प्रसादामुळे माझा मोह नष्ट झाला कर्तव्याची स्मृति मला झाली. माझा संशय फिटला तुझ्या उपदेशाप्रमाणे मी वागतो

शोध लागल्यानंतर आनंदाने आर्किमेडिस रस्त्यातून धावत राजवाड्याकडे निघाला त्याप्रमाणे तो मांत्रिक कर्तव्याचा शोध व बोध झाल्यावर खिशातील गीता हातात उंच धरून आनंदाने डॉक्टरांच्या घराकडे धावत निघाला

त्याने डॉक्टरांच्या मुलाला मंत्र म्हणून मुळी उगाळून दिली मुलगा हळूहळू शुद्धीवर आलाच व " आई बाबा " म्हणू लागला.

आईबापांचा आनंद गगनांत मावेना. डॉक्टर मांत्रिकाला म्हणाले—

" मी पापी आहे. दुष्ट आहे तुझ्या मुलाला मी औषध दिले नाही. तो मेला माझ्या मुलाला मरणाच्या दारांतून बाहेर आणलेस. हे घे तुला पाचशे रुपये बक्षीस."

मांत्रिक म्हणाला—

" डॉक्टरसाहेब, हा मुलगा माझाच मुलगा आहे. हे पाचशे रुपये माझ्या मुलाला मी बक्षीस देतो."

असे म्हणून त्या मांत्रिकाने त्या मुलाला पांचशे रुपये बक्षीस दिले त्या मांत्रिकाचा तो मनाचा मोठेपणा पाहून डॉक्टरच्या पत्नीच्या डोळ्यात पाणी आले तिने आपल्या हातातले सोन्याचे बिलवर काढले व ते बिलवर मांत्रिकाला देत ती म्हणाली—

" तू आमच्यावर फार फार उपकार केले आहेस. माझी भेट म्हणून हे बिलवर तुझ्याजवळ ठेव."

मांत्रिक डॉक्टर पत्नीला म्हणाला—

" तू माझी बहीण आहेस बहीण ओवाळणीला नाही म्हणत नाही. भाऊबिजेची ओवाळणी म्हणून हे बिलवर मी तुला देतो."

असे म्हणून त्या मांत्रिकाने डॉक्टर पत्नीला बिलवर दिले

त्याचा तो पराकाष्ठेचा मोठेपणा पाहून डॉक्टर व त्याची पत्नी त्याला नमस्कार करू लागले मांत्रिक म्हणाला—

" नमस्कार मला नाहीं करायचा; नमस्कार करायचा तो माझ्या कृष्ण कन्हय्याला. "

गणेश,—

आमच्या बसने काश्मीरच्या राजधानीत — श्रीनगरांत प्रवेश केला मी ती सत्यकथा तन्मयतेने वाचत होतो

तो दिव्य देखावा माझ्या डोळ्यापुढें तरंगत होता डोळयांत पाणी आणून डॉक्टर व त्याची पत्नी मांत्रिकाला नमस्कार करु पहात आहेत मांत्रिक कृष्ण कन्हय्या म्हणत आहे.

माझे डोळे पाणावले. मी मनोभावे नमस्कार केला व म्हटले—

कृष्ण कन्हय्या

पुढचें पत्र उद्या.

तुझा

राम

तो मांत्रिक म्हणाला—

नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाऽच्युत ।
स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव ॥

कृष्णा, तुझ्या प्रसादामुळें माझा मोह नष्ट झाला कर्तव्याची स्मृति मला झाली. माझा संशय फिटला तुझ्या उपदेशाप्रमाणे मी वागतो

शोध लागल्यानंतर आनंदाने आर्किमेडिस रस्त्यातून धावत राजवाड्याकडे निघाला त्याप्रमाणे तो मांत्रिक कर्तव्याचा शोध व बोध झाल्यावर खिशातील गीता हातात उंच धरून आनंदाने डॉक्टरांच्या घराकडे धावत निघाला

त्याने डॉक्टरांच्या मुलाला मंत्र म्हणून मुळी उगाळून दिली मुलगा हळूहळू शुद्धीवर आलाच व " आई बाबा " म्हणू लागला.

आईबापांचा आनंद गगनात मावेना. डॉक्टर मांत्रिकाला म्हणाले—

" मी पापी आहे दुष्ट आहे तुझ्या मुलाला मी औषध दिले नाही. तो मेला माझ्या मुलाला मरणाच्या दारांतून बाहेर आणलेस. हे घे तुला पाचशे रुपये बक्षीस. "

मांत्रिक म्हणाला—

" डॉक्टरसाहेब, हा मुलगा माझाच मुलगा आहे हे पांचशे रुपये माझ्या मुलाला मी बक्षीस देतो. "

असें म्हणून त्या मांत्रिकाने त्या मुलाला पांचशे रुपये बक्षीस दिले त्या मांत्रिकाचा तो मनाचा मोठेपणा पाहून डॉक्टरच्या पत्नीच्या डोळ्यांत पाणी आले तिने आपल्या हातातले सोन्याचे बिलवर काढले व ते बिलवर मांत्रिकाला देत ती म्हणाली—

" तू आमच्यावर फार फार उपकार केले आहेस. माझी भेट म्हणून हे बिलवर तुझ्याजवळ ठेव "

मांत्रिक डॉक्टर पत्नीला म्हणाला—

" तू माझी बहीण आहेस बहीण ओवाळणीला नाही म्हणत नाहीं. भाऊबिजेची ओवाळणी म्हणून हे बिलवर मी तुला देतो "

असे म्हणून त्या मांत्रिकाने डॉक्टर पत्नीला बिलवर दिले.

त्याचा तो पराकाष्ठेचा मोठेपणा पाहून डॉक्टर व त्याची पत्नी त्याला नमस्कार करू लागले. मान्त्रिक म्हणाला—

" नमस्कार मला नाहीं करायचा; नमस्कार करायचा तो माझ्या कृष्ण कन्हय्याला "

गणेश,—

आमच्या बसने काश्मीरच्या राजधानीत — श्रीनगरांत प्रवेश केला मी ती सत्यकथा तन्मयतेने वाचत होतो.

तो दिव्य देखावा माझ्या डोळ्यापुढें तरंगत होता. डोळ्यांत पाणी आणून डॉक्टर व त्याची पत्नी मांत्रिकाला नमस्कार करु पहात आहेत मांत्रिक कृष्ण कन्हय्या म्हणत आहे.

माझे डोळे पाणावले मी मनोभावे नमस्कार केला व म्हटले—

कृष्ण कन्हय्या

पुढचें पत्र उद्या.

तुझा

राम

## पत्र तिसरे

प्रिय गणेश

आम्ही लालारुख हॉटेलमध्ये उतरलो आहोत. मला व सौभाग्यवतीला एक मोठी खोली मिळाली आहे त्याच्या बाहेर स्वतंत्र दोन गॅलऱ्या आहेत. बाथरुम संडास सर्व त्या खोलीला लागून आहे. सर्व सोयींनी युक्त अशी ती अलीशान खोली आहे. ह्या खोलीमधून काश्मीरची शोभा दिसते आहे.

वाङ्मयात स्वर्गाची कल्पना आहे, पण तो मेल्यावर दिसतो. ज्याला जिवतपणी स्वर्ग पहाणेचा असेल त्याने काश्मीरची सहल करावी.

### काश्मीर म्हणजे पृथ्वीवरील साक्षात् स्वर्गच

काश्मीर म्हणजे नंदनवन आहे. जगामध्ये सौंदर्याबद्दल स्वित्झर्लंड प्रसिद्ध आहे काश्मीरला आशियाचे स्वित्झर्लंड म्हणतात, पण दोहोमध्ये फरक असा आहे की—

स्वित्झर्लंडमधील सौंदर्य कृत्रिम ( मॅन मेड ) आहे तर काश्मीरमधील सौंदर्य नैसर्गिक ( नॅचरल ) आहे.

जहांगिर आजारी असताना त्याला शेवटची इच्छा विचारण्यात आली तेव्हा तो म्हणाला—

सिर्फ काश्मीर.

फारशी कवी म्हणतो—

अज शाहे जहांगीर दमे नजा चूँ जुस्तबंद
बा ख्वाहिशे दिल गुफ्त कि काश्मीर दिगर है च।

मेल्यावर स्वर्ग पहाण्येपेक्षा लोकाना वाटते की—

जिवंतपणीच आपण साक्षात् स्वर्ग असलेले काश्मीर पाहून घेऊ.

काश्मीरचे दर्शन खरोखर मनमोहक सुखकारक आनदकारक आहे. ह्या ठिकाणी जिकडे तिकडे पाणी आहे

आम्ही उन्हाळ्यात काश्मीरला आलो आहे. मे महिना सुरु आहे, पण येथे हुश हुश नाही. खोलीत पखा नाही एअर कंडिशनची व्यवस्था करणेचे कारण नाही आम्हाला हॉटेलने फोमच्या गाद्या, फोमच्या उशा व रग दिले आहेत एकदर प्रकार मस्त आहे.

काश्मीरचे पत्थर देखील शीतल पाणी देत आहेत ऊर्दुचे प्रसिद्ध शायर ब्रजनारायण चकबस्त म्हणतात—

जरी जरी है मेरे काश्मीरका मेहमा नवाज,
राह मे पत्थरके टुकडोंने दिया पानी मुझे।

× × ×

आम्ही शंभर यात्रेकरु आहो. सारे लोक काश्मीरात आल्यावर आनंद सागरात पोहत आहो. अपवाद म्हणून कांही तुरळक लोक दु.खी चेहरा करून बसले आहेत तो प्रकार पाहून विदर्भात म्हटल्या जाणाऱ्या मराठी शायरीमधून एक कविता आम्हा यात्रेकरुपैकी एकाने पहाडी आवाजात म्हटली. ती कविता ऐकून आम्हाला मनापासून हसू आले.

त्या कवितेमध्ये कवि म्हणतो—

एकदा मी स्वर्गात गेलो. जिकडे तिकडे आनद ओसडून वाहत होता

जिकडे तिकडे आनद चोहीकडे– असा प्रकार होता पण—

एका कल्पवृक्षाखाली मला कांही लोक दिसले त्यांचा चेहरा सुतकी होता. त्याचे कपडे मळके होते.

कल्पवृक्ष माणसाला मागेल ते देतो

ह्या स्वर्ग आहे. ह्या कल्पवृक्ष आहे ह्या कल्पवृक्षाखाली असणाऱ्या ह्या लोकाचे चेहरे सुतकी कसे ? हे लोक दीन दुःखी कसे ?

हा प्रश्न मला भेडसावू लागला

जिकडे तिकडे स्वर्ग पण ह्या कल्पवृक्षाखाली मात्र पृथ्वी— हा प्रकार कसा ? मी विचार करू लागलो मला ते कोडे सुटले नाही.

शेवटच्या ओळीत कवि म्हणतो—

शेवटी मी तपास केला तेव्हा मला कळून आले की स्वर्गात आलेले हे लोक सर्वोदयवादी आहेत

× × ×

आम्ही यात्रेकरू आनंदात होतो, पण कांही तुरळक लोक दुःखी चेहरा करून बसले असतावा त्या काव्यात कविने केलेले विडंबन ऐकून जिकडे तिकडे—

हास्याची लकेर दरवळू लागली विशेष गमतीची गोष्ट अशी की जे लोक दुःखी चेहरा करून बसले होते तेहि हसू लागले त्याचे दुःख एकदम पळून गेले.

मला वाटू लागले—

खरा विनोद माणसाला घडवतो, तर खोटा विनोद माणसाला बिघडवतो खरा विनोद माणसाच्या दुःखावर फुकर घालतो तर खोटा विनोद माणसाच्या दुःखावर डागणी देतो. दुःखिताना आणखी दुःख देण्याकरिता तुम्ही विनोद करत असाल तर तुमचा विनोद विनोद नसून दुष्टपणा आहे. विनोद म्हणजे वात्रटपणा नव्हे पांचटपणा नव्हे किंवा चावटपणा नव्हे जीवनाच्या रंगभूमीवर दुःखाचा खरा सोबती विनोद आहे. जीवनातील विसंगति विकृति ह्यांच्याकडे दयाबुद्धिने पाहून विसंगतीला सुसंगतीकडे व विकृतीला सुकृतीकडे जो नेतो तो विनोद. जीवनाच्या हॉस्पिटलमध्ये विनोद आपरेशन करतो व दुःखी माणसाचे दुःख दूर करतो हे आपरेशन विनोद करतो ते शस्त्राने नव्हे तर शब्दाने.

× × ×

ह्या भागाला काश्मीर हें नाव कसे पडले ह्याबद्दल माहिती घेता मला समजून आले की—

प्राचीन काळी काश्मीरचा भूभाग सरोवर होता त्याला "सतीसर" असे म्हणत असत ह्या सरोवरात जलदेव नावाचा राक्षस राहत असे तो लोकाना फार त्रास द्यावयाचा. ह्या राक्षसाचा नाश करण्याकरता काश्यप ऋषीने तपश्चर्या केली. देव प्रसन्न झाला मग बारामुल्लाजवळच्या पर्वताला भोक पाडून त्या सरोवरातील पाणी काढण्यात आले नतर विष्णुने त्या राक्षसास ठार मारले. राक्षसास ठार मारल्यानतर काश्यप ऋषीने आर्यावर्तातील लोकाना बोलावून येथे वस्ती केली म्हणून त्याला काश्यप-मीर असें म्हणू लागले. काश्यपमीरचे नतर 'काश्मीर' झाले

ही हकिकत ऐकून मला मोठी मौज वाटली. आज काश्मीरमध्ये बहुसख्य मुसलमान आहेत. पूर्वी हे हिंदु होते, पण नतर त्याना मुसलमान धर्माची दीक्षा देण्यात आली.

कृण्वंतो विश्वमार्यम् । हें आपल्या पूर्वजाचे सूत्र होते, पण नतरच्या काळात हिंदु लोक खोटचा नाटचा सोवळचा ओवळयाच्या कल्पनानी भारून गेले व कृण्वंतो विश्वमार्यम् । हें सूत्र विसरून गेले

काश्मीरमध्ये मला जे कळून आले ते ऐकून मला फार वाईट वाटले.

काश्मीरमध्ये किती तरी लोक मुसलमान झाले होते. त्याना परत हिंदुधर्मात येण्याची इच्छा झाली. त्यानी इतर लोकाना म्हटले—

"आम्हाला हिंदु धर्मात घ्या."

इतर लोक म्हणाले—

"काशीच्या पंडितांचा सल्ला घेऊन या"

त्याप्रमाणे काशीच्या पडितांचा सल्ला घेण्यात आला. काशीचे पंडित म्हणाले—

'ह्या मुसलमान लोकाना ह्या जन्मी नाही हिंदु होता येणार पुढल्या जन्मी ते हिंदु होऊ शकतील.'

'ह्या जन्मी नाही पुढल्या जन्मी.'

हा सल्ला देणारे पडित जोपर्यंत हिंदुधर्मात आहेत तोपर्यंत ह्या धर्माचा

कशी भरभराट होणार ?

असा सल्ला मिळाल्यामुळे ते मुसलमान हिंदु झाले नाहीत.

केरळपासून काश्मीरपर्यंत पायी प्रवास करून वैदिक धर्माची ध्वजा फडकावणारे आद्य शंकराचार्य कोणीकडे आणि हे काशीचे पंडित कोणीकडे ? त्यावेळी काशीमध्ये स्वामी विवेकानदांच्यासारखे पंडित असते तर काश्मीरचा इतिहास बदलला असता.

× × ×

आम्ही श्रीनगरमधून एक फेरफटका मारून आलो व माझ्या खोलीच्या बाहेर सोफा सेटस टाकून बसणेची व्यवस्था केली आहे तेथे बोलत बसलो

गणेश,

काश्मीरमध्ये दारिद्र्य फार आहे आमचा वेटर दिसायला चागला आहे. काश्मीरी लोक दिसायला चागले असतात. सृष्टीदेवीने येथे सौंदर्याचा खजिना उघडला आहे हा सुदर वेटर पैशाने फार गरीब आहे. आम्ही तपास केला तेव्हा आम्हाला कळले की त्याला महिना पगार फक्त पासष्ट रुपये जेवणखाण देखील हॉटेलचे नाही तर घरचे जेवण. येथल्या लोकांचे दारिद्र्य पाहून आम्हाला त्यांची दया आली मुबईला टॅक्सीवाले खूप पैसे मिळवतात, पण ते उर्मट असतात, ह्याच्या उलट येथले फार कमी पैसे मिळवणारे लोक फार अदबीने वागतात.

आम्ही बोलत बसलो असताना एका गृहस्थाने संस्कृत श्लोक म्हटला—

यस्यास्ति वित्तं स नरः कुलीनः स पंडित स श्रुतवान् गुणज्ञ ।

स एव वक्ता स च दर्शनीय सर्वे गुणा काचनमाश्रयंते ॥

( ज्याच्या जवळ पैसा आहे तो मनुष्य कुलीन असतो, पंडित असतो, विद्वान् असतो, गुणज्ञ असतो, वक्ता असतो, सुदर असतो सारे गुण पैशाचा आश्रय करतात. )

मी म्हटले—

" अहो एका सस्कृत कवीला पैशापुढे सारे फिक्के वाटते, त्याला जातगोत नको, गुण नकोत, शील नको, शौर्य नको. फक्त पैसा पाहिजे.

त्याची समजून अशी आहे की पैशाशिवाय हे सारे गुण तृणवत्, नव्हे त्यापेक्षा कमी किमतीचे आहेत.

लोकानी विचारले—

' कोणता तो श्लोक म्हणा पाहू '

मी तो श्लोक म्हणू लागलो—

जातिर्यातु रसातलं गुणगणस्तत्राप्यधोगच्छतात् ।
शीलं शैलतटात्पतत्वभिजनः सन्दह्यतां वह्निना ।
शौर्ये वैरिणि वज्रमाशु निपतत्वर्थोऽस्तु नः केवलं
येनैकेन विना गुणास्तृणलवप्रायाः समस्ता इमे ॥

( जात रसातळाला जावो, गुणाचा समुदाय खलास होवो, शील खड्यात पडो, वंशाची राख रांगोळी होवो, शौर्य नष्ट होवो, पण — आम्हाला पैसा मिळाला म्हणजे पुरे. पैशाशिवाय हे सारे गुण तृणापेक्षा, नव्हे त्यापेक्षा कमी किंमतीचे आहेत )

लोक म्हणाले—

' हा श्लोक आम्ही ऐकला नव्हता श्लोक ऐकणीय आहे '

बोलता बोलता मला आणखी एक संस्कृत श्लोक आठवला—

दानं भोगो नाशः तिस्रो गतयो भवति वित्तस्य ।
यो न ददाति न भुङ्क्ते तस्य तृतीया गतिर्भवति ॥

( दान भोग व नाश ह्या धनाच्या तीन अवस्था आहेत जे धन दान किंवा भोग ह्यासाठी वापरले जात नाही त्याला तिसरी अवस्था प्राप्त होते. )

आम्ही बोलत बसलो असताना लोकानी मला प्रश्न विचारले. ते प्रश्न व मी दिलेली उत्तरे थोडक्यात अशी—

## राजेशाही व लोकशाही

प्रश्न- काश्मीरात पूर्वी राजेशाही होती, आता लोकशाही आहे भारतवर्षात पूर्वी राजेशाही होती आता लोकशाही सुरु झाली आहे. ह्याचा अर्थ कायदे करण्याचा अधिकार पूर्वी राजेलोकांचा होता तो अधिकार आता लोकांच्याकडे आला असेच नाही का ?

उत्तर– तसें नाही भारतवर्षात पूर्वी राजेशाही असताना राजाकडे कायदे करण्याचा अधिकार नव्हता ते काम स्मृतिकार करत असत आचारसंपन्न व विचारसंपन्न ऋषी मुनींनी कालानुरुप स्मृति कराव्या व ते कायदे अमंलात आणण्याचे काम राजाने करावे असा प्रकार होता

निरनिराळ्या स्मृतीमध्ये राजाने कसे वागावे, केव्हा उठावे काय करावे वगैरे बद्दल नियम सांगितले आहेत. मचिव किती नेमावे ह्याबद्दलहि नियम आहेत मनू म्हणतो—

मौलाञ्छास्त्रविदः शूराल्लँब्धलक्षान्कुलोद्गतान् ।
सचिवान्सप्तचाष्टौ वा प्रकुर्वीत परीक्षितान् ।।

वंशपरंपरागत शास्त्र जाणणारे, शूर, युद्धामध्ये प्रवीण कुलीन व परीक्षा घेऊन उत्तम ठरलेले असे सात अगर आठ सचीव राजाने नेमावे.

हिंदु राजांना ज्याप्रमाणे कायदे करण्याचा अधिकार नव्हता त्याचप्रमाणे मुसलमान बादशहांना देखील कायदे करण्याचा अधिकार नव्हता. त्यांचे काम म्हणजे कुराणाचा कायदा अमलात आणणे

जेव्हा राजेशाहीचे लोकशाहीत परिवर्तन झाले तेव्हा त्या परिवर्तनातील एक गोष्ट अशी की केवळ राज्यशासन लोकांच्याकडे आले असे नव्हे तर राजाकडे जो कायदे करण्याचा अधिकार नव्हता तो अधिकार देखील लोकांच्याकडे आला.

## स्वातंत्र्याचा हक्क व मालमत्तेचा हक्क

प्रश्न– लोकशाहीमध्ये माणसाला स्वातंत्र्याचा हक्क अस्तो, त्याचप्रमाणे मालमत्तेचा हक्क असतो मला वाटते लोकशाहीमध्ये वाटेल तितकी मिळकत मिळवण्याचा माणसाला मूलभूत हक्क असतो. ह्या हक्कावर बंधन घालता येणार नाही. तुम्हाला काय वाटते ?

उत्तर– लोकशाहीमध्ये माणसाला स्वातंत्र्याचा हक्क असतो पण त्या हक्कावर In the interest of public —सार्वजनिक हिताच्या दृष्टीने बंधन घातलेले असते. विनोद म्हणून आपण असे म्हणू शकू की—

वक्त्याला व्याख्यान देताना हातवारे करायचा जरूर हक्क आहे पण असे हातवारे करताना अध्यक्षांना न लागेल अशा तऱ्हेने हातवारे करण्याचे बंधन त्याने पाळायला नको कां ?

लोकशाहीमध्ये माणसाला मिळकतीचा हक्क जरूर आहे, पण वाटेल तितकी मिळकत मिळवण्याचा माणसाला मूलभूत हक्क आहे असे म्हणणे बरोबर नाही.

मर्यादित मिळकत हा माणसाचा मूलभूत हक्क आहे व्यक्तीच्या कल्याणासाठी माणसाला मिळकत हवी, पण ती मिळकत मर्यादित पाहिजे.

आपल्या धर्मसिद्धांताप्रमाणे अपरंपार अमर्यादित संपत्ति इष्ट नाही.

ना छित्वा परमर्माणि ना कृत्वा कर्म दुष्करम् ।
ना हत्वा मत्स्यघाती च प्राप्नोति महतीं श्रियम् ॥

आपल्या धर्मसिद्धांताप्रमाणे अपरंपार अमर्यादित संपत्ति पापमूलक असते.

आपण असे लक्ष्यात घ्या की – सत्तेचे केंद्रीकरण जसे वाईट त्याचप्रमाण संपत्तीचे केंद्रीकरण देखील वाईट

## समाजवाद

**प्रश्न–** आज समाजवाद हा परवलीचा शब्द झाला आहे. समाजवादी लोक भांडवलवादी सरकारची खूप चेष्टा करतात. भांडवलवादाच्या चष्म्यातून समाजवादी सरकारची टीका करताना काय म्हणण्यात येते ?

**उत्तर–** ह्या बाबतीत चर्चिलचे प्रख्यात उद्‌गार तुम्हाला सांगतो, म्हणजे तुमच्या प्रश्नाचें उत्तर मिळेल. चर्चिल म्हणतो—

मठ्ठ लोकांचे, मठ्ठ लोकांनी, मठ्ठ लोकांसाठी चालवलेलें सरकार म्हणजे समाजवादी सरकार समाजवादी सरकारात जिकडे तिकडे ' क्यू ' असतो. सिनेमापुढे, दुकानापुढे, बसगाडीपुढे, जिकडे तिकडे ' क्यू ' असतो समाजवाद म्हणजे युटोपिया नसून क्युटोपिया आहे.

## दानवाद

**प्रश्न–** आपण आज समाजवाद, भांडवलवाद असे शब्द ऐकतो. आपल्या पूर्वजांनी कोणता वाद प्रस्थापित केला होता ?

उत्तर- आपल्या पूर्वजानी जो वाद प्रस्थापित केला होता त्याचे नाव दानवाद

प्रश्न- ह्या दानवादाबद्दल सविस्तर माहिती कृपा करून सांगा मामटचा भिकाऱ्याला भिक्षा व भाडोत्री भटजीला भोजन म्हणजे दान अशी चेष्टा करण्यात येते आपण जरा खुलासा करा

उत्तर- दानधर्माची मुख्य कल्पना अशी आहे की —

अवनि म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा-अशा ज्या मानवी जीवनास अत्यावश्यक गोष्टी आहेत त्या सर्वांना मिळाल्या पाहिजेत व मग चैनीच्या वस्तु सर्वांना नाहीं मिळाल्या तरी चालतील

आपल्या पूर्वजानी पुण्य संपादन करण्याचे जें मार्ग आहेत त्याचे दोन भाग पाडले ( १ ) इष्ट म्हणजे यज्ञ व ( २ ) पूर्त म्हणजे दान.

इष्टापेक्षा पूर्ताची महती अधिक आहे.

इष्टेन लभते स्वर्गं पूर्ते मोक्ष समश्नुते ।

पूर्ताचे सहा भाग करण्यात आले आहेत.

## ( १ ) देवालये बांधणे

देवालयामध्ये धर्मशाळा असत. ह्या ठिकाणी कोणालाहि राहणेची सोय असे ह्यामुळे कोणीहि मनुष्य, रस्त्यावर उघडा पडत नसे धर्मशाळेमध्ये लोकाना राहणेची जागा व जरूर ते वस्त्र मिळण्याची सोय असे.

## ( २ ) वापी कूप तडाग वगैरे बांधणे

लोकाच्या उपयोगाकरता जलाशये बांधली जात जो जलाशये बांधतो तो वरुण लोकाप्रत जातो असे पूर्वीच्या वाङ्मयात म्हटले आहे. जलाशयामुळे कुणालाहि मोफत पाणी मिळण्याची सोय असे

## ( ३ ) अन्नदान करणे

दान धर्माचा तिसरा प्रकार म्हणजे अन्नदान करणे पूर्वीच्या काळी जिकडे तिकडे धर्मशाळा व अन्नशाळा असत. त्यामुळे अन्न वस्त्र निवारा ह्या वस्तु सर्वांना मोफत मिळत.

### ( ४ ) नाना प्रकारचे वृक्ष लावणे

नानाप्रकारचे वृक्ष लावणे हा दानधर्माचा चवथा प्रकार आहे.

आपले पूर्वज म्हणत असत की—

पुत्रापेक्षा वृक्षाची किंमत जास्त आहे वृक्ष हे पाने पालवी, फुले व फळे ह्यानी तर्पण करत असतात.

आपले पूर्वज झाडाची नावे ठेवीत, त्यांच्यावर ममता करीत व त्यांचे लग्नसमारंभ देखील करीत.

### ( ५ ) आजारी माणसांची सेवा करणे

दानधर्माचा पाचवा प्रकार म्हणजे आजारी माणसाची सेवा करणे रोग्याची सेवा करणे हे फार मोठे सामाजिक कार्य आहे, ह्या कल्पनेने आपल्या पूर्वजानी दानधर्माच्या प्रकारामध्ये आजारी माणसांची सेवा करणे हा प्रकार नमूद केला

### ( ६ ) विद्यावृद्धीकरता मदत करणे

दानाचा सहावा प्रकार म्हणजे विद्यावृद्धी करता मदत करणे

पैसा नाही म्हणून विद्या शिकता आली नाही असा प्रकार होऊ नये म्हणून हा दानाचा सहावा प्रकार करण्यात आला.

ह्या सहा गोष्टी जिकडे तिकडे प्रस्थापित झाल्या म्हणजे दानवाद झाला

आपल्या पूर्वजाना वाटत होते की ह्या सहा गोष्टी सर्वांना मिळू लागल्यानंतर चैनीच्या गोष्टीमध्ये श्रीमंत गरीब असा भेद झाला तरी हरकत नाही.

हा आपल्या पूर्वजाचा दानवाद समजून घ्या व आपला दानवाद म्हणजे आमच्या भिकाऱ्याला भिक्षा व भाडोत्री भटजीला भोजन ही टीका बरोबर आहे का ? ह्याबद्दल निकाल द्या.

× × ×

सर्व लोक म्हणाले—

' साहेब, ती टीका सर्वस्वी चूक आहे आपण फार उत्तम माहिती दिली

× × ×

गणेश,

रात्री लालारुख हॉटेलमध्ये जेवण झाल्यावर आमच्या खोलीत कांही लोक जमले. ते म्हणाले—

' साहेब, मार्कट्वेन एकदा भाषण करताना म्हणाला होता—

आज मीच माझें भाषण ऐकणार आहे.

खुलासा करताना तो म्हणाला—

आज मी तयारी करून आलो नाही. आज मी स्वत शीच मोठ्याने बोलणार आहे व ते भाषण मी ऐकणार आहे.

साहेब,

आज काश्मीरच्या राजधानीत आपण आलो आहो. काश्मीरबद्दल तुमच्या मनात खूप विचार दाटले असतील. तुम्ही खूप खूप वाचले आहे, खूप विचार केला आहे, खूप चिंतन केले आहे कृष्णाला – कन्हय्याला – स्मरून तुमचे चिंतन चालते आज तुम्ही स्वत शीच मोठ्याने बोला तुम्ही तुमचें भाषण ऐका अन् आम्ही देखील ऐकतो

× × ×

गणेश,

श्रीनगरला आल्यानंतर त्या पहिल्या रात्री माझ्या मनात खूप विचार दाटून आले होते हे खरे होते. मी बोलू लागलो—

' आपल्याकडे प्रवास वाङ्मय फार कमी आहे असे म्हटले जाते की खरे प्रवास वाङ्मय ते की ज्यामध्ये केवळ वृत्त असून नाही तर विचार देखील असतो. प्रवास करताना आपण निरनिराळ्या ठिकाणी जातो त्या ठिकाणचे वृत्त प्रवास वाङ्मयात जरूर येणेस पाहिजे, पण त्याचे बरोबर त्या ठिकाणी आपल्या मनात जे विचार आले ते देखील प्रवास वाङ्मयात जरुर घेणेस पाहिजेत

बॉरोन हयुगेलने इ स. १८३५ व १८३६ मध्ये काश्मीर व पंजाबचा प्रवास केला व त्याबद्दल त्याने आपल्या मायदेशात म्हणजे जर्मनीमध्ये गेल्यावर जे पुस्तक प्रसिद्ध केले ते नितांत वाचनीय आहे त्यामध्ये नुसते

चूत नाही तर विचार देखील आहे. ह्युगेल हा सरदार घराण्यातील आहे व विशेष म्हणजे तो तत्त्वज्ञ आहे.

मराठ्यांचे साम्राज्य इंग्रजांनी इ. सन १८१८ साली जिंकून घेतले. सबंध हिंदुस्थानात त्यांना कोणी प्रतिस्पर्धी नव्हता, मात्र पंजाब व काश्मीरवर सत्ता असलेले रणजित सिंगाचे राज्यच काय ते इंग्रजाविरुद्ध अद्याप ताठ उभे होते या राज्यात ह्युगेलने खूप प्रवास केला

ह्युगेलची व रणजितसिंगची भेट झाली. रणजितसिंगने ह्युगेलचा खूप आदरसत्कार केला व त्याला कोहिनूर हिरा पहाणेस दिला. जगातील सर्वात मोठा व उत्कृष्ट असा तो हिरा होता त्या हिऱ्याचा आकार कोंबडीच्या अंड्याप्रमाणे होता हिरा पांढरा शुभ्र होता व कल्पना करता येणार नाही इतका चमकदार होता रणजितसिंगने हा हिरा शहासुजा-कडून पैदा केला होता.

ह्युगेलने तो हिरा हातात घेऊन पाहिला. त्या हिऱ्याकडे पहात असता त्याच्या मनात विचार आला—

ह्या हिऱ्याच्या किमतीत धुळीस मिळालेल्या कितीतरी गरीब कुटुंबांचे संसार उजळून निघतील

ह्युगेलच्या प्रवासवृत्तात असा तऱ्हेचे विचार असल्यामुळे जागतिक वाङ्मयात त्याच्या प्रवासवृत्ताला फार माव दिला जातो.

× × ×

आपण खूप प्रवास केला म्हणजे निरनिराळ्या ठिकाणची माणसे निरनिराळी दिसतात, पण खोलवर विचार केला म्हणजे असे दिसून येते की या जगात सर्वत्रांना बांधणारे असे एक दिव्य सूत्र आहे. मुलाचा खेळकरपणा आणि मातेचा प्रेमळपणा— हा जिकडे तिकडे दिसून येतो. ज्ञान कर्म कमी अधिक प्रमाणात असते पण साऱ्या ठिकाणी प्रत्येकाच्या अंतरंगात भक्तीचा झरा वहात असतो. विचार - खोलवर विचार करून आपली खात्री होते की—

हा झरा पुष्कळदा गढूळ असतो, पण जेव्हा त्यातला गढूळपणा निघून जातो तेव्हा आपण म्हणू लागतो की—

देव देवळात नाही, चर्चमध्ये नाही, मशीदीत .नाही, तर तो आपल्या अंत:करणात आहे

मित्र हो,

पृथ्वीच्या पोटातून झरे बाहेर पडतात व आनंदाने नाचू लागतात. काही झऱ्याना अडथळा होत नाही तर काही झऱ्याना अडथळ्याशी झगडा करावा लागतो. कांही झरे प्रवास करताना ऊष्णतेमुळे आटून जातात, तर काही झरे सुपीक प्रदेशातून वहात जाऊन लोकांचे जीवन संपन्न करतात. काही झरे एकांड्या शिलेदाराप्रमाणे ऊष्णतेने जळणाऱ्या वाळवंटात प्रवेश करतात, तर काही झरे कोणतीही खूण पाठीमागे न ठेवता नाहीसे होतात. असे काही थोडकेच भाग्यवान् झरे असतात की ते खूप मोठा प्रवास करतात, आपल्या मार्गावरील प्रदेश सुपीक संपन्न व सुंदर करतात व शेवटी महासागरात विलीन होतात माणसाच्या जीवनात असाच प्रकार होत असतो आपण माणसे म्हणजे पृथ्वीच्या पोटातून बाहेर येऊन वाहणाऱ्या झऱ्याप्रमाणे आहो

× × ×

मित्र हो,

काश्मीरचे सौंदर्य जसे जगप्रसिद्ध आहे त्याप्रमाणे येथल्या शाली व गालीचे देखील जगप्रसिद्ध आहेत. बारोन ह्युगेलने जेव्हा काश्मीरला भेट दिली तेव्हा त्याच्याबरोबर पुष्कळ नोकर होते नोकराना पगार महिना तीन अगर चार रुपये ठरलेला असे अशा त्या काळांत बारोन ह्युगेल जेव्हा शाली विणण्याच्या कारखान्यात गेला तेव्हा त्याला दिसून आले की एका खोलीत सोळा वीणकर तीन हजार रुपये किंमतीची एक दुशाला विणीत आहेत. ह्या प्रवासात आपण देखील शाली व गालीचे तयार करणाऱ्या कारखान्याना भेट देणार आहो

× × ×

बारोन ह्युगेलने काश्मीरच्या प्रवासात कौरवपांडव ह्या ठिकाणाला आवर्जून भेट दिली व आपल्या पुस्तकात लिहून ठेवले की हिंदुस्थानात पडुराजघराण्याचा सर्वत्र उल्लेख केला जातो त्याने असेंहि लिहिले की—

हिंदुस्थानात इ. स. पूर्वी २६०० मध्ये षड्‌ राजघराणे होऊन गेले.

× × ×

आपण काश्मीरमध्ये आलो आहो सुंदर सरोवरे, उंच उच पर्वतांच्या रांगा, त्यामधून वाहणाऱ्या स्वच्छ नद्या, मनमोहक वृक्ष, सुरेख माणसे, पऱ्यांची आठवण करून देणाऱ्या येथल्या गोष्टी – हे सर्व पाहून ह्या भागाला नंदनवन म्हणण्यात येते

काश्मीरचा इतिहास बऱ्याच लेखकानी लिहिला आहे कल्हण पंडितांनी लिहिलेल्या राजतरंगिणीत काश्मीरची माहिती आहे. राजावली व श्री जैन राजतरंगिणो ह्या पुस्तकांत काश्मीरची माहिती आहे पुण्यभट्टाने लिहिलेल्या 'राजवली पताका' ह्या ग्रंथात, किंवा अबुल फाजलने लिहिलेल्या "ऐने अकबरी" ह्या ग्रंथात काश्मीरबद्दल माहिती आहे

कितीतरी पाश्चात्य प्रवासी काश्मीरला येऊन गेले व आपल्या ग्रंथात त्यांनी काश्मीरची माहिती दिली

| | | |
|---|---|---|
| झेव्हियर | इ. स | १५७२ |
| बर्निअर | ,, | १६६३ |
| फॉस्टर | ,, | १७८६ |
| गुथ्री, मूरक्रॉफ्ट व ट्रेबेक | ,, | १८२१ |
| व्हिक्टर जॅक्वेमॉट | ,, | १८३१ |
| जोसेफ वूल्फ | ,, | १८३२ |
| बारोन ह्यूगेल | ,, | १८३५ |

आज आपण मोठ्या सुखाने प्रवास करत काश्मीरमध्ये आला आहो, पण पूर्वी प्रवास करणे फार धोक्याचे होते.

*

प्रवास करण्याची पाश्चात्य प्रवाशांची जिद्द पाहून आपण नतमस्तक होतो मूर क्रॉफ्ट, गुथ्री व ट्रेवेक हे तिघेहि वाटेत ताप येऊन मरण पावले. मेल्यानतर त्यांची रोजनीशी प्रसिद्ध झाली, त्यावरून आपणाला काश्मीरची माहिती मिळते

× × ×

बारोन ह्युगेलने काश्मीरचा प्रवास केल्यानंतर आपल्या पुस्तकात लिहिले आहे की—

मुसलमानी धर्माचे अनुयायी धर्मवेडे नाहीत असे क्वचितच घडले; किंबहुना असेहि म्हणता येईल की—धर्मवेडेपणा हा मुसलमानी धर्माचा एक भागच असल्यासारखा वाटतो.

× × ×

मित्रहो,

आपण लक्षात घ्या की, माणसाने जगभर प्रवास केला तरी त्याला आपली मायभूमि जास्तीत जास्त प्रिय वाटते जेव्हा महाराजा रणजितसिंग आणि बारोन ह्युगेल ह्यांची भेट झाली तेव्हा महाराजानी विचारले—

"तुम्ही जगभर प्रवास केला आहे कोणता देश तुम्हाला जास्त प्रिय वाटतो ?"

ह्युगेल म्हणाला—

"माझा मायदेश."

आपल्या पुस्तकात बारोन ह्युगेलने एक विचार करण्यासारखा विचार मांडला आहे तो म्हणतो—

हिंदुस्थानातील लोक दोन गोष्टी महत्वाच्या मानतात. पैसा आणि अधिकार मिळवून शारीरिक सुखोपभोग घेणे किंवा सर्व सुखांचा त्याग करून पवित्र आचरण करून मोक्षप्राप्ति करून घेणे हिंदुस्थानातील लोकांच्या दृष्टीने बिलकूल महत्वाच्या नसलेल्या अशा तिसऱ्या गोष्टीत युरोपातील मनुष्य लक्ष घालतो ती गोष्ट म्हणजे शास्त्रीय चिकित्सा

करून जगाविषयी ज्ञान प्राप्त करून घेणे. यामुळेंच युरोपातील लोकांनी मोठमोठे शोध लावले आहेत.

× × ×

मित्रहो,

आपण आपल्या प्रवासाला काश्मीर कन्हय्या असें नाव दिले आहे. काश्मीर पहाताचा निरनिराळ्या ठिकाणची माहिती आपण घेणार आहो, पण त्याचबरोबर कन्हय्याला स्मरून जे निरनिराळे विचार आपल्या मनात आले त्यानाहि महत्व देणार आहो. कन्हय्याचे तत्वज्ञान आज साऱ्या जगात सर्वोत्कृष्ट मानले जाते कन्हय्याच्या विचाराप्रमाणे आचार हे खरे संगीत आहे. हे संगीताचे संगीत समजून जो गाऊ लागतो तो गवई आपणाला जरी चांगले गाता आले नाही तर हे संगीत ऐकण्याची आपणाला फार गोडी लागली आहे, हे आपले परम भाग्य आहे आपण तानसेन झालो नाही तरी मला तानसेन मानून तुम्ही कानसेन झाला आहा हेच ह्या प्रवासाचे वैशिष्टय आहे जयहिंद ! जय भारत !

× × ×

मी बोलत होतो. माझे बोल ऐकून खोलीत जमलेले लोक म्हणाले—

साहेब ! आभारी आहो काश्मीरच्या प्रवासात वृत्ताबरोबर विचार देखील आम्हास ऐकायला मिळोत इतकीच इच्छा !

× × ×

लोक आपापल्या खोलीत गेले आमच्या खोलीत मी व सौभाग्यवती राहिलो

माझ्या कॉटवर बसून झोपण्यापूर्वी मी कृष्णकन्हय्याची प्रार्थना करत होतो सौभाग्यवती आपल्या कॉटवर बसली होती तिने मला विचारले—

" काश्मीरात बहुसंख्य मुसलमान आहेत. कृष्णाचे भक्त कोणी मुसलमान आहेत का ? झोपण्यापूर्वी भक्त व भक्ति ह्याबद्दल मला थोडेसे सांगा "

मी म्हटले—

" भक्तिच्या दरबारात हा हिंदु हा मुसलमान असा भेद नाही. काश्मीरला येण्यापूर्वी पुण्याला मी न्यायदानाच्या कामासाठी गेलो होतो, त्यावेळी कृष्णचरित्रावर मी गीताधर्म मंडळाच्या मदतीकरता तीन प्रवचने दिली. खूप श्रोते येत होते. त्यात किती तरी मुसलमान होते समाप्तीच्या वेळी त्या मुसलमान श्रोत्यांचे अंतःकरण भरून आले व माझ्या पाया पडून ते म्हणाले—

साहेब, आम्ही आता रोज गीतेचे काही श्लोक म्हणणार.

मग, भक्तीच्या दरबारात ब्राह्मण शूद्र, हिंदु मुसलमान असला कृत्रिम भेद नाहीं. कबीर म्हणतो—

को बम्हन को सूदा !

भक्तिच्या प्रांतांत कोण ब्राह्मण आणि कोण शूद्र ?

कृष्णाची भक्ती हिंदूच्याप्रमाणे मुसलमानांनी देखील केली. मुसलमान भक्तात—

रहीम रसखान मुहम्मदशाहरंगीले ही नावे उल्लेखनीय आहेत.

कृष्णासाठी असल्या मुसलमान भक्ताची तळमळ पाहून भारतेंदु हरिश्चंद्र ह्यांनी म्हटले आहे—

इन मुसलमान हरिजननपै कोटिन हिंदुन वारिए ।

असल्या मुसलमान भक्तावरून कोटी हिंदु ओवाळून टाकावेत

तू भक्ताची व्याख्या लक्षात घे. भक्ताच्या खूप व्याख्या करण्यात आल्या आहेत त्या व्याख्या जरी तू सोडून दिल्यास तरी इतके लक्षात ठेव की—

भक्त म्हणजे जो विभक्त नाही तो.

ह्या भक्तिमार्गात जातीचे धर्माचे बंधन नाही. कृष्णाच्या भक्तात साऱ्या धर्माचे साऱ्या जातीचे लोक आहेत.

हा भक्तिमार्ग चोखाळण्यास चोखामेळयास आडकाठी नाही. ही वाट मळावयास सावता माळ्यास प्रत्यवाय नाही ह्या वाटेवरून जाण्यास

जनाबाईस मना नाही रोहिदास चांभार ह्या वाटेवरून का जातो म्हणून कोणी चांभार चौकशी करत नाही अमेरिकेचा थोर तत्त्वज्ञ थोरो ह्या मार्गावरून गेला म्हणून अमेरिकेने त्याच्या थोरपणास मज्जाव केला नाही. आज जगात जे विद्वान् हयात आहेत त्यामध्ये ज्याला पहिला मान दिला जातो तो डॉ टॉयनबी ह्या वाटेवरून टॉय घालून जातो म्हणून कोणी त्याची टॉय हिसकावून घेत नाही.

तू इतके मात्र लक्ष्यात ठेव की—

केवळ उच्चारात व विचारात भक्ति उपयोगी नाही तर ती आचारात पाहिजे. आचाराशिवाय भक्ति म्हणजे शब्दाविना साहित्य, सुराविना संगीत, मेंदुविना माथा आणि गळ्याविना गाणे आहे

आचार नसता भक्ति केली तर त्यात गोडी कशी निर्माण होणार? कागदावर साखर हा शब्द लिहून तो चाटू लागलो तर तोंड कसे गोड होणार? अंधाऱ्या रात्री दिव्याचा खूप विचार केला तरी प्रकाश कसा दिसणार?

विष्णु पुराणात म्हटले आहे—

अपहाय निजं कर्म कृष्ण कृष्णेति वादिनः।
ते हरेर्द्वेषिण पापा धर्मार्थं जन्म यद् हरे ॥

स्वकर्म न करता जे नुसते तोंडाने कृष्ण कृष्ण म्हणतात ते पापी होत. ते कृष्णाचा द्वेष करणारे आहेत.

तुला ज्ञानेश्वर फार प्रिय आहेत त्यांच्या भक्तीची सारी मदार आचारावर आहे

भक्तिशिवाय शांति नाही. आचाराशिवाय भक्तिला कांती येत नाही व कांती आल्याशिवाय शांती येत नाही. भक्तीचे झाड विचाराच्या भूमीत लावले व त्याला आचाराचे खतपाणी घातले म्हणजे त्या झाडाला फळ येते. हे भक्तिफळ म्हणजे शांतिफळ

अग,

ज्ञानेश्वरांना— त्या भक्तीच्या सम्राटाला— किती त्रास झाला पण त्यांची शांति ढळली नाही. त्यांच्या वडिलांनी सन्यासाश्रम घेतला व मग ते परत गृहस्थाश्रमात आल्यावर त्यांना चार मुले झाली. लोकांनी त्यांना—

देहांत प्रायश्चित्त असे ह्या बोलिले।

असा निकाल दिला.

विठ्ठलपंत म्हणाले—

लोक हो, तुमचा निकाल मी मानतो मी माझ्या बायकोसकट देहांत प्रायश्चित्त घेतो येथून प्रयागला जाऊन प्राणत्याग करण्यापूर्वी माझी तुम्हाला एक विनंति आहे पदर पसरून मी तुमच्याजवळ एक मागणे मागतो

माझी ही चार पोरे— निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई— फार लहान आहेत अद्याप मुंज झाली नाही. आता तुम्हीच ह्यांचे माईबाप. ह्यांना मी तुमच्या ओटीत घालतो सांभाळा त्यांच्यावर माया करा त्यांना हिडिस फडीस करू नका.

सेशन्स जज्ज म्हणून मी फाशीची शिक्षा दिली आहे. फाशी जाणाऱ्याला शेवटी विचारतात—

तुझी शेवटची काय इच्छा आहे ?

शक्य तो ती इच्छा पुरवली जाते.

अग,

आळदीच्या लोकांनी विठ्ठलपंतांना देहांताची शिक्षा सुनावल्यानंतर विठ्ठलपंत आपली लहान लहान पोरे लोकांच्या हवाली करून प्रयागला गेले. त्यांची पत्नी पोरांच्याकडे डोळ्यात पाणी आणून पाहत होती. अश्रूंनी ओला झालेला मायेचा हात त्या माऊलीने आपल्या पोरांच्या पाठीवर फिरवला आणि ती देखील नवऱ्याचे मागून प्रयागला गेली. त्या दोघांनी प्रयागच्या त्रिवेणी संगमात प्राणत्याग केला

आणि इकडे—

ही चार फार सुंदर पोरं— दृष्ट लागावी अशी पोरं— ज्याच्यावरून महाराष्ट्राचं भाग्य ओवाळून टाकावं अशी पोरं—

आळंदीमध्ये दारोदार भिक्षा मागू लागली

संन्याशाची पोरं— ही त्या काळी शिवी होती ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्राला ओव्या दिल्या आणि लोकांनी त्यांना शिव्या दिल्या.

गावातली पोरं ह्या संन्याशाच्या पोरांना धोंडे मारायची आणि मोठे लोक फिदी फिदी हासायचे.

आज आपण त्याची पालखीतून मिरवणूक काढतो, पण—

जिवंतपणी हाल हाल आणि मेल्यावर मानाची ढाल.

असा प्रकार झाला

ज्ञानेश्वराचे ते हाल पाहिले की माझे डोळे लाल होतात व मी रडू लागतो

इतके हाल, इतका छळ, इतका त्रास, भोगल्यानंतर ज्ञानेश्वरांनी म्हटले असते की—

ह्या समाजाचे वाटोळे होवो—

तर ते क्षम्य झाले असते. पण त्या महात्म्याने पसायदान मागताना जे मागणे मागितले ते लोकांच्या कल्याणाचे

ज्याचे हाल हाल झाले, दुःखाचे धोंडे खाऊन ज्याने लोकांना सुखाचे मांडे दिले, त्या ज्ञानोबाचे त्या मायेच्या पुतळयाचे जिव्हाळयाचे पसायदान म्हणताना – भाविकांचे डोळे अश्रूंनी भरून येतात.

ते पसायदान किती गोड आहे !

सौभाग्यवती आपल्या गोड गळयातून पसायदान म्हणू लागली

म्हणता म्हणता तिच्या डोळयात अश्रू येत होते ऐकता ऐकता माझ्या डोळयांत अश्रू येत होते

सौभाग्यवती म्हणत होती—

आता विश्वात्मके देवे । येणे वाग् यज्ञे तोषावे ।
तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ॥

जे खळाची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परे पडो । मैत्र जीवाचे ॥
दुरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात ॥
वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेट तु भूता ॥
चला कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचे गाव ।
बोलते जे अर्णव । पीयुषाचे ॥
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांहि सदा सज्जन । सोयरे होतु ॥
किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होऊनी तिही लोकी ।
भजिजो आदि पुरखी । अखंडित ॥
आणि ग्रंथोपजीविये । विशेषी लोकी इये ।
दृष्टादृष्ट विजये । हो आवे जी ॥
येथ म्हणे विश्वेशरावो । हा होईल दानपसावो ।
-येणे वरे ज्ञानदेवो । सुखिया झाला ॥
सुखिया झाला ।
सुखिया झाला ॥

× × ×

गणेश,

पसायदान म्हणताना व ऐकताना आम्ही अश्रूंच्या फुलांनी कृष्णकन्हय्याची भक्तिभावनेने पूजा केली

उद्या आम्ही श्रीनगरमध्ये निरनिराळ्या ठिकाणांना भेटी देणार आहोत.

पुढचे पत्र त्यानंतर

तुझा
राम

## पत्र ४ थे

प्रिय गणेश

आज आम्ही श्रीनगरमधील काही ठिकाणे पाहिली

प्रथम रेशमी मिल पाहिली. येथे शाली फार उत्तम होतात. स्वस्त शाली व फार किंमतीच्या शाली पाहून व त्यावरील नक्षीकाम पाहून मन थक्क होऊन जाते शाल हे काश्मीरचे वैशिष्टय आहे.

या मिलमध्ये एक मुसलमान कामगार होता. आश्चर्याची गोष्ट अशी की तो कृष्णभक्त होता.

ट्रिब्यूनलच्या कामासाठी मी पुण्यास गेलो असताना कृष्ण चरित्रावर तीन दिवस गीताधर्ममंडळाच्या मदतीसाठी मी प्रवचनें दिली होती त्यावेळी काही मुसलमान गृहस्थ फार आवडीने ती प्रवचने ऐकत असत

गणेश,

तू लक्षात घे की गीता ही साऱ्या मानवजातीकरता आहे व म्यानामध्ये कृष्णाला " जगद्गुरु " असे म्हटले आहे. ते अगदी सार्थ आहे.

श्रीनगरमधल्या त्या मुसलमान कामगाराचे विचार ऐकून मला फार आनंद झाला.

तो मुसलमान कामगार मला म्हणाला—

" साहेब, मी कृष्णाचा भक्त आहे. कृष्णाने गीतेंत सांगितलेला उपदेश माझ्या जीवनाचा आधार आहे मी जें जें कार्य करतो ते ते देवाला अर्पण

करून करतो. ह्यालाच मी भक्तिमार्ग म्हणतो ह्या भक्तिमार्गामुळें आपणाकडून वाईट काम होत नाही. जे देवाला अर्पण करायचे ते वाईट असून कसें चालेल ? जे देवाला अर्पण करायचे तें चांगलेच नको का ? "

हो साधा कामगार साध्या भाषेत जीवनाचें किती सुंदर तत्वज्ञान बोलून गेला. मला बंगालचे शरच्चंद्र ह्यांची आठवण झाली

शरच्चंद्राना दारु पिण्याचा नाद होता. तो नाद वाईट आहे ह्याचे त्याना ज्ञान होते, पण तो नाद सुटत नव्हता. नाद सुटण्याच्या कामी ज्ञानाचा उपयोग होत नव्हता

दारु सोडण्याकरता तें कर्म देखील करत होते तरी पण नाद सुटत नव्हता. त्याचे कर्म ऐकणीय आहे

त्यानी विचार केला— एकदम दारु सुटणार नाही, आपण आस्ते आस्ते सोडू त्यासाठी आपण पहिले दिवशी संबध ग्लास दारु पिऊ; दुसरे दिवशी पाऊण ग्लास दारु पिऊ; तिसरे दिवशी अर्धा ग्लास दारु पिऊ, चवथे दिवशी पाव ग्लास दारु पिऊ व अशा तऱ्हेने दारु अजिबात सोडून देऊ

गणिताने हा विचार ठीक झाला पण जीवनाचे गणीत काही आगळें, वेगळे नि निराळे असते.

एका झाडावर शंभर पक्षी बसले आहेत बदूक मारल्यावर त्यातला एक पक्षी मेला तर झाडावर किती पक्षी राहिले ? ह्याचे उत्तर गणिताने नव्व्याणऊ असे येते, पण व्यवहारांत हे उत्तर चूक असते बदूक मारल्यावर एक पक्षी मेला पण बाकीचे पक्षी तो आवाज ऐकून उडून जातात, आणि एकहि पक्षी शिल्लक राहत नाही, हे व्यवहाराचे गणित आहे.

शरच्चद्रानी ठरवले की सबंध ग्लास, पाऊण ग्लास, अर्धा ग्लास, पाव ग्लास— ह्या प्रमाणे आपण दारु सोडत गेलो तर आपली दारु पूर्णपणे सुटेल, पण प्रत्यक्षांत त्याना अनुभव आला की—

आज सबध ग्लास, दुसरे दिवशी पाऊण ग्लास, मग अर्धा ग्लास, नंतर पाव ग्लास, त्यानतर—

ते पुन्हा सबध ग्लास घेऊ लागले.

दारु पिण्याच्या बाबतीत सवय, पाऊण, अर्धा, पाव— पुन्हा सवय —
ह्या प्रकाराने दारु कशी सुटणार ?

शरच्चंद्र स्वत शी म्हणाले —" आपणाला ज्ञान आहे तरी दारु सुटत नाही दारु सोडण्याच्या बाबतीत आपण कर्म करत आहो तरी दारु सुटत नाही— आता हा नाद सोडण्याकरता काय करावे ? "

शेवटी ते आपले गुरु रामकृष्ण परमहंस ह्यांच्याकडे गेले व म्हणाले—

" महाराज, मला दारुचा नाद आहे. काही केल्या तो सुटत नाही. ज्ञानाचा उपयोग होत नाही, कर्माचा उपयोग होत नाही मला काही मार्ग सांगा."

रामकृष्ण म्हणाले —

" बेटा तू खुशाल वाटेल तितकी दारु पीत जा— "

गणेश,

तू म्हणशील—

गुरु असावा तर असा असावा

पण रामकृष्णांचे वाक्य पूर्ण झाले नव्हते. ते म्हणाले—

" बेटा, तू खुशाल दारु पीत जा, मात्र ती पिण्यापूर्वी मला अर्पण करून पी म्हणजे झाले "

शरच्चद्राना खूप आनंद झाला. त्याना पूर्वी वाटत होते की—

दारु पिणे म्हणजे पाप आहे.

आता त्याना वाटू लागले की—

मार्ग फार चांगला आहे दारु रामकृष्णाना अर्पण करून पिणेची. आता पाप अजिबात नाही. अर्धा ग्लास, पाव ग्लास— असला प्रकारहि करणेचे कारण नाहीं. रामकृष्णाना अर्पण करून आता मला वाटेल तितकी दारु पिता येईल

पराकाष्टेच्या आनंदाने शरच्चंद्र आपल्या घरी गेले.

दारु पिणेची वेळ झाली. त्यानी दारुचा ग्लास भरला. पिण्यापूर्वी रामकृष्णाना अर्पण करून दारु पिणेची हा महामंत्र त्यांना आठवला

त्यानी हातात दारुचा ग्लास घेतला.

आता रामकृष्णांना दारू अर्पण करणेची होती-- इतक्यात--

त्यांच्या मनात विचार आला--

अरे, रामकृष्ण माझी माता आहे, माऊली आहे, साऊली आहे, गाऊली आहे ही माता किती शुद्ध आहे, किती प्रेमळ आहे, किती मायाळू आहे, किती ममताळू आहे, किती कनवाळू आहे--

अशा त्या शुद्ध सात्विक, भाविक मायाळू ममताळू मातेला--

असली घाण, कुजकट, नासगट अमंगल दारु अर्पण करू ?...

त्यापेक्षा मीच दारु सोडलेली बरं नाही का ?

हा विचार इतका प्रभावी झाला की त्या सरशी--

त्यानी दारुचा ग्लास फेकला

तो ग्लास फुटला, आणि त्यांना दारुचा नाद सुटला

× × ×

गणेश,

आपण जें जें कर्म करतो तें तें देवाला अर्पण करून करणे ह्याचें नाव भक्तिमार्ग ज्ञानापेक्षा, कर्मापेक्षा, भक्तीमध्ये फार जोर असतो, म्हणूनच साधुसंतानी भक्तीवर फार जोर दिला आहे.

कृष्णाचा भक्त असलेला तो मुसलमान कामगार जे बोलला त्यात फार मोठा अर्थ साठवलेला होता.

× × ×

रेशमी कापडाची मिल पाहून झाल्यावर आम्ही स्पेशल बसने कार्पेटचा कारखाना पाहण्यास गेलो

त्याठिकाणी एक हजार रुपयापासून चार हजार रुपयापर्यंतचे कार्पेट तयार करण्याचे काम सुरु होते.

कामगार अगदी मन लावून काम करत होते त्यांच्या अंगात खूप कला होती.

कार्पेट हे काश्मीरचे वैशिष्टय आहे. अंगात खूप कला असलेले व अगदी

मन लावून काम करणारे ते कामगार आम्हाला गरीब वाटले

एक ऑफीसर मला म्हणाला—

ह्या लोकांशी आपण अजीजीने वागलो तर हे लोक काम नाही चांगले करणार. ह्यांच्यावर जरब ठेवून, त्यांना धाक दाखवून आपण काम घेऊ लागलो तर हे लोक खूप चांगले काम करणार.

मला स्वामी अखंडानंद ह्यांनी लिहिलेल्या ' हिमालयाच्या कुशीत ' ह्या पुस्तकातील एका गोष्टीची आठवण झाली.

पूर्वी टिहरीचे राजे संपूर्ण गढवालचे स्वामी होते, व श्रीनगर ही त्यांची राजधानी होती

गढवाली लोक सहजा सहजी कुणाला देत नाहीत, पण जो कोणी ओरडून व दमबाटी करून मागेल त्याला भरपूर देतात. त्यांच्याबद्दल एक प्रसिद्ध म्हण आहे—

गढवालीसरिखा दाता नही, लठ्ठा बगैर देता नही।

एकदा स्वामी विवेकानंद, स्वामी अखंडानंद व स्वामी सारदानंद असे टिहरीवरून श्रीनगरला जाण्यास निघाले होते. वाटेत सध्याकाळ झाली व ते एका गावात आले त्यांनी लोकांना भेटून अत्यंत आर्जवाने व नम्रपणे लाकडे व बिस्तर मागितला त्यांना कोणीच काही देईना. ते तिघे लोकांची आर्जव करून भिक्षा मागत होते, पण त्यांना कोणीहि भिक्षा घालत नव्हता

शेवटी त्यांना वरील म्हण आठवली. तेव्हा ते गावातल्या एक चौकात जाऊन उभे राहिले व जोरजोराने दरडावून म्हणू लागले—

' लाकडे आणा, बिस्तर आणा, दूध आणा, भाजी आणा, भाकरी आणा '

दरडावून केलेल्या त्या तिघांच्या गर्जनेमुळे चमत्कार झाला. थोड्याच वेळात कोणी लाकडे आणू लागला, कोणी बिस्तर आणू लागला, कोणी दूध आणू लागला, कोणी भाजी आणू लागला कोणी भाकरी आणू लागला.

ते सारे जिन्नस आणून कितीतरी गढवाली लोक स्वामी विवेकानंद व त्यांचे सोबती ह्यांच्या भोवती नम्रपणे उभे राहिले व म्हणू लागले—

' स्वामी महाराज आपणाला आणखी कांही पाहिजे का ? '

जास्तीत जास्त आर्जव करून जे गढवाली लोक काहीही भिक्षा घालणेस तयार नव्हते तेच लोक दरडावणी अैकून आता वाटेल ती भिक्षा देणेस तयार होते.

× × ×

कार्पेटचा कारखाना पाहून झाल्यावर आम्ही म्युझीयम पाहणेस गेलो. म्युझीयम पहात असताना मी काश्मीरच्या इतिहासाची माहिती घेत होतो.

असे सांगितले जाते की काश्मीरचा पहिला राजा रावणाला मारणारा प्रभु रामचंद्र हा होता. काश्मीरमध्ये रामाची देवळे आहेत, पण राम हा पहिला राजा होता, ह्याबद्दल खात्रीलायक ऐतिहासिक पुरावा उपलब्ध नाही

राजतरंगिणीमध्ये राजा गोनंदाचे नाव आहे. गोनदाच्या मुलाने ( दामोदराने ) कृष्णाबरोबर युद्ध केले पण तो मारला गेला. कृष्णाने स्वतः कधी राज्य हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला नाही त्याने नरकासुराला मारले पण त्याचे राज्य त्याच्या मुलाला दिले कृष्णाने कंसाला मारले पण त्याचे राज्य उग्रसेनाला दिले. कृष्णाने दामोदराला मारले पण काश्मीरचे राज्य त्याच्या गरोदर स्त्रीच्या हवाली केले

पुढे बऱ्याच वर्षांनी काश्मीरवर बुद्ध अम्मल सुरु झाला सम्राट अशोक ह्याने खिस्त पूर्व २५० साली काश्मीर जिंकून घेतले

बुद्ध अमलानंतर काश्मीरवर मुसलमानी अम्मल सुरु झाला या जमान्यांत खूप लोकाना मुसलमान करण्यात आले.

इ. स १५८५ मध्ये काश्मीरमध्ये अकबराचा अम्मल सुरू झाला शहाजहानने हिंदु नावे बदलून मुसलमानी नावे दिली व कांही हिंदु देवळे नष्ट केली

( M. R. Ranngo— Journal of Indian History for April 1929 ).

औरंगजेबने बरीच दुष्ट कृत्ये केली.

मुसलमानी अम्मलानंतर काश्मीरवर शीख अम्मल सुरू झाला.

रणजीतसिंग ह्या नावाजलेला सेनानी होता.

गुलाबसिंग हा जम्मू व काश्मीरवर राज्य करणारा पहिला डोग्रा होता. त्याचा जन्म इ. स. १७९२ मध्ये झाला १८४६ च्या तहाने गुलाबसिंग जम्मू व काश्मीरचा महाराजा झाला.

गुलाबसिंगनंतर महाराजा रणबीरसिंग राज्य करूं लागला. तो ता. १४ सप्टेंबर १८८५ रोजी मरण पावला. नंतर महाराजा प्रतापसिंग राज्य करू लागला. तो ता. २३ सप्टेंबर १९२५ रोजी मरण पावला.

नंतर महाराजा हरिसिंग राज्य करू लागले त्यांचा जन्म १८९५ मध्ये झाला होता

पहिल्या राऊंड टेबल कान्फरन्समध्यें महाराजा हरिसिंग ह्यांनीं हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे असे ठणकावून सांगितले.

हिंदुस्थान पाकिस्तान असे भारताचे दोन भाग झाल्यानंतर काश्मीर आपणाला मिळेल अशी जीनाची खात्री होती. त्याप्रमाणें पाकिस्तानने खूप खटपट केली, पण महाराजांनी ता. २६ आक्टोबर १९४७ रोजी हिंदुस्थानच्या सामील नाम्यावर ( Merger Agreement ) वर सही केली. मग हा प्रश्न युनोकडे नेला गेला व अजून तो प्रश्न युनोने निकालात काढला नाहीं.

आज दोन तृतियांश काश्मीर भारताकडे व एक तृतियांश काश्मीर पाकिस्तानकडे आहे

× × ×

म्युझियम पाहून झाल्यावर आम्ही बाहेर आल्यावर एक गृहस्थ मला म्हणाले—

" काश्मीरमध्यें मला एक कम्युनिस्ट भेटला. तो म्हणत होता की— देवाचे उच्चाटन केल्याशिवाय आपले कल्याण होणार नाहीं. शाळेमध्यें सर्व मुलांना शिकवले पाहिजे की या जगात देव नाहीं "

एवढें बोलून त्या गृहस्थानी मला विचारले—

" तुम्हाला काय वाटते ? "

मी म्हटले—

"देवाचे उच्चाटन होणार नाहीं. कम्युनिष्ट देशांत देखील खूप प्रयत्न करूनहि देवाचे उच्चाटन झालें नाहीं."

रशियातली एक गोष्ट मी त्या गृहस्थाला सांगितली.

रशियामध्यें शाळेमध्यें जगात देव नाही, अशी शिकवण मुलांना दिली जाते. एकादा परीक्षेंत पेपरमध्यें असा प्रश्न होता—

Does God exist ?

एका मुलाने No असे उत्तर लिहिलें, पण आपले उत्तर बरोबर कां चूक अशी त्याला शंका आली पेपर संपल्यावर मुलें एकत्र गोळा झाली. त्या मुलाने इतर मुलांच्याकडे चौकशी केली तेव्हा त्याला कळून आले की—

Does God exist ? ह्या प्रश्नाचे No हे आपले उत्तर अगदी बरोबर आहे. त्याला खूप आनंद झाला लगेच तो म्हणाला—

Thank God.

\+ + +

मी सांगितलेली ही गोष्ट ऐकून ते गृहस्थ म्हणाले—

"छान फारच छान गोष्ट आहे."

× × ×

म्युझियम पाहून आल्यावर आम्ही Govt. Market व Govt. Emporium पाहिले तेथे फार उत्तम काश्मीरी वस्तु विकत मिळतात.

तेथे मला एक मुसलमान भेटला तो गुरु नानक ह्यांची फार स्तुति करत होता. मला गुरु नानकाचा उपदेश आठवला मुसलमानांना उपदेश करताना गुरु नानक म्हणाले—

"तुम्ही खरे मुसलमान असाल तर दया ही तुमची मशीद झाली पाहिजे, श्रद्धा ही तुमची प्रार्थनेची चटई झाली पाहिजे, प्रामाणिकपणा हे तुमचे कुराण झाले पाहिजे, नम्रता ही तुमची सुंता झाली पाहिजे व सदाचरण हा तुमचा रोजा झाला पाहिजे."

× × ×

श्रीनगरमधील निरनिराळी ठिकाणे पाहून आम्ही लालारुख हॉटेलमध्ये आलो व चहाफराळ झाल्यावर बाहेरच्या जागी बोलत बसलो असताना एका गृहस्थाने मला विचारले—

" गीतेत सहाव्या अध्यायात ध्यानयोग आहे. तुम्ही रोज ध्यान करता लोक नेहमी अष्टांगयोग असे म्हणतात या बाबतीत आम्हाला थोडे सांगा ना ? आठ अंगे कोणती ?"

मी सांगू लागलो—

" ( १ ) यम ( २ ) नियम ( ३ ) आसन ( ४ ) प्राणायाम ( ५ ) प्रत्याहार ( ६ ) धारणा ( ७ ) ध्यान व ( ८ ) समाधी ही योगाची आठ अंगे आहेत "

त्या गृहस्थाने लगेच म्हटले—

" आसन प्राणायाम आम्हाला ठाऊक आहे बाकीच्या अंगाबद्दल थोडक्यात माहिती कृपाकरून सांगा. "

मी सांगू लागलो-

" अहिंसा, सत्य, चोरी न करणे, ब्रह्मचर्य, अपरिग्रह, आर्जव, क्षमा धृति मिताहार, पावित्र्य – म्हणजे यम.

तप, संतोष, आस्तिक्य, दान, ईश्वर पूजन, सिद्धांत श्रवण, जप व्रत म्हणजे नियम.

इंद्रियाचा आपापल्या विषयापासून परावृत्त करणे म्हणजे प्रत्याहार.

मन एकाग्र करणे म्हणजे धारणा.

एका क्षणाला जी भावना चित्तात असेल ती पुढील अनेक क्षणात टिकवून एकतानता साधणे म्हणजे ध्यान.

व भाव्य वस्तुचे आपण ध्यान करत आहो असे स्फुरण देखील न होणे व केवळ अर्थरूपाने भासमान होणे ह्याचे नाव समाधी.... "

आणखी एका प्रश्नाला उत्तर देताना मी म्हटले—

" मन एकाग्र करणे ह्या गोष्टीला फार महत्व आहे. आपण देवाच्या ठिकाणी मन एकाग्र करण्याचा प्रयत्न करावा म्हणजे आपल्या अंगात फार

मोठी शक्ति निर्माण होते. जगदीशचंद्र बोस लहान होते. त्याना त्यांचे वडिल म्हणाले—

तुला एक चमत्कार दाखवतो

त्यानी दुर्बिण घेतली व त्यातून सुर्याचे किरण एका कागदावर पाडले

जगदीश म्हणाला— "ह्यात कसला चमत्कार ?"

वडिल म्हणाले— "थोडा वेळ थांब"

वडिलानी ती दुर्बिण घट्ट धरली. कांही वेळ झाल्यावर त्या दुर्बिणीतून जे किरण कागदावर पडत होते त्यामुळे कागद जळू लागला.

तो प्रकार पाहून जगदीश आनंदानें टाळ्या वाजवू लागला व म्हणाला—

"काय चमत्कार आहे !"

वडील त्याला म्हणाले—

"बाळ, तू जर मन एकाग्र करायला शिकलास तर तू देखील चमत्कार करू शकशील."

जगदीशचंद्र म्हणतात—

लहानपणच्या ह्या गोष्टीमुळें माझ्यावर फार मोठा परिणाम झाला. मी मन एकाग्र करण्याचा प्रयत्न करू लागलो व आजचे माझे यश त्याचेच फळ आहे.

× × ×

एका गृहस्थाने मला विचारले—

"गीतेच्या सहाव्या अध्यायांत युक्ताहाराबद्दल विशेष खबरदारी घेण्यास सांगितले आहे. युक्ताहाराबद्दल आपल्या पूर्वजांचा तुम्ही एकादा नियम सांगू शकाल का, की जो नियम आजच्या डॉक्टरांना देखील मान्य होईल."

मी म्हटले—

"तो नियम असा आहे—

द्वौ भागौ पूरयेदन्नैस्तोयेनैकं प्रपूरयेत् ।

वायोः संचरणार्थाय चतुर्थमेव शेषयेत् ॥

निम्मा भाग अन्नाने भरावा, पाव भाग पाण्याने भरावा व पाव भाग वायूसाठी मोकळा ठेवावा

जमलेल्या लोकात एक डॉक्टर होते. ते म्हणाले— युक्ताहाराच्या बाबतींत हा नियम उत्कृष्ट आहे. माणसाने जेवताना पोटभर अन्न खाऊ नये. निम्मे पोट भरेल इतके अन्न खावे, पाव पोट भरेल इतके पाणी प्यावे व पोटाचा पाव भाग मोकळा ठेवावा. म्हणजे आळस येत नाहीं.

× × ×

व्हिटॅमिनबद्दल बोलणे सुरु असताना मी म्हटले—

आज व्हिटॅमिनवर फार जोर देण्यात येतो व ह्या बाबतींत शास्त्रज्ञांचे वाक्य वेदवाक्य गणले जाते.

पाश्चात्य देशातली गोष्ट आहे. आपला प्रभाव लोकांच्या मनावर किती आहे हे पाहण्याकरता कांही शास्त्रज्ञानी एक पत्रक प्रसिद्ध केले व त्यात म्हटले—

गाईच्या शेणात ए बी. सी. व डी. ही चारी व्हिटॅमिन आहेत

हे पत्रक प्रसिद्ध झाल्यावर लोक तोंडे वेडी वाकडी करत गाईचे शेण खाऊ लागले.

तो प्रकार पाहून त्या शास्त्रज्ञानी पुन: पत्रक काढले की—

आमच्या पूर्वीच्या पत्रकात शेण हा शब्द चुकीने पडला आहे तेथे दूध हा शब्द पाहिजे. गाईच्या दुधात ए. बी. सी. व डी. ही चारी व्हिटॅमिन आहेत.

ही गोष्ट ऐकून जमलेले लोक खूप हसले. हसणे ओसरल्यावर मी म्हटले—

शारीरिक आरोग्यासाठीं ज्याप्रमाणे व्हिटॅमिनची आवश्यकता आहे, त्याप्रमाणे मानसिक आरोग्यासाठीं देखील व्हिटॅमिनची आवश्यकता आहे. मानसिक आरोग्यासाठीं लागणारे व्हिटॅमिन गीतावाचनापासून भरपूर प्रमाणात मिळतात.

बोलता बोलता देव व राक्षस ह्याबद्दल बोलणे निघाल्यावर मी म्हटले—

देतो तो देव, राखतो तो राक्षस.

लोक म्हणाले—

बाबा, आम्ही हें वाक्य आमच्या डायरीत टिपून घेतो.

× × ×

रात्री हॉटेलमध्ये सुग्रास जेवण झाल्यावर मी व ती, वरी आमच्या खोलीत आलो.

जेवताना लोक म्हणत होते— काश्मीर म्हणजे स्वर्ग आहे. मला वाटले— प्रत्येक प्रवाश्याला वाटते की काश्मीर म्हणजे साक्षात् स्वर्ग आहे आपल्या पूर्वीच्या ऋषीमुनींना वाटत होते की हृषीकेश म्हणजे स्वर्ग आहे.

गेल्यावर्षी मी हृषीकेशला गेलो होतो. तेथे जवळच तपोवन नांवाचे एक गाव आहे. ह्या गावच्या परिसरात 'वासुमती' तांदुळ पिकतो. शिजलेल्या भाताला फार सुगंध असतो. असे सांगतात की—

एका महान् ऋषीच्या वरदावाने तपोवनाशेजारील शेतामध्ये असा अमृततुल्य तांदुळ पिकतो

नगाधीराज हिमालयाच्या शिखरातून प्रस्रवित झालेला गंगामाईचा वेगवान प्रवाह भक्तांच्या उद्धाराकरिता चाललेला पहात असताना हृषीकेशला आपण आनंदाने काठोकाठ भरून येतो तियले वातावरण पाहून भावुकी मनाला वाटू लागते की—

येथेच आसपास देवांची वसती असली पाहिजे

हृषीकेश पाहून आल्यानंतर मला सारखे वाटते की तेथले दर्शन नुसते अवर्णनीय नाही तर अविस्मरणीय देखील आहे.

हिमालय म्हणजे जगन्माता पार्वतीचे माहेर. ह्या पार्वतीच्या माहेरी पुरुषापेक्षा स्त्रिया विशेष आतिथ्यशील असतात.

—मला स्वामी अखंडानंदांची आठवण झाली. ते हिमालयाची यात्रा करत होते एका विशाल पहाडावर एक दुकान होते. अखंडानंदांना फार भूक लागली होती. भिक्षा मागून यात्रा करणाऱ्या अखंडानंदांच्या जवळ एकहि पैसा नव्हता ते भुकेने व्याकूळ होऊन एका झाडाखाली बसले

त्यांना पाहून एक बाई त्यांच्या जवळ आली त्यांच्या पोटात कांही नाही हे कळल्यावर ती बाई तशीच दुकानात गेली व तिने खाद्यपदार्थ आणून अखंडानंदांना दिले. ते पदार्थ खाऊन अखंडानंदांनी तृप्तीची ढेकर दिली.

इतक्यात त्या बाईचा नवरा येत आहे असे दिसले, तेव्हा ती बाई अखंडानंदांना म्हणाली—

'माझा नवरा फार चिक्कू आहे यात्रेकरूला तो फुकट कांही देत नाही. त्याने तुम्हाला विचारले तर मी दिले असे सांगू नका.'

असे म्हणून ती बाई निघून गेली

अखंडानंदाना वाटले—

"कृष्णाने सत्याची जी व्याख्या केली आहे तीच खरी आहे. सत्य शब्दात नसते कल्याणात असते. असल्या साध्या भोळ्या भाविक मायाळू ममताळू बायका आहेत म्हणूनच भारतीय संस्कृति अद्याप टिकून आहे."

× × ×

गणेश,

हिमालयाचे दृश्य फार विलोभनीय आहे नगाधिराज हिमालयाचा अर्धाभाग कर्पूरखंडाप्रमाणे अत्यंत शुभ्र आहे तर उरलेला अर्धा भाग सोन्याप्रमाणे झळाळत आहे श्याम म्हणजे काळा नव्हे श्याम म्हणजे 'तप्तकांचनवर्णाम्' तापलेल्या सोन्याचा रंग म्हणजे श्याम रंग.

हिमालयाचा अर्धा भाग श्याम आहे तर अर्धा भाग गौर आहे त्या दोन मूर्तीचे ते मीलन पाहून आपणाला वाटते की—

हेंच ते शिव पार्वतीचे मीलन. हेंच ते हराचे व गौरीचे मीलन. हाच तो अर्धनारी नटेश्वर.

× × ×

झोपण्यापूर्वी कॉटवर बसलो असताना सौभाग्यवती मला म्हणाली—

"येथले कांही लोक फार उदार आहेत, तर काही लोक फार चिक्कू आहेत स्वामी अखंडानंदानी लिहिलेले "हिमालयाच्या कुशीत" हें पुस्तक तुम्ही वाचले आहे त्यातल्या मानवी स्वभावाच्या दोन विरोधी गोष्टी मला सांगा."

मी सांगू लागलो—

अखंडानद एकटेच हिमालयाची यात्रा करत होते. दिवस मावळावयास आला होता भटवारी चार अजून एक मैल लांब होते. वाटेत एक संन्यासी जवळच बोचके ठेवून पडला होता. अखंडानंदाना कळून आले की तो फार

थकला आहे व त्याच्या अगात चालण्याचे त्राण राहिले नाही. अखंडानंदांना दया आली. ते गावात गेले व मोठ्या प्रयासाने एक कडी व एक हमाल घेऊन परत आले. त्या संन्याशाला गावात नेण्यात आले. हमालाने आपले काम फार उत्तम केले होते. तो फक्त चार आणे मागत होता, पण तो संन्याशी त्या हमालाला कांहीही देण्यास तयार होईना. त्या संन्याशाच्या बोचक्यात देण्यासारखे होते पण तो कांहीच देण्यास तयार नव्हता. उलट तो हमालाला शिव्या देऊ लागला.

बिचारा हमाल तसाच परत गेला.

कांही वेळाने त्या सन्याशाच्या घशात घरघर सुरु झाली.

ती घरघर सुरु झाल्यावर देखील तो सन्यासी आपल्या बोचक्यातील लहान सहान वस्तुना जपत होता.

असल्या संन्याशाना सन्यास ह्याचा अर्थच कळलेला नसतो. ज्याने आपल्यावर फार उपकार केला त्या हमालाला तो संन्यासी आपल्या बोचक्यातील कांहीच देण्यास तयार नव्हता. उपकाराबद्दल थोडी देखील कृतज्ञता त्याच्याजवळ नव्हती. उलट तो उपकारकर्त्याला शिव्या देत होता.

त्या संन्याश्याच्या, घशातील घरघर वाढू लागली. अखंडानंदानी त्याला जोर जोराने हाक मारली, पण सारा ग्रंथ आटोपला होता. मरणापूर्वी थोडाच वेळ तो आपल्या बोचक्याला जपत होता, आणि मग तो मेल्यावर पटवारी आला व ते बोचके जप्त करून घेऊन गेला.

× × ×

सौभाग्यवती म्हणाली—

'संन्यास घेतलेल्या ह्या माणसाची गोष्ट म्हणजे मानवी स्वभावाचा अजब नमूना आहे दुसरी गोष्ट कोणती आहे ?'

मी सांगू लागलो—

" गंगोत्रीची यात्रा करून अखंडानंद उत्तर काशीला आले. तेथें त्याना Hill Diarrhoea पहाडी हगवण सुरु झाली. सारखे जुलाब होऊ लागले. ते गांवाबाहेर खूप लांब गेले. एका शिळाखंडावर ते राहूं लागले ती जागा

निर्मनुष्य होती. दोन दिवस त्यांना सतत जुलाब होत होते; त्यांना खूप अशक्तता आली. गांवाकडे जाऊन भिक्षा मागून कांहीं तरी पोटात घालणें भाग होते. पण त्यांच्या अगांत चालण्याचे त्राण नव्हते. आपण आता येथेंच मरणार असे त्यांना वाटू लागले.

इतक्यात एक मनुष्य आला. त्यानें अखंडानंदांना आपल्या झोपडीत नेले. आई जशी मुलाची काळजी घेते तशी काळजी घेत, तो अखंडानंदांना आपल्या झोपडीत घेऊन गेला. त्या झोपडीत मातीची चार पांच गाडगी मडकी होती व तो मनुष्य भिक्षा मागून त्या झोपडीत सैंपाक करत असे. त्यानें भिक्षा मागून आणली व सैंपाक करून अखंडानंदांना जेऊ घातले.

उत्तर काशीतले लोक त्याला वेडा समजत असत. ह्या वेडया माणसाचा उद्योग इतकाच की भिक्षा मागून आणायची व सैंपाक करून भुकेल्या माणसांना मातेच्या प्रेमानें जेऊ घालायचे. तो वेडा मनुष्य कुणाची जातपात पहात नव्हता. भुकेल्या माणसाला जेऊ घालणें व दुःखितांची सेवा करणें हाच त्या वेडयाचा उद्योग होता.

अशा माणसाला वेडे म्हणणारे लोकच वेडे नाहींत कां ? त्या वेडयाच्या झोपडीत राजमहालचे ऐश्वर्य नसेल, पण तेथे माणुसकीचा राजमहाल होता. असला मनुष्य जो यज्ञ करतो तो यज्ञ राजेलोकांच्या यज्ञापेक्षा फार मोठा असतो. म्हणूनच मला वाटते महान यज्ञ करणाऱ्या राजा युधिष्ठिराला त्या मुंगसाचे म्हणणे खरे वाटले.

ही गोष्ट ऐकून सौभाग्यवती म्हणाली—

" त्या गरीब हमालाला शिक्षा देणारा तो संन्यासी कोणीकडे, आणि भुकेल्या माणसांना भिक्षा मागून जेऊ घालणारा व दुःखितांची सेवा करणारा हा वेडा कोणीकडे ! "

मी म्हटले —

" अग, असे वेडे लोक भारतात आहेत म्हणूनच कंठात आलेले भारताचे प्राण अजून कुठे सोडून जात नाहींत. आपल्या देशांत असे वेडे नसते तर

इतर प्राचीन संस्कृतिप्रमाणे आपली भारतीय संस्कृति देखील नष्ट झाली असती. असले लोक हीच आपली खरी संपत्ति ह्या संपत्तीमुळेंच आपली भारतभूमि स्वर्गादपि गरीयसी आहे.'

× × ×

गणेश,

झोपायची वेळ झाली आहे. सौभाग्यवती कृष्णकन्हैय्याला नमस्कार करते आहे मी ही कृष्णकन्हैय्याचें ध्यान करत आहे.

उद्या आम्ही हजरतबल, बारामुल्ला वगैरे पहाणार आहो.

पुढचे पत्र त्यानंतर.

तुझा

राम

# पत्र पांचवें

प्रिय गणेश

आज आम्ही सारे प्रवासी चार बसमधून निरनिराळी ठिकाणे पहाण्यास गेलो प्रथम आलो ते हजरत बल

मुसलमानांच्या दृष्टीने हें फार पवित्र स्थान आहे येथील मशिदीमध्ये महंमद पैगंबराचा पवित्र केस ठेवण्यात आला आहे. तो केस एका पेटीत आहे. ती पेटी आम्ही पाहिली

दर शुक्रवारी खूप मुसलमान येथे नमाज पढण्यासाठी येतात, त्यामुळे प्रवासी शुक्रवार सोडून ही जागा पहाण्यासाठी येतात

महंमद पैंगबराच्या जन्मदिनी ह्या पवित्र केसाचे लोकांना दर्शन दिले जाते. त्या दिवशी अतोनात गर्दी होते असें सांगितले जाते की मदिनाहून हा पवित्र केस सय्यद अबदुल्लाने १११११ मध्ये येथे आणला. मदिनाच्या मशिदीच्या धर्तीवर येथे मशीद बांधण्याचे काम सुरु आहे. त्या मशिदीला तीस लाख रुपये खर्च येणार आहे

ह्या ठिकाणी हिंडत असताना माझ्या मनात विचार आले ते असे—

म. गांधींचे काही शिष्य म्हणतात की—

अहिंसा हे आपले ब्रीद असल्यामुळे भारताने मुळीच सैन्य ठेवू नये—

हें मत आत्मघातकी आहे. पाकिस्तान, चीनसारखे शेजारी आपले शत्रू असताना आपण जास्तीत जास्त समर्थ असणें जरूर आहे. ज्या दिवशी भारत आपल्या सैन्याला रजा देईल, त्या दिवशी काश्मीर तर आपल्या हातून जाईलच, पण शेजारी राष्ट्रे आपल्या देशाचे लचके तोडण्यास कमी करणार नाहीत

गीतेचा शेवटचा श्लोक असा आहे—

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।

तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥

जिकडे योगेश्वर कृष्ण व धनुर्धर अर्जुन तिकडे श्री, विजय, शाश्वत ऐश्वर्य व नीति असें माझे मत आहे.

याचा अर्थ असा की—

तलवार व तत्त्वज्ञान ह्यांचा संयोग झाला म्हणजे श्री, विजय, ऐश्वर्य व नीति प्राप्त होतात.

गीतेचा असा संदेश आहे की—

भारताने समर्थ सैन्य ठेवले पाहिजे व भारताला योग्य शस्त्रागार पाहिजे.

देशगौरव सुभाषचंद्र बोस यानी ता. २२ जून १९४० रोजी मुंबईला सावरकर सदनात जाऊन वीर सावरकरांची भेट घेतली. त्याच्याशी चर्चा करून सुभाषचंद्र भारताबाहेर गेले व त्यानी अस्थायी भारत सरकार स्थापन केले. सावरकरानी जिकडे तिकडे सैनिकीकरणाचा प्रचार केला त्यावेळी किती तरी लोकानी त्याना नावे ठेवली, पण सिंगापूर येथून आझाद हिंद नभोवाणीवरून ता २५ जून १९४४ ला भाषण करताना सुभाषचंद्रानी सावरकराना धन्यवाद देताना म्हटले—

When due to misguided political whims and lack of vision, almost all the leaders of the Congress party have been decrying all the soldiers in the Indian army as mercinaries, it is heartening to know that

Veer Savarkar is fearlessly escorting the youths of India to enlist in the armed forces. These enlisted youths themselves provide us with trained men and soldiers for our Indian National Army.

१९४७ साली भारत स्वतंत्र झाला त्यावेळी ब्रिटिश पंतप्रधान ॲटली म्हणाले— Britain is transferring power to India due to the fact that Indian army is no longer loyal to Britain.

× × ×

काश्मीरमध्ये हिंडत असताना माझे मन कृष्णाला नमस्कार करून म्हणत होते—

भारत जोपर्यंत गीता सांगणाऱ्या कृष्णापासून स्फूर्ति घेत आहे, तोपर्यंत भारताला उज्वल काळ आहे. अहिंसेच्या नावाखाली आपले सैन्य पूर्णपणे काढून टाकण्याची बुद्धि राजकर्त्यांना कदापि न होवो.

× × ×

पूर्व बंगालमध्ये अशांततेचे वातावरण आहे, पण काश्मीरात भारताचे सैन्य असल्यामुळे येथे पूर्ण शांतता आहे

म गांधीचे काही शिष्य म्हणतात की

राष्ट्रपिता म गांधी तत्वज्ञानाच्या प्रांतात गीता सांगणाऱ्या कृष्णाच्या पुढे होते. कौरव–पांडवांच्या वेळी ते जर गोपालकृष्णाच्या जागी असते तर त्यांनी अर्जुनाला युद्ध करू नको असाच उपदेश केला असता व त्यामुळे कौरवपांडवाचे युद्ध टळले असते.

ह्या लोकांना म. गांधी समजले नाहीत. म गांधी म्हणत असत की—

गीता म्हणजे पेचप्रसंगांचा कोष आहे माझ्या जीवनातील साऱ्या समस्या गीताग्रंथाने सोडविल्या आहेत.

शेवटल्या दिवसांत म. गांधी दिल्लीला रहात असत व रोज प्रार्थनेनतर प्रवचन देत असत त्यांची ही प्रवचने दिल्ली डायरी ह्या पुस्तकांत ग्रथित केली आहेत. त्यात ते म्हणतात—

If there is no other way of securing justice from Pakistan, India will have to go to war against Pakistan.

ह्याचा अर्थ असा की पाडवांच्यावर कमालीचा अन्याय झाला असताना व न्याय मिळवणेकरता पांडव लढायला तयार झाले असताना, गोपाल-कृष्णाच्या जागी म गांधी असते तर त्यानी देखील अर्जुनाला युद्ध कर असाच उपदेश केला असता.

× × ×

गणेश,

तू तत्वज्ञानाचा खूप अभ्यास केला आहेस माझे हे विचार कितपत ग्राह्य आहेत ते तूच ठरीव

हजरतबल पाहून झाल्यावर आम्ही खीरभवानी हे देऊळ पहाणेस गेलो श्रीनगरपासून हे देऊळ १६ मैल दूर आहे येथे प्रत्येक महिन्याच्या अष्टमीला यात्रा भरते आषाढ महिन्याच्या अष्टमीला फार मोठी यात्रा भरते हिंदूना हें स्थान फार पवित्र वाटते

आम्हाला ह्या देवळाचा पौराणिक इतिहास सागताना असे सागण्यात आले की–

मंदोदरी रावणाची समजूत घालते पण रावण ऐकत नाही. तो प्रकार पाहून पार्वती फार दु:खी कष्टी झाली. तिला मन शाति प्राप्त व्हावी म्हणून मारुतीने पार्वतीला येथे आणल्यावर तिला मन:शाति प्राप्त झाली.

आषाढीला जेव्हा येथे फार मोठा उत्सव होतो तेव्हा मुख्य मत्री ( मुस्लिम ) देवीची पूजा करतो

हे देऊळ चांगल्या स्थितीत आहे आम्ही येथे बसलो असताना काही लोक म्हणाले—

' जवाहरलाल पाकिस्तानचा नक्षा उतरु शकले नाहीत, पण आम्हाला वाटते इंदिरा गाधी ते काम करु शकेल ''

मी सहज बोलून गेलो—

आपली पुराणे सांगतात की—

जेव्हा देवांना दानव आवरत नाहीत तेव्हा दानवांचा पराभव करण्याचे काम देवी करते

माझे हे बोल ऐकून लोक म्हणाले—

' साहेब, आपण अगदी बरोबर बोलला '

× × ×

हिंदूंना फार पवित्र वाटणारे खीरभवानी मंदिर पाहून झाल्यावर आम्ही बसने मानसबल लेक पाहणेस गेलो. हे लेक श्रीनगरापासून १८ मैल दूर आहे येथे पाणी फार खोल आहे नितांत स्वच्छ व खूप खोल पाणी पाहून मन अगदी प्रसन्न होते.

ते लेक पाहून एक गृहस्थ म्हणाले—

' अलिकडच्या सन्याश्यामध्ये स्वामी विवेकानंदांना पाहून ज्याप्रमाणे मन एकदम प्रसन्न होते त्याप्रमाणे हे मानसबल लेक पाहून मन अगदी प्रसन्न होते '

ता ११ सप्टेंबर १८९३ रोजी स्वामी विवेकानंदांनी जे ऐतिहासिक भाषण शिकागोच्या सर्वधर्म परिषदेत केले, त्याबद्दल बोलणे निघाले असताना मी सांगितले—

त्यावेळी स्वामी म्हणाले—

' परधर्मसहिष्णुता आणि विश्वबंधुत्व ह्यांची ओळख साऱ्या जगास ज्या धर्माने प्रथम करून दिली, त्या देशात माझा जन्म झाला ह्याचा मला मोठा अभिमान वाटतो. स्वतःच्या राष्ट्रात ज्यांचा छळ झाला व वित्त आणि जीवित ह्यांची सुरक्षितता राहिली नाही अशा सर्व धर्मांच्या व जातींच्या लोकांना ज्या भूमीने आश्रय दिला तीच माझी जन्मभूमि आहे ह्याचा मला अभिमान वाटतो. '

एका गृहस्थाने मला विचारले—

बायबलमध्ये म्हटले आहे की एका गालावर कोणी मारले तर दुसरा गाल पुढे करा गीता सांगणाऱ्या कृष्णाचे अनुयायी असलेले विवेकानंद ह्यांचे विचार ह्या बाबतीत काय आहेत ? '

मी सांगू लागलो व सारे लोक मोठ्या उत्सुकतेने ऐकू लागले

' प्राच्य व पाश्चिमात्य ह्या आपल्या ग्रंथात विवेकानंद म्हणतात—

जग हें युद्धक्षेत्र आहे संग्राम करून आपला मार्ग मोकळा करून घ्या. वीरभोग्या वसुंधरा पुरुषार्थ दाखवा. साम दाम भेद दंड इत्यादि नीतीचा उपयोग करा, तरच तुम्ही खरे धार्मिक. जोड्यांच्या ठोकरा नि लाथा खाऊन घृणास्पद जीवन जगत राहिल्यास इहलोकी व परलोकीहि नरकभोग हे लक्ष्यात ठेवा. स्वधर्म पाळा. अन्याय करू नका. अत्याचार करू नका पण त्याचबरोबर अन्याय सहन करू नका अन्याय करणे पाप आहे व अन्याय सहन करणे महापाप आहे तुमच्या गालावर कोणी थप्पड मारली तर उलट त्याच्या गालावर तुम्ही थप्पड लगावणार नाही तर तुम्ही पाप केले असे होईल. हेंच शास्त्र आहे. हीच नीति आहे. हाच तुमचा मंत्र असू द्या तरच तुम्ही जीवन जगण्यास लायक व्हाल '

स्वामी विवेकानंदांचे हे विचार ऐकून लोकांनी एकदम टाळ्या वाजवल्या व म्हटले—

' ह्याला म्हणतात खरा सन्यासी. ह्याला म्हणतात कृष्णाचा खरा भक्त. '

× × ×

मानसबल लेक पाहून झाल्यावर आम्ही वलरो वूलर लेक पाहणेस गेलो. हे लेक भारतात सर्वात मोठे लेक आहे त्याची लांबी रुंदी १९ × १० किलोमिटर आहे व या लेकमध्ये प्रचंड लाटा येतात. असें सांगण्यात येते की या जागी पूर्वी एक भव्य शहर होते, पण भूकंपामुळे ते नष्ट झाले व येथे वूलरलेक निर्माण झाले

हे लेक पहाताना मनामध्ये आनंदाच्या व आश्चर्याच्या लाटा येतात.

सारे लोक अथांग वूलर लेक पहाण्यात दंग होते मी ह्या लेककडे भावाने भावनेने भक्तीने पहात होतो. मी पहात होतो, आणि त्या लेकने मला संदेश दिला की—

स्वतःकडे त्रयस्थपणाने पहाणेस शीक

माझ्यापुढे एकदा एक फार मोठा कज्जा चालणार होता त्या कज्यात दोन्ही बाजूकडून बडे बडे वकील येणार होते मला एक स्वप्न पडले व त्या स्वप्नात तो कज्जा माझ्यापुढे सुरू झाला. दोन्ही वकिलाची खूप वादावादी झाली. मला योग्य वाटले त्याप्रमाणे स्वप्नात न्यायाधीश म्हणून मी वर्तन केले स्वप्न संपेपर्यंत माझी खात्री होती की माझे वर्तन बरोबर आहे.

जागा झाल्यावर मी स्वप्नांत केलेल्या वर्तनाबद्दल त्रयस्थपणाने मी पाहू शकत होतो. तसे पहाताना माझे काय चुकले ते मला बरोबर कळले.

पुढे जेव्हा तो कज्जा माझ्यापुढे चालला तेव्हा स्वप्नांत केलेल्या चुका मी केल्या नाहीत व योग्य ते वर्तन केले. परिणाम असा झाला की, ते बडे बडे वकील माझ्यावर खुष होऊन म्हणाले—

न्यायाधीश असावा तर असा असावा.

स्वतःकडे त्रयस्थपणाने पहाणेस शिकणे ही गोष्ट फार महत्वाची आहे.

वुलरलेकमध्ये फार मोठया लाटा येत होत्या व त्याकडे त्रयस्थपणाने पहाण्यामुळे आम्हा सर्वांना आनंद वाटत होता.

मनामध्ये सुखदुःखाच्या लाटा येतात, व जोपर्यंत मन म्हणजे मी अशी आपली भावना असते तोपर्यंत सुखदु.खाच्या लाटानी आपण बेजार होतो. पण मी म्हणजे त्या मनापलीकडील दिव्यशक्ति अशी आपली भावना होते तेव्हा किनाऱ्यावर उभे राहून त्या सुखदुःखाच्या लाटाकडे आपण मौजेने पाहू शकतो स्वतःच्या मनोव्यापाराकडे त्रयस्थपणाने त्या दिव्यशक्तीच्या चष्म्यातून पाहणे हीच आनंदाची गुरुकिल्ली आहे.

परमार्थाच्या प्रांतात सुखदुःखाच्या पलीकडे जाणे ह्या गोष्टीला फार महत्व आहे या बाबतीत काही लोक म्हणतात की—

सुख झाले असताना बरे वाटू न देणे व दुःख झाले असता वाईट वाटू न देणे म्हणजे सुखदुःखाच्या पलीकडे जाणे.

दुसरे कांही लोक म्हणतात की—

सुख झाले असता वाईट वाटणे व दुःख झाले असता बरे वाटणे म्हणजे सुखदुःखाच्या पलीकडे जाणे

ह्या दोन्ही कल्पना एकांगी आहेत

सुखदुःखाच्या पलीकडे जाणे म्हणजे आपल्या भावना मारणे नव्हे

रावणाने सीतेला पळवल्यानंतर राम रडला खूप रडला. एका लतेजवळ जाऊन म्हणाला—

हे लते, कांही दिवसांनी तुला फुले येतील त्यावेळी सीता येथे आली तर तिला तू सांग की माझी ही फुले रामाच्या अश्रूंची फुले आहेत

असला राम आपणाला आवडतो सीतेला पळवल्यानंतर रामाला बरे वाटले असते अथवा त्याला वाईट वाटले नसते तर तसला राम आपणाला आवडला नसता

राम नुसताच रडत बसला असता तरी देखील तो आपणाला आवडला नसता. सीतेला रावणाने पळवून नेल्यावर राम रडला, पण नंतर त्याने रावणाला ठार मारुन सीतेला सोडवून आणले. असा राम आपल्याला आवडतो

सुखदुःखाच्या पलीकडे जाणे म्हणजे सुखाच्या वेळी सुखी माणसासारखे वागणे व दुःखाच्या वेळी दुःखी माणसासारखे वागणे, पण सुखदुःखामुळे आपल्या मनाचा तोल बिघडू न देणे

समत्वं योग उच्यते ।

समतोलपणा म्हणजे योग हा गीता सांगणाऱ्या कृष्णाचा महामंत्र आहे.

जोवरी न जाई मनाचा तोल । तोवरी वाजे गीतेचा ढोल ।

असे सार्थत्वाने आपण म्हणू शकू

नाटकातला नट सुखाच्यावेळी सुखी माणसाप्रमाणे वागतो व दुःखाच्यावेळी दुःखी माणसाप्रमाणे वागतो, पण सुखदुःखामुळे त्याच्या मनाचा तोल जात नाही. ह्याचें कारण त्याने नाटकात भूमिका केली तरी तो स्वतः तटस्थ असतो.

जीवन देखील एक नाटक आहे. त्या नाटकात सुखाच्या वेळी आपण सुखी माणसाप्रमाणे वागावे व दुःखाच्यावेळी दुःखी माणसाप्रमाणे वागावे, पण स्वतःकडे तटस्थपणाने पहावे म्हणजे आपल्या मनाचा तोल जात नाही.

स्वतःकडे तटस्थपणाने पाहू ग्रेस शिकणेकरता आपल्या हृदयात जो ईश्वर आहे त्याला पहाता आले पाहिजे.

आपल्या हृदयातल्या देवाचा शोध व बोध म्हणजेच खरा परमार्थ. हा शोध व बोध होण्यास ज्ञान पाहिजे, कर्म पाहिजे, भक्ति पाहिजे

ज्ञानाची स्फूर्ति, कर्माची शक्ति व भक्तीची शांती म्हणजे परमार्थाची मूर्ति.

अंत:करणरूपी समुद्रात खोल बुडी मारुन आपण हृदयस्थ परमेश्वराला पाहू लागलो म्हणजे सुखदु:खाच्या शिपल्यातून आनंदाचे मोती बाहेर येतात

मनुष्य सुखासाठी धडपडतो असे म्हणतात, पण हें अर्धसत्य आहे

पूर्ण सत्य असे की—

मनुष्य आनंदासाठी धडपडतो.

ध्येयाच्या मागे लागुन कितीतरी महाभाग जाणून बुजून दु खी जीवन व्यतकरतात, ह्याचें कारण त्या दु'खी जीवनात देखील त्याना आनंद वाटत असतो.

राजद्रोहाच्या खटल्यात लोकमान्य टिळकाना कडक शिक्षा झाल्यावर किती तरी लोक दु:खाने रडले, पण त्या दु:खात लोकमान्याना आनंद वाटत होता. त्या रात्री ते आनंदाने झोपी गेले.

गणेश,

मनाच्या वेलीला आनंदाची फुले येतात, पण केव्हा ? तर त्या वेलीला अंतरगातील ईश्वराच्या ओळखीचे पाणी घातले तर

एकदा येसू ख्रिस्त म्हणाले—

माझ्या साऱ्या उपदेशाचे सार इतकेच आहे की—

तुम्ही जसे आपल्यावर प्रेम करता तसे शेजाऱ्यावर प्रेम करा.

अठरा पुराणाचे सार असें आहे की—

परोपकार म्हणजे पुण्य व परपीडा म्हणजे पाप

गणेश,

ह्याच चालीवर व ह्याच सुरावर बोलताना मला वाटते की साऱ्या परमार्थाचे सार म्हणजे—

अंतस्थ व्हा हृदयस्थ पहा.

तू परमार्थाचा खूप अभ्यास केला आहेस पहा हा विचार तुला पटतो का.

× × ×

*

वुलर लेक पाहून झाल्यावर आम्ही निषाद बागेंत गेलो. ही बाग श्रीनगरपासून ११ किलोमीटर अंतरावर दललेकच्या किनाऱ्यावर आहे. नूरजहानचा भाऊ असफखान ह्याने इ. स. १६३३ मध्ये ही बाग तयार केली. जेव्हा बादशहाने ती पाहिली तेव्हा तो इतका खूष झाला की ती आपणास द्यावी अशी त्याने गर्भित सूचना केली, पण असफखान तयार झाला नाहीं, तेव्हा बादशहाने ह्या बागेचे पाणी तोडले. परिणाम असा झाला की लहान लहान झाडे व सुंदर सुंदर फुलांचे ताटवे कोमेजू लागले ते दृश्य पाहून असफखान देखील दुःखाने कोमेजू लागला.

आपल्या धन्याचे दुःख पाहून त्याच्या माळ्याने गुपचूपपणे तोडलेला पाण्याचा प्रवाह पुनः सुरु केला व मग बाग आनंदाने नाचू लागली.

तो प्रकार पाहून बादशहाने माळ्यास बोलावून घेतले व जाब विचारला.

माळी म्हणाला—

' साविंद, माझ्या धन्याचा दुःखी चेहरा मला पाहवेना म्हणून मी हा गुन्हा केला. आपण द्याल ती शिक्षा मी आनंदाने भोगणेस तयार आहे

त्या माळ्याचे ते बोल ऐकून व त्याची ती स्वामीनिष्ठा पाहून बादशहाने त्याला शिक्षा करण्याच्या ऐवजी त्याला बक्षिस दिले व बागेचा पाणीपुरवठा पूर्ववत् चालू करावा असा हुकूम दिला.

ही बाग ५९५ वार लांब व ३६९ वार रुंद आहे, व ह्या बागेत १० मजले आहेत. मधून पाण्याचा स्वच्छ प्रवाह वाहत आहे. ह्या बागेत निरनिराळ्या रंगाची फुले व उत्तमोत्तम झाडे आहेत. ह्या बागेत ज्या हिरवळी आहेत त्या पाहून मन प्रसन्न होते.

निशात बाग म्हणजे आनंदाची बाग. हजारो प्रवासी या ठिकाणी येतात व आनंदाची मेजवानी लुटतात नुकतेच लग्न झालेल्या नवराबायकोंना ह्या बागचे विशिष्ट आकर्षण वाटते.

ह्या बागेत आम्ही शंभर प्रवासी जेव्हा भोजनास बसलो तेव्हा प्रत्येकाच्या मुखावर आनंद ओसडून वाहत होता.

जेवताना कांही लोक म्हणाले—

'संत वेदांती आहेत, पण त्याना एकांत आवडतो खरं म्हणजे त्यांनी लोकात मिसळून काम करायला पाहिजे. रामदासासारख्या संतांनी लोकात मिसळून काम केले पण इतर संत एकांती आहेत.'

दुसरे कांही लोक म्हणाले—

'एकांती संत स्वार्थी होत. ते एकांतात बसून स्वतःचा स्वार्थ साधतात. जे संत लोकात मिसळून काम करतात तेच परार्थी असतात.'

गणेश,

संताना लोक वेदांती म्हणतात, पण परमार्थाच्या प्रांतात मोठा वाद असा आहे की हे वेदांती संत एकांती का लोकांती? विवाद असा आहे की तुकारामासारखे वेदांती एकाती आहेत तर रामदासासारखे वेदांती लोकांती आहेत. प्रवाद असा आहे की एकांती संत स्वार्थी असतात, तर लोकांती संत परार्थी असतात.

हे सर्व वाद विवाद नि प्रवाद पाहून लवाद नेमून निकाल द्यायचा झाला तर असा निकाल करावा लागेल की—

वेदांती संत एकांती व लोकांती असतात. एकांत हे त्यांचे माहेर असते व लोकांत हे त्यांचे सासर असते

गणेश,

स्त्रीला ओढ असते माहेरची पण तिचे कार्यक्षेत्र असते सासरी. वेदांती संताना ओढ असते एकांताची पण त्याचे कार्यक्षेत्र असते लोकांतात.

एकांत माहेर लोकांत सासर, हे त्यांच्या जीवनाचे सूत्र असते. एकांतात ते अंतरंगात जनार्दन पहातात व लोकांतात ते जनी वसे जनार्दन म्हणून वागतात, आणि जनता जनार्दनाची सेवा करतात.

आपण पांचामुखी परमेश्वर म्हणतो. पूजेमध्ये पंचायतनाला विशेष महत्व आहे. आपल्या महाराष्ट्राचे संत पंचायतन कोणते असें जर कोणी विचारील तर त्याचे उत्तर असे की—

ज्ञानेश्वर नामदेव एकनाथ तुकाराम व रामदास

हे आपले संतपचायतन आहे. वेदांती संत एकांती का लोकांती ? ह्या प्रश्नाचा विचार माझ्या मनांत सुरू झाल्यावर मी ह्या पांच संतांचा विचार करू लागलो

ज्ञानेश्वराना एकांत प्रिय होता ह्याबद्दल वाद नाही ते म्हणतात—

पुरे पुरे आता प्रपच पाहणे ।
निजानंदी राहणे स्वरूपी वो माये ॥

ज्ञानेश्वराना एकांत प्रिय असला तरी—

' हे विश्वचि माझें घर '

असे म्हणून ते लोकांती झाले व ' अवघाचि संसार सुखाचा करीन ' अशी त्यांनी प्रतिज्ञा केली.

प्रेम प्रसाद व प्रतिभा ह्याचा त्रिवेणी संगम ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयात झाला आहे. त्यांच्या शब्दाची फुले कधी कोमेजत नाहीत की कधी त्यांचा सुवास कमी होत नाही ज्या जाधवांच्या राज्यछत्राखाली ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली, ते राज्यछत्र लयास गेले, पण ज्ञानेश्वरांचे छत्र महाराष्ट्रात अक्षय्य आहे व अक्षय्य राहो हीच प्रार्थना.

लोकांतात जाऊन ज्ञानेश्वरांनी समाजाचे जें अपरंपार कल्याण केले ते सोन्याहून पिवळे व रत्नाहून तेजस्वी आहे

अशा ज्ञानेश्वराना स्वार्थी असे म्हणणे किंवा ते लोकांती नव्हते असें म्हणणे म्हणजे साडे सहा फूट ऊंचीच्या माणसाला तू ठिंगु आहेस असे म्हणण्याप्रमाणे किंवा कुबेराला तू गरीब आहेस असे म्हणण्याप्रमाणे आहे.

नामदेवाना एकांताची आवड होती ह्यात वाद नाही. एकांतात ते देवास म्हणतात—

देवा, तुझ्या दारी हा नामा आला आहे. तुझ्या कृपेची सावली मिळेल तरच हा निवेल. तू अनाथांचा नाथ, मी अनाथ तू कृपाळू माउली तर मी भुकाळू बालक, तू सागर तर मी सरिता, तू चंद्र तर मी चकोर.

रात्रंदिवस तुझी वाट पहाणारा हा नामा तुला दिसत नाही का ?

वाट पाहे दाहीदिशा । जीवो धरोनि भरंवसा ॥
प्राण केव्हा येईल माझा । आलिंगिल बाहू भुजा ॥
नामा गहिवरे दाटला । देह धरणिये लोटला ॥

असे हे एकांती नामदेव पुढे लोकांती झाले.

ज्ञानेश्वराच्या बरोबर त्यांनी तीर्थयात्रा केली व ज्ञानेश्वरांच्या निर्याणा-तर त्यानी खूप प्रचार केला

## पंढरी ते पंजाब

नामदेवानी जे लोककल्याणाकरता महान् कार्य केले त्याला तोड नाही.

सत्तेच्या जोरावर मराठयानी पुढे भगवा झेंडा अटकेपार लावला हे खरे आहे, पण सत्तेचा आधार नसताना नामदेवानी मराठयांनी अटकेपार झेंडा लावण्यापूर्वी भागवतधर्माचा झेंडा साऱ्या पंजाबभर नाचवला. त्याचे ते कार्य पाहून महाराष्ट्राच्या मनाच्या विटेवर नामदेवांचे नाव युगे अठ्ठावीस उभे राहील ह्यात अणु परमाणू इतकाहि संदेह नाही.

अशा महान् नामदेवाना स्वार्थी म्हणणे किंवा ते लोकांती नव्हते असें म्हणणे म्हणजे साखरेला गोडी नाही, किंवा रत्नाला तेज नाही, अगर अत्तराला सुवास नाही असें म्हणण्याप्रमाणे आहे.

एकनाथाना एकांत प्रिय होता ह्याबद्दल वाद नाही, पण नतर लोकांती बनून त्यानी जे महान् कार्य केले ते पाहून लोक त्याना म्हणू लागले—

अनाथाचा नाथ एकनाथ.

वाणी लेखणी व करणी ह्यानी लोकांची आमरण सेवा करणारे

जन तेचि जनार्दन ।
एका जनार्दनी भजन ॥

असे म्हणून जनसेवा म्हणजेच ईशसेवा असा उपदेश करणारे एकनाथ जो निकाल देतात तो असा आहे—

एकांती आणि लोकांती । थोर साक्षेप केला संती ॥

ज्ञानियांच्या राजाने जी शिकवण खूप उंचावरुन दिली त्या शिकवणीची गंगा भगिरथ प्रयत्नाने ज्या महाभागाने बहुजनसमाजापर्यंत पोचवली त्या महात्म्याचे नाव एकनाथ.

अशा एकनाथांना स्वार्थी म्हणणे किंवा ते लोकांती नाहीत असें म्हणणें म्हणजे गंगा पवित्र नाही किंवा माता प्रेमळ नाही असें म्हणण्याप्रमाणे आहे.

' ज्ञान्याचा एका व नाम्याचा तुका ' असे म्हटले जाते. प्रपंचात दुःखाचे डोंगर कोसळल्यावर तुकाराम डोंगरावर जाऊन एकांतीचे सुख अनुभवू लागले.

विरक्त झाल्यावर तुकाराम एकांती झाले ह्याबद्दल वाद नाही, पण साक्षात्कार झाल्यावर ते लोकांती झाले व आता राहिलो उपकारापुरता असें म्हणून त्यांनी लोकांच्या कल्याणाकरता पराकाष्ठेचें महान् कार्य केले.

साक्षात्कारानंतर तुकारामांनी कर्माचे झाड ज्ञानाच्या भूमीत लावले, व त्याला भक्तीचे पाणी घालून त्या झाडाला येणारी आनंदाची फळे लोकांना मुक्त हस्ताने वाटली.

अशा तुकारामांना स्वार्थी म्हणणे किंवा ते लोकांती नव्हते असें म्हणणे म्हणजे दुधात पौष्टिकपणा नाही किंवा पाणी जीवन नाही असें म्हणण्याप्रमाणे आहे

पंचायतनातील पाचवे संत रामदास परार्थी आहेत व लोकांती आहेत ह्याबद्दल वाद नाही पण लोकांना वाटते की ते एकांती नाहीत.

लोकांची ही समजून चुकीची आहे. रामदास जितके लोकांती आहेत तितकेच ते एकांती आहेत. ते म्हणतात—

उठे मानसी सर्व लोकांसी जावे ।
रघुनायका काय कैसे करावे ॥
मनाने दमावे श्रीरामी रमावे ।
दिगंती फिरावे जना न स्मरावे ॥

× × ×

प्रकृति सांभाळावे ।
परि अंतरी शाश्वत ओळखावे ॥

× × ×

पहावे आपणासी आपण ।
हा नाव ज्ञान ॥
आपला आपणासी लाभ ।
हेचि ज्ञान परमदुर्लभ ॥

× × ×

समुदाय करावे, महंत मेळवावे, ते युक्तिबुद्धीने भरावे हा समर्थांचा उद्योग असला तरी—

' एकांत सेवावा '

हें समर्थांचे ब्रीद होते.

मनो निवृत्त जनी प्रवृत्त अशा वृत्तीचे ते होते ते जितके लोकांती होते तितकेच एकांती होते.

त्याना एकांती नाही असे म्हणणे म्हणजे मातेला माया नाही किंवा संत साधु नाही असे म्हणण्याप्रमाणे आहे.

वेदांती संत कधीहि स्वार्थी नसतो तो परार्थी असतो म्हणूनच सत्ता संतापुढे नमते. हे वेदांती संत जितके एकांती असतात तितकेच लोकांती असतात. पक्षाला दोन पख असल्याशिवाय आकाशांत उडता येत नाही. वेदांती संताना देखील दोन पख असतात. एकाचे नांव एकांत व दुसऱ्याचें नांव लोकांत ह्या दोन पखांच्या जोरावर वेदांती संत परमार्थाच्या आकाशांत उडतात. अशा परिस्थितीत वेदांती संत एकांती की लोकांती ह्या प्रश्नाचे उत्तर 'की' च्या जागी 'व' घालून द्यावे लागेल व असे म्हणावे लागेल की—

वेदांती संत एकांती व लोकांती.

× × ×

गणेश,

" लहानपणी तू व मी मिळून अभ्यास केला. मोठेपणी तू मोठा संशोधक झालास. हा विचार तुझ्या संशोधक मनाला पटतो का, आवडतो का ते पहा.

× × ×

निषात बागेत भोजन झाल्यावर आम्ही बारामुल्ला पहाणेस गेलो

आम्हाला हें मोठे तीर्थक्षेत्र वाटले.

पाकिस्तानने टोळीवाले काश्मीरमध्ये घुसवले. त्यांच्याजवळ सारी शस्त्रे होती. काश्मीरचे सैन्य थोडे होते. हे टोळीवाले – सान्या शस्त्रानिशी सज्ज असलेले हे टोळीवाले–प्रदेशामागून प्रदेश व्यापत श्रीनगरच्या दिशेने निघाले. तिकडे जिनाना आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. आपण श्रीनगरमध्ये कसा समारंभ साजरा करण्याचा व किती डौलाने प्रवेश करावयाचा ह्याबद्दल जीना बेत रचू लागले होते.

उघड्या डोळ्यानी आपला नाश पहाण्याची पाळी काश्मीरच्या महाराजांच्यावर आली प्रसंग फार बाका होता त्या आणीबाणीच्या प्रसंगी महाराजा हरिसिंग ह्यानी ता. २६।१०।४७ रोजी हिंदुस्थानच्या सामील नाम्यावर ( Merger Agreement ) सही केली.

मग भारताने विमानाने सैन्य पाठवण्यास सुरवात केली.

भारतीय सैन्याची पहिली तुकडी व टोळीवाले ह्यांच्यामध्ये बारामुल्ला येथे घनघोर लढाई झाली. त्या लढाईत आपल्या कितीतरी जवानानी पराकाष्ठेचा पराक्रम करून धारातीर्थी प्राणांचे बलिदान केले.

ज्यानी आपल्या प्राणांचे बलिदान केले त्या आपल्या सान्या जवानांची नांवे बारामुल्ला येथे कोरली आहेत

ती नावे पाहून व त्यांची शौर्यगाथा ऐकून आम्हा सान्या प्रवाशांचे डोळे पाण्याने भरुन आले

आपल्या जवानानी प्राण अर्पण करून शत्रूला थोपवून धरले व मग दुसऱ्या तुकडीने शत्रूला मागे रेटत नेले.

आम्ही प्राण अर्पण करणाऱ्या सान्या जवानांची नांवे वाचली व त्याना अश्रूची फुले वाहून म्हटले—

" तुमच्या अलौकिक पराक्रमामुळे आम्ही काश्मीरची सफर करू शकलो. तुम्हाला कोटी कोटी प्रणाम ! "

बारामुल्ला हे तीर्थक्षेत्र पाहून भारावलेल्या मनस्थितीत आम्ही लालारुख हॉटेलमध्ये आलो व रात्री जेवण झाल्यावर व्हराड्यात बरेच सोफासेटस् टाकले होते त्यावर बोलत बसलो

बोलताना ज्ञानेश्वरांचा विषय निघाला.

एकाने मला शंका विचारली—

' साहेब, विठ्ठलपंतांनी संन्यास घेतल्यावर गुरुच्या आज्ञेने पुन्हा गृहस्थाश्रम घेतला त्यांना चार मुले झाली मुंजीची वेळ झाल्यावर विठ्ठलपंतांनी आळंदीच्या ब्रह्मवृंदाना विनती केली की आपणाला प्रायश्चित्त देऊन शुद्ध करून घ्यावे. शास्त्राधार पाहण्यांत आला व विठ्ठलपंताना सांगण्यांत आले की तुमच्या कृत्याला देहांत हे प्रायश्चित्त आहे. विठ्ठलपंतांनी ते मानले व प्रयागला जाऊन त्रिवेणीसंगमात प्राणार्पण केले

ह्या साऱ्या गोष्टी एकून शंका अशी येते की—

आपल्या ज्या स्मृती आहेत त्यामध्ये असल्या कृत्याला देहांत प्रायश्चित्त सांगितले आहे का ? सांगितले नसेल तर विठ्ठलपंतांना देहांत प्रायश्चित्त कसे देण्यात आले ! व त्यांनी ते कसें मान्य केले ? '

मी सांगू लागलो—

' अठरा मुख्य स्मृति, अठरा उपस्मृति, व एकवीस इतर स्मृति – अशा एकदर सत्तावन्न स्मृति आहेत. त्या साऱ्या स्मृतीमध्ये असल्या कृत्याला देहांत प्रायश्चित्त आहे असें कोठे म्हटले नाही श्रुति व स्मृति पहाता विठ्ठलपंतांच्या कृत्याला देहांताचे प्रायश्चित्त देण्यास कोठेच आधार मिळत नाही '

लोक म्हणाले—

' साहेब, असे आहे तर देहांताचे प्रायश्चित्त कसे देण्यात आले ? का देहांताचे प्रायश्चित्त सांगण्यात आले हें म्हणणेच खोटे आहे ? '

मी सांगू लागलो—

' नामदेव हे ज्ञानेश्वराचे समकालीन होते. ते ज्ञानेश्वरापेक्षा वयाने वडील होते.

कविकुलगुरु कालिदास ह्याबद्दल खात्रीलायक माहिती मिळत नाही. त्याच्या चरित्राबद्दल आख्यायिका आहेत ज्ञानेश्वरांच्या चरित्राबद्दल नामदेवांच्या अभंगावरून माहिती मिळते ज्ञानेश्वरांच्या प्रेमाने नामदेवांनी जे अभंग केले ते महाराष्ट्रावर फार मोठे उपकार आहेत

ह्या अभंगावरून असे दिसते की—
विठ्ठलपंताना देहांत प्रायश्चित्त देण्यात आले.
नामदेव आपल्या अभंगात म्हणतात—

झाली उपवरे सतंधायोग्य ।
जनयता उद्वेग चिंतातुरे ॥
जातीकुळावेगळी पडियेली निराळी ।
मागी वशावळी प्रायश्चित्त ॥
मेळविले द्विज केली ब्रह्मसभा ।
क्षमा अपराधा करा दीना ॥
सांगाल ते मान्य म्हणती साहोयपणे ।
शुद्धी हे करणे पतितासी ॥

× × ×

पाहतील ग्रंथ सभाश्रेष्ठ महाजन ।
वैदिक शास्त्रज्ञ पुण्यश्लोक ॥
देहांते प्रायश्चित्त असे ह्या बोलिले ।
विचारुनि भले हित करा ॥
म्हणती द्विजवर आणिक नाही उपाव ।
सस्कारे देह करा शुद्ध ॥

× × ×

त्रिवेणी संगमी घालोन कर्वती ।
गेला पूर्वस्थिती वीतरागे ॥
दारा पुत्रगृह त्यजुनी निघाला ।
नमस्कार केला द्विजवृंदा ॥

× × ×

नामदेवाचे हे अभंग ऐकून लोक म्हणाले—

'साहेब, नामदेवाच्या अभंगावरून असे दिसते की— विठ्ठलपंताना देहांत प्रायश्चित्त देण्यात आले व त्यांनी प्रयागला जाऊन देहांत प्रायश्चित्त घेतले. पण शंका अशी की शास्त्राधार नसताना देहांत प्रायश्चित्त कसें

देण्यात आले व शास्त्राधार नसताना विठ्ठलपंतांनी देहांत-प्रायश्चित्त कसे घेतले ?

मी सांगू लागलो—

हीच तर शोकांतिका आहे. लोक-विद्वान् लोक देखील- श्रुति स्मृतींचा अभ्यास करत नाहीत आपल्या समजुती म्हणजेच शास्त्र असे मानतात व त्याप्रमाणे वर्तन करतात. या बाबतीत माझा अनुभव ऐकण्यासारखा आहे

लोक म्हणाले—

सांगा, सांगा आम्ही तो अनुभव ऐकण्यास फार उत्सुक आहो.'

मी सांगू लागलो—

' एल्. एल्. एम् चा अभ्यास करत असताना मी स्मृति व श्रुति ह्यांचा अभ्यास करत होतो. मला समजून आले की विधवांच्या केशवपनाबद्दल श्रुति व स्मृति ह्यात आधार नाही उलट केशवपनाच्या विरुद्ध बोल आहेत.

न स्त्रियाः वपनं कार्यं न च वीरासनं तथा ॥

वैदिककाळी व स्मृतिकाळी केशवपनाची चाल नव्हती रामायण किंवा महाभारत ह्या ग्रंथात देखील विधवांचे केशवपन करावे ह्याबद्दल आधार मिळत नाही.

बुद्धानंतर बुद्ध भिक्षुणींचे अनुकरण होऊ लागले व विधवांच्या केशवपनाची चाल आपल्या धर्मात आली, पण स्मृतींचा व श्रुतीचा आधार पहाता विधवांनी केशवपन करण्याचे कारण नाही.

स्कंद पुराणामध्ये विधवांचे केशवपन करावे ह्याबद्दल आधार आहे हें खरे आहे, पण ते श्लोक उघड उघड प्रक्षिप्त आहेत.

स्कंद पुराणात केशवपनाचा उल्लेख आहे, पण लगेच असे म्हटले आहे की —

विधवेने ब्राह्मण यति व साधु ह्यांना

" लाडू, पेंडिका, वडे करंज्या " वगैरे गोड व सुगंधी पक्वान्ने घालावी.

लाडू पेंडिका वडे व करंज्या हे शब्द संस्कृत नाहीत, पण ज्याला चंद्रसुधा मोदकासारखा दिसतो अशा एकाद्या भोजनभाऊने हे श्लोक स्कंदपुराणात घुसडून दिले असले पाहिजेत

अशा परिस्थितीत श्रुति व स्मृति ह्यांना मानणाऱ्या सनातनी विद्वानांनी असेंच म्हणणेस पाहिजे की—

विधवांचे केशवपन करण्याचें कारण नाही

ह्या बाबतीत सारे आधार देऊन मी माझा लेख पुरुषार्थाकडे पाठवला. पंडित सातवळेकरांनी त्या लेखाबद्दल माझी खूप स्तुति करून तो लेख पुरुषार्थात छापला.

लेख छापून आल्यावर सांगलीच्या वेदशाळेतील एक पंडित माझ्या घरी आले व म्हणाले—

"तुम्ही रोज पूजा करता फार धार्मिक आहा. मग पुरुषार्थात असला लेख लिहून धर्मभ्रष्टपणा का करता? विधवाचे केशवपन झालेच पाहिजे केशवपन न करणे म्हणजे शुद्ध धर्मभ्रष्टपणा आहे."

मी म्हटले—

'मी माझे आधार दिले आहेत. तुम्ही तुमचे आधार सांगा मी ते जरुर पाहीन'

ते विद्वान् म्हणाले—

'मी मोठा विद्वान् आहे. मी शास्त्रपारंगत आहे मी म्हणतो हाच माझा आधार. तुम्हाला मी धर्मभ्रष्ट म्हणणार. धर्मभ्रष्ट म्हणून शिव्या देणार..'

मी म्हटले—

'अहो आधार सांगा. माझ्याच घरी येऊन मलाच शिव्या देता. हे तुमच्यासारख्या शास्त्री पंडिताला शोभते का?'

ते विद्वान् म्हणाले—

'आधार विचारू नका. शास्त्रात माझा हात धरणारा कोणी नाही. मी म्हणतो हाच आधार विधवाचे केशवपन झालेच पाहिजे. त्या विरुद्ध जो कोणी लिहील तो धर्मभ्रष्ट आहे असेंच मी म्हणणार. त्याला मी शिव्या देणार.'

त्या विद्वान् शास्त्री पंडिताने मला एकहि आधार न सांगता मला अर्धा तास शिव्या दिल्या व मी उलट शिव्या दिल्या नाहीत म्हणून माझे कौतुक करीत तो निघून गेला

थोड्या दिवसांनी राजापूरच्या एका शास्त्रीबुवाचे मला पत्र आले त्याच्या विधवा बहिणीनें केशवपन केले नव्हते व त्याबद्दल त्या शास्त्रीबुवास वाळीत टाकणेचा ठराव झाला होता त्या शास्त्रीबुवाने देखील श्रुति स्मृतींचा ह्या बाबतीत अभ्यास केला नव्हता वाळीत टाकण्याचा ज्यानी ठराव केला त्यानी आपली परंपरागत समजूत म्हणजेच शास्त्र असे समजून ठराव केला व शास्त्रीबुवाने त्या ठरावापुढे मान तुकवली.

माझा पुरुषार्थमधील लेख प्रसिद्ध झाल्यावर सारा नूर पालटला शास्त्रीबुवास वाळीत टाकणेचा ठराव रद्द केला गेला व मग शास्त्रीबुवानी मला जें पत्र पाठवले त्यात करता येईल तितकी माझी स्तुति केली व म्हटले—

तुमच्या लेखामुळे माझे संकट टळले. तुम्हाला पुनः पुनः सहस्रशः प्रणाम.

× × ×

हा प्रकार ऐकून लोक म्हणाले—

' साहेब, तुमचा अनुभव फार बोलका आहे. विठ्ठलपंतांच्या बाबतीत जो प्रकार झाला त्याबद्दलची आमची सारी शंका आता फिटली. '

× × ×

नतर ज्ञानदेवाच्या समाधीबद्दल बोलणे निघाले ज्ञानेश्वरांच्या जिवंत समाधीबद्दल नामदेवांनी जे अभंग लिहिले आहेत तितके करुणावर वाङ्मय मराठीमध्ये नाही.

त्यावेळी आळंदीला खूप लोक जमले होते ज्ञानेश्वर आता जाणार म्हणून माशासारखे ते तळमळत होते.

कासावीस प्राण तळमळी ।
जैसी का मासोळी जीवनावीण ॥

त्यावेळचे नामदेवाचे अभंग वाचून वा ऐकून पाषाण हृदयी माणूस देखील रडू लागेल

इंद्रायणीने खूप लोकाना पावन केले आहे पण त्या दिवशी ज्ञानेश्वर समाधी घेण्यासाठी जात असताना लोकानी जो शोक केला त्या अश्रूमुळे इंद्रायणी देखील पावन झाली

लोकानी अश्रूंच्या फुलांनीच ज्ञानेश्वरांची पूजा केली.

ज्ञानेश्वराचे गुरु निवृत्तिनाथ पण तेहि रडू लागले. सोपानदेव मुक्ताबाई यांनी तर आकांतच केला बघणाऱ्या लोकाना दुःख आवरेना.

सारे संत कासावीस झाले

नामा म्हणे संत कासावीस सारे ।
लाविती पदर डोळियासी ॥

निवृत्ति नाथाचे समाधान करण्याचा इतरानी प्रयत्न केला पण त्याना दुःखावेग आवरेना. बांधल्या तळ्याचा पाट फुटावा आणि बारा वाटे ओघ वाहवेत तसा प्रकार झाला. बांधल्या पेंडोचा आळा सुटावा व रानोमाळ बकत पांगावे त्याप्रमाणे त्यांचे अश्रू वाहू लागले. त्यांच्या आईबापानी कुलाशा सोडून देहांत प्रायश्चित्त घेतले त्या वेळी त्याना जे दुःख झाले त्यापेक्षा आता त्याना जास्त दुःख झाले. काही केल्या त्यांचे अश्रू आवरेनात.

त्यावेळचा अभंग सौभाग्यवती म्हणू लागली आणि सारे लोक डोळे पुसू लागले. सौभाग्यवती भाविकतेने तो अभंग म्हणत होती आणि माझे डोळे अश्रूनी भरून आले.

बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट ।
ओघ बारा वाट मुरडताती ॥
बांधल्या पेंडोचा सुटलासे आळा ।
तृण रानोमाळा पांगतसे ॥
हरिणीवीण सोप बहियेलो उदास ।
दश दिशा पाडस भयताती ॥
मायबापे जेव्हा त्यागियले जेव्हा ।
ऐसे संकट तेव्हा झाले नाही ।
नामा म्हणे पेटला हुताशन ।
करा समाधान निवृत्तीचे ॥

× × ×

नदीविण मासा घातले भाजण ।
तैसे जनवन काळवले ॥
वाही दिशा धुंद उदयास्तावीण ।
तैसे विण गगन काळवले ॥

दा. क्र. ५६९ मुंबई ग्रं. १०७६२

गणेश,

माझे ज्ञानराज, तो योग्यांची माऊली, तो कैवल्याचा पुतळा, तो चैतन्याचा जिव्हाळा, तो ज्ञानियांचा शिरोमणि, तो चितकांचा चिंतामणी— तो माझा प्राणसखा ज्ञानोबा जेव्हा समाधिस्थ झाला त्यावेळचा अभंग जेव्हा सौभाग्यवतीने म्हटला, तेव्हा सारे लोक लहान मुलाप्रमाणे रडू लागले

बाही दिशा धूव उदयास्ताविण ।
तैसेचि गगन कालवले ॥
आजनी ज्ञानेश्वर बैसले आसनावरी ।
पुढे ज्ञानेश्वरी ठेवियेली ॥
ज्ञानदेव म्हणे सुखी केले देवा ।
पादपद्मी ठेवा निरंतर ॥
तीन वेळा जेव्हा जोडिले करकमळ ।
झाकियेले डोळे ज्ञानदेवे ॥
भीममुद्रा डोळा निरंजनी लीन ।
जाले ब्रह्मपूर्ण ज्ञानदेव ॥
नामा म्हणे आता लोपला दिनकर ।
बाप ज्ञानेश्वर समाधिस्थ ॥

मी म्हणू लागलो आणि लोकहि म्हणू लागले— व नमस्कार करू लागले.

कृपाळू उदार माझा ज्ञानेश्वर ।
नमस्कार तया वारंवार ॥

गणेश,

ज्ञानेश्वर नामदेव ही जोडी आपल्या महाराष्ट्रात जन्माला आली हे आपले केवढे भाग्य

अहो भाग्यम् । अहो भाग्यम् ॥

उद्या आम्ही शंकराचार्य हिलवर जाणार आहो. पुढचे पत्र मग पाठवीन.

तुझा
राम

## पत्र ६ वे

प्रिय गणेश

आज तारिख ७ मे १९७१.

आज आम्ही सकाळी ७ वाजता शंकराचार्य हिल पहाण्यास गेलो. तेथून १० वा. परत आलो. मग जेवण करून दुपारी १२॥ वा. शिकाऱ्यामधून खूप हिंडलो, व रात्री ८ वाजता हॉटेलकडे परत आलो.

गणेश,

येथल्या सर्वसामान्य लोकाना इंदिरा गांधीबद्दल नितांत प्रेम वाटले.

याह्याखान बाह्यातखान झाला आहे. गरीब बंगाली जनतेवर तो वरवंटा फिरवत आहे. नदीला पूर यावा त्याप्रमाणे निर्वासितांचा पूर भारताकडे येत आहे

येथील लोकाना वाटते की इंदिरा गांधी याह्याखानाचा पराभव करेल.

मला वाटू लागले—

आपल्या पुराणांचे सार असें आहे की—

जेव्हा देवाना दानव आवरत नाहीत, तेव्हा देवी तें काम करते.

बंगालमध्ये नवरात्रात देवीचा उत्सव फार मोठ्या प्रमाणावर होतो. जेव्हां बंगलादेशचा प्रश्न निकरावर येईल तेव्हा लोक इंदिरा गांधीकडे दुर्गादेवी म्हणून पाहतील.

अमेरिकेच्या जोरावर याह्याखान मोठ्या वल्गना करत आहे. त्याला वाटत आहे की—

भारताची पंतप्रधान एक औरत आहे. आपण सेनानी आहो ह्या औरतला काय विचारावयाचे ?

पण प्रसंग जेव्हा निकरावर येईल तेव्हां याह्याखानला घाम फुटेल व तो म्हणेल—

ही औरत आवरत नाही.

× × ×

नेहरुंचे मूळ घराणे काश्मीरचे. पंडित जवाहरलाल नेहरुंनी जेलमधून इंदिरा गांधीना पत्रे लिहिली व त्या पत्रामधून जागतिक इतिहासाचे ओझरते दर्शन घडवले.

तारीख २७ नोव्हेंबर १९३२ रोजी त्यांनी १०९ वे पत्र लिहिले. त्यात इंदिरा गांधीला ते म्हणतात—

' तू स्वतः काश्मीरी आहेस. '[१]

ह्याच पत्रात ते म्हणतात—

' ब्रिटीश लोक १८५७ च्या बंडाचा बीमोड करू लागले. त्यांनी जिकडे तिकडे हत्याकांड सुरू केले. नील नावाचा एक इंग्रज सेनापती अलाहाबादेहून कानपूरपर्यंत कूच करीत गेला, तेव्हा वाटेत लाग्या रस्त्यावर त्याने इतकी माणसे टांगून मारली की रस्त्यावर दोन्ही बाजूला असे एकही झाड शिल्लक राहिले नाही की ज्यावर कोणीना कोणी मनुष्य टांगलेला नाही. '

अत्यंत हृदयद्रावक व अमानर शहारे आणणाऱ्या नरमेधाबद्दल वर्णन केल्यानंतर ह्याच पत्रात पुढे जवाहरलाल म्हणतात—

' या बंडाच्या काळ्याकुट्ट पार्श्वभूमीवर एक नांव— एक तेजस्वी बिंदू— फारच उठून दिसतो ते नांव— ती बिंदू म्हणजे झाशीची राणी लक्ष्मीबाई. ह्या विधवेच्या तेजस्वीपणाबद्दल, कर्तबगारीबद्दल व अभेद्य धैर्याबद्दल अनेक कथा प्रचलित आहेत '

×

मला वाटू लागले की—

इंदिरा गांधी देखील झाशीच्या राणीप्रमाणे तेजस्वी आहे, कर्तबगार आहे व अभेद्य धैर्याची आहे. याह्याखानच्या काळ्याकुट्ट पार्श्वभूमीवर तिचें नांव तेजस्वी बिंदूप्रमाणे उठून दिसेल.

× × ×

गणेश,

आपण तुरुंगाला वाईट म्हणतो पण—

कृष्ण कन्हय्याचा जन्म तुरुंगात झाला.

डॉन क्विक्झोटचा कर्ता सरव्हेंटीस, व पिलग्रीम्स प्रोग्रेसचा कर्ता जॉन बन्यन– ह्या महान लेखकांची महान कामगिरी तुरुंगात.

कलिकच्या कालातील गीतेवरचे महान पुस्तक लो. टिळकाचें गीता-रहस्य– ह्या पुस्तकाचा जन्म तुरुंगात.

पंडित जवाहरजींचे महान पुस्तक– जागतिक इतिहासाचे ओझरते दर्शन– ह्या पुस्तकाचा जन्मदेखील तुरुंगात.

दुःख किंवा संकट म्हणजे शाप नसून वरदान असते हेंच खरें

× × ×

आम्ही शंकराचार्य हिलवर चढत असताना शंकराचार्यांच्या प्रेमामुळे माझे मन तुडुंब भरून गेले होते.

कांही विद्वान् आजचा विचार करून शंकराचार्यांना खूप नावे ठेवतात.

गणेश,

भूतकाळांत होऊन गेलेल्या माणसाला जर आपण आजच्या परिस्थितीच्या किंवा आजच्या विचारपरंपरेच्या दृष्टिने बरा वाईट ठरवू लागलो तर ते वेडगळपणाचे ठरेल. त्या माणसाचे खरे स्वरूप समजून घेताना त्याच्या भोवतालचे वातावरण, तो ज्या परिस्थितीत राहत होता ती परिस्थिती, त्यावेळची विचारपरंपरा– ह्या साऱ्या गोष्टींचा आपणाला विचार करावा लागेल.

आजच्या जगात गुलामगिरीचें समर्थन करणारा कोणी आढळणार नाही, पण एवढा महान प्लेटो मात्र गुलामगिरी अत्यावश्यक मानत होता

तू हे कबूल करशील की—

भूतकालीन गोष्टीना वर्तमानकालीन कसोटी लावून निकाल करणें योग्य होणार नाही.

गणेश,

मला वाटते की—

वर्तमानकाळाला देखील भूतकाळाची कसोटी लावून निकाल करणे योग्य होणार नाही.

भूतकाळाला जे विचार, ज्या कल्पना, ज्या श्रद्धा, ज्या चालीरीती उपकारक होत्या तेच विचार, त्याच कल्पना, त्याच श्रद्धा, त्याच चालीरीती आज उपकारक नसल्या तरी धर्माच्या नावाखाली त्यांचा अम्मल करण्याचा चंग बांधला जातो.

भूतकाळातील चांगल्या गोष्टीपासून स्फूर्ति घेऊन वर्तमानकाळाचा विचार करून आपण देखील अशा कांही चांगल्या गोष्टी केल्या पाहिजेत की ज्यामुळे भविष्यकाळ चागला होईल.

× × ×

आम्ही शंभर यात्रेकरू होतो, पण शंकराचार्य हिलवर चढण्यास फक्त चाळीसच तयार झाले. बाकीचे खाली राहिले.

गणेश,

माणसाला उंचीचे आकर्षण असते. श्रीनगरपासून दूर दूर अतरावर खूप उंच पर्वत आहे. त्याची शोभा कांही और आहे. श्रीनगरला लागून उंच ठिकाण म्हणजे शकराचार्य हिल.

ह्या हिलवर चढण्यास आम्हाला विशेष आनंद वाटत होता.

श्रीनगरमध्ये पाहण्यासारखे खूप आहे, पण ह्या शकराचार्य हिलला शंकराचार्यांच्यामुळे ज्याप्रमाणे महत्व आहे त्याप्रमाणे उंचीमुळे देखील महत्व आहे.

फार पूर्वीपासून माणसाला उंचीबद्दल आदर आहे ध्येयाबद्दल बोलताना देखील आपण म्हणतो की—

आपले ध्येय उंच असले पाहिजे.

असें सांगतात की—

१९०० पासुन अमेरिकेत प्रतिस्पर्धी उमेदवारामध्ये अधिक उंच उमेदवारच अमेरिकेचा अध्यक्ष म्हणून निवडला गेला. ह्यूबर्ट हुम्रेपेक्षा निक्सन एक इंच उंच म्हणून ते निवडले गेले, असे लोक म्हणतात.

अमेरिकेतील क्लीव्हलंड येथील विद्यापीठाचे प्राध्यापक सील फील्डमन ह्यांनी अशी तक्रार केली आहे की—

समाज उंच माणसाला किमत देतो व गिड्ड्या माणसाना कमी लेखतो.

असे,

समान हक्काच्या काळात देखील स्त्रीला आपल्याहून उंच असलेला पुरुष आवडतो

लिलीपुटच्या राज्यात गेलेला गलिव्हर तेथील गिड्डे लोक पाहून हसतो.

सात बुटक्यांची लघबग पाहून उंच असणारी हिमगौरी देखील हसू लागली

× × ×

शंकराचार्य हिल मी व सौभाग्यवती मिळून चढत होतो. बाकीचे लोक मागे पुढे होते.

शंकराचार्य दक्षिणेचे पण उत्तरेकडे येऊन त्यानी केवढे मोठे कार्य केले ते पाहून आपले मन थक्क होऊन जाते.

सौभाग्यवतीने कांही प्रश्न विचारल्यावर मी चढता चढता सांगत होतो—

पंडित जवाहरलालजींनी म्हटले आहे की—

हिंदुस्थानातील दक्षिणेकडील लोकानी प्राचीन हिंदुपरंपरा अन्य अधिक सांभाळली. परक्यांच्या स्वाऱ्यांचा परिणाम उत्तर हिंदुस्थानवर जितका झाला तितका दक्षिण हिंदुस्थानवर झाला नाही. उत्तर हिंदुस्थानचे लोक एका मिश्र संस्कृतीत वाढू लागले. हिंदु व मुसलमान संस्कृतीचा मिलाफ व त्यामध्ये पाश्चात्य संस्कृतीचा शितोडा असें हें मिश्रण आहे. पण दक्षिण हिंदुस्थानचे लोक मात्र बहुतांशी हिंदु संस्कृतीचे आहेत.

× × ×

बुद्धानंतर महायान पंथ व हीनयान पथ यामध्ये वाद सुरू झाला. कनिष्काने काश्मीरमध्ये एक मोठे धार्मिक समेलन भरवले होते.

असे दिसते की महायानपंथाचे वर्चस्व उत्तर हिंदुस्थानात वाढले व हीनयान पंथाचे वर्चस्व दक्षिण हिंदुस्थानांत वाढले.

शकराचार्यांनी वैदिक धर्माच्या प्रसाराकरिता आसेतू-हिमाचल एवढे महान कार्य केले की ते पाहून नितांत आदराने आपले मस्तक नम्र होते.

असल्या महान विभूतींच्या कार्यामुळे हिंदु धर्माने महायानपंथ व हीनयान-पंथ ह्याना आपल्या धर्मात पचवून टाकले.

× × ×

सौभाग्यवती म्हणाली—

' तुम्हाला व मला शंकराचार्यांच्याबद्दल नितांत प्रेम असल्यामुळे आपण ही हिल चढत आहो. आपल्या सारखे वृद्ध देखील हिल चढतात हें पाहून कितीतरी तरुण जोडप्याना उत्साह आला आहे ही हिल चढायला कठीण आहे पण शंकराचार्यांच्या प्रेमामुळे आपणा उभयताना अशी काही आंतरिक शक्ति आहे की– आपण तरुणाच्या देखील पुढे आहो. मला एक शंका आहे—

पंडित नेहरूंचे जागतिक इतिहासाचे ओझरते दर्शन हें पुस्तक तुम्ही पाहिले आहे पंडित नेहरूना सम्राट अशोकाबद्दल व बुद्धाबद्दल फार प्रेम आहे. मला वाटते शंकराचार्याबद्दल त्याना प्रेम व आदर नसावा. माझे हें म्हणणे बरोबर आहे कां ?'

मी म्हटले—

' अग, शंकराचार्यांच्याबद्दल नेहरुना फार आदर होता. '

सौभाग्यवती म्हणाली—

' आपण शंकराचार्य हिल चढतो आहे. पंडित नेहरुनी जगाचा प्रवास केला. ते काश्मीरी असल्यामुळे ह्या हिलवर ते आले असतील. शंकराचार्यांच्या-बद्दल त्याना काय वाटत होते ते ऐकण्यास मी फार उत्सुक आहे. '

मी सांगू लागलो—

' शंकराचार्यांच्याबद्दल पंडित नेहरुनी जे उद्‌गार काढले आहेत ते असे—

कित्ती एक राजे व महाराजे ह्यानी राज्य केले, वैभव उपभोगले व नतर त्यांचा अत होऊन त्यांची स्मृति देखील राहिली नाही. परंतु ह्या राजा महाराजापेक्षा लक्ष्यात राहण्यासारखा मनुष्य म्हणजे दक्षिणेत जन्मलेला महापुरुष शंकराचार्य. या महापुरुषाने राजा महाराजापेक्षा हिंदी जीवनात जिवत व प्रेरक कार्य केले. ज्याला अलौकिक व मति गुंग करून टाकणारी प्रतिभा होती अशा ह्या महापुरुषाने हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनाच्या कार्याला हात घातला व हिंदुधर्मामध्ये बुद्धिनिष्ट पंथाचा प्रसार करण्याचे कार्य पार पाडले. अलौकिक बुद्धिमत्ता व तर्कचातुर्य या साधनानी त्यानी आपला मार्ग प्रस्थापित केला व त्या कार्याकरिता हिंदुस्थानच्या पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण ह्या चारी दिशाना चार केंद्रे प्रस्थापित केली. हिंदुस्थानभर प्रवास करून उपदेश करत असताना ह्या महापुरुषाला विजयी वीराचे अधिष्ठान लाभले. जेथे जेथे हा गेला तेथे तेथे त्याचा विजयच झाला. हा विजय मुलुखगिरीचा नव्हता तर बुद्धिमत्तेच्या व तर्कचातुर्याच्या जोरावर अतःकरणे जिकण्याचा होता इतके महान कार्य करणाऱ्या शंकराचार्यांचे आयुष्य सारे बत्तीस वर्षाचे होते. त्यांच्या प्रभावामुळे बुद्धधर्म हिंदुस्थानातून जवळ जवळ पार नाहीसा झाला. शंकराचार्यांचे ग्रथ व त्याचे वादविवाद ह्यामुळे साऱ्या देशात बौद्धिक क्षेत्रांत खळबळ माजून राहिली

मोठमोठ्या धार्मिक नेत्यानी लाखो लोकाना हालवून त्यांची मने उत्साहाने भारल्याची जगाच्या इतिहासात उदाहरणे आहेत, पण ह्या नेत्याचा आधार म्हणजे लोकांची श्रद्धा व भावना दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की बहुतेक लोकाना विचार करण्याची सवय नसते, त्याना फक्त भावना असतात.

शकराचार्यांना लोकाच्या भावनांचा आधार घेऊन कार्य करायचे नव्हते तर त्यांची बुद्धि व विवेकशक्ति जागृत करून कार्य करायचे होते. प्राचीन ग्रथातील एखादे आप्तवाक्य घेऊन त्याचाच केवळ जप त्याना करायचा नव्हता. त्यांचे कार्य फार कठीण होते. असले महान कठीण कार्य करून त्यांनी लोकांच्या बुद्धिबरोबर त्याचे अतःकरण देखील जिकले व ते महापुरुष ह्या यशोला पात्र झाले. ह्या महापुरुषाला हिंदुस्थान हा सांस्कृतिक दृष्टया

एक असे वाटत होते, त्यामुळे राजकीय दृष्ट्या ह्या देशाचे भाग पडले तरी सांस्कृतिक दृष्ट्या या महान् देशात एक-भारतीयत्वाची जाणीव झाली.

सौभाग्यवती म्हणाली—

'पंडित जवाहरलाल नेहरुंचे शंकराचार्यांबद्दलचे मत ऐकून मला फार फार आनंद झाला.'

× × ×

सौभाग्यवती म्हणाली—

'असले महान् कार्य करणाऱ्या शंकराचार्यांना— त्या महापुरुषाला— अलिकडचे काही तथाकथित विद्वान् नांवे ठेवतात त्याबद्दल तुम्हाला काय वाटते ?'

मी सांगू लागलो—

'त्या महापुरुषाला नांवे ठेवणे म्हणजे सूर्यावर थुकण्याप्रमाणे आहे. आपण वर तोंड करून सूर्यावर थुकलो तर ती थुकी सुर्याकडे न जाता आपल्याच अंगावर पडते.

शंकराचार्यांच्या काही विचाराबद्दल मतभेद होऊ शकेल, पण ज्याने शंकराचार्यांच्या जीवनाचा व त्यांच्या कार्याचा सखोल अभ्यास केला आहे, त्याला भगवान् गोपालकृष्ण पांडवाच्या बाजूला न राहता युद्धात कौरवांच्या बाजूला गेले असते तर जितके आश्चर्य वाटेल तितके आश्चर्य शंकराचार्यांची निंदा ऐकून वाटेल'

× × ×

आम्ही हिलच्या माथ्यावर गेलो तेथे शंकराचे देऊळ आहे व जवळच शंकराचार्यांची मूर्ति आहे.

गणेश,

मी भारतवर्षात आसेतु हिमाचल प्रवास केला आहे मला वाटते शंकर ह्या देवतेला जास्तीत जास्त महत्त्व आहे.

ज्ञानेश्वरांची परंपरा आदि गुरु शंकरापासून आहे. अनुभवामृतात नमन करताना ते म्हणतात—

मूलाग्राय मध्याय मूलमध्याग्रमूर्तये ।
क्षीणाग्रमूलमध्याय नमः पूर्णाय शंभवे ॥

ज्ञानेश्वरांना वाटते की— गुरु व शिव एकच. गुरु म्हणजे दुसरी कोणती वस्तू नसून केवळ शांकरी विद्या आहे.

गुरुरित्याख्यया लोके साक्षात् विद्या हि शांकरी ।

कितीतरी संस्कृत नाटककारांनी आपल्या नाटकांच्या नांदीमध्ये शंकराची स्तुति केली आहे.

कविकुलगुरु कालिदासाने आपल्या तिन्ही नाटकांच्या नांदीमध्ये शिवस्तुति केली आहे.

शूद्रकाने मृच्छकटिकाच्या आरंभी शिवपार्वतीचे वर्णन केले आहे.

श्रीहर्षाने आपल्या रत्नावलीत नाटकाच्या नांदीत शिवपार्वतीचे वर्णन केले आहे

रामायणातील राम व रावण दोघेहि शिवभक्त होते.

भगवान कृष्ण देखील शिवभक्त होते महाभारताच्या अनुशासनपर्वात कृष्णाने शिवाची उपासना केल्याचे वर्णन आहे.

रामायणकार वाल्मिकी व महाभारतकार व्यास दोघेहि शिवभक्त होते.
यक्ष गंधर्व शिवभक्त होते. ईश्वर मानणारे सारे दर्शनकार शिवभक्त होते.
असे म्हटले आहे की— ज्या गावात शिवाचे देऊळ नाही त्याचा धि:कार असो—

धिग्राममशिवालयम् ।

स्वामी विवेकानंद म्हणतात—

महाभारताची देवता शिव आहे. भारता, तू हे विसरू नकोस की, तुझे उपास्य दैवत म्हणजे संन्याशाचा संन्यासी वैराग्यमूर्ति शंकर आहे—

" Shiv is the God of the Mahabharata. O India, forget not that the God thou worshippest is the great Ascetic of ascetics, the all renouncing Shankara. "

[illegible],

तू मोठा संशोधक आहेस. खालील विचार तुला पटतो का पहा.

पाश्चात्यांच्या देवताविषयक शब्दांत ( १ ) होरस ( Horus ) ( २ ) सेब ( Seb ) व ( ३ ) सिबिलाइन ( Sybylline ) असे शब्द आहेत.

होरस म्हणजे हर

सेब म्हणजे शिव

व सिबिलाइन म्हणजे शिवलिंग असो.

× × ×

शंकराचार्य हिलवरील शंकराचे देऊळ व लगत असलेली शंकराचार्यांची मूर्ति पाहिल्यावर लोकांच्या आग्रहाखातर त्या स्थानाचे महत्त्व व शंकराचार्यांचे कार्य याबद्दल मी अर्धा तास माहिती सांगितली.

शंकराचार्यांच्या महान कार्यामुळे लोक इतके भारून गेले की असल्या महान् पुरुषाला आपण पूर्वी नांवे ठेवली म्हणून त्यांच्या डोळ्यात पाणी आले व ते मला म्हणाले—

"साहेब, ह्या जागी आम्ही पुनीत झालो. आम्हाला खरा वैदिक धर्म कळला. इतर सान्या अवैदिक मतांचा पराभव करून काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत वैदिक धर्माची ध्वजा फडकावणाऱ्या व हे अति महान कार्य फक्त बत्तीस वर्षांच्या आयुष्यात करणाऱ्या शंकराचार्यांना—

कोटी कोटी प्रणाम"

कितीतरी लोकांनी शंकराचार्यांच्या मूर्तिपुढे मला उभे करून माझे फोटो घेतले व म्हटले—

"हा फोटो पाहिला म्हणजे शंकराचार्यांचे कार्य आपल्या डोळ्यापुढे उभे राहील व आपण शंकराचार्यांच्या पुढे नतमस्तक होऊ."

मला आठवण झाली— ती एका खुर्चीची.

शेक्सपीअर ज्या खुर्चीत बसत असे ती खुर्ची स्मारक म्हणून जपून ठेवली आहे.

भाविक लोक ती खुर्ची पहातात व शेक्सपीअरचे कार्य त्यांच्या डोळ्यापुढे उभे राहते व ते नतमस्तक होतात.

× × ×

शंकराचार्य हिलवर शंकराच्या देवळांत मी बसलो असताना माझ्या मनात विचार आला—

आपले पूर्वज मूर्तीपूजक नव्हते तर ते तत्वपूजक व समाजपूजक होते

हिमालयाची मुलगी पार्वती हिच्याशी लग्न करणारा शिव हा समाजपुरुष आहे. गणाच्या समवेत राहणारा हा महान पुरुष आहे.

शिवतत्व म्हणजे निसर्गतत्व. निसर्ग जसा शांत तसा रौद्र देखील आहे. निसर्गाचे नृत्य जसे मनाला मोहिनी घालते त्याचप्रमाणे हे नृत्य केव्हा केव्हा तांडव स्वरूप धारण करते. तांडव नृत्य करणारा शिव रुद्र आहे.

शिव हा भोळा आहे. त्याचे भक्त जसे चांगले आहेत तसे वाईट देखील आहेत निसर्गाचा शोध घेणाऱ्याला जे ज्ञान प्राप्त होते त्याचा केव्हा केव्हा सदुपयोग केला जातो, तर केव्हा केव्हा दुरुपयोग देखील केला जातो.

आपला भक्त ज्ञान सदुपयोगासाठी वापरणार आहे की दुरुपयोगासाठी वापरणार आहे ह्याचा विचार निसर्ग करत नाही.

आपल्या पूर्वजांना सांगावयाचे आहे की निसर्गाची पूजा आणि समाजाची पूजा म्हणजे शिवपूजा.

नगाधीराज हिमालयाच्या शिखरातून प्रसवित झालेली गंगा शिवाच्या कोन्यावर आहे. हिमालयात खूप औषधी आहेत चंद्र हा औषधींचा अधिपति आहे. शिव हा चंद्रमौली आहे.

शिव श्याम आहे. संस्कृतमध्ये श्याम वर्ण म्हणजे तप्तकांचनाचा वर्ण. पार्वती गौर आहे.

हिमालयाचा निम्मा भाग कापराप्रमाणे गौर आहे तर उरलेला अर्धा भाग तापलेल्या सोन्याप्रमाणे श्याम आहे

हेच ते शिवपार्वतीचे मीलन. हीच ती हराची व गौरीची भेट. हाच तो बांधनारो वटेश्वर.

आपणाला मूर्तातून अमूर्ताकडे जावयाचे आहे, दृश्यातून अदृश्याकडे जावयाचे आहे, बाह्यरंगातून अंतरंगाकडे जावयाचे आहे व सांतातून अनंताकडे जावयाचे आहे.

× × ×

गणेश,

शंकराचार्य हिलवरुन आम्ही परत आलो व जेवण करून दुपारी १२॥ ते रात्री ८ पर्यंत दललेकमधून शिकाऱ्यात बसून मनसोक्त आनंद लुटला.

काश्मीरचे महाभूषण म्हणजे दललेक.

श्रीनगरपासून हे लेक अर्धा मैल दूर आहे ह्याची लांबी चार मैल व रुंदी जवळच मैल आहे

लॉरेन्सने म्हटले आहे की हे लेक म्हणजे कदाचित् जगातील सर्वांतील आनंदकारक जागा आहे.

Perhaps in the whole world there is no corner so pleasant as the Dal Lake

—W. R Lawrence

आम्ही समर प्रवासी निरनिराळ्या शिकाऱ्यात बसून आनंदाच्या लाटावर तरंगू लागलो. मी व सौभाग्यवती एका शिकाऱ्यात बसलो होतो. तो शिकारा खूप सुशोभित केला होता. निरनिराळ्या शिकाऱ्यात बसलेल्या जोडप्यांना वाटत होते की——

जणू कांही आपली वरातच निघाली आहे.

शिकाऱ्यात बसून दललेकमध्ये हिंडताना प्रत्येकाच्या मनात वेगवेगळे विचार येत होते.

माणसाचे मन म्हणजे असंख्य विचार भरलेली एक अजब खिचडी आहे.

माझ्या मनात भूतकाळ व वर्तमानकाळ ह्याबद्दल विचार येऊ लागले.

भूतकाळ आपणाला सांगतो की——

रानटी अवस्थेतून मनुष्य उन्नत झाला व संस्कृति आणि सुधारणा ह्यांनी संपन्न झाला.

भूतकाळापेक्षा वर्तमानकाळात कितीतरी चांगल्या गोष्टी आहेत, व वर्तमानकाळापेक्षाहि कितीतरी चांगल्या गोष्टी भूतकाळात आहेत. ह्या पाहिल्या म्हणजे संदेह निर्माण होतो की——

जग पुढे जात आहे का मागे जात आहे ?

इतर प्राण्यापेक्षा आपण साऱ्या बाबतीत श्रेष्ठ आहो अशी माणसाला घमेंड असते, पण ह्या घमेंडीला केव्हा केव्हा जबरदस्त धक्का बसतो.

मेटरलिंकचे – 'मुंगी, वाळवी, व मधमाशी ह्याचे जीवन' हे पुस्तक वाचले म्हणजे ह्या क्षुद्र वाटणाऱ्या कीटकानी जी श्रेष्ठ दर्जाची परस्पर सहकार्याची कला व सर्वांच्या हितासाठी त्याग करण्याची सवय आत्मसात केली आहे त्यापुढे मनुष्य नतमस्तक होतो.

परस्पर सहकार्य व सामाजिक हितासाठी स्वार्थत्याग ह्या जर सुसंस्कृत-पणाच्या कसोट्या असतील तर हे क्षुद्र प्राणी सुसंस्कृत आहेत असेच म्हणावे लागेल.

× × ×

मला एकदम वाटू लागले—

आपले जीवन वहात असले पाहिजे जिवंतपाणी वहात असते त्याला अडवून कोंडून ठेवले तर त्यात शेवाळं साठतं. आपल्या मनांतील कुजलेल्या विचारांची डबकी उपसून काढली पाहिजेत व जीवत वाहते विचार मोकळपणे खेळले पाहिजेत.

× × ×

सौभाग्यवतीच्या मनात बंगालच्या लढयाबद्दल विचार सुरु होते. पाकिस्तान बंगालमध्ये नरमेध करत आहे. बंगाल स्वतंत्र होण्याची खटपट करत आहे. आपण त्याला मदत करत आहे.

सौभाग्यवतीने मला विचारले—

' आपण ह्यात विजयी होऊ का ?

मी म्हटले—

'यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।।

( ज्या बाजूला योगेश्वर कृष्ण व धनुर्धर अर्जुन त्या बाजूला श्री विजय ऐश्वर्य व नीति असते. )

हा गीतेचा शेवटला श्लोक म्हणजे साऱ्या गीतेचे सार आहे असे ज्ञानेश्वराना वाटते.

ह्या श्लोकाचा विचार करता व एकंदर परिस्थिती पाहू जाता मला वाटते की—

आपण विजयी होऊ."

सौभाग्यवती म्हणाली—

" आपण खरोखरच पाकिस्तानच्या विरुद्ध विजयी झालो तर तो दिवस सुवर्णाक्षरानी लिहून ठेवण्याच्या योग्यतेचा होईल. तुम्हाला काय वाटतं ? "

मी म्हटल—

" बंगालला स्वतंत्र करण्यात आपण पाकिस्तानच्या विरुद्ध विजयी झालो तर तो दिवस सोन्याच्या शाईने हिऱ्याच्या लेखणीने मोत्याच्या पानावर लिहिण्याच्या योग्यतेचा होईल. "

सौभाग्यवती म्हणाली—

" आपण विजयी झालो तर आपण कसे वागले पाहिजे ?"

मी म्हटल—

" केव्हा केव्हा पराजयापेक्षा विजय पचवणं कठीण असत. विजय तेव्हाच पचतो की जेव्हा विजय विनय व विवेक ह्या दोन पायावर चालतो. "

× × ×

शिकाऱ्यातून मध्येच आम्ही एके ठिकाणी उतरलो, व पोहणे आणि वर्फ रायडिंग हा प्रकार झाल्यानंतर पुनः शिकाऱ्यात बसून आम्ही चार चिनार ह्या अतीव सुंदर स्थानाकडे गेलो.

ह्या बागेत खूप मोठे चार चिनार वृक्ष आहेत व प्रवाश्यांच्या सोयीसाठी रेस्टॉरंट आहे.

आम्ही बागेत बसलो असताना पूर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तान ह्यामध्ये जो झगडा सुरु आहे व ज्यामळे आपल्या देशात निर्वासितांचा लोंढा सुरु आहे त्याबद्दल बोलणे निघाले.

एक गृहस्थ म्हणाले—

"ह्या झगड्यात अमेरिकेची सारी सहानुभूति पश्चिम पाकिस्तानकडे आहे साहेब, खुद्द अमेरिकेत जे यादवी युद्ध झाले त्याबद्दलची माहिती आम्हाला सांगा "

इतर लोक म्हणाले—

"पाकिस्तानात आज यादवी सुरु आहे. अमेरिकेची मदत पश्चिम पाकिस्तानाला आहे; साहेब, अशावेळी खुद्द अमेरिकेत जे यादवी युद्ध झाले त्याबद्दलची माहिती जरुर सांगा. आम्ही ती ऐकण्यास फार उत्सुक आहो "

लोकांच्या आग्रहाखातर मी सांगू लागलो—

अमेरिकेत उत्तरेकडील संस्थाने आणि दक्षिणेकडील संस्थाने ह्यामध्ये फार मोठा भेद होता. उत्तरेकडील संस्थानात मोठ्या यांत्रिक कारखानदारीचा प्रसार फार वेगाने झाला होता, तर दक्षिणेकडील संस्थानात मोठे मोठे मळे व शेती होती उत्तरेकडील संस्थाने गुलामगिरीच्या विरुद्ध होती तर दक्षिणेकडील संस्थाने गुलामांच्या श्रमावर अवलंबून होती.

हे गुलाम काळे लोक होते गोरे गुलाम नव्हते.

सर्व माणसे समान आहेत हे प्रख्यात सूत्र अमेरिकेच्या जाहीरनाम्यात आहे, पण हे सूत्र गोऱ्या लोकाना लागू होते, काळया लोकाना नव्हे

आफ्रिकेतून नीग्रो लोकाना गुलाम म्हणून आणण्यात येत असे.

जहाजामध्ये नीग्रो लोकाना साखळदंडाला बांधून घालत. प्रत्येकाला साडेपाच फूट लांब व सोळा इंच रुंद इतकी जागा दिलेली असे. जहाजामध्ये अशा तऱ्हेने बांधून घालून मग त्याना गुलाम म्हणून अमेरिकेत आणले जात असे.

हॅरिएट बीचर स्टोएची अंकल टॉम्स केबिन ही कादंबरी प्रसिद्ध आहे. ह्या कादंबरीत गुलामाची दुःखकारक हृदयद्रावक करुण कहाणी सांगण्यात आली आहे. अमेरिकेतील यादवी युद्ध सुरु होण्यापूर्वी हे पुस्तक प्रसिद्ध झाले व त्यामुळे अमेरिकेतील लोकांचे मन गुलामगिरी विरुद्ध होऊ लागले

तुम्ही केव्हा केव्हा वृत्तपत्रांत लिंचिगबद्दल वाचता. लिंचिंग म्हणजे काय ? तर एकाद्या नीग्रोने कांही अपराध केल्याचा संशय आला की त्याला

लोकांनी पकडावयाचे व ठार मारावयाचे. केव्हा केव्हा गोरे लोक नीग्रोंना खांबाला बांधून जिवंत जाळतात.

गुलामगिरीविरुद्ध जी महान चळवळ सुरू झाली त्याचा अतिमहान पुढारी म्हणजे गॅरिझन.

लिबरेटरच्या अंकात त्याने लिहिले—

मी नेहमी सत्याइतकाच कठोर राहीन. एखाद्याच्या घराला आग लागली असताना लोकांचा मदतीला बोलावण्याकरता जे ओरडावयाचे ते हळू ओरड असे त्याला एकवेळ तुम्ही सांगा. एखाद्याच्या पत्नीवर कोणी अत्याचार करत असेल तर बळजबरी करणाऱ्याला त्रास होणार नाही अशा नाजूक हाताने त्याच्यापासुन आपल्या पत्नीला सोडव असे तुम्ही त्याला हवे तर सांगा. आपले मूल आगीत पडले असताना ते त्यातून सावकाश बाहेर काढ, घाई करू नकोस असे त्या मुलाच्या आईला खुशाल सांगा. पण गुलामगिरीच्या विरुद्ध मी जे कार्य हाती घेतले आहे त्यामध्ये नेमस्तवृत्ति पतकरण्याचा सल्ला देण्याचा खटाटोप तुम्ही बिलकूल करू नका. ह्या कार्यासाठी माझा जीव नुसता तळमळतो आहे ह्या कार्यापासून मी एक इंचभर देखील मागे जाणार नाही."

१८६० मध्ये अमेरिकेचा अध्यक्ष म्हणून आब्राहाम लिंकन निवडला गेला. त्याच्या निवडणुकीचा परिणाम म्हणून दक्षिणेकडील संस्थानांनी फुटून निघण्याची चळवळ जोरात सुरू केली.

लिंकन फार मोठा मनुष्य होता. त्याने दक्षिणेकडील संस्थानांना खूप अधिकार देऊ केले, पण फाटाफुटीच्या बाबतीत मात्र तो एक इंचभर देखील माघार घेणेस तयार नव्हता

शेवटी १८६१ साली यादवी युद्ध सुरू झाले.

१८६२ मध्ये लिंकनने 'गुलामांच्या मुक्ततेचा जाहीरनामा' प्रसिद्ध केला.

हे यादवी युद्ध चार वर्षे चालले व १८६५ साली लिंकनला ह्या यादवी युद्धात विजय मिळाला. लिंकनची सारी मदार संयुक्त राज्याच्या एकीवर होती पण ही एकी शक्तीच्या – सामर्थ्याच्या – जोरावर लादलेली नसावी,

तर ती एकी खरोखुरी अंत:करणाची एकी असावी म्हणून त्याने पराकाष्ठेची खटपट केली, पण कांही दिवसांनी एका माथेफिरू माणसाने गोळी घालून लिंकनला ठार मारले '

× × ×

लोक म्हणाले—

' साहेब, तुम्ही आम्हाला खूप चांगली माहिती सांगितली. आता बंगलादेश पाकिस्तानातून फुटून निघण्याची खटपट करत आहे आपण बंगलादेशाची बाजू घेतली आहे पाकिस्तान आपल्या विरुद्ध आहे. या युद्धात कोणाचा जय होईल ? जयाच्या बाबतीत कोणते सूत्र आहे ?'

मी सांगू लागलो—

' पश्चिम पाकिस्तानी सैन्य बंगलादेशावर अत्याचार करत आहे. बायकांच्यावर बलात्कार करत आहे, बुद्धिवान् लोकांची कत्तल करत आहे. आपण बंगलादेशाची बाजू घेतली आहे. आपली बाजू न्यायाची आहे. ह्या युद्धात आपला जय होईल

गीतेच्या पहिल्या श्लोकात, धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे– असें आहे. आता धर्मक्षेत्रे बंगक्षेत्रे असा प्रकार होईल.

गीतेच्या पहिल्या श्लोकात मामका पांडवाश्चैव– असे शब्द आहेत– आता—

मामका भारताश्चैव– असा प्रकार होईल

गीतेच्या शेवटच्या श्लोकात विजयाचे सूत्र आहे. त्यावरून जर सूत्र करावयाचे झाले तर मी असे म्हणेन—

जेथे कृष्णाची गीता । अन् जेथे रामाची गाथा ।
तेथे विजयाची वार्ता । म्हणे राम ॥

एका हातात गीतेचे शास्त्र व दुसऱ्या हातात उत्कृष्ट शस्त्र असा प्रकार असेल तर विजय मिळतो

तलवार व तत्त्वज्ञान ह्यांचा समन्वय झाला, शस्त्र व शास्त्र ह्यांचा संयोग झाला म्हणजे विजय मिळतो.

या युद्धात तत्त्वज्ञान आपल्या बाजूला आहे. न्याय आपल्या बाजूला आहे. गीता आपल्या बाजूला आहे. जर आपण शस्त्राचा चांगला उपयोग केला, जर आपली तिन्ही दले, सागरी, आरमारी व भूदले परस्पर सहकार्याने लढली तर विजय आपलाच आहे '

लोक म्हणाले—

' आमचा विजय होवो व तुमच्या तोंडात साखर पडो. '

× × ×

चार चिनार पाहून झाल्यावर आम्ही शिकाऱ्यात बसून नेहरुपार्ककडे गेलो. ही जागा फारच रम्य आहे, व श्रीनगरपासुन सुमारे तीन मैल आहे. रात्रीच्या वेळी येथील विजचे दिवे पाण्यात लकलकतात त्यावेळी ही जागा सुंदरतेने न्हालेली असते.

येथे रेस्टॉरंट आहे

येथील अवर्णनीय शोभा पहात व खाद्य पदार्थांचा आस्वाद घेत आम्ही येथे बसलो असताना लोकांनी मला विचारले—

' नेहरुपार्क चांगले आहे. आपण महाराष्ट्रीय आहो. आपणाला शिवाजी महाराजांच्याबद्दल फार आदर आहे. जागतिक इतिहासाचे ओझरते दर्शन ( Glimps as of World History ) घडवण्याकरता पंडित नेहरुनी प्रियदर्शिनी इंदिरा हिला जी पत्रे जेलमधून लिहिली, त्यांत त्यांनी शिवाजीला Misguided patriot असे म्हटले. आम्हाला वाटते पंडित नेहरुनी शिवाजीबद्दल असें म्हणणेस नको होते तुम्हाला काय वाटते ? '

मी म्हटले—

' अहो, त्या पत्रांत पंडित नेहरुनी शिवाजीला Misguided patriot असे म्हटले नाही. '

लोक म्हणाले—

' जागतिक इतिहासाचा विचार करताना पंडित नेहरुनी शिवाजीबद्दल काय म्हटले आहे ? '

+

मी सांगू लागलो—

नेहरुंनी लिहिले आहे की– मराठ्यांचा इतिहास साधा नाही त्यात धर्म आणि मोंगलांच्या विरुद्ध हत्यार उपसून लढ्यास तयार झालेला राष्ट्रवाद ह्यांचे मिश्रण आहे. मोगल साम्राज्याचा पाडाव ब्रिटिशानी केला नसून मराठ्यानी केला आहे.'

'शिवाजी हा तर मोगल साम्राज्याचा कर्दनकाळ होऊन गेला. तो मोठा शूर सेनानायक होता. गनिमी लढाईचा नमुनेदार पुढारी होता, व फार पराक्रमी होता रामदास व तुकाराम ह्या संतानी महाराष्ट्राच्या भूमीची चांगलीच मशागत केली होती व मराठे लोकात स्वसामर्थ्याबद्दल जागृति केली होती. त्यावेळी ऐन मोक्याला महाराष्ट्राला विजयाच्या मार्गावर नेणारा शिवाजी सारखा तेजस्वी नायक मिळाला'

इतके सांगून मी म्हटले—

'पंडित नेहरुच्या पत्रांमध्ये–'शीख आणि मराठे' अशा शीर्षकाचे एक स्वतंत्र पत्र आहे. त्यात ते इंदिराजीना म्हणतात—

'तू मराठ्यांच्या देशाच्या अगदी ऐन अंतरगात पुणे शहरात राहिली आहेस. त्यामुळे शिवाजीविषयी महाराष्ट्रीयामध्ये केवढा आदर, केवढी भक्ति आहे हे तुला समजून चुकले असलेच पाहिजे.'

लोक म्हणाले—

'तुम्ही आम्हाला खूप उत्तम माहिती सांगितली. आमची माहिती चुकीची होती असें दिसते.'

नंतर बंगला देशबद्दल इंदिरा गांधी जे कार्य करत आहेत व पंतप्रधान म्हणून जी कामगिरी करत आहेत त्याबद्दल बोलणे निघाले असताना मी म्हटले—

'इंदिरा गांधी पंडित नेहरुंच्या खांद्यावर उभे राहून सरदार पटेलांचे कार्य करत आहेत She has Combined Neharu and Patel

विशेष आनंदाची गोष्ट अशी आहे की इंदिराजी गीतेचे वाचन करत आहेत, मनन करत आहेत व त्याप्रमाणे वर्तन करण्याची खटपट करत

आहेत. वाचन मनन व वर्तन ह्यामुळे त्यांच्या जीवनाला दैवी तेज येत आहे आणि जेव्हा बंगला स्वतंत्र करताना पाकिस्तानचा पराभव होईल व पराभव झाल्यावर इंदिराजी गीतेचा उल्लेख करतील तेव्हा सारा भारत म्हणेल—

तेथे कर माझे जुळती '

लोक म्हणाले—

' असे झाले तर आम्ही देखील म्हणू—

तेथे कर माझे जुळती. '

× × ×

नेहरुपार्क पाहून झाल्यावर आम्ही शभर प्रवासी आपापल्या शिकाऱ्यात बसलो व परतीचा मार्ग सुरू झाला

शिकाऱ्यात सौभाग्यवतीने मायेची बेडी व ज्ञानी आणि भक्त ह्याबद्दल प्रश्न विचारल्यावर मी सांगू लागलो—

' एकाद्याला बेडीने बांधले तर सुटण्याचे दोन मार्ग आहेत. आपण मोठे होणे व आपल्या शक्तीने बेडी तोडून टाकणे हा एक मार्ग. दुसरा मार्ग असा की आपण बेडी पेक्षाहि खूप लहान होणे व त्यामुळे बेडीपासून मुक्त होणे. पहिला मार्ग ज्ञानी अनुसरतो तर दुसरा मार्ग भक्त अनुसरतो. '

तुलसी रामायणात एक सुंदर गोष्ट आहे ती मी सौभाग्यवतीला सांगितली.

' उड्डाण करून हनुमान लंकेला निघाला होता. वाटेत त्याला एका राक्षसीने पकडले व त्याला ती खाऊ लागली. हनुमान त्या राक्षसीपेक्षा मोठा होऊ लागला, पण मोठा होऊनहि तो राक्षसीच्या तावडीतून सुटू शकला नाही. मग हनुमान फार लहान झाला. तो राक्षसीच्या तोंडात शिरला, तिच्या कानातून बाहेर आला व लंकेला गेला '

ही गोष्ट ऐकून सौभाग्यवती म्हणाली—

' ही गोष्ट फार फार छान आहे. फार मार्मिक आहे. '

मी म्हटले—

' तुला आणखी एक गोष्ट सांगतो. '

एक राजा होता. तो राजवाड्यात उंचावर राहवयाचा. दारात एक कुत्रा असे तो कोणाला राजवाड्यात जाऊ द्यायचा नाही. येणाऱ्यावर खूप मोठ्याने भुकायचा

जेव्हा ज्ञानी तेथे येई तेव्हा तो कुत्र्याबरोबर लढाई करून त्याचा पराभव करावयाचा व मग राजवाड्यात राजाच्या दर्शनाला जावयाचा

जेव्हा भक्त तेथे येई, तेव्हा तो कुत्र्याबरोबर लढाई न करता दारातूनच राजाच्या नावे हाक मारी, व तो हाक ऐकून राजा स्वतःच भक्ताच्या दर्शनाकरता दारात येई.'

सौभाग्यवती म्हणाली—

ज्ञानी व भक्त ह्याबद्दल मी खूप गोष्टी ऐकल्या आहेत, पण ही गोष्ट सर्वात छान आहे गीतेत देखील कृष्णाने ज्ञानी माणसापेक्षा भक्ताचे जास्त कौतुक केले आहे. मला एक शंका आहे. असे म्हणतात की— मुक्ति चार प्रकारची आहे. ते प्रकार कोणते ? थोडक्यात सांगा.'

मी सांगू लागलो—

'ते चार प्रकार म्हणजे— (१) सलोकता (२) समीपता (३) सरूपता व (४) सायुज्यता

हे सब देवाचे राज्य आहे. त्याच्या राज्यात जे राहतात त्यांच्याबद्दल आपणास म्हणता येईल— सलोकता.

त्याच्या राजवाड्यात राहणाऱ्या लोकांबद्दल आपणास म्हणता येईल— समीपता.

त्याच्या मुलाबाळांच्याबद्दल आपणास म्हणता येईल— सरूपता.

आणि त्यांच्या पत्नीबद्दल आपणास म्हणता येईल— सायुज्यता.'

सौभाग्यवती म्हणाली—

'मुक्तीचे हे प्रकार मला उत्तम तऱ्हेने कळले. पुढची शंका अशी की—

ज्याला देवाचें दर्शन झाले त्याने चमत्कार करावे कां ? जो करी चमत्कार त्याला लोक करी नमस्कार - असा प्रकार आहे. चमत्काराबद्दल तुम्हाला काय वाटते ?'

मी सांगू लागलो—

'मुद्दाम चमत्कार करू नये. मुद्दाम चमत्कार करणे ह्याला प्रदर्शन म्हणता येईल पण केव्हा केव्हा सहज चमत्कार होतात. ह्याला निदर्शन म्हणता येईल. प्रदर्शन अशिष्ट आहे पण निदर्शन शिष्ट आहे.'

शिकाऱ्याचा प्रवास संपत आला होता. सौभाग्यवती म्हणाली—

'लोकाना वाटते की जगात दुःख असू नये जिकडे तिकडे नुसते सुखच असावे. असे होणे शक्य आहे कां ? माणसाने देवाजवळ काय मागावे ?—'

'हे पहा जगांत दुःख राहणारच. जगातले सारे दुःख नाहीसे झाले व फक्त सुखच जगांत राहिले तर जीवनातले स्वारस्य संपुष्टात येईल. 'देवा, मला दुःख देऊ नको, मला फक्त सुखच दे'—असे माणसाने देवाजवळ मागणे मागू नये. त्याने देवाजवळ असे मागणे मागावे की—

देवा, दुःख नको असे मागणे मी मागत नाही. माझे मागणे असे आहे की कितीहि दुःखे आली तरी ती सहन करण्याची शक्ति मला दे. त्या दुःखावरती मात करण्याची ताकद मला दे त्या दुःखावरती स्वार होऊन तुझ्या नावाचा जयघोष माझ्या तोंडून होऊ दे इतकीच माझी इच्छा.'

× × ×

शिकाऱ्यातील प्रवास फार आनंददायक झाला. प्रवास संपून आम्ही लालारुख हॉटेलमध्ये गेलो. रात्री जेवण झाल्यावर झोपण्यापूर्वी रोजच्या प्रमाणे मी एक गीतेचा अध्याय म्हणू लागलो.

आज अध्याय म्हटला तो तेरावा अध्याय.

गणेश—

पाश्चात्य लोक सॉक्रेटिसाला फार मान देतात. ते म्हणतात—

Socrates brought philosophy from heaven to earth.

( सॉक्रेटिसाने तत्वज्ञान स्वर्गातून पृथ्वीवर आणले. )

पाश्चात्य लोकाना वाटते की—

सॉक्रेटिस हा तत्वज्ञानाचा जनक आहे.

सॉक्रेटिसाने लोकाना शिकवले— ज्ञान म्हणजे सद्‌गुण अज्ञान म्हणजे दुर्गुण.

पाश्चात्य लोकाना वाटते की ही शिकवणूक अपूर्व आहे.

गणेश,

सॉक्रेटिसाच्या पूर्वी कितीतरी वर्षे ही शिकवणूक गोपाल कृष्णाने गीतेच्या तेराव्या अध्यायात दिली आहे.

ह्या अध्यायात ज्ञानाची वीस लक्षणे सांगितली आहेत ही सारी लक्षणे म्हणजे निरनिराळे सद्‌गुण आहेत. हे सद्‌गुण म्हणजे ज्ञान. ह्याच्या उलट जे आहेत जे दुर्गुण आहेत ते अज्ञान.

असल्या शिकवणीमुळे सॉक्रेटिसाला देहांताची शिक्षा देण्यात आली. तुरुगात विष पिऊन मरण्याचा प्रसंग सॉक्रेटिसावर आला. सारे लोक रडू लागले. ज्याच्याकडे विष देण्याचे काम होते तो देखिल रडू लागला.

पण सॉक्रेटिस शांत होता. मरण्याच्या आदल्या दिवशी सॉक्रेटिसाने तुरुगात जे प्रवचन दिले होते त्यात त्याने लोकाना सांगितले होते—

आत्मा अमर आहे.

सारे लोक रडत असताना आनंदी असलेला सॉक्रेटिस जेव्हा विष घेऊ लागला तेव्हा लोकानी त्याला विचारले—

'मेल्यानतर तुम्हाला कसे पुरणेचे ?'

सॉक्रेटिस म्हणाला—

'मला कोण पुरणार ? मीच साऱ्याना पुरून उरणार !'

असा हा सॉक्रेटिस साऱ्याना पुरून उरला आहे.

पाश्चात्य लोक म्हणतात—

आत्मा अमर आहे.

हा सॉक्रेटिसाचा सिद्धांत अपूर्व आहे.

गणेश,

सॉक्रेटिसाच्या पूर्वी किती तरी वर्षे गोपालकृष्णाने गीतेत उपनिषदांचे सार सांगताना आत्मा अमर आहे हा सिद्धांत मांडला

तत्वज्ञाचा बाप असणारा सॉक्रेटिस लोकांना गीतेचीच शिकवणूक देत होता. गीता हीच त्याची गाथा होती

मला वाटू लागले—

आज मी तेरावा अध्याय म्हटला त्यामध्ये कृष्णकन्हय्याने जी ज्ञानाची वीस लक्षणे सांगितली आहेत त्यांचा प्रकाश आपल्या जीवनामध्ये पाडण्याची खटपट केली पाहिजे.

ह्या प्रकाशाशिवाय जीवन म्हणजे गळ्याविना गाणे, शब्दाशिवाय साहित्य, व सुराविना संगीत होय.

मी कृष्णाला नमस्कार केला व म्हटले—

देवा, मायबापा, दयाघना, तुझ्या प्रसादाने वाणी लेखणी व करणी ह्यांचा माझ्या जीवनात ताळ व सुर जुळू दे व माझे सारे जीवन गोड गाणे होऊ दे.

पुढचे पत्र उद्या.

तुझा

राम

# गाती गीता भारतमाता

"ता. १६ डिसेंबर १९७१ रोजी आपण भारत पाकिस्तान युद्धात जो निर्णायक विजय मिळवला तो भारताच्या इतिहासात सोन्याच्या शाईने, हिऱ्याच्या लेखणीनें, मोत्यांच्या पानावर लिहिण्याच्या योग्यतेचा आहे"

वरील विजय मिळवल्यानंतर जिकडे तिकडे विजयोत्सव सुरु झाला. मुंबईच्या सेल्स टॅक्स प्रॅक्टिशनर्स ॲसोशिएशनच्या सभासदानी जवानांच्या मदतीकरता तीस हजार एक रुपये जमा केले व त्या रकमेचा चेक ता. ३१ डिसेंबर १९७१ रोजी माननीय वित्तमंत्री शेषराव वानखेडे ह्याना दिला. त्या निमित्त जो आकर्षक समारंभ झाला त्यावेळी महाराष्ट्र सेल्स टॅक्स ट्रिब्यूनलचे मुख्य न्यायाधीश राम केशव रानडे ह्यांनी जे भाषण केले त्यात वरील उद्गार काढले न्या. रानडे म्हणाले—

"सेल्स टॅक्स प्रॅक्टिशनर्स हे वकील आहेत का नाहीत ह्याबद्दल पूर्वी वाद होता पण आता त्या वादाचा निकाल झाला असून हे वकील आहेत असें ठरले आहे. मला जो तुमच्याबद्दल आदर वाटतो, त्याचें कारण तुम्ही नुसतेच वकील नाही तर तत्त्वज्ञानी देखील आहे म्हणून.

प्रख्यात तत्त्वज्ञानी प्लेटो याने जगाला महान् संदेश देताना असे उद्‌गार काढले आहेत की—

All evils of the world would cease if lawyers would become philosophers and philosophers would become lawyers.

( जगांतील सारे अमंगल तेव्हाच नाहीसे होईल की जेव्हा वकील तत्त्वज्ञानी होतील व तत्त्वज्ञानी वकील होतील. )

विजयोत्सव साजरा करतांना जवानांच्या करता तुम्ही तीस हजार एक रुपये जमा केले व ह्या बाबतीत महाराष्ट्रातील साऱ्या वकिलांच्या संघटना- मध्ये तुमचा पहिला नंबर लागतो, ह्याबद्दल मी तुमचें मनःपूर्वक अभिनंदन करतो.

× × ×

' आपणाला महान् विजय मिळाल्यानंतर जे दृश्य दिसते आहे त्याबद्दल सार्थत्वाने असें म्हणता येईल की—

## गाती गीता भारतमाता.

आपल्या पंतप्रधान इंदिरा गांधी – ज्याना आता ' याह्यामर्दिनी ' असें म्हणण्यात येते त्या म्हणतात की, आपल्याला गीतेमुळे स्फूर्ति मिळते. ता. १६ डिसेंबर १९७१ रोजी भारताला दैदीप्यमान विजय मिळाल्यानंतर दुसरे दिवशी त्यांनी पार्लमेंटमध्ये जे ऐतिहासिक निवेदन केले त्यामध्ये त्यांनी आवर्जून गीतेचा उल्लेख केला.

आता भारतमाता जी गीता गाते आहे त्या गीतेचा पहिला श्लोक असा आहे—

धर्मक्षेत्रे रणक्षेत्रे समवेता युयुत्सवः ।
याह्याका भारताश्चैव किमकुर्वत संजय ॥

गीतेच्या शेवटच्या श्लोकांत म्हटले आहे की—

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥

( जेथे योगेश्वर कृष्ण व जेथे धनुर्धारी अर्जुन तेथे श्री, विजय, ऐश्वर्य व नीति असते. )

ज्ञानेश्वराना हा श्लोक म्हणजे गीतेचे सार आहे असे वाटते ह्या श्लोकाचा सदेश असा की—

जेव्हा तलवार व तत्त्वज्ञान ह्यांचा समन्वय होतो, जेव्हा शस्त्र व शास्त्र ह्याचा संयोग होतो तेव्हा विजयाचा प्रकाश पडतो.

भारताला हा महान् विजय प्राप्त झाल्यावर सरक्षणमंत्री माननीय जगजीवनराम ह्यांचा दिल्लीच्या नागरिकांनी प्रचंड सत्कार केला, तेव्हा त्याना जी भेट म्हणून देण्यात आली ती म्हणजे—

गीता व तलवार.

आपल्या जवानानी पराकाष्टेचा पराक्रम केल व जे जवान धारातीर्थी पडले त्याचे सामान पहाता असे दिसून आले की— त्यात गीता आहे.

पाश्चात्त्य विद्वान् व तत्त्वज्ञानी म्हणतात की—

जोपर्यंत गीता भारताला स्फूर्ति देत आहे, तोपर्यंत भारत समर्थ राहील, पण जेव्हा भारत गीतेपासून स्फूर्ति घेण्याचे सोडून देईल तेव्हा भारत दुबळा होईल.

पतप्रधानापासून साध्या शिपायापर्यंत साऱ्याना गीता स्फूर्ति देत आहे व ह्या विजयाने आपल्या देशाचें नांव जगाच्या आकाशांत चकाकते आहे

गीता भारतापुरती मर्यादित नाही. साऱ्या जगांत ज्याला पहिला मान द्यावा लागेल असा ग्रथ म्हणजे गीताग्रंथ.

केसरलिंग म्हणतो—

Geeta is the greatest philosophical poem in the world's literature.

( जगाच्या वाङ्मयात सर्वात मोठे तात्त्विक काव्य म्हणजे गीता. )

महात्मा गाधी लंडनला एका मोठ्या लायब्ररीत गेले असताना त्यांनी ग्रंथपालाला विचारले—

What is the book here for which there is highest demand ?

( असे येथे कोणते पुस्तक आहे की, ज्या पुस्तकाला जास्तीत जास्त मागणी आहे ? )

ग्रंथपाल म्हणाला—

That book is Geeta. ( तें पुस्तक म्हणजे गीता )

कार्लाइल्ला गीतेच्या वाचनाने स्फूर्ति मिळाली जेव्हा इमर्सन कार्लाइलच्या भेटीस गेला तेव्हा कार्लाइलने इमर्सनला गीता भेट म्हणून दिली

शाकुंतल नाटक वाचून ज्याप्रमाणे जर्मन कवी आनंदाने नाचू लागला त्याप्रमाणे इमर्सन गीता वाचून आनंदाने नाचू लागला व म्हणाला—

Geeta means empire of thought.

( गीता म्हणजे विचाराचे साम्राज्य. )

आज जे विद्वान् हयात आहेत त्यामध्ये साऱ्या जगामध्ये डॉ टॉयन्बीला पहिला मान दिला जातो त्याला विचारण्यात आले—

तुमच्याजवळ एकच – दो या तीन नव्हे – पुस्तक ठेवणेचे असे बंधन घालण्यात आले तर तुम्ही कोणते पुस्तक जवळ ठेवाल ?

डॉ टॉयनबी म्हणाला—

‘ असले बंधन घालणे बरें नव्हे. वाटेल तितकी पुस्तके जवळ ठेवण्याचे माणसाला स्वातंत्र्य पाहिजे; पण एकच पुस्तक ठेवण्याचे बंधन जर खरोखरच घालण्यात आले तर जें पुस्तक मी जवळ ठेवीन ते म्हणजे गीता. ’

मॅक्समुल्लर, रोमा रोलाँ, श्लेगेल, डॉ. हुंबोल्ट वगैरे कितीतरी विद्वान् गीतेची पराकाष्ठेची स्तुति करतात.

अमेरिकेचा थोर तत्वज्ञानी थोरो ह्याला एकदा विचारण्यात आले की—

तुमचे विचार खूप चांगले आहेत, तुमचा आचार खूप चांगला आहे, ह्याचे रहस्य काय ?

थोरो म्हणाला—

‘ ह्याचे रहस्य इतकेंच आहे की रोज पहाटे उठल्यावर मी गीता वाचतो.

× × ×

अशा ह्या महान् गीता ग्रंथाबद्दल विद्वानांच्या दोन महान् शंका आहेत, व त्या शंकाचे समाधान करावे असे मला सांगण्यात आले आहे.

पहिली शंका अशी आहे की—

गीतेने प्रयत्नावर फार जोर दिला असला तरी दैवं चैवात्र पंचमम् असें म्हणून दैवावर देखील विश्वास ठेवला आहे पंतप्रधान इंदिरा गांधी म्हणतात—

I don't belive in fate – माझा दैवावर विश्वास नाही.

किती तरी विद्वान् म्हणतात की – आमचा दैवावर विश्वास नाही

ह्या बाबतीत कोणते मत बरोबर आहे ?

ह्याचें उत्तर असें आहे की— गीतेचे मत बरोबर आहे.

गीतेने ' उद्धरेत् आत्मनाऽऽत्मानम् ' – असे म्हणून प्रयत्नावर फार जोर दिला आहे, पण त्याच बरोबर दैवाचा देखील विचार केला आहे मानवी जीवनाचा सखोल अभ्यास केल्यानंतर असे म्हणता येईल की—

दैवावर हवाला ठेवून माणसाने गप्प बसू नये त्याने जास्तीत जास्त प्रयत्न करावा; पुनः पुनः प्रयत्न करावा, पण दैवावर मुळीच विश्वास नाही असें माणसाने म्हणू नये गीतेने कर्माच्या सिद्धीला पांच कारणें सांगितली आहेत—

( १ ) स्थळ ( २ ) कर्ता ( ३ ) नाना प्रकारची साधने ( ४ ) कर्त्याने केलेल्या निरनिराळ्या क्रिया व ( ५ ) दैव.

दैव आपल्या हातात नसते. ज्यांच्यावर आपला अम्मल चालत नाही अशा अज्ञात गोष्टी म्हणजे दैव

कृष्णाने उद्योगपर्वात सांगितले आहे की—

माणसाने जास्तीत जास्त प्रयत्न करावा यश आले तर दैव अनुकूल होते, म्हणून यश आले असे म्हणावे. म्हणजे यशाने आपण मस्त अथवा गर्विष्ट होत नाही. जास्तीत जास्त प्रयत्न करूनहि यश आले नाही तर दैव प्रतिकूल होते म्हणून यश आले नाही असे म्हणावे, म्हणजे आपण दुःखी होत नाही.

कृष्णाचा हा विचार फार चांगला आहे.

दैवाच्या बाबतीत इतिहास आपणाला खूप गोष्टी सांगतो

रशियावर नेपोलियनने स्वारी केली त्यावेळी तो फार हुषारीने वागला होता. रशियात बर्फ केव्हा पडते याची पंचवीस वर्षांची माहिती त्याने गोळा केली होती, व त्या माहितीच्या आधारावर त्याने स्वारी केली होती. त्या स्वारीत त्याला जय मिळाला असता, पण त्याच वर्षी सृष्टीची लहर फिरली. पूर्वीच्या पंचवीस वर्षांचा नियम सृष्टीने बदलला व त्यावर्षी एक महिना अगोदर बर्फ पडणेस सुरवात झाली, म्हणून नेपोलिअनचा पराभव झाला

महंमद पैगंबर मदिनेला पळून गेले. त्यांच्या पाठीवर शत्रू होते पळत असतांना वाटेत महंमद पैगंबर व अबू बाकर एका गुहेत शिरले व तेथे राहिले. एका कोळयाने त्या गुहेच्या तोंडाला जाळे विणले. शत्रूचे लोक तेथे आले. त्याना वाटले ह्या गुहेत महमद पैगबर शिरले असावेत ते आत जाणार होते, पण तोंडावरील कोळयाने विणलेले जाळे पाहून त्याना वाटले आत कोण गेले नसणार म्हणून आत न जाता ते पुढे गेले.

शत्रूचे लोक आत गेले असते तर महंमद पैगंबर मारले गेले असते. पण दैवयोगाने त्याच वेळेला एका कोळयाने गुहेच्या तोंडाला जाळे विणले आणि त्यामुळे त्यांचे प्राण वाचले व मग त्यानी फार मोठे कार्य केले.

प्रयत्न व दैव ह्याबद्दल गीतेचा जो विचार आहे तो अबाधित आहे.

× × ×

दुसऱ्या शंकेचे स्वरुप असे आहे—

आपला महान् सिद्धात म्हणजे अहिंसा.

पण गीता अहिंसेच्या विरुद्ध आहे. गीतेने अर्जुनास युद्ध करण्यास प्रवृत्त केले. पण अहिंसेचा विचार करताना अर्जुनाने युद्ध करण्यास नको होते.

आज भारताला युद्धात जय मिळाला. जिकडे तिकडे युद्धाचें वातावरण आहे. सारी भारतमाता गीता गाते आहे पण हा सारा प्रकार अहिंसेच्या विरुद्ध आहे.

आज राष्ट्रपिता महात्मा गांधी हयात असते तर त्यांनी, अहिंसेचाच पाठपुरावा केला असता व युद्धाच्या विरुद्ध आपला आवाज उठविला असता.

× × ×

किती तरी लोकांना ह्या शंकेने ग्रासले आहे. ह्या शंकेचे उत्तर असें देता येईल—

गीता अहिंसेच्या विरुद्ध नाही गीतेने दैवी संपत्तीचे वर्णन करताना व ज्ञानाची लक्षणे सांगताना अहिंसेला मानाचे स्थान दिले आहे.

पाश्चात्य तत्वज्ञानाना गीतेने स्फूर्ति दिली आहे. पाश्चात्य तत्वज्ञानी विद्वानांचे अहिंसेबाबत विचार समजून घेतले म्हणजे जे सूत्र तयार होते ते असे—

Justice must be established as far as possible by peaceful means, if not by force. If there is no other way of securing justice, then war should be resorted to and such war wajed for establishing justice is in tune and harmony with Ahimsa.

( काही झाले तरी न्याय प्रस्थापित झाला पाहिजे शक्य तितक्या शांततेच्या मार्गाने न्याय प्रस्थापित करावा. ते शक्य नसेल तर बळाच्या जोरावर न्याय प्रस्थापित करावा. जर दुसरा कोणताच मार्ग नसेल तर न्याय प्रस्थापित करणेकरता युद्धाचा अवलंब करावा, अशा तऱ्हेने न्याय प्रस्थापित करण्याकरता केलेले युद्ध अहिंसेला अनुकूल आहे )

महात्मा गांधीना आरंभी वाटत होते की—

गीता अहिंसेच्या विरुद्ध आहे

ह्यावर तोड म्हणून त्यानी सांगितले की—

गीता कौरवपांडवाच्या युद्धाचा विचार करते ते निराळ्या अर्थाने. कौरव म्हणजे दुष्ट विचार. पांडव म्हणजे सुष्ट विचार. आपल्या मनामध्ये सुष्ट विचार व दुष्ट विचार ह्यांचे युद्ध सुरु असते व त्याच युद्धाचा गीतेने विचार केला आहे.

पण पुढे मात्र म. गांधींचे मत बदलले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर म गांधी दिल्लीमध्ये राहत असत ता ३० जानेवारी १९४८ रोजी त्यांचा खून झाला त्या दिवशी त्याना प्रवचन देता आले नाही. ते फक्त हुरे राम असे म्हणाले

म गांधीनी दिल्ली मुक्कामी जी प्रवचने दिली ती एका पुस्तकात ग्रथित करण्यात आली आहेत त्या ग्रथाचे नाव आहे—

## दिल्ली डायरी

ह्या पुस्तकावरून तुम्हाला समजून येईल की न्याय प्रथापित करण्याकरता दुसरा कोणताच मार्ग नसेल तर युद्ध करणे अहिंसेच्या विरुद्ध नाही.

ता २६।९।४७ रोजी म गांधीनी प्रार्थनोत्तर जे प्रवचन दिले त्यात त्यांनी म्हटले—

If there is no other way of securing justice from Pakistan, India should wage war against Pakistan.

ह्यावरून तुम्हास कळून येईल की म. गांधींच्या मते जर न्याय प्रस्थापित करण्याकरता दुसरा कोणताच मार्ग नसेल तर भारताने पाकिस्तानबरोबर युद्ध करणे योग्य आहे. न्याय प्रस्थापित करण्याकरता नाइलाजाने केलेले युद्ध अहिंसेला अनुकूल आहे

आजची परिस्थिती अशी आहे की—

केवळ न्याय प्रस्थापित करण्याकरता इतर सारे शांततेचे उपाय थकल्या-नंतर व पाकिस्तानने प्रथम हल्ला केल्यानंतर भारताने हें युद्ध केले आहे.

अशा तऱ्हेचे युद्ध अहिंसेच्या व्याख्येत बसते म्हणून असल्या युद्धाबद्दल म गांधीनी आवाज न उठवता उलट पतप्रधान इंदिरा गांधीना उद्देशून म्हटले असते—

लाडके प्रियदर्शिनी, तू गीतेचा अभ्यास करते आहेस हें युद्ध अहिंसेला अनुकूल आहे. गीतेचा जयजयकार करीत तू जे वर्तन करत आहेस त्यामुळे माझे मन आनंदाने भरून आले आहे. तू भारताची खरी पुत्री आहेस. तू देवी आहेस. जवानांना वाटते आहे की तू त्यांची माता आहेस. तुला माझे कोटी कोटी आशिर्वाद

× × ×

मित्र हो,

भारताच्या इतिहासात देदीप्यमान ठरणारा विजय आपणाला मिळाला आहे एका देशाने आपल्या शेजारचा देश स्वतंत्र व्हावा म्हणून युद्ध करावे, व त्या युद्धात असा कांही अलौकिक पराक्रम करावा की शत्रूचे सुमारे एक लाख वीर शस्त्रास्त्रासह शरण यावेत – हा प्रकार जगाच्या इतिहासात अपूर्व आहे.

अशा वेळी—

पाकिस्तानने आमची छेड काढली असल्यामुळे आम्ही जिंकून घेतलेले छाड बेट सोडणार नाही. भारताविरुद्ध पुन युद्धाच्या डरकाळ्या फोडणाऱ्या पाकिस्तानी भुत्तोला कुत्तोच्या मोतीनेच मरावे लागेल

इंदिरा गांधींनी निवडणुकीच्या युद्धात कांग्रेसमधील सिंडिकेटचा धुव्वा उडवला व आता पाकिस्तानच्या युद्धात जगातील सिंडिकेटचा फडशा पाडला

× × ×

अशा तऱ्हेची शब्दांची आतषबाजी सुरु आहे.

भारतमाता आपणाला सांगते आहे—

‘बाळांनो, तुम्हाला विजय मिळाला ही आनंदाची गोष्ट आहे पण लक्ष्यात ठेवा की पराजयापेक्षा विजय पचवणे कठीण असते तो विजय पचवण्याकरता नम्रतेच्या आसनावर बसा. जवान व किसान ह्यांचे स्मरण ठेवा. दीनांना, दुःखितांना व दुबळ्यांना आपले म्हणा. युद्ध थांबले तरी दक्ष रहा. भिकेच्या झोळीला रामराम ठोकून स्वावलंबी होण्यासाठी पोट बांधून व कंबर कसून प्रयत्नांची पराकाष्टा करा, व भारत म्हणजे जगांतील आदर्श देश आहे हे सिद्ध करण्याकरता कृष्णाला नमस्कार करून गाणे म्हणा की—

आम्हा गीता असे माता।
जीवन मंदिरी अता ॥

× × ×

न्या. राम केशव रानडे यांचे अशा तऱ्हेचे भाषण झाल्यावर वित्तमंत्री माननीय शेषराव वानखेडे ह्यांनी आपल्या भाषणात युद्धप्रयत्नाची माहिती सांगून म्हटले—

'आज न्या. राम केशव रानडे ह्यांनी जें भाषण केले त्यामुळे मी फार प्रभावित झालो आहे. गीता व अहिंसा ह्याबद्दल शंकाचे मोहोळ पुष्कळ लोकांच्या मनांत उठत होते. असें सार्थत्वाने म्हणता येईल की—

लोकमान्य टिळकांनी गीतेबद्दल नवीन दृष्टी दिल्यानंतर लोकांना फार आनंद झाला. लो. टिळकांच्यानंतर आज न्या. रानडे ह्यांनी आपणाला गीतेबद्दल नवीन दृष्टी दिल्यामुळे आपणाला फार आनंद झाला आहे.'

× × ×

समारंभ संपल्यावर न्या. राम केशव रानडे ह्यांच्या चेंबरमध्ये बरेच अधिकारी जमले होते. ते राम केशवांना म्हणाले—

'साहेब, आज तुमचें भाषण फार उत्कृष्ट झाले. आज तुमचा लोकांनी खूप खूप सत्कार केला.'

राम केशव म्हणाले—

'अहो, आपण गीता डोक्यावर घेऊन चालू लागलो म्हणजे लोक खूप सत्कार करतात तो सत्कार आपला नसून गीतेचा असतो.

एकदा येसू ख्रिस्त गाढवावर बसून चालले होते लोकांनी त्याचा खूप खूप सत्कार केला तो सत्कार पाहून गाढवाला वाटलं की– हा आपलाच सत्कार आहे.

आपण गीता डोक्यावर घेऊन चाललो असताना लोक खूप सत्कार करतात. तो सत्कार गीतेचा असतो. तो सत्कार आपला आहे असे मानण्याचा गाढवपणा आपण कदापि करु नये.'

सारे अधिकारी मंद स्मित करीत म्हणाले—

'छान. छान. साहेब, ही तुमची गोष्ट जितकी लहान तितकीच महान आहे'

\+

# पत्र ७ वे

प्रिय गणेश,

आज कंपनीमार्फत कोणताच कार्यक्रम नव्हता. आज कंपनीच्या कार्यक्रमामध्ये Free Day असे म्हटले होते या दिवशी प्रवासी लोकांनी गावात फिरून खरेदी करावी, गाव पहावे अशी योजना होती.

आम्ही श्रीनगरमध्ये लालारुख नावाच्या प्रख्यात हॉटेलमध्ये राहत आहो. श्रीनगर हे शहर काश्मीरची राजधानी आहे ह्या नगराची वस्ती सुमारे चार लाख आहे व ह्याचा विस्तार १४४ स्क्वे किलोमिटर आहे.

मुंबईला हिंदु कोण व मुसलमान कोण हे सहज कळते, पण येथे परक्या माणसाला हिंदु कोण व मुसलमान कोण हे कळत नाही. मुसलमान लोक-देखील दाढी ठेवत नाहीत. लोक दिसायला चांगले आहेत व पोषाखात फरक दिसत नाही. जेव्हा एकादा मनुष्य आपले नाव गफूर, अहंमद, महंमद असे सांगतो, तेव्हाच आपणाला कळून येते की– हा मुसलमान आहे

गावात फिरत असताना मला एक हिंदु म्हातारा मनुष्य भेटला. त्याची हकिकत ऐकून मला फार वाईट वाटले.

तो पूर्वी कारकुनाचे काम करत होता. त्याला दोन मुलगे आहेत. जास्तीत जास्त काटकसर करून व पोटाला चिमटे काढून त्याने व त्याच्या बायकोने आपल्या दोन मुलांचे शिक्षण केले. त्याला सेवानिवृत्तीनंतर प्रॉव्हिडंट फंड मिळाला, पण तो सारा पैसा मुलाच्याकरता खर्च झाला.

आता ते दोन मुलगे मोठे ऑफिसर आहेत. एक मुलगा श्रीनगरमध्ये नोकरी करत आहे, दुसरा मुलगा जम्मूमध्ये नोकरी करत आहे. दोघांच्या राहण्याच्या जागा चांगल्या आहेत. दोघांच्या बायका सुंदर आहेत व श्रीमंत बापाच्या मुली आहेत.

ह्या म्हाताऱ्याला व त्याच्या म्हाताऱ्या बायकोला मुलांच्याशिवाय कोणताच आधार नाहीं. ह्या म्हाताऱ्याजवळ स्वतःचा असा कांहींच पैसा नाहीं ह्याची इस्टेट म्हणजे ह्याचे दोन मुलगे पण—

ह्या दोन ऑफिसर मुलानी आईबापांची वाटणी केली आहे.

वाटणी करायला दुसरी इस्टेट नसल्यामळे मुलानी आईबाप वाटून घेतले.

श्रीनगरच्या मुलाजवळ बाप राहतो व जम्मूच्या मुलाजवळ आई राहते.

हे म्हातारा–म्हातारी डोळ्यांत पाणी आणून आपल्या मुलाना म्हणाले—

' आम्ही दोघानी मिळून संसार केला. गरीबी असली तरी आमच्याजवळ प्रेमाची श्रीमंती होती. म्हातारपणी आमची दोघांची कृपाकरून ताटातूट करु नका. '

म्हातारा बाप मुलाना म्हणाला —

' मला रात्री खोकल्याची उबळ येते. त्यावेळी तुमची आई उठून मला चहा करुन देते. म्हातारपणी शृंगार नसतो, पण नाजुक तब्येतीमुळे दोघांना परस्परांचा फार मोठा आधार वाटत असतो. अरे, ह्या वयांत हिच्यापासून तुम्ही माझी ताटातूट करणें म्हणजे मला रोज मरणप्राय दुःखणें देण्याप्रमाणे आहे मी तुम्हाला हात जोडून सांगतो की— आमचे कपडे फाटके असले तरी चालतील, आम्हाला पोटभर अन्न नाही मिळाले तरी चालेल, पण आमची ताटातूट करु नका. '

म्हातारी आई मुलांना म्हणाली—

' अरे, तुमच्याकरता ह्यानी जीवाचे रान केले व रक्ताचे पाणी केले. त्यांचे ऐका. म्हातारपणी त्याना दुखवू नका. अरे, ह्या वयात त्यांच्याजवळ मी असायला पाहिजे. त्यांची तब्येत फार नाजुक आहे. नाहीतर असे करा. कांही दिवस आम्ही दोघे एका मुलाजळ राहतो व कांही दिवस आम्ही दोघे

दुसऱ्या मुलाजवळ राहतो म्हणजे वाटणी झाल्याप्रमाणे होईल व आमची दोघांची ताटातूट होणार नाही.'

त्या दोन ऑफिसरानी आपल्या म्हाताऱ्या आईबापांचे ऐकले नाही. त्यांच्या श्रीमंत बायका म्हणाल्या—

'एका वेळी दोन म्हातारी माणसं आपल्या घरी नकोत आम्ही त्याना वेगळे करून सांभाळतो, हेच खरोखर त्यांच्यावर महान उपकार आहेत.'

परिणाम असा झाला की—

म्हाताऱ्या आईबापांची ताटातूट व फाटाफूट करण्यात आली. म्हातारा बाप श्रीनगरच्या मुलाजवळ राहतो व रोज सुनेच्या शिव्या खात जीवन जगतो म्हातारी बाई जम्मूच्या मुलाजवळ राहते व देवाचं नाव घेत हीन दीन जीवन जगते.

× × ×

ही हकिकत ऐकून माझ्या हृदयाला घरे पडली.

गणेश,

माझी आई शेवटी बारा वर्षे आजारी होती; माझे वडील कडेपर्यंत माझ्याकडे होते.

आईबापांची सेवा करण्यात जो आनंद आहे, तो आनंदाचा कंद असतो, आनंदाचा आनंद असतो, परमानंद असतो. हा आनंद हा परमानंद ज्याला मिळाला त्याचा नंदाचा आनंद कृष्णकन्हय्या पाठीराखा होतो.

गणेश,

मी आईबापांची केलेली सेवा हाच माझ्या जीवनाचा मेवा आहे. जेव्हा माझी आई मला सोडून गेली तेव्हा गीता मला म्हणाली— मीच आता तुझी आई.

मी विचार करू लागलो. लोकाना वाटते की—

कायदा करून कोणतीहि सुधारणा होऊ शकते.

मला वाटू लागले—

ही समजूत चुकीची आहे. सुधारणेचा रथ दोन चाकावर चालतो एका चाकाचे नांव कायदा व दुसऱ्या चाकाचे नांव संस्कार.

लोकांच्या मनावर चांगले संस्कार न करता केवळ कायद्याच्या जोरावर सुधारणा करू पाहणे, म्हणजे एकाच चाकावर सुधारणेचा रथ ढकलण्याप्रमाणे आहे

मला दोन प्रसंग आठवले

त्यावेळी मी कॉलेजमध्ये होतो. चिपळूणला माझ्या बहिणीकडे गेलो. त्या सुमारास प्लेग असल्यामुळें बरेच लोक शेतात राहत होते.

आम्ही पाचसहा लोक सायकली घेऊन गावातून झोपड्याकडे निघालो. गावापासून दोन मैल आल्यावर बाकीचे लोक म्हणाले—

' आपण येथेच रस्त्यावर सायकली टाकू, चालत झोपड्याकडे जाऊ व जेवण करून मग परत येऊ आणि सायकली घेऊन गावाकडे जाऊ. '

झोपड्या शेतात बऱ्याच आत होत्या शेतातून सायकली नेणे त्रासाचे होते, म्हणून त्या लोकानी तसा विचार केला.

मी त्याना म्हटले—

' अहो, आमच्या सांगली गावात घरातून देखील सायकली चोरीला जातात. आपण जर रस्त्यावर सायकली टाकून गेलो तर त्या चोरीस नाही का जाणार ? '

ते लोक मला म्हणाले—

' हें कोकण आहे. येथे संस्कारांचा फार जोर आहे. आमच्या गावात चोरी नाही. रात्री दारे उघडी टाकून देखील आम्ही झोपी जाऊ शकतो. आमचे कोकण गरीब असेल पण संस्कारांच्या बाबतीत श्रीमंत असल्यामुळे येथे फौजदारी गुन्हा नाही. '

बहुसंख्य मताप्रमाणे मला वागावे लागले. आम्ही सायकली रस्त्यावर टाकून शेतातून चालत झोपडीकडे गेलो व जेवण करून चार तासानी परत आलो.

माझी शेकडा शंभर टक्के बालंबाल खात्री होती की आमच्या सायकली चोरीस गेलेल्या असणार, पण चार तासानी येऊन पहातो तो साऱ्या सायकली, होत्या तशा होत्या. माझा माझ्या डोळ्यावर विश्वास बसेना.

चांगल्या संस्कारांचा एवढा मोठा प्रभाव पाहून मी थक्क झालो

कोकणाच्या जिल्ह्याचे ठिकाण रत्नागिरी येथे खारेपाटण नावाचे पारशी न्यायाधीश बरेच दिवस काम करत असत. त्यांनी आपल्या आईजवळ कबूल केले होते की—

आपण कोणाला फाशी देणार नाही.

पण सेशन्सजज्जाला हा नियम पाळणे कसे शक्य आहे ?

खून भयंकर असेल तर त्याला आरोपीला खुनाची सजा द्यावी लागते.

कोकणात फौजदारी गुन्हे अगदी तुरळक असल्यामुळे व खुनाचा कज्जा नसल्यामुळे खारेपाटण ह्यांना रत्नागिरीचे सेशन्सजज्ज म्हणून केव्हाहि फाशीची शिक्षा देण्याचा प्रसंगच आला नाही.

कोकणात संस्कारांचा फार जोर असल्यामुळे व खून नसल्यामुळे खारेपाटण खटपटी करून पुनः पुन रत्नागिरी मागून घेत.

संस्कारांचा जोर असताना कोकणात असा प्रकार होता; पण पुढे संस्कार नाहीसे झाले.

संस्कारांचा जोर ओसरल्यानंतर कोकण दुसऱ्या टोकाला निघाला. नंतर सुमारे तीस वर्षांनंतरची गोष्ट आहे. आता कोकणात संस्कारांचा जोर अजिबात नव्हता. माझी रत्नागिरीला सेशन्सजज्ज म्हणून नेमणूक झाली होती.

भयंकर खुनांच्या बाबतीत सातारी खून प्रसिद्ध आहेत, पण आता संस्कारशून्य कोकणात सबाई सातारी खून होऊ लागले.

माझ्यापुढे पहिलाच जो सेशन्स कज्जा आला तो म्हणजे—

चाफाखून कज्जा.

साऱ्या कोकणचे लक्ष्य ह्या कज्जाकडे लागले होते कज्जा ऐकण्याकरता कोर्टात स्त्रीपुरुषांचा पूर येत होता

कूळ कायद्याचे भांडण होते.

एक तरुण खोत चाफा गावामध्ये रात्री ८ वाजता जेवणास बसणार होता, इतक्यात काही लोक त्याच्या दारांत आले व त्यांनी पाणी मागितले.

तो तरुण खोत गूळ पाणी घेऊन बाहेर आला. त्या लोकानी त्याचा लगेच सुऱ्यानी खून केला

त्याची तरुण बायको आरडत बाहेर आली, पण त्या नराधमानी तिचा देखील सुऱ्यानी खून केला. पोस्टमार्टेम ( मरणोत्तर डॉक्टरी ) रिपोर्टावरून दिसून आले की—

त्या बाईच्या अंगावर एक नाही, दोन नाही, तीन नाही, चार नाही तर बत्तीस सुऱ्यांचे वार होते.

त्या खोताची म्हातारी आई घरात होती. तिचाहि त्या लोकानी सुऱ्यानी खून केला.

त्या खोताचा गडी होता त्याचाहि त्या लोकांनी सुऱ्यानी खून केला. त्या खोताची आठ वर्षाची मुलगी होती. ती आईबाबा म्हणून रडू लागली.

त्या रडण्यामुळे दयेचा पाझर फुटण्याऐवजी त्या दुष्टानी तिचाहि सुऱ्यानी खून केला.

कोर्टात येणारे लोक ती सारी हकिकत ऐकताना दुःखी कष्टी होत व एका प्रसंगामुळे तर सान्याच्या व माझ्या डोळ्यात पाणी येई– तो प्रसंग म्हणजे—

त्या खोताचा सहा महिन्याचा मुलगा पाळण्यांत झोपला होता, त्याचा त्या अधमानी सुऱ्यानी भोसकून खून केला ! !

संस्काराचा जोर असलेले कोकण मी कॉलेजमध्ये असताना पाहिले व संस्कारशून्य कोकण सेशन्सजज्ज म्हणून पाहिले.

कन्हय्या, कल्पितापेक्षा सत्यच विलक्षण असते हेंच खरें.

× × ×

गणेश,

काश्मीरची राजधानी श्रीनगर हें मोठें सुंदर शहर आहे. राजतरंगिणीमध्ये म्हटले आहे की हें शहर सम्राट अशोकने वसवले आहे. ह्या शहराभोवती जे पर्वत आहेत ते पाहून मला वाटले—

ह्या पर्वतानी बर्फाच्या टोप्या घातल्या आहेत व पाईन वृक्षांचे अंगरखे घातले आहेत.

शहरात हिंडत असताना कितीतरी ठिकाणी पाणीच पाणी दिसते. ते पाहून वाटते की श्रीनगरची देवता जणू कांही जलरूपी आरसे–महालात राहत आहे.

जिकडे तिकडे सुगंधी फुलांची झाडे पाहून वाटते की—

ह्या आरसे–महालात बेफाम, बेहद्द अत्तराचा सुगंध पसरला आहे

बागा, सरोवरे, मंदिरे, मशीदी, पूल–ह्यानी सुंदर नक्षीकाम केलेले हें शहर पाहून डोळ्याना वाटते की आज पंच पक्वान्नाचे जेवण मिळाले.

साहित्याचार्य केळकरांनी पर्वतावर बर्फ पडलेले पाहून उपमा देताना म्हटले की—

काळ्या पर्वतावर पडलेले ते पांढरे बर्फ पाहून वाटत होते की—
जणू कांही वांगी भातावर खोबरे घातल्याप्रमाणे दिसत होते.
येथे पर्वतावर इतके दाट बर्फ पडते की—
वांगीभातावर खोबरे घातल्याप्रमाणे ते दिसत नाही.
पक्कान्नाची उपमाच द्यायची तर कर्नाटकातील—
ओलक्की मसरु.

× × ×

पूर्वी श्रीनगर हे शिक्षणाचे महान केंद्र होते. अजूनहि हिंदुस्थानांत कांही ठिकाणी अशी चाल आहे की—

मुंज करताना मुंज्या मुलाने काश्मीरच्या दिशेला तोंड करून सात पावले चालणेचे.

पूर्वीच्या काळी काश्मीर विश्वविद्यालयाकडून सर्टिफिकेट मिळवणे हा मोठा मान मानला जात असे.

× × ×

हल्लीचे श्रीनगर दुसरा प्रवरसेन ह्या राजाने ( ११२ ते १७२ A. D ) वसवले ह्या नगराचे त्याने आठ भाग केले

म्युनिसिपालिटीने शहराचे आठ वॉर्ड करावेत, व प्रत्येकावर एक वॉर्ड ऑफिसर नेमावा, त्याप्रमाणे प्रवरसेनराजाने ह्या नगराचे आठ भाग केले व प्रत्येक भाग एका देवाच्या हवाली केला. ते आठ देव असे—

( १ ) विटलराज भैरव
( २ ) आनंदीश्वर भैरव
( ३ ) तुष्कराज भैरव
( ४ ) जयेकसेन भैरव
( ५ ) विशालसेन भैरव
( ६ ) भक्तकीश्वर भैरव
( ७ ) पूर्णराज भैरव
( ८ ) मगलराज भैरव

× × ×

श्रीनगरमध्ये हिंडताना मन उदास दिसत होते, कारण मुसलमान बादशहानी कितीतरी देवळें पाडली आहेत. हिंडत असताना मला एक पंडित भेटला त्याने मला आपल्या घरी नेले. आम्ही बराच वेळ बोलत बसलो होतो. तो म्हणाला-

हिंदुस्थानचे सर्वात उत्कृष्ट पुस्तक म्हणजे गीता

मी त्याला म्हटले—

अहो, गीता हे साऱ्या जगाचे पुस्तक आहे. जगात जी महान पुस्तके आहेत त्यामध्ये गीताग्रंथाला पहिला मान आहे.

चार्लस विल्किन्स ह्याने गीतेचे इंग्लिशमध्ये इ. स. १७८५ साली भाषांतर केले. त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत वॉरन हेस्टिंगजने म्हटले आहे की—

This translation of the Bhagavad Geeta would survive when the British Dominion shall have long ceased to exist.

वुइल्यम वॉन हम्बोल्ट ह्याने गीतेचे भाषांतर वाचले व त्याला वाटले—
माझे भाग्य थोर म्हणून इतके उत्कृष्ट पुस्तक मला वाचायला मिळाले.
दुसरे जागतिक युद्ध सुरु होते. बर्लीनवर बॉबवर्षाव होत असे. भोंगा झाल्यावर लोक भयभीत होऊन निवाऱ्याच्या जागी पळत असत.

अशा वेळी एक पधरा सोळा वर्षांची मुलगी निर्भयपणे वावरत असे. तो प्रकार पाहून हिटलरच्या एका सल्लागाराला फार आश्चर्य वाटले हा सल्लागार नामांकित प्रोफेसर होता. त्याने त्या मुलीला विचारले—

'बाकीचे लोक भयभीत होत असताना तुला अजिबात भय वाटत नाही ह्याचे रहस्य काय ?'

ती मुलगी म्हणाली—

'रहस्य इतकेच की मी भगवद्गीता वाचते.'

त्या प्रोफेसरने लगेच गीतेचे जर्मन भाषांतर मिळवले व ते वाचल्यावर आनंदाने बेफाम होऊन तो म्हणाला—

'संकटकाळी उपयोगी पडणारे जगातले सर्वांत उत्कृष्ट पुस्तक म्हणजे गीता.'

इमर्सन ज्या ज्या वेळी हॉस्पिटलना भेटी देत असे, त्या त्या वेळी तो रोग्यांना गीतेतले उतारे वाचून दाखवत असे व म्हणत असे—

शरीराकरता औषध घ्या व मनाकरता गीता वाचा.

× × ×

गीता हा जगातला महान ग्रंथ कसा आहे ह्याबद्दलची हकिकत ऐकून तो काश्मीरी पंडित मला म्हणाला—

'साहेब, गीतेला मी जीव की प्राण मानतो. तुम्ही सांगितलेली हकिकत ऐकून माझ्या गीतामाउलीला जगात एवढी किंमत आहे हे समजल्यावर माझा आनंद द्विगुणीत झाला आहे. आज तुम्ही माझ्यावर फार मोठे उपकार केले आहेत'

× × ×

तो काश्मीरी पंडित पुढे म्हणाला—

'साहेब, कृष्णकन्हय्या तुमचा जीव की प्राण. गीतेचा तुम्ही अभ्यास केला आहे मला एक शंका आहे. विचारु का ?'

मी म्हटले—

'विचारा.'

तो पंडित म्हणाला—

'गीतेचा शेवटचा श्लोक असा आहे—

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥

काही लोक ध्रुवा हे विशेषण नीतिला लावतात तर कांही लोक ते भूतीला लावतात.

ह्या श्लोकात नीति ह्या शब्दाचे प्रयोजन दिसत नाही. मला असें म्हणावयाचे आहे की—

जिकडे योगेश्वर कृष्ण व जिकडे धनुर्धारी अर्जुन तिकडे लक्ष्मी, विजय व ऐश्वर्य निश्चित असते असे माझे मत आहे.

या श्लोकात 'इति' हा शब्द मतीच्या पूर्वी येणे आवश्यक आहे व 'नीति' ह्या शब्दाची आवश्यकता दिसत नाही.

तुम्हाला काय वाटते ?'

मी सांगू लागलो—

'तुमची शंका फार चांगली आहे. शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य वगैरे आचार्यांनी, त्याचप्रमाणे लोकमान्य टिळक, म. गांधी वगैरे अलीकडील विद्वानांनी नीति हा शब्द शेवटल्या श्लोकात आहे असे समजूनच त्या श्लोकाचा अर्थ केला आहे. मति पूर्वी 'इति' हा शब्द पाहिजे हें म्हणणे खरे आहे, पण सर्व टीकाकारांनी 'इति' हा शब्द अध्याहृत आहे असे मानले आहे.

ज्ञानेश्वरांनी ह्या शेवटल्या श्लोकाला साऱ्या भारताचे तात्पर्य असे म्हटले आहे. ज्ञानेश्वरीमध्ये जो शेवटला संस्कृत श्लोक दिला आहे, त्यामध्ये 'नीति' असा शब्द आहे, पण ज्ञानेश्वरांनी ह्या श्लोकावर जी टीका केली आहे त्यामध्ये श्रीचा उल्लेख आहे, विजयाचा उल्लेख आहे व भूतिचा उल्लेख आहे, पण नीतिचा बिलकुल उल्लेख नाही.

ह्या श्लोकावर ओव्या करताना ज्ञानेश्वर रंगून गेले आहेत त्यांचे म्हणणे समजून घेतले म्हणजे असे दिसते की—

जिकडे योगेश्वर कृष्ण व धनुर्धारी अर्जुन आहे तिकडे श्री, विजय व भूति निश्चित आहे असें संजयाचे मत आहे.

तिकडे नीति आहे असें ज्ञानेश्वरानी ज्ञानेश्वरीत म्हटले नाही.

शेवटच्या श्लोकात संजयाच्या तोंडात नीति हा शब्द येण्याचे कारण नाही असें तुमच्याप्रमाणे पुष्कळ लोकाना वाटते. ज्ञानेश्वरानी संजयाला काय म्हणावयाचे आहे त्याचा खुलासा करताना नीतिचा अजिबात उल्लेख केला नाही.

इतर टीकाकारानी नीतिचा उल्लेख केला, कारण शेवटल्या श्लोकात नीति असा शब्द आहे

संजयाच्या तोंडात 'नीति' हा शब्द येण्याचे कारण नाही असें पुष्कळाना वाटते. त्याचप्रमाणे मतिच्या पूर्वी इति हा शब्द पाहिजे ह्यात वाद नाही

पूर्वी गीतेमध्ये संजयाच्या तोंडी जो श्लोक होता तो असा असावा—

यत्र योगेश्वर कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवाणीति मतिर्मम ॥

## ध्रुवा नीति

ह्या शब्दाच्या ऐवजी पूर्वी ध्रुवाणीति असा शब्दप्रयोग असावा.

अशा शब्दप्रयोग असल्यामुळे मतिच्या पूर्वी इति हा शब्द येतो, व ध्रुवाणि असा शब्द असल्यामुळे श्री, विजय व भूति ह्या तिघाना तो लागू पडतो.

हल्लीच्या पाठात फक्त 'ध्रुवा' असे विशेषण आहे व ते विशेषण कोणत्या एका शब्दाला लावावे ह्याबद्दल संदेह निर्माण होतो

जिकडे योगेश्वर श्रीकृष्ण आहे व जिकडे धनुर्धारी अर्जुन आहे, तिकडे निश्चित विजय आहे असे संजयाला आवर्जून सांगावयाचे आहे; पण हल्लीच्या पाठात जो ध्रुवा शब्द आहे तो विजय ह्या शब्दाला लावता येत नाही

ध्रुवाणीति

असा पाठ घेतला म्हणजे साऱ्या शंकाचे निरसन होते.'

हे ऐकून तो काश्मीरी पंडित म्हणाला—

'साहेब, हा तुमचा पाठ ऐकून बारा वर्षे ज्याला मूल नाही त्याला मुलगा झाल्यानंतर जितका आनंद होईल तितका मला आनंद झाला आहे. आता शंका इतकीच की तुमचा हा पाठ सर्वोत्कृष्ट असला तरी ह्या पाठाला कांही आधार आहे का?'

मी सांगू लागलो—

'महाभारताच्या एका प्रतीत (मुंबईत गणपत कृष्णाजीच्या छापखान्यात छापलेल्या महाभारताच्या प्रतीत) गीतेचे अठरा अध्याय संपल्यावर जो अध्याय लागतो त्याच्या म्हणजे भीष्मपर्वाच्या त्रेचाळीसाव्या अध्यायांत असे म्हटले आहे की—

षट्शतानि सविंशाति श्लोकानां प्राह केशवः।

अर्जुनः सप्तपंचाशत् सप्तषष्टिं तु संजय।

धृतराष्ट्रः श्लोकमेकं गीताया मानमुच्यते।

यावरून तुम्हास समजून येईल की गीतेमध्ये कृष्णाचे ६२०, अर्जुनाचे ५७, संजयाचे ६७ व धृतराष्ट्राचा एक असे एकंदर ७४५ श्लोक आहेत. हल्लीच्या गीतेत मात्र ७०० श्लोक आहेत.

खूप शोध सुरु असताना विद्वानांना पूर्वी भोजपत्रावर हाताने लिहिलेली गीता उपलब्ध झाली. ही गीता आता तुमच्या आमच्या माहितीसाठी छापून प्रसिद्ध केली आहे ह्या गीतेला 'भोजपत्री गीता' असे म्हणतात.

ह्या भोजपत्री गीतेत ७४५ श्लोक आहेत व विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे ह्या गीतेत—

ध्रुवा नीति

असा पाठ नसून, ध्रुवाणीति असा पाठ आहे

मला वाटते मी म्हणतो त्या पाठाबद्दल हा आधार मोलाचा आहे.'

हें ऐकून तो काश्मीरी पंडित म्हणाला—

'साहेब, हा आधार फार फार मोलाचा आहे. आपले जितके आभार मानावेत तितके थोडेच आहेत'

× × ×

श्रीनगरमधून फेरफटका मारून मी व सौभाग्यवती लालारुख हॉटेलमध्ये आलो. जेवणेस थोडा अवकाश होता म्हणून कांही लोक बाहेर सोफासेटवर बसुन गप्पा मारत होते. मी व सौभाग्यवती त्यांच्यामध्ये जाऊन बसलो

काश्मीर भारतात सामील झाल्यानतर थोड्याच दिवसानी म्हणजे ता. ३०जानेवारी १९४८ रोजी म. गांधींचा खून झाला व मरणापूर्वी त्यांनी 'हरे राम' असे शब्द उच्चारले. ह्या बाबतीत Nine Hours to Ram–ही कादबरी प्रसिद्ध झाली आहे. ह्या कादंबरीबद्दल लोक चर्चा करत होते. एक गृहस्थ म्हणाले—

'ही कादंबरी फार फार चांगली आहे इतकी उत्कृष्ट कादबरी माझ्या पहाण्यात नाही.'

मी काहीच बोलत नाही हे पाहून लोक मला म्हणाले—

'साहेब, तुम्हाला काय वाटते ?'

मी सांगू लागलो—

'म. गांधींचा खून होणेस नको होता भारतीय संस्कृतीला ही गुन्हाची वृत्ति मंजूर नाही. नास्तिक चार्वाकाचा देखील भारताने खून केला नाही एकाद्याचे विचार पटले नाहीत तर ते विचार प्रचाराने मारणेचे असतात. विचार पटले नाहीत तर ते विचार सांगणाऱ्याचा खून करणेचा हे भारतीय संस्कृतीला मान्य नाही. नाइन अवर्स टू राम-ह्या कादंबरीत सत्याचा विपर्यास केला आहे या कादबरीच्या लेखकाचे नाव आहे—

स्टॅन्ले वोल्पर्ट

हा वोल्पर्ट म्हणे इतिहासाचा प्रोफेसर आहे. याला म्हणे भारताची खूप माहिती आहे.

या प्रोफेसराने या कादबरोत सत्याचाच जागोजागी खून केला आहे. सरदार वल्लभभाई पटेलांच्यावर असभ्य चिखलफेक केली आहे स्वातंत्र्यवीर

सावरकर याना Minister evil genius behind the murder अशी पदवी बहाल केली आहे.

खुनाच्या कज्याचा निकाल होऊन सावरकर पूर्णपणे निर्दोषी आहेत, त्यांचा खुनाशी काही संबंध नाही, असे शाबीत झाले असताना देखील हा कादंबरीकार त्यांची यथेच्छ बदनामी करत आहे.

ऐतिहासिक कादंबरीकाराने आपल्या कलाकृतीच्या रंगतीसाठी सत्य व कल्पित ह्याचे मिश्रण करण्यास हरकत नाही, पण ते कल्पित असें पाहिजे की ज्यामुळे सत्याचा खून होणार नाही त्याने सत्य व्यक्तीच्या भोवती काही काल्पनिक व्यक्ति उभ्या केल्या तरी हरकत नाही, पण प्रत्यक्ष इतिहासाला त्याने जर धक्का लावला तर ते क्षम्य ठरणार नाही.'

लोक म्हणाले—

' साहेब, तुमचे हे विचार आम्हाला एकदम मान्य आहेत. म. गांधींचा खून नथुराम गोडसे ह्याने केला, गोडसेचा जीवनवृत्तात आम्हाला माहित आहे, त्याच्याबद्दल ह्या इंग्लिश कादंबरीकाराने काय लिहिले आहे ? '

मी सांगू लागलो–

' अहो, गोडसेबद्दल त्याने वाटेल ते लिहिले आहे. आपणास सर्वांना माहित आहे की गोडसेने कॉलेजशिक्षण घेतले नाही व तो ब्रह्मचारी होता. कादबरीकाराने गोडसेला केवळ कॉलेजचा विद्यार्थी बनवले आहे व कादबरीत असे दाखवले आहे की, त्याचे सोळाव्या वर्षी लग्न झाले होते व त्यावेळी त्याची बायको बारा वर्षाची होती. कादंबरीकाराने असेहि सांगितले आहे की आपल्या अल्पवयीन बायकोवर गोडसे ह्याने जबरीसंभोग केला, त्यामुळे तिच्या अंगातून रक्तस्राव होऊं लागून तिचा अंत झाला '

हा प्रकार ऐकून लोक म्हणाले—

' म. गांधीना सत्य जास्तीत जास्त प्रिय. गोडसेने म. गांधींचा खून केला पण ह्या कादबरीकाराने सत्याचाच खून केला.'

× × ×

आमचे रात्र्याचे जेवण झाले. मी व सौ. वती आमच्या खोलीत आलो. मी माझ्या कॉटवर पडलो व सौभाग्यवती आपल्या कॉटवर पडली.

पडल्या पडल्या मौनव्रत धारण करून पराकाष्टेच्या शांततेमध्ये मी कृष्णकन्हय्याचें चिंतन करू लागलो. शांतता हे मानवी जीवनाचे उत्कृष्ट टॉनिक आहे.

कार्लाईलने म्हटले आहे– ' Silence is the element in which great things fashion themselves. '

सुप्रसिद्ध तत्ववेत्ता शोपेनहावर म्हणतो की मनुष्य ज्याला सुख म्हणतो ती एक अभावात्मक अवस्था आहे.

मला हे पटत नाहीं. कृष्णाच्या स्मरणाने मला जें सुख वाटते तें अभावात्मक खचित नाही

डॉक्टर लोक म्हणतात की Many people suffer poor health, because they do not eat proper food.

मला वाटते की– Many people suffer poor health, mainly not because of what they eat, but mainly from what is eating them.

नामकुश्री झाल्यानतर सारे प्रवाशी खरेदी करण्याकरता बाहेर पडले

काश्मीरचे केशर प्रसिद्ध आहे. तीस रुपयास एक तोळा ह्याप्रमाणे उत्कृष्ट केशर मिळते. त्याचप्रमाणे काश्मीरची रेशमी पातळे प्रख्यात आहेत. ड्राय फ्रूटबद्दल काश्मीर प्रसिद्ध आहे. आम्ही बराच वेळ खरेदी केली.

ही सारी खरेदी झाल्यावर आम्ही एका बड्या पुस्तकाच्या दुकानांत गेलो. येसू ख्रिस्ताच्या पुर्वी पांच हजार वर्षापासून काश्मीरच्या इतिहासाचा काळ सुरु होतो असें म्हणतात ! असें म्हणतात की, प्रभू रामचंद्र ह्याने प्रथम काश्मीरचे राज्य स्थापन केले

राजतरंगिणीमध्ये जो आरंभ केला आहे, त्यामध्ये काश्मीरचा राजा म्हणून पहिल्या गोनंदाचा उल्लेख केला आहे. गोनंदानंतर त्याचा मुलगा दामोदर गादीवर बसला. ह्याने कृष्णाबरोबर युद्ध सुरू केले पण त्या युद्धात तो मारला गेला.

कृष्णाने त्याचे राज्य न बळकावता ते त्याची पत्नी यशोवती हिला दिले.

गणेश,

कृष्णाला त्याच्या आयुष्यात राजा होण्याची संधी—सुसंधी आली, पण कृष्ण कन्हय्या राजा झाला नाही. तो ज्या सिंहासनावर अधिष्ठित झाला ते म्हणजे समाजाच्या अंत:करणाचे सिंहासन.

कृष्णाने आपल्या पराक्रमाने द्वारका नगरी वसवली. त्या नगरीवर राजा म्हणून त्याने वसुदेवाची स्थापना केली. बलरामाला यौवराज्याभिषेक करवला, सात्यकीला सेनापतीपद दिले, सांदिपनींना राज पुरोहित नेमले. निरनिराळ्या प्रधानांची नेमणूक केली.

कृष्णाने सर्वांच्या नेमणुका केल्यानंतर लोक म्हणाले—

' अरे, तू सर्वांपेक्षा मोठा आहेस. तू कोण होणार ? '

कृष्ण म्हणाला—

' माझी पदवी सर्वांपेक्षा मोठी आहे. मी आहे—

**सर्वांचा दास**

× × ×

काश्मीरमध्ये हा सर्वांचा दास— हा कृष्णकन्हय्या— माझा सागाती होता. त्याचा हात धरुन मी प्रवास करत होतो व त्याच्या प्रेमात डुबत होतो. कृष्णप्रेमात डुबल्याशिवाय नि डुबल्याशिवाय गीतेचे तत्त्वज्ञान समजत नाही. कृष्णकन्हय्याला पाहिले की मला वाटते—

हिम्मत नि हिकमत जेव्हा सम्मत होतात तेव्हाच जीवनामध्ये खरी गम्मत नि जम्मत येते.

× × ×

श्रीनगरमध्ये आम्ही खूप खूप हिंडलो व सध्याकाळी लालारुख हॉटेलमध्ये परत आलो

पाकिस्तानने पूर्व बंगालमध्ये जे अनन्वित अत्याचार सुरू केले होते त्याबद्दल काश्मीरमध्ये जिकडे तिकडे चर्चा सुरु होती. खर म्हणजे अमेरिकेने पाकिस्तानच्या विरुद्ध आवाज उठवणेस पाहिजे होता, पण अमेरिका

*

अत्याचार करणाऱ्या पाकिस्तानाच्या बाजूने व न्यायाची बाजू घेणाऱ्या हिंदुस्थानाच्या विरुद्ध आवाज उठवीत होती.

रात्रीच्या जेवणापूर्वी आम्ही प्रवासी गॅलरीमध्ये सोफा सेटवर बसून गप्पा मारत असताना अमेरिकेबद्दल खूप बोलणे झाले

लोकानी आग्रह केल्यावर मी सांगू लागलो—

My Autobiogrophy हें चार्ली चॅप्लीनचे आत्मवृत्त तुम्ही जरुर वाचा. त्याच्या लहानपणाच्या ज्या आठवणी आहेत त्या साऱ्या दरिद्र्याच्या व हालअपेष्टाच्या.

ज्या अमेरिकेत वयाच्या पंचविसाव्या वर्षी महिना फक्त एकशे चाळीस रुपये पगार मिळवणाऱ्या चार्ली चॅप्लीनने पाऊल ठेवले होते, ज्या ठिकाणी त्याने तब्बल त्रेचाळीस वर्षे काढून अगणित संपत्ति मिळवली, ज्याने अमेरिकेला आपली कर्मभूमि मानले, त्याने शेवटी अमेरिकेला रामराम ठोकला.

चार्ली चॅप्लीन कधी कम्युनिष्ट नव्हता. कोणत्याहि राजकीय पक्षात तो सामील झाला नव्हता. जगात शांतता नांदावी, सर्व लोकाना माणुसकीने जगता यावे, अन्याय, जुलम, वैषम्य या तिहेरी शापातून मानवाची मुक्तता व्हावी; उन्मार्गावर जाणाऱ्या जगाला सन्मार्गावर आणण्यासाठी प्रयत्न करावा— म्हणून उदात्ततेने खटपट करणाऱ्या ह्या महान कलावंताची अमेरिकेत ससेहोलपट झाली. जोन बॅरीच्या प्रकरणातून उत्पन्न झालेल्या खटल्यातून तो निर्दोषी सुटला होता, पण त्याच्या अंतःकरणात जखमा खोलवर गेल्या होत्या. अमेरिकेविषयी त्याची आत्मियता दुखवली गेली व उदंड कीर्ती नि अफाट संपत्ति मिळवलेला मानवतेचा हा महान पुजारी शेवटी अमेरिका सोडून स्वित्झर्लंडमध्ये स्थायिक झाला.

अहो,

अमेरिका म्हणजे विसंगतिचा उच्चांक आहे पाकिस्तान बंगालमध्ये नरमेध करत आहे, पण त्याविरुद्ध अमेरिका आवाज उठवत नाही. त्याच अमेरिकेने झेकोस्लोव्हाकियामध्ये जो अत्याचार झाला त्या विरुद्ध मात्र

जगभर डागोरा पिटला कंबोडिया लाओस ह्या ठिकाणी अमेरिकेने आक्रमण केले, इस्त्रायलने इजिप्तच्या युद्धात शत्रूचा प्रदेश बळकावला पण अमेरिका आक्रमणाच्या विरुद्ध उभी न राहता आक्रमणाच्या बाजूने उभी राहिली तीच अमेरिका भारत, बंगालमध्ये आक्रमण करत आहे असा बकवा करत आहे. अमेरिका स्वत. लोकशाही आहे पण हा लोकशाही देश लोकशाही हिंदुस्थानची बाजू न घेता, लष्करशाही पाकिस्तानची बाजू घेत आहे. '

शेवटी मी लोकाना सांगितले—

' अमेरिका आज संपत्तीच्या शिखरावर आहे पण त्या देशात झोपेच्या गोळ्यांचा जास्तीत जास्त खप आहे. त्या खपाचे प्रचड आकडे पाहून तज्ञ म्हणतात की—

Americans have lost the art of sleeping.

अमेरिकेचा पराक्रम पाहून लोक म्हणतात की—

आता चंद्रयुग सुरू झाले

पण अमेरिकेत डोकेदुखी प्रचंड प्रमाणावर आहे व अॅस्पिरिनचा कल्पनातीत खप आहे त्या खपाचे प्रचंड आकडे पाहून तज्ञ म्हणतात की—

आता चंद्रयुग सुरु झाले नसून अॅस्पिरिन युग सुरू झाले आहे.

× × ×

लोक म्हणाले—

' अमेरिका अशी का वागते ह्याबद्दल आम्हाला नवीन प्रकाश मिळाला.'

× × ×

जेवण झाल्यावर सारे प्रवासी आपल्या खोलीत गेले.

रात्री कॉटवर पडलो असताना सौभाग्यवतीने मला विचारले—

' कृष्ण एकशेवीस वर्षेपर्यंत जगला दीर्घायुष्याचे रहस्य काय ? '

मी म्हटले—

' जे लोक शंभर वर्षाच्या पुढे आहेत त्यांच्या जीवनाचा अभ्यास करून तज्ञांनी असा निष्कर्ष काढला आहे की—

सप्तरंगी नियम हे दीर्घायुष्याचे रहस्य आहे '

सौभाग्यवती म्हणाली—

' कोणते ते सात नियम ? '

मी सांगू लागलो—

' ते सात नियम असे—

( १ ) आळशीपणा सोडून उद्योगी जीवन जगणे

( २ ) जीवनात नेमस्तपणा असणे

( ३ ) जाड्य होईल असा आहार न करणे व साधा आहार करणे

( ४ ) जीवनात जास्तीत जास्त आनंद घेणे

( ५ ) लवकर निजणे व लवकर उठणे

( ६ ) चिंता देवाला अर्पण करणे व

( ७ ) देवावर विश्वास ठेवणे.

× × ×

गणेश,

आपण भेटलो म्हणजे कुकळदा देवाबद्दल बोलतो. कृष्णानें गीतेत जास्तीत जास्त भक्तिप्रेमावर जोर दिला आहे

टॉलस्टॉयने म्हटले आहे की—

' Where love is, there God is. '

असो.

उद्या आम्ही चिरनिराळ्या बागा पहाणार आहो. त्या पाहिल्यावर पुढचे पत्र पाठवीन.

तुझा

राम

# पत्र ८ वे

प्रिय गणेश,

आज दुपारी निरनिराळ्या बागा पहाण्याचा कार्यक्रम फळ्यावर जाहीर करण्यात आला.

सकाळी ब्रेकफास्टला आम्ही लालारुखच्या हॉलमध्ये जमलो असतांना मी व डॉ. कुलकर्णी व मिसेस कुलकर्णी बोलत होतो. डॉ. कुलकर्णी व मिसेस कुलकर्णी दोघेही डॉक्टर आहेत.

हे दोघे डॉक्टर फार भाविक आहेत. त्यांचा देवावर विश्वास आहे व त्याना वाटते की—

देवाची प्रार्थना करून ऑपरेशन केले म्हणजे फार फायदा होतो

गणेश,

कांही लोकाना वाटते की—

रोग आला, दुखणे झाले किंवा आजारीपण आले म्हणजे डॉक्टरी औषध मुळीच न घेता फक्त देवाचे नाव घ्यावे.

दुसऱ्या लोकांना वाटते की—

अशावेळी देवाच्या नावाचा अथवा देवावरील श्रद्धेचा कांहीही उपयोग नसून आपण फक्त डॉक्टरी उपचार करावेत.

ही दोन्ही मते एकांगी आहेत. उत्कृष्ट उपाय म्हणजे—

डॉक्टरी उपचार व देवाचे नांव अथवा देवावरील श्रद्धा ह्या दोन्हींचा उपयोग करणे.

डॉ हन्स फिन्स्टेरर हा प्रख्यात डॉक्टर आहे आज तो चौऱ्याहत्तर वर्षांचा आहे हा व्हिएन्ना युनिव्हर्सिटीचा नामांकित प्रोफेसर आहे ह्याने वीस हजारपेक्षा जास्ती मोठी ऑपरेशने केली आहेत. तो म्हणतो—

" Some Doctors have lost faith in God. Their experience is that sometimes even in simple surgical operations patients die. Some Doctors have faith in God. Their experience is that in some cases where there was no chance, the patients survived. Although considerable advance has been made in medicine and surgery, still unless we pray to God and unless we have faith in God, the true progress will not be accomplished in the treatment of patients and in restoring the sick to health "

× × ×

दुपारी जेवण झाल्यावर आम्ही डीलक्स बसने मोगल गार्डन्स पहायला निघालो.

प्रथम आम्ही चश्माशाहीमध्ये आलो.

ही फार सुंदर बाग आहे. एका टेकडीच्या पायथ्याशी ही बाग असून श्रीनगरपासून साडे पाच मैल दूर आहे. शहाजहान बादशहानें ही बाग तयार केली. ह्या बागेमध्ये एक थंड पाण्याचा झरा आहे. असे सांगण्यात आले की या झऱ्याचे पाणी आरोग्यप्रद आहे

या बागेमध्ये सुंदर सुंदर नाना प्रकारच्या रंगाची फुले आहेत. ह्या बागेजवळ राज्यपालभवन आहे. ह्या बागेला—

' प्रेमका बाग ' असें म्हणण्यात येते.

ह्या बागेत आम्ही बसलो असताना एका गृहस्थाने मला विचारले—

' साहेब, आपण काश्मीर सफर करत आहो. तुम्ही जी माहिती व विचार आम्हाला सांगता त्यामुळे ह्या सफरीला आम्ही—

## काश्मीर कन्हय्या

असें म्हणतो. माझे कांही मित्र मायानंद चैतन्यांच्या संप्रदायाचे आहेत. त्या संप्रदायाबद्दल आम्हाला कृपा करून थोडी माहिती सांगा '

दुसरे लोक म्हणाले—

' साहेब, मायानंद चैतन्यांच्या संप्रदायाबद्दल जरूर सांगा. आम्ही ती माहिती ऐकण्यास फार उत्सुक आहो '

लोकांच्या आग्रहाखातर मी सांगूं लागलो—

ह्या संप्रदायाच्या लोकांना वाटते की—

भगवान् कृष्णानंतर त्याचे खरे तत्त्वज्ञान जर कोणी समजून दिले असेल तर ते भगवान् मायानंद चैतन्य यांनी

विश्व म्हणजे माया होय असें म्हणणाऱ्या लोकांना खरें तत्त्वज्ञान समजले नाही.

कित्येतरी लोकांनी बुवाबाजी करून धर्माच्या नावाखाली व्रतवैकल्याचे व उपासनेचे अवडंबर माजवून समाजाची फसवणूक केली व जनतेला चुकीचा मार्ग दाखवला.

गीतेत जो योग आहे, त्याचे नांव दिव्यदृष्टिचा सर्वांग योग

हा योग प्रथम भगवान् मायानंद चैतन्य यांनी जगाला सांगितला.

दिव्यदृष्टी प्रदान करण्याची पद्धत पूर्वीच्या तत्ववेत्यांना आकलन झाली नव्हती.

कलियुग सुरू होईल व त्या युगात देव अवतार घेईल अशी हिंदु धर्मशास्त्रात भविष्यवाणी आहे. हा देवाचा अवतार म्हणजे भगवान् मायानंद चैतन्य

भगवान् मायानंद ह्यांचा सिद्धांत असा आहे कीं—

कुरूक्षेत्राच्या रणांगणावर श्रीकृष्णाने अर्जुनाला विश्वरूप दर्शन दिले. ही जादू नव्हे किंवा किमया नव्हे किंवा ती दैवी शक्ति नव्हे अगर अतींद्रिय दृष्टी नव्हे. ज्या सामान्य डोळ्यांनी आपण विश्वदर्शन घेतो तीच दृष्टी विश्वदृष्टी होय फरक इतकाच की आपले पाहणे जाणीवपूर्वक नसते.

श्रीकृष्णाने अर्जुनाला इतकाच साक्षात्कार घडवला की आपण जे विश्व पाहतो ते म्हणजे ईश्वराच्या भौतिक पैलूचे प्रतिनिधी—रूप—प्रतीक आहे मंत्रतंत्र-सिद्धीवरील अंधश्रद्धा किंवा योगी सामर्थ्याने दैवी शक्तीचा लाभ होतो असा भोळा भाव विश्वरूपाचे आकलन करण्याच्या मार्गात धोंड आहे. भगवान् मायानंद चैतन्यानी व्यावहारिक प्रयोगाने दिव्य दृष्टि कशी मिळवता येते याचे उत्कृष्ट विवेचन केले व त्यांचे हे विवेचन म्हणजे त्यानी जगाला दिलेली सर्वोत्कृष्ट देणगी होय

आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात इ. सन १९२३ ते १९३४ पर्यंत भगवान् मायानंद चैतन्यानी नर्मदेजवळ मान्धाता ओंकारेश्वर येथे वसती केली होती व तेथूनच त्यानी साऱ्या भारतभर दिव्यदृष्टीच्या तत्वज्ञानाचा प्रसार केला.

भगवान् मायानंदानी आपले अवतार कार्य आटोपल्यावर मान्धातामधील आपल्या आश्रमात १९३४ मध्ये अखेरचा निश्वास सोडला.

विज्ञानशाळा ओंकार मांधाता ह्याचे तृतीय संचालक डॉ. पुं. ह. सत ह्यानी 'गीतोक्त विश्वधर्म' हें पुस्तक लिहून ह्या संप्रदायाच्या तत्वज्ञानावर प्रकाश टाकला आहे'

× × ×

ही माहिती ऐकून एक विद्वान् गृहस्थ म्हणाले—

'शंकराचार्यांपासून योगी अरविंदापर्यंत निरनिराळ्या तत्वज्ञानी लोकानी निरनिराळ्या चष्म्यातून गीतेचे तात्पर्य काढले आहे. भगवान् मायानंदानी आपला निराळा चष्मा लावून गीतेचे तात्पर्य काढले आहे.'

मी म्हटले—

'वामन पंडित काय म्हणतात ते तुम्हाला ठाऊक असेल.'

लोकानी विचारले—

'काय म्हणतात ?'

मी सांगू लागलो—

'वामन पंडित म्हणतात—

घरी आजी भगवंतजी । या कलियुगामाजी ।
जो तो गीतार्थ योजी । मतानुरूप ॥

डॉ. संत ह्यांचे "गीतोक्त विश्वधर्म" हें पुस्तक वाचून वामन पंडितांच्या ह्या उद्‌गारांची साहजिक आठवण होते.

× × ×

चष्माशाही पाहून झाल्यावर बसने आम्ही हरवान पहाण्यास गेलो. हें ठिकाण श्रीनगरपासुन बारा मैल दूर आहे येथे सुंदर सरोवर आहे व उत्कृष्ट बाग आहे. येथील रम्य चिनार वृक्ष पाहून मन प्रसन्न होते या ठिकाणच्या पाण्याच्या साठ्यापासून श्रीनगरला पिण्याचे पाणी पुरवले जाते.

इतिहास असे सांगतो की ह्या ठिकाणी प्राचीन काळी प्रख्यात बौद्ध शिक्षक नागार्जुन राहत असे.

आम्ही हें ठिकाण पहाण्यास गेलो असताना खूप हिंदू मुसलमान तेथे आले होते.

त्या ठिकाणी एका रम्य जागी आम्ही प्रवासी बसलो असताना हिंदुस्थान पाकिस्तानची फाळणी झाल्यानंतर जो रक्तपात झाला त्याबद्दल बोलणे निघाले असताना मी म्हटले—

'किनाऱ्यावर उभे राहून पाण्यात पोहणाऱ्यांना उपदेश करणे सोपे असते. प्रत्यक्ष त्या कठीण प्रसंगात आपण असतो तर आपण कसें वर्तन केलें असते, ह्याचा विचार न करता आपण लांबून उपदेश करत असतो, पण नंतर आपली चूक आपणाला कळून येते.

हा विषय फार रंगला तेव्हा लोकांना मी झालेली एक गोष्ट सांगितली.

हिंदुस्थान पाकिस्तानची फाळणी झाल्यावर पाकिस्तानांत हिंदूंची कत्तल करण्यात आली. खूप बायकांच्यावर अत्याचार करण्यात आले. कितीतरी निर्वासित भारतात आले.

दिल्लीमध्ये निर्वासितांच्या सभेंत पं. जवाहरलाल नेहरुंचे भाषण झाले. त्यांनी निर्वासितांना शांततेचा उपदेश केला. ते म्हणाले—

प्रसंग कितीहि कठीण असला तरी तुम्ही रागावता उपयोगी नाही. कितीदा तरी तुमचे रक्त तापले, तुम्ही हात उगारले, पण तसे न करता शांत रहाणे तुमचे कर्तव्य आहे. कांहीहि झाले तरी क्रोध न करता आपण शांत रहावे ह्यातच आपले कल्याण आहे.

त्यावेळी पं. नेहरुच्या बरोबर इंदिरा गांधी होत्या.

भाषण संपवून पं. नेहरु निघाले असताना एका वृद्ध निर्वासिताने इंदिरा गांधींचा पदर ओढला.

लगेच आरडा ओरडा झाला. लोकांनी त्या वृद्धास मारले प नेहरु देखील रागावले ते त्या वृद्धाच्या अंगावर रागाने धावून गेले व त्यांनी त्याला दणके दिले. त्या वृद्धाने लोकाना शांत रहाणेचा उपदेश केला व मग तो म्हणाला—

"इंदिरा गांधी माझ्या मुलीसारखी आहे तिचा नुसता पदर ओढल्यावर तुमचा राग अनावर झाला व मला मारण्यांत आले. मुसलमानांनी माझ्या मुलींवर आणि सुनांवर माझ्या देखत अत्याचार केला असताना क्रोध न करता शांत रहाणेचा मला तुम्ही उपदेश करता हें बरोबर आहे काय, ह्याचा थोडातरी विचार करा."

त्या वृद्ध गृहस्थाचें तें भाषण ऐकून प. नेहरुना आपली चूक समजून आली व इंदिरा गांधीना वाटले की—

ह्या वृद्ध गृहस्थाचे भाषण म्हणजे आपल्या डोळयात घातलेले अंजन आहे

× × ×

लोक मला म्हणाले—

"साहेब, तुमची ही गोष्ट फार फार मार्मिक आहे."

× × ×

हरवान पाहून झाल्यावर आम्ही बसने शालिमार बाग पहाणेस गेलो

ही बाग श्रीनगरपासून १८ किलोमिटर अंतरावर आहे. जहांगीर व नूरजहान ह्यांच्या प्रेमाचें प्रतीक म्हणजे ही बाग. जहांगीरने इ. स. १६१९ मध्ये ही बाग तयार करवली.

५९० वार लांब व २०० वार रुंद असणारी ही बाग सुंदर आहे.

ह्या बागेमध्ये एकावर एक असे चार मजले आहेत व मधून पाणी खेळवले आहे. पाण्याभोवती गुळगुळीत दगड आहेत.

असें सांगतात की संत नुरुद्दीनला ही जागा पहाणेस बोलावले असता तो म्हणाला— इतकी सुंदर जागा मी पाहिली तर मेल्यानंतर स्वर्ग पहाणेची मला इच्छा होणार नाही

गणेश,

देवाच्या मंदिरासाठी खांब उभारलेले असतात, पण नेवाश्याला ज्या खांबाला टेकून ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी सांगितली त्या खांबासाठी मंदिर उभारले आहे. ते मंदिर पाहिल्यावर वाटते की मंदिरासाठी खांब नसून खांबासाठी मंदिर आहे.

जहांगीर व नूरजहान ह्यांच्या प्रेमाचे स्मारक म्हणून ही बाग तयार करण्यात आली.

या सुंदर बागेत तरुण व तरुणी ह्यांचे प्रेम फुलते व प्रेमाचा परिपाक विवाहात होतो. जहांगीर व नूरजहान ह्यांचे प्रेम फुलल्यानंतर मग ही बाग तयार करण्यात आली बागेत प्रेम परिपक्व होते, पण ही बाग पाहिल्यावर वाटते की परिपक्व प्रेमाचे स्मारक म्हणून ही बाग तयार करण्यात आली.

असें सांगितले जाते की— तपसी व तापसी ह्यांनी स्त्रीप्रेमापासून दूर असले पाहिजे.

हें म्हणणे बरोबर दिसत नाही. वैदिक वाङ्मयातील ऋषीमुनी व वरनीय व नमनीय, चरित्र व चारित्र्य ह्यांनी नटलेले, तपसी व तापसी— पण ह्यांच्या हृदयांतरी प्रणयपुष्प फुललेले असते.

ऋग्वेदामध्ये उषेचे वर्णन करताना असें म्हटले आहे की—

ही सौंदर्यवती तरुणी प्रेमिकेला भेटणेस जात आहे. यौवनपूर्ण सस्मित मधुर वदनाने लोकांना आकर्षित करणारी ही उषा आपले वक्षस्थल उघडे करून दाखवत आहे

परमार्थात केव्हां केव्हां असें म्हटले जाते की—

स्त्रीचा त्याग केल्याशिवाय परमार्थ साधत नाही.

केव्हा केव्हा परमार्थमार्गी लोक उच्चरवाने सांगतात की—

स्त्री ही परमार्थातील धोंड आहे.

हें मत बरोबर नाही. साक्षात्कारी वैदिक ऋषीमुनींनी स्त्रीप्रेमाचे गोडवे गायिलेले आहेत. वैराग्य आणि नीति ह्यांच्या नावाखाली त्यांनी स्त्रीप्रेमाला आपल्या जीवनातून हद्दपार केले नाही. विश्वाला तारणाऱ्या जगन्मोहिनीच्या रूपात त्यांनी स्त्रीला पाहिले आहे

× × ×

गणेश,

शालिमार बाग पाहून झाल्यावर आम्ही बसने निषाद बाग पहाणेस निघालो. केव्हा केव्हा आपणाला मौल्यवान विचार स्फुरतात. ते त्याचवेळी कां स्फुरले त्याची कारण परंपरा केव्हा केव्हा लागता येत नाही. बस चालू झाल्यावर माझ्या मनात विचारांच्या लाटावर लाटा येऊ लागल्या.

( १ ) पूर्वी मंत्रयुग होते. मग तंत्रयुग सुरु झाले आता यन्त्रयुग सुरु झाले आहे. मंत्रयुग असो, तंत्रयुग असो, यन्त्रयुग असो, माणसाने मी चा शोध केला पाहिजे. मी चा शोध करत आत आत गेले म्हणजे मी ची व देवाची भेट होते. देव देवळांत नाही, मशिदीत नाही अगर चर्चमध्ये नाही, तर तो आपल्या अंतःकरणात आहे ह्या देवाची भेट झाल्यावर अत्यानंदाने आपण म्हणतो—

देवा, तू आणि मी

आता काय करो.

× × ×

( २ ) संस्कृति, सत्ता, संपत्ति व सेवा, ह्या बाबतीत पूर्वी अशी वाटणी करण्यात आली होती की—

संस्कृतीचा मक्ता ब्राह्मणांच्याकडे,

सत्तेचा मक्ता क्षत्रियांच्याकडे,

संपत्तीचा मक्ता वैश्यांच्याकडे,

व

सेवेचा मक्ता शूद्रांकडे

आता ह्या वाटणीला रामराम ठोकला पाहिजे. आपण कोणते काम करणेचे ते जन्मावरून न ठरता गुणकर्मावरून ठरले पाहिजे

× × ×

( ३ ) देवाच्या दरबारांत आपण सम्राट होण्याची इच्छा न करता, सेवक होण्याची इच्छा करावी नेताजी सुभाषचंद्र ह्यांनी आझाद हिंद फौजेची स्थापना परदेशात केल्यावर, एक मनुष्य नेताजीच्या मातोश्रीला भेटण्यास गेला. कलकत्यामध्ये राहत असलेली ही माता आसन्नमरण अवस्थेत होती.

त्या मनुष्याने त्या मातेला नमस्कार केला व सम्राटाची राजमाता म्हणून तिचा गौरव केला. तो उल्लेख ऐकून ती माता लगेच उसळून म्हणाली—

"पुन्हा असली भाषा करु नकोस. माझा सुभाष भारताचा सम्राट व्हावा असे मला कधीच वाटत नाही. माझा सुभाष भारताचा सम्राट न होता सदा भारताचा सेवक राहावा हीच माझी परमेश्वराच्या चरणी पुन. पुनः प्रार्थना आहे "

× × ×

( ४ ) नम्र होणे म्हणजे शेळपट होणे नव्हे. शांत रहाणे म्हणजे अपमान सहन करणे नव्हे. जर एकाद्याने आपली विनाकारण खोडी काढली तर शांतपणे प्रतिखोडी काढण्यास हरकत नाही. डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी ह्यांचे वडील बाबू अशुतोष मुकर्जी गीता सांगणाऱ्या कृष्णाचे भक्त होते.

त्याचा काल म्हणजे भारताच्या पारतंत्र्याचा काल. इंग्रजांना आपण भारतीयांपेक्षा पराकाष्ठेचे श्रेष्ठ आम्ही असा अहंकार वाटत असे. एकदा बाबू अशुतोष हावडा एक्स्प्रेसच्या पहिल्या वर्गात शिरले. त्या डब्यात एक इंग्रज अधिकारी बसला होता. दोघांशिवाय त्या डब्यात कोणीच नव्हते.

अशुतोष ह्यांनी आपले बूट काढून ठेवले व बसल्या बसल्या मागे टेकून त्यांनी डोळे मिटले त्या इंग्रज गृहस्थाने हळूच अशुतोष ह्यांचे बूट उचलले व गाडीबाहेर फेकून दिले.

अशुतोष डोळे उघडून पहातात तो बूट नाहीत ते शांत राहिले. थोड्या वेळाने तो इंग्रज अधिकारी संडासांत गेला. अशुतोष ह्यांनी त्याची हॅट उचलली व गाडी बाहेर फेकून दिली.

बाहेर आल्यावर त्या इंग्रज अधिकाऱ्याने दरडावून विचारले—

Where is my hat ? ( माझी हॅट कोठे आहे ? )

अशुतोष बाबूंनी शांतपणे उत्तर दिले—

It has gone to meet my shoes. ( ती माझ्या बुटांना भेटायला गेली आहे. )

त्या इंग्रज अधिकाऱ्याचा चेहरा फोटो काढण्यासारखा झाला

× × ×

(५) तत्वज्ञान आणि व्यवहार ह्या सवती सवती न होता मायलेकी व्हावयास पाहिजेत.

× × ×

(६) साहसाला संयमाची, विक्रमाला विवेकाची व विजयाला विनयाची जोड पाहिजे.

× × ×

(७) माणसाला मत जरूर पाहिजे, पण मत व हित ह्यांत वाद अथवा विवाद नसून संवाद असायला पाहिजे.

× × ×

नंतर आम्ही निषाद बागेत आलो. ह्या बागेला Garden of bliss म्हणतात.

ह्याची माहिती तुला पूर्वीच्या एका पत्रांत दिली आहे. ह्या बागेत आम्ही बसलो असताना एक पंडित म्हणाला—

" महाभारताच्या आदिपर्वात—

जयो नाम इतिहासोऽयम् ।

असे म्हटले आहे. कौरव-पांडवांचे युद्ध झाल्यावर व्यासांनी जय नावाचा इतिहास लिहिला. ( Hisrory of Victory ) पण मग नंतर त्यात बरीच भर घालण्यात आली. पंडितांना वाटते की—

द्रौपदीवस्त्रहरण, उपरंभ—असले प्रसंग मागाहून घालण्यात आले. ते प्रसंग मूळच्या व्यासांच्या जय-भारतात नव्हते. मला एक शंका आहे—

धृतराष्ट्राला शंभर मुलगे होते असें म्हटले आहे ते बरोबर दिसत नाही. तुम्हाला काय वाटते ? जरा सविस्तर सांगा. "

मी सांगू लागलो—

'मला वाटते धृतराष्ट्राला गांधारीपासून दहा मुलगे झाले.

आदिपर्वात म्हटले आहे—

तथा पुत्रशतं जज्ञे धृतराष्ट्रस्य धीमतः ।

दुर्योधनप्रभृतय युयुत्सुः करणस्तथा ॥

मला वाटते—

व्यासानी

पुत्र दश

असे लिहिले असावे, पण मग जय ग्रंथाचे जेव्हा महाभारत झाले तेव्हा दशं चे शतं केले गेले असावे.

कारण वरील श्लोकानंतर पुढल्या दोन श्लोकात दहा पुत्रांची नावे देऊन मग वैश्यापुत्र युयुत्सु ह्याचे नांव दिले आहे ते दोन श्लोक असे—

ततो दुःशासनश्चैव दुःसहश्चापि भारत ।
दुर्मर्षणो विकर्णश्च चित्रसेनो विविंशतिः ॥
जय सत्यव्रतश्चैव पुरुमित्रश्च भारत ।
वैश्यापुत्रो युयुत्सुश्च एकादश महारथा ॥

ह्यावरून असे दिसते की—

धृतराष्ट्राला—

( १ ) दुर्योधन ( २ ) दुःशासन ( ३ ) दुःसह ( ४ ) दुर्मर्षण ( ५ ) विकर्ण ( ६ ) चित्रसेन ( ७ ) विविंशति ( ८ ) जय ( ९ ) सत्यव्रत व ( १० ) पुरुमित्र–असे दहा मुलगे होते व युयुत्सु हा अकरावा मुलगा त्याचा वैश्यापुत्र होता.

महाभारतामध्ये भीमाच्या ज्या क्रीडा वर्णन करण्यात आल्या आहेत त्यामध्ये तो धृतराष्ट्राच्या दहा मुलाना भारी होता असे वर्णन आहे.

भीमाचा पराक्रम वर्णन करताना म्हटले आहे—

दशबालान् जले क्रीडन् भुजाभ्यां परिगृह्य स

ह्या वरून असे दिसते की—

व्यासांनी जेव्हा जयग्रंथ लिहिला तेव्हा धृतराष्ट्राला दहा मुलगे होते व युयुत्सु हा त्याचा अकरावा मुलगा वैश्यापुत्र होता असे लिहिले, पण नतर जयाचे महाभारत होताना पुष्कळ कपोलकल्पित भाग घालण्यात आला व धृतराष्ट्राला शभर मुलगे होते असे लिहिण्यात आले.

जमलेले लोक म्हणाले—

‘ साहेब, हा तुमचा विचार नितांत विचारणीय आहे ’

नंतर एका माणसानें मला विचारले—

‘ साहेब, रामदासाचा गीता फार प्रिय होती असे असताना ते जातीवादी कसे झाले ? त्यांनी ब्राह्मणांना फार मान कां दिला ? ब्राह्मणाचे ब्रह्म सोवळे व शूद्रांचे ब्रह्म ओवळे असा प्रकार असू शकतो का ? जे देवभक्त झाले मग ते कोणत्या का जातीचे असेनात त्यांच्या चरणाची माती देखील वंदनीय नाही कां ? देवाला कोणती जात आहे ? अशा परिस्थितीत मला वाटते– समर्थ रामदासाचा जातीयवाद समर्थनीय नाही ’

मी सांगू लागलो—

‘ खोल अभ्यास केला म्हणजे असे दिसते की समर्थ जातीयवादी नाहीत. त्यांनी ब्राह्मणाची व्याख्या केली आहे. ते म्हणतात—

करितो ब्रह्म निरूपण । जाणती ब्रह्म संपूर्ण ।
तेचि जाणावे ब्राह्मण ।

असे ब्राह्मण—जन्माने ब्राह्मण नव्हे तर हे गुण ज्यांच्याजवळ आहेत असे ब्राह्मण म्हणजे समर्थांच्या भाषेत—

ब्राह्मण वेद मूर्तिमंत । ब्राह्मण तेचि भगवंत ।

हे खरे आहे की—

ब्राह्मणाचे ब्रह्म सोवळे व शूद्राचे ब्रह्म ओवळे असा प्रकार असत नाही, म्हणूनच समर्थ म्हणतात—

ब्राह्मणाचे ब्रह्म ते सोवळे । शूद्राचे ते ओवळे ।
ऐसे वेगळे आगळे । असेचिना ॥

जे देवभक्त झाले– मग ते कोणत्या का जातीचे असेनात– त्यांच्या चरणाची माती देखील निश्चित वंदनीय आहे. म्हणूनच समर्थ म्हणतात—

रामी भिनले ते असो नीचयाती ।
त्यांच्या चरणाची वंदीन माती ॥

देवाला जात नाही हें तुमचे म्हणणे खरे आहे. समर्थ म्हणतात—

अनाथांचा नाथ रे । त्याला कैंची जात रे ॥

हे आधार पहा. नीट सखोल अभ्यास करा. म्हणजे तुम्हाला समजेल की— समर्थ जातीयवादी नाहीत."

प्रश्न विचारणारे गृहस्थ म्हणाले—

"साहेब, तुम्ही फार मोठा प्रकाश टाकला. फारसा सखोल अभ्यास न करता समर्थांना लोक जातीयवादी म्हणतात ते बरोबर नाहीं"

× × ×

गणेश,

नंतर आम्ही बसने लालारुख हॉटेलमध्ये आलो रात्री जेवण झाल्यावर आम्ही गच्चीवर गप्पा मारत बसलो कांही वयस्कर पाहुणे आले होते. वृद्धपणी रामाने शरयूत उडी टाकून जगाचा निरोप घेतला. यादवीनंतर बळराम व कृष्ण यानी झाडाखाली बसून प्राणांचा निरोध करून जगाचा निरोप घेतला लोक म्हणाले—

'आत्महत्या— ही वाईट मानता कामा नये'

लोकानी मला खूप प्रश्न विचारले. प्रश्नोत्तराचा थोडक्यात सारांश असा—

प्रश्न.— केव्हा केव्हा म्हाताऱ्या लोकाना जीवन असह्य होते. जीवन संपवून टाकण्याकरता डॉक्टरानी त्याना औषध देणेस काय हरकत आहे? म्हाताऱ्या लोकाना जीवन असह्य झाले तर त्याच्या संमतीने डॉक्टराना त्याना जीवनातून सुटका करण्याचा कायदेशीर अधिकार असला पाहिजे. तुम्हाला काय वाटत'

उत्तर — असा कायदा जगात कोठे नाही, पण अमेरिकेत नुकतीच वृद्धाची परिषद झाली त्यावेळी ह्या प्रश्नाचा विचार करण्यात आला.

प्रश्न — फार छान. त्या परिषदेत जे विचार मांडण्यांत आले ते लक्ष्यात घेऊन तुम्ही आपले विचार सविस्तर सांगा.

उत्तर — इंडियन पीनल कोडमध्ये असे एकच कलम आहे की ज्यामध्ये प्रत्यक्ष कृत्याला शिक्षा नाही, पण प्रयत्नाला शिक्षा आहे. ते कलम म्हणजे आत्महत्येचा प्रयत्न. आत्महत्या केली तर शिक्षा कोणास देणार? पण

×

आत्महत्येचा प्रयत्न केला तर मात्र कायदा शिक्षा देतो कायद्याची समजूत अशी आहे की माणसाला आत्महत्या करण्याचा अधिकार नाही. ही समजूत कितपत बरोबर आहे हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

ज्ञानेश्वरांनी जाहीर करून वाजत गाजत जिवत समाधी घेतली. आजचा कायदा त्यावेळी असता तर समाधी घेण्यापूर्वी पोलिसानी त्याना पकडून नेले असते. पूज्य साने गुरुजीनी आत्महत्या केली. न्यायमूर्ति बावडेकरानीं आत्म-हत्या केली. त्यांचा प्रयत्न फसला असता तर कोर्टात आरोपी म्हणून उभे राहण्याची त्यांच्यावर पाळी आली असती व आत्महत्येच्या प्रयत्नाबद्दल त्याना शिक्षा झाली असती.

अमेरिकेत आता असा विचार सुरु झाला आहे कीं माणसाला ज्याप्रमाणे जगण्याचा अधिकार आहे त्याप्रमाणे मरणाचा देखील अधिकार आहे.

हा अधिकार एकदा मान्य केला म्हणजे आत्महत्येच्या प्रयत्नाबद्दल शिक्षा देता येणार नाही

मला वाटते आत्महत्येच्या प्रयत्नाबद्दल शिक्षा देणारे कलम कायद्याच्या पुस्तकातून काढून टाकले पाहिजे.

न्यायमूर्ति बावडेकरांच्यासारखा सज्जन न्यायाधीश फार विरळा असतो साने गुरुजी म्हणजे महान् संत. अशा संताना नि सज्जनाना आत्महत्येचा प्रयत्न फसल्यानंतर शिक्षा देणे कितपत योग्य आहे ?

प्रश्नः— अजिबात योग्य नाहीं. अमेरिकेत काय विचार सुरु आहे ?

उत्तर.— तो विचार असा—

माणसाला सुखानें जगण्याचा अधिकार आहे, त्याचप्रमाणे त्याला सुखानें मरण्याचा अधिकार असला पाहिजे आपली इस्टेट आपल्या इच्छेप्रमाणे कुणालाहि देण्याचा माणसाला अधिकार आहे. आपले शरीर माणसाची इस्टेट आहे माणसाला आपल्या इच्छेप्रमाणे आपल्या इस्टेटीची विल्हेवाट लावता येते, त्याचप्रमाणे माणसाला आपल्या इच्छेप्रमाणे आपल्या शरीराची विल्हेवाट लावण्याचा अधिकार का नसावा ? एकादा मनुष्य दुर्धर रोगानें आजारी आहे. त्याला मनापासून वाटते की आपणाला मरण यावे. त्याला डॉक्टराला सांगता आले पाहिजे की—

मला सुखानें मरण येईल असे औषध द्या.

आज कायदा डॉक्टराना असें करू देत नाहीं. डॉक्टरानें पेशंटवर दया म्हणून जरी मरणाचे औषध दिले तरी कायद्याप्रमाणे तो महान् गुन्हेगार ठरतो.

असे कां ? हा कायदा जरुर बदलला पाहिजे

जीवनाचे पावित्र्य ' ह्या गोंडस नांवाखाली अशा तऱ्हेचा अधिकार देण्यात येत नाही ज्या समाजाला युद्धामध्ये तरुण माणसे मेलेली चालतात त्याच समाजाने जगायची बिलकूल इच्छा नसलेल्या म्हाताऱ्या माणसाला स्वेच्छेने मरण्याचा अधिकार का देऊ नये ? डॉक्टराने Malevolent killing करु नये, पण त्याने Merciful killing केले तर कायदा का आड यावा ?

रुथ रसेल म्हणतो--

One of the most potent fears of the aged is that they may be subjected to a lingering painful death, causing an over-whelming burden and grief to their beloved ones. If a person longs for the relief which only death can provide, why should he not be permitted to choose to have the assistance of a physician in mercifully terminating his life? A doctor cannot lawfully grant such a request today. Should not new legislation be enacted that would permit a qualified physician to grant his patient's request for termination of his life ?

प्रश्न-- हा विचार नितांत विचारणीय आहे पण आपल्या देशाचे राष्ट्रपिता म गांधी आहेत. आपण अहिंसेचे भोक्ते आहो. Merciful Killing चा क्रांतिकारी विचार म. गांधींच्या अनुयायाना कसा पटेल ?

उत्तर-- एकदा आश्रमात गाय तडफडत होती. म. गांधीना गाईचे तें दुःख पहावेना. त्याना वाटले-- अहिंसावादी गांधीना वाटले की-- Merciful killing हाच खरा उपाय आहे. त्यानी डॉक्टराच्या सहाय्याने गाईचे जीवन संपवले व तिला दुःखातून मुक्त केले.

त्यावेळी ह्या कृत्याबद्दल खूप बभ्रा झाला; पण अहिंसेच्या चष्म्यातून पहाणाऱ्या म. गांधींना वाटले की—

मी केले तें बरोबर केले.

म. गांधींच्या ह्या मताबद्दल त्यावेळी बरीच उलट सुलट चर्चा झाली. एक गमतीची गोष्ट आहे. अशी उलट सुलट चर्चा सुरु असताना एक तत्वज्ञ म्हणाला—

" एकदा एक मुलगा– छोटा मुलगा– आपल्या आईला म्हणाला—

आई, बाबा मला लायन्स क्लब दाखवायला घेऊन गेले, पण त्यांनी मला एकहि लायन दाखवला नाही. सारी माणसेच दाखवली. "

ही गोष्ट सांगून तो तत्वज्ञ म्हणाला—

" त्या छोट्या मुलाला लायन्स क्लबचा खरा अर्थ कळला नाही म्हणून तो तसे बोलला. अहिंसेचा खरा अर्थ न कळल्यामुळे काहीं लोक म. गांधींच्या विरुद्ध बोलतात. ज्यांना अहिंसेचा खरा अर्थ कळला आहे, त्यांना म. गांधींचे कृत्य बरोबर वाटेल व त्यांना हें समजून येईल की अहिंसेला Merciful Killing मान्य आहे. "

प्रश्न– छान. आपण खूप चांगली माहिती दिली. आभार. नमस्ते.

उत्तर– नमस्ते.

× × ×

गणेश,

उद्या आम्ही घोड्यावरून खूप उंच जाणार आहो, बर्फावरून घसरणार आहो

पुढचे पत्र मग—

तुझा

राम

# पत्र ९ वे

प्रिय गणेश,

आज खिलनमर्गला जाऊन बर्फावरून घसरणेचा कार्यक्रम असल्यामुळे सारे लोक लहान मुलांच्या उत्साहाने भारून गेले होते.

सकाळी ब्रेकफास्टच्या वेळी प्रवासी हॉलमध्ये जमा झाले असताना खोट्या समजुतीबद्दल बोलणे निघाले.

काश्मीरचे काही लोक फार मागासलेले आहेत, व त्यांच्या मनावर खोट्या समजुतींचा पगडा आहे हें खरे आहे

मी म्हटले—

"अहो, काश्मीर सोडून उरलेल्या भारतात देखील कांही कांही लोक कमालीचे मागासलेले आहेत, व त्यांच्या मनावर खोट्या समजुतींचा जबरदस्त पगडा आहे"

बोलता बोलता लोकांना मी ग्रामीण भागाची एक कथा सांगितली.

एका गावात एका धरणाचे उद्घाटन करण्याकरता पंडित जवाहरलाल नेहरु गेले होते.

पंडित नेहरु म्हणाले—

"लोकहो, तुम्ही आपल्या देशाकरता महान् कार्य करत आहा. कामगारांच्या श्रमामुळेच हें धरण तयार झाले आहे. मला वाटते– ह्या

धरणाचे मी उद्घाटन करण्यापेक्षा ज्या कामगाराने जास्त दिवस काम केले आहे त्याच्या हातून ह्या धरणाचे उद्घाटन होणे योग्य आहे ''

लगेच खूप दिवस काम करणाऱ्या एका स्त्रीला बोलावण्यात आले. तिने फीत कापली. पंडित नेहरूनी स्वतः तिच्या गळ्यात हार घालून तिचा खूप मोठा सत्कार केला. टाळ्याचा प्रचंड कडकडाट झाला. दुसऱ्या दिवशी पेपरमध्ये जिकडे, तिकडे नेहरूसमवेत त्या स्त्रीचे फोटो प्रसिद्ध झाले. लोकाना वाटले— त्या स्त्रीचे भाग्य फार थोर आहे म्हणून हा महान मान तिला मिळाला.

पण नंतर काय झाले ? त्या खेडवळ स्त्रीला तिच्या जमातीने बहिष्कृत केले. कारण काय ? तर तिला परक्या पुरुषाचा स्पर्श झाला होता तिच्या नवऱ्याने तिला टाकून दिले. कारण काय ? तर परक्या पुरुषाने तिच्या गळ्यात हार घातला होता.

आज ती स्त्री जिवत आहे. फार म्हातारी झाली आहे, आणि परित्यक्त अवस्थेत दारोदारी भीक मागून उदरनिर्वाह करते आहे.

ही हकिकत ऐकून लोक म्हणाले—

' हसयाला जाऊन भिडणारी ही गोष्ट आहे. कोत्या समजुतीचा राक्षस काय करेल ह्याचा नियम नाही. '

अल्पोपहार झाल्यावर आम्ही आपापल्या खोलीकडे जात असताना एक गृहस्थ मला म्हणाले—

' साहेब, प्रपचात नानातऱ्हेच्या कमतरता असतात. त्या बाबतीत मला एकादे सुंदर वाक्य सांगा की ज्या वाक्याचा माझ्या जीवनात फार उपयोग होईल. '

मी म्हटले—

' तें वाक्य असें—

प्रपंच जरी असे फाटका, तरी परमार्थाने होतसे नेटका '

त्या गृहस्थाने लगेच ते वाक्य आपल्या डायरीत टिपून घेतले.

बस येण्यास थोडा अवकाश होता आम्ही सारे लोक बसची वाट पहात उभे होतो. एक गृहस्थ म्हणाले—

'काश्मीर म्हणजे साक्षात् स्वर्ग आहे आपण दरसाल काश्मीरची वारी करणार '

दुसरे गृहस्थ म्हणाले—

'म्हणजे तुम्ही वारकरी होणार.

लगेच वारकरी पंथाबद्दल लोकांनी मला प्रश्न विचारले—

प्रश्न :– साहेब, वारकरी पंथाबद्दल आम्हाला खरीखुरी माहिती सांगा

उत्तर – वारकरी पंथ हा वैदिक धर्मांतरगत एक महान पंथ आहे. वारकरी हा वारीकरी शब्दाचा अपभ्रंश आहे.

ज्ञानेश्वर म्हणतात—

काया वाचा मने जीवे सर्वस्वे उदार ।
बाप रखुमादेवीवरा विठ्ठलाचा वारीकर ॥

वर्षांतून आषाढी कार्तिकी, माघी अथवा चैत्री शुद्ध एकादशीस नियमाने जो पंढरपुरास जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेतो व जो गळ्यात तुळशीची माळ घालतो त्याला वारकरी म्हणतात.

प्रश्न '– गळ्यात तुळशीची माळ कां घालतात ?

उत्तर – वारकरी हा विठ्ठलाचा उपासक आहे विठ्ठल हे कृष्णाचे रूप आहे. कृष्णास तुळस फार प्रिय, म्हणून आपल्या उपास्य देवतेवरील प्रेमाचे निदर्शक म्हणून वारकरी गळ्यात तुळशीची माळ घालतो. शैव रुद्राक्षाची माळ धारण करतात, गाणपत्य पोवळ्याची माळ धारण करतात, तर वारकरी तुळशीची माळ धारण करतात. शैव गाणपत्य हे माळ घालतात पण पुष्कळ वेळा ते ती काढून ठेवतात. पण वारकरी तुळशीची माळ घालतात ती केव्हाहि काढणेची नसते.

प्रश्न – वारकरी पंथाचा पाया ज्ञानेश्वरांनी घातला असें म्हणतात ते कितपत बरोबर आहे ?

उत्तर – बहिणाबाईचा एक प्रख्यात अभंग आहे. त्यांत म्हटले आहे—

ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ॥

ह्यावरून लोकांची अशी समजूत आहे की—

वारकरी पंथाचा पाया ज्ञानेश्वरांनी घातला, परंतु असे दिसते की—

ज्ञानेश्वरांच्या पूर्वीपासुन हा पंथ प्रचलित होता. ज्ञानेश्वराचा जन्म होण्यापूर्वी नामदेवानी विठ्ठलपंतांचे जे चरित्र दिले आहे त्यात त्यांनी म्हटले आहे—

पंढरीची वारी आषाढी कार्तिकी ।
विठ्ठल एकाएकी कुळरूप ॥

प्रश्न .– वारकरी लोकांचे उपास्य दैवत विठ्ठल त्याबद्दल नामदेव म्हणतात—

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा ।

हा विठोबा अठ्ठावीस युगे विटेवर उभा आहे का ?

उत्तर :– पुंडलिकाचे भेटीसाठी देव आला तेव्हा पुंडलिक आईबापाची सेवा करत होता त्याने देवासाठी वीट दिली व त्यावर देव उभा राहिला, अशी आख्यायिका आहे. ह्या आख्यायिकेच्या आधारावर नामदेवांनी वरील विधान केले आहे. ज्ञानेश्वरांच्या अगोदर होऊन गेलेला पुंडलिक हा या युगातील एक महान संत होता.

आपल्या कालगणनेप्रमाणे—

वर्तमानो वैवस्वतमनु सप्तम ।
तत्र सप्तविंशति महायुगानि गतानि ।
वर्तमानप्राप्ता विंशतितम महायुगम् ॥

चालु असलेले वैवस्वत मन्वंतर सातवे आहे. ह्या मन्वंतरातील २७ महायुगे होऊन गेली व अठ्ठाविसावे महायुग चालू आहे.

नामदेवानी 'युगे अठ्ठाविस' हा शब्दप्रयोग अठ्ठाविसाव्या युगी ह्या अर्थी केला आहे

प्रश्न – वारकरी पंथात निरनिराळ्या जातीचे संत होऊन गेले हे खरे आहे काय ?

उत्तर – खरे आहे. ज्ञानेश्वरकालीन संत जरी घेतले तरी त्यामध्ये निरनिराळ्या जातीचे वारकरी संत आहेत. निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, चांगदेव,

नामदेव, नरहरी सोनार, सांवता माळी, गोरा कुंभार, चोखामेळा महार, रोहिदास चांभार ही नांवे पाहिली म्हणजे तुम्हाला योग्य ते उत्तर मिळेल

विशेष लक्ष्यात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे मुक्ताबाई व जनाबाई अशा स्त्रियादेखील संतमंडळीत शोभत होत्या.

प्रश्न :– वारकरी पंथास फक्त कृष्ण मान्य आहे ह्या पंथाला राम, दत्त, शिव ही दैवते मान्य नाहीत असे म्हणतात ते कितपत बरोबर आहे ?

उत्तर :– हे म्हणणे बरोबर नाही वारकरी पंथात चार संप्रदाय आहेत.

(१) चैतन्य संप्रदाय– या संप्रदायात 'राम कृष्ण हरि' व ॐ नमो भगवते वासुदेवाय' असे दोन मंत्र आहेत.

(२) स्वरूप संप्रदाय– या संप्रदायात 'श्रीराम जय राम जय जय राम' हा मंत्र आहे

(३) आनंद संप्रदाय– या संप्रदायात 'श्रीराम' अथवा 'राम' असा मंत्र आहे.

(४) प्रकाश संप्रदाय– ह्या संप्रदायात 'ॐ नमो नारायणाय' असा मंत्र आहे

राम शिव दत्त इत्यादि दैवतांची उपासना करणारे उपासक वारकरी पंथात आहेत. एकनाथ महाराज हे दत्त परंपरेतील होत. त्यांनी दत्ताप्रमाणेच कृष्णाच्या व रामाच्या उपासनेचे महत्व गायले आहे. विठोबाने आपल्या मस्तकावर शिवास धारण केले आहे हें लक्षात ठेवण्यासारखे आहे

तुकाराम म्हणतात—

हरिहरा भेद नाही । नका करू वाद ॥

वारकऱ्यांना एकादशी जितकी प्रिय तितकाच सोमवार प्रिय. तुकाराम म्हणतात—

व्रत करा एकादशी सोमवार ।

प्रश्न :– सगुण निर्गुण ह्याबद्दल परमार्थात तंटा आहे. वारकरी लोकांना त्याबद्दल काय वाटते ? परमार्थात ज्ञानाला फार महत्त्व आहे. वारकरी लोक कशाला महत्त्व देतात ?

उत्तर – परमात्मा निर्गुण निराकार आहे हे वारकऱ्यांना मान्य आहे, पण त्याचबरोबर तो सगुण साकार आहे असे त्यांना वाटते
ज्ञानेश्वर म्हणतात

बापरखुमादेवीवरु सगुण निर्गुण ।
रुप विटेवरी दाविली खूण ॥

तुकाराम म्हणतात—

दोन्ही टिपरी एकचि नाद ।
सगुण निर्गुण नाही भेद रे ।

ज्ञान व भक्ति ह्यामध्ये तंटा असण्याचे कारण नाही असे वारकऱ्यांना वाटते. उलट त्यांची अशी समजूत आहे की—

भक्तीमुळे ज्ञान प्राप्त होते. भक्ति हे मूळ आहे व ज्ञान हें फळ आहे. या बाबतीत एकनाथ महाराजानी जे म्हटले आहे ते नितांत महत्त्वाचे आहे. ते म्हणतात—

भक्तीचे उदरी जन्मले ज्ञान ।
भक्ति ते मूळ ज्ञान ते फळ ।
भक्तिविण ज्ञान गिवसिती वेडे ।
मूळ नाही तेथे फळ केवि जोडे ॥

भक्तिमार्गात एक मोठे पथ्य पाळणेचे असते त्याबद्दल तुकाराम म्हणतात—

परद्रव्य परनारी । ह्यांचा धरी विटाळ ॥

× × ×

इतक्यात बसेस आल्या व आम्ही सारे प्रवासी त्यात बसलो.

बसमधून प्रवास करून आम्ही टनमर्ग येथे आलो हें ठिकाण श्रीनगरपासून २६ मैल अंतरावर आहे येथे अल्पोपहार झाल्यावर आम्ही घोड्यावर स्वार झालो

टनमर्ग येथे घोडे भाड्याने मिळतात. मी व सौभाग्यवती वेगवेगळ्या घोड्यावर बसलो व गुलमर्गला निघालो. गुलमर्ग येथून तीन मैल उंचावर आहे

सारे प्रवासी वेगवेगळ्या घोड्यावर बसले होते. घोडेवाला घोड्याजवळून चालत होता चढण कठीण होती. आपण घोड्यावरून पडू का अशी केव्हा केव्हा भीति वाटे, पण ती क्षणभरच दुसऱ्याच क्षणी ती भीति नाहीशी होई.

लहान मुलाना घोड्यावर बसायला फार आवडते. आम्ही दोघे वृद्ध होतो, पण वृद्धपण म्हणजे नवीन बालपणच असते. घोड्यावर बसून उंच उंच चढण चढताना आम्हाला आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या

घोड्यावरून आम्ही तीन मैलावर गुलमर्ग येथे आलो. जगामध्ये जी स्थाने सौंदर्याच्या बाबतीत फार प्रसिद्ध आहेत त्यामध्ये गुलमर्गचा नंबर लागतो. आम्ही घोड्यावरून उतरलो व त्या जागेचा सौंदर्याचा खजिना पाहून तृप्त झालो.

ह्या ठिकाणी फराळपानाचा कार्यक्रम होता.

आम्ही सारे लोक एका ठिकाणी गप्पा मारत बसलो होतो. लोक मला म्हणाले—

' साहेब, गीता व कृष्ण तुम्हाला फार प्रिय तुम्ही नेहमी म्हणता—

गीता माता पिता कृष्ण । वंदे त्यांना सदा मुदा ॥

आपण खूप उंचावर आलो आहो. समुद्रसपाटीपासुन हे ठिकाण ८५०० फुटावर आहे आज तुम्ही आम्हाला तुम्ही चालवलेल्या एकाद्या फौजदारी कज्याची हकिकत सांगा. तो सेशन्स कज्जा असावा, पण त्यांतील अनुभव हृदयाला जाऊन भिडावा. '

मी सांगू लागलो—

' ऐका. त्यावेळी मी रत्नागिरीला सेशन्स जज्ज म्हणून काम करत होतो. माझ्यापुढे पहिलाच जो सेशन्स कज्जा झाला त्याचे नाव— चाफाखून कज्जा.

एक तरुण खोत व कुळे ह्यांचा तटा होता. कुळ कायदा सुरु झाला होता. भांडण विकोपाला गेले होते

एका रात्री आठ वाजता तो तरुण खोत जेवणेस बसणार होता, इतक्यात बाहेर कांही कुळे आली व त्यांनी पाणी मागितले लगेच तो खोत गूळपाणी घेऊन बाहेर आला, पण त्या नराधमानी त्याला सुऱ्यानी ठार मारले.

त्याची तरुण बायको ओरडत आली पण त्या दुष्टांनी तिलाहि सुऱ्यांनीं ठार मारले.

माझ्यापुढे जो पोस्ट मॉर्टेमचा रिपोर्ट ( मरणोत्तर तपासणीचा रिपोर्ट ) आला त्यावरून असे दिसून आले की त्या तरुणीच्या अंगावर एक नाही, दोन नाही, तीन नाही, चार नाही तर बत्तीस सुऱ्यांचे वार होते ! !

त्या खोताची म्हातारी आई घरात होती, पण त्या नरपशूंनी तिला देखील सुऱ्यांनी ठार मारले.

त्या खोताचा एक गडी होता, त्याचा देखील सुऱ्यांनी खून करण्यात आला।

त्या खोताची एक मुलगी होती, तिचाहि सुऱ्यांनी खून करण्यात आला.

हा कज्जा ऐकण्यास खूप लोक – बायका पुरुष – कोर्टात जमत असत. एक प्रकार असा होता की तो प्रकार ऐकताना साऱ्यांच्या डोळ्यांना पाणी येत असे माझे डोळे सुद्धा ओले होत. तो प्रकार असा—

त्यावेळी त्या तरुण खोताचा सहा महिन्यांचा मुलगा पाळण्यात झोपला होता. ते दुष्ट लोक पाळण्याजवळ गेले व त्या लहान बालकाला सुऱ्यांनी भोसकून त्यांनी त्यालाही ठार मारले ! !

माझ्यापुढे कज्जा सुरु झाला. माणुसकीचा खून करणाऱ्या राक्षसी आरोपींवर सारा समाज चिडला होता. कज्या ऐकण्यास खूप स्त्री पुरुष कोर्टात येत. ते सारे लोक आरोपींकडे हाताच्या मुठी वळवून डोळे लाल करून पहात. आरोपींच्याकडे पहाताना त्यांचा क्रोधाग्नि भडकत असे.

मी कृष्णाला नमस्कार केला. गीतेला वंदन केले व संदेश मागितला। गीता माऊली मला म्हणाली—

“ तू आपले कर्तव्य कर. कर्तव्य करताना कोणावरहि रागावू नकोस कोणाचाहि द्वेष करू नकोस. कसाई कापतो व डॉक्टरहि कापतो, पण शस्त्रधारी कसाई क्रूर असतो, तर शस्त्रधारी डॉक्टर कृपाळू असतो. फाशीची शिक्षा देणारी तुझी लेखणी गाय कापणाऱ्या कसायाचे शस्त्र होता कामा नये, तर ऑपरेशन करणाऱ्या डॉक्टराचे शस्त्र झाले पाहिजे. ”

गीता माऊलीचा उपदेश हृदयात साठवून व कृष्णाला नमस्कार करून मी कज्जा चालवला. आरोपींना जितकी सवलत देता येईल तितकी मी त्यांना दिली. त्याबद्दल आरोपीच्या वकिलानी माझे आभार मानले

जास्तीत जास्त सहानुभूतीने मी आरोपीचे म्हणणे ऐकले.

सर्व पुरावा संपल्यावर व दोन्ही बाजूच्या तक्रारी झाल्यावर निकालाची तारीख ठरली. फाशीची शिक्षा देण्याचा प्रसंग आला म्हणजे न्यायाधिशाला एक रात्र झोप येत नाही. ज्या टोकाने फाशीच्या निकालपत्रावर सही करणेची असते ते टोक मोडून टाकावयाचे असते.

निकालाच्या दिवशी कोर्टात स्त्री पुरुषांची अतोनात गर्दी झाली होती. मी कांही आरोपींना फाशी, काहींना जन्मठेप व ज्यांच्याविरुद्ध संशयातीत पुरावा नाही, त्यांना निर्दोषी असा निकाल सांगितला.

निकाल ऐकून जमलेल्या लोकांनी एकदम टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. कोर्टात टाळ्या वाजवणेच्या नसतात, पण लोकांना भान राहिले नाही. जे आरोपी निर्दोषी सुटले होते, त्यांनीं मला नमस्कार केला, पण विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्या आरोपींना मी जन्मठेपेची शिक्षा सांगितली होती त्यानी देखील मला भक्तिभावनेने नमस्कार केला व सर्वांत आश्चर्याची पराकोटी म्हणजे ज्याना मी फाशीची शिक्षा सांगितली होती त्यानी देखील चितांत भक्तिभावनेने मला नमस्कार केला व म्हटले—

'साहेब, आम्ही फाशी जातो, पण त्यापूर्वी तुम्हाला नमस्कार करतो. तुम्हाला देव समजून नमस्कार करतो. आम्हाला आशिर्वाद द्या पुढल्या जन्मी तुमच्या आशिर्वादाने आमची बुद्धि चांगली होवो इतकीच इच्छा !

× × ×

सेशन्स कज्जाची ही हकिकत ऐकून लोक मला म्हणाले—

" साहेब, केव्हा केव्हा कल्पितापेक्षा सत्यच जास्त धक्कादायक असते हेंच खरे. तुमची हकिकत आमच्या हृदयाला जाऊन भिडली. तुमच्या प्रमाणे आम्ही देखील म्हणतो—

गीता माता पिता कृष्ण। वंदे त्यांना सदा कदा।

× × ×

नंतर आम्ही पुन घोड्यावर स्वार झालो व गुलमर्गपासून खिलनमर्गकडे निघालो. हें ठिकाण फार उंचावर आहे गुलमर्गपासून खिलनमर्ग चार मैल दूर आहे. चढण खूप आहे. घोडे सावकाश चालले होते.

मी व सौभाग्यवती बोलण्याच्या अंतरावर होतो आमचे दोघांचे घोडे मिळून चालले होते

ऋषी मुनी हिमालयात तपश्चर्या करतात हे अगदी योग्य आहे याची आम्हाला खात्री पटली पर्वतावर खूप खूप उंच गेल्यावर व बर्फ दिसू लागल्यावर मनुष्याच्या मनात परमार्थ व परमेश्वर ह्याबद्दलचे विचार गर्दी करू लागतात

वर्षाचे बारा महिने खिलनमर्ग येथे बर्फ पडत असतो. आम्ही घोड्यावरून खिलनमर्गकडे चाललो होतो. डोंगरावरचे बर्फ दिसत होते

मी व सौभाग्यवती परमार्थाच्या उच्च वातावरणात विहार करू लागलो. सौभाग्यवती मला शंका विचारू लागली व मी उत्तर देऊं लागलो.

सौभाग्यवतीने विचारले—

" आपणाला अनुभव येतो की एक इंद्रिय दुसऱ्या इंद्रियाचे काम करत नाहीं. डोळे पहातात, पण त्याना बोलता येत नाहीं. जीभ बोलते पण तिला पहाता येत नाहीं. अंतरंगातील देवाचा अनुभव इंद्रियातीत आहे, त्या बाबतीत काय प्रकार आहे ? "

मी सांगू लागलो—

" इतका उत्तम प्रश्न विचारल्याबद्दल प्रथम तुझे अभिनंदन. एका खुनी कज्यात कबिराची साक्ष कोर्टात झाली होती. एका व्यभिचारी बायकोचा तिच्या नवऱ्याने खून केला होता. कबिरानी तो खून पाहिला होता, पण व्यभिचारी बायकोचा खून करणाऱ्या नवऱ्याविरुद्ध साक्ष द्यावी, असे त्याना वाटेना साक्षीच्या पिंजऱ्यात गेल्यावर त्यांना जेव्हा प्रश्न विचारण्यात आले तेव्हा ते म्हणाले—

जो देखे सो कहे नहि । कहे सो देखे नहि ।
सुने सो समझावे नहि । रसना दृक् श्रुति काहि ॥

जो पहातो तो बोलूं शकत नाही, जो बोलतो तो पाहू शकत नाही. जो ऐकतो त्यास समजाऊन सांगता येत नाही. जीभ डोळे व कान ह्यांची कार्यें स्वतंत्र आहेत.

कबिराचे हें उत्तर ऐकून, हा शागिर्दाश वेडा आहे असे समजून त्याला पुनः कांही प्रश्न विचारण्यात आले नाहीत.

कबीर वेडा नव्हता त्याचे म्हणणे बरोबर होते. डोळे पहातात पण त्याना बोलता येत नाही. जीभ बोलते पण तिला दिसत नाही. कान ऐकतात पण त्याना दुसऱ्याना समजाऊन सांगता येत नाही.

आपल्या अंतरंगात देव आहे त्याचा अनुभव मात्र वेगळा आहे हा अनुभव आला म्हणजे आपणास वाटूं लागते की ह्या प्रांतात एक इंद्रिय दुसऱ्या इंद्रियाचे काम करते. अनाहूत नाद फक्त कानासच ऐकू येतो असे नाही तर तो शरीरात देखील ऐकू येतो. शरीर देखील कानाचे काम करते दिव्य अनुभव चाखताना आपण म्हणू शकतो की—

डोळ्यास तहान लागली. जीभ सुवास घेऊ लागली, कान पाहू लागले.

नेहमीच्या जगात हे विक्षिप्तपणाचे वाटेल, पण अंतरंगातील दिव्य जगात ह्या नित्याच्या गोष्टी आहेत.

सौभाग्यवतीने विचारले—

' ऐहिक कल्याण व पारमार्थिक कल्याण ह्या दोहोंच्या मागे लागू नये. आपण निश्चय करावा व एकाच्या मागे लागावे आपणास दोन्ही मिळणें शक्य नाही, असे पुष्कळ लोक म्हणतात, तुम्हास काय वाटते ? '

मी सांगू लागलो—

' प्रेयस् व श्रेयस्, अथवा ऐहिक कल्याण व पारमार्थिक कल्याण ह्यांचा विरोध आहे, आपण दोन्ही मिळवण्याचा प्रयत्न करू नये असें पुष्कळ लोकाना वाटते कांही तत्वज्ञ म्हणतात की—

ऐहिक कल्याण पाहिजे का पारमार्थिक कल्याण पाहिजे, ह्याबद्दल निश्चय न करता आल्यामुळें पुष्कळ वेळा मनुष्य दोन्हास मुकता.

बायबलांत ब्युरिडन नावाच्या पाद्रयाच्या गाढवाला एकाच वेळी भूक व तहान लागली. त्याच्या एका बाजूस गवत होते व दुसऱ्या बाजूस पाणी होते. पण आधी गवत खाऊ, का आधी पाणी पिऊ, ह्याचा ह्या गाढवाला निश्चय करता आला नाही. त्यामुळे भरपूर गवत व भरपूर पाणी जवळ असतानाही, ते गाढव भुकेने व तहानेने जीव व्याकूळ होऊन मेले.

श्रेयस् व प्रेयस् ह्या बाबतीत माणसाने असला गाढवपणा करू नये.

इपिक्युरियन्स व स्टोईक्स, किंवा बेंथॅम व कांट ह्यांच्या मतामध्ये विरोध आहे, पण कृष्णाच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे आपण पारमार्थिक कल्याणाच्या मागे लागलो असताना ऐहिक कल्याण सोडण्याचे कारण नाही. दोहोंचा समन्वय करणें हाच सर्वश्रेष्ठ मार्ग आहे.

जनक राजाच्या दरबारात बडे बडे विद्वान वाद करण्यासाठी येत असत. बृहदारण्यक उपनिषदावरून तुला कळून येईल की, जनक राजाने बऱ्याच विद्वानांना आपल्या दरबारात बोलावले, व जो वाद जिंकील त्याला हजार गाई व त्या गाईंच्या शिंगांना बांधलेल्या सोन्याच्या नाण्यांच्या पिशव्या मिळतील असे जाहीर केले.

जेव्हा याज्ञवल्क्य दरबारांत शिरले तेव्हा जनकाने विचारले—

' तुम्हाला हजार गाई व सोन्याची नाणी पाहिजेत, का वादात जय पाहिजे ? '

याज्ञवल्क्य म्हणाले—

' उभयमेव सम्राट्. '

प्रेयस् पाहिजे का श्रेयस् पाहिजे ह्याचे उत्तर—

" उभयमेव असे आहे "

सौभाग्यवती म्हणाली—

" तुमचें हें उत्तर ऐकून मला खूप आनंद झाला. माझा पुढचा प्रश्न असा की—

देवाची नगरी म्हणजे काय ? या नगरीत राहणारे लोक हिंदू का मुसलमान असतात ? ज्यांना अहंकार आहे त्यांना ह्या नगरांत प्रवेश मिळतो का ? "

मी सांगू लागलो—

" गीता सांगते त्याप्रमाणे देव आपल्या अंतःकरणात आहे. अशा ह्या देव ओळखणारे लोक ज्या नगरीत राहतात त्या नगरीला देवाची नगरी म्हणतात. या नगरीत राहणारे जे नागरीक असतात त्यामध्ये हा हिंदू हा मुसलमान असा भेद असत नाही. हिंदी वाङ्‌मयातील कबीर, तुलसीदास, सूरदास, मीराबाई, रामानंद, नानक वगैरे संत हे देवाच्या नगरीचे नागरिक आहेत. याच नगरीत मन्सूर व रहीम हे मुसलमान संतदेखील राहतात. आपण त्यांच्याबद्दल बोलताना हा हिंदू हा मुसलमान असे म्हणतो, पण असला भेद देवाच्या नगरीत असत नाही. तू असे लक्ष्यात घे की, जगातील सर्व राष्ट्रांचे व सर्व काळचे आत्मज्ञानी लोक देवाच्या नगरीचे नागरीक असतात. हे सारे नागरीक एकच भाषा बोलतात. ही भाषा समजून घ्यायला आपणाला आपल्या अंतःकरणातील दिव्यशक्तीचा थोडातरी स्पर्श व्हावा लागतो. जोपर्यंत अहंकार आहे तोपर्यंत हा स्पर्श होऊ शकत नाही एक वेळ सुईच्या नेढ्यातून उंट जाऊ शकेल, पण अहंकारी माणसाला देवाच्या नगरीत कधीच प्रवेश मिळणार नाही. प्रो. जेम्स म्हणतो की अहंकार किंवा ईश्वर ह्यापैकी एकाचीच तुम्हाला निवड करता येईल. दोन्ही तुम्हाला मिळणार नाहीत. "

सौभाग्यवती म्हणाली—

" तुम्ही केव्हा केव्हा म्हणता की देवाच्या नगरीत जाण्याला असणारी वाट उलटी किंवा उफराटी आहे, म्हणजे काय ? "

मी सांगू लागलो—

" तू असे लक्ष्यात घे की—

माणसांची तक्रार अशी असते की आपले जीवन म्हणजे कुत्र्याप्रमाणे लाळघोटेपणाचे असते कुत्रा ह्याला DOG म्हणतात DOG हा शब्द उलटा केला म्हणजे जो शब्द तयार होतो तो GOD.

तु आणखी असे लक्ष्यात घे की—

आपण ध्यान करतो पण आपली ध्यानाची धारा बहिर्मुखी असते अशा ध्यानाने देवाच्या नगरीत जाता येणार नाही. आपली बहिर्मुखी धारा उलटी

×

केली पाहिजे म्हणजे अंतर्मुखी केली पाहिजे. धारा हा शब्द उलटा केला म्हणजे जो शब्द तयार होतो तो राधा ध्यानाची बहिर्मुखी धारा उलट करणे म्हणजे राधा. राधा म्हणजे ध्यानाची अंतर्मुखी धारा. ह्या राधेमुळे ह्या अंतर्मुखी धारेमुळे देवाच्या नगरीत जाता येते. "

× × ×

इतक्यात खिलनमर्ग आले व आम्ही घोड्यावरून खाली उतरलो.

वर डोंगरावर पडलेले दाट बर्फ पाहून आम्ही सारे लोक एका दिव्य वातावरणात गेलो, सान्या वर्षभर येथे बर्फ पडत असते.

आम्ही बर्फावर स्लेजिंग केले. त्यावेळी मी म्हणू लागलो—

यह मेरा काश्मीर<br>
कि जिसकी धरती स्वर्ग समान<br>
गहरे गहरे खड्ड निराले<br>
ऊंची पर्वत माला<br>
हर चट्टान बोलनेवाली<br>
हर कोना हरियाला<br>
इस जादूसे भरे मुल्कपर<br>
है दुनिया कुर्बान<br>
यह मेरा काश्मीर<br>
जला पर्शी

वाउचची कविता आठवली—

O, for the wind in the pine wood tree.<br>
O, the flowery scented breeze in Gulmarg<br>
O, the bubbling brook's clear flow<br>
Dancing for the Khilan's height below<br>
O, for the cold and gleaming snow<br>
Which Afarward doth proudly show

× × ×

खिलनमर्ग पाहून झाल्यावर आम्ही घोड्यावरून खाली यायला निघालो. घोडे सावकाश डोंगरावरून खाली येऊ लागले.

मी व सौभाग्यवती वेगवेगळ्या घोड्यावरून खाली येत होतो. घोड्यांची चाल संथ होती. मनुष्याने सावकाश चालावे त्याप्रमाणे घोडे सावकाश डोंगर उतरू लागले.

सौभाग्यवती परमार्थाच्या दिव्य वातावरणात विहार करत होती. तिला नाना प्रकारचे प्रश्न सुचत होते ती प्रश्न विचारीत होती व मी उत्तरे देत होतो.

गणेश

संसारात असा एक काळ असतो की त्यावेळी पतिपत्नीच्या जीवनात शृंगाराला पहिल्या नंबरचे स्थान असते शृंगार, हास्य, करुण, रौद्र, वीर, भयानक, बीभत्स, अद्‌भूत हे जे जीवननाट्यातले रस आहेत, त्यामध्ये शृंगार हा रसांचा राजा आहे असे आपणाला वाटते, पण पुढे पुढे आपणाला कळून येत का

शृंगाराच्या डोक्यावर पाय ठेवणारा रसांचा सम्राट जर कोण असेल तर तो म्हणजे शांतरस

शृंगाररसात पोहताना जे सुख मिळते त्याच्या सहस्रपट सुख शांतरसात पोहताना मिळते.

उच्च बर्फमय प्रदेशातून घोड्यावरून प्रवास करत असताना आम्ही दोघे दिव्य वातावरणात शांतरसात पोहत होतो

पत्नीची शृंगारिक भूक भागवण्यात पतीला जो आनंद वाटतो त्यापेक्षा पत्नीची पारमार्थिक भूक भागवण्यात पतीला जो आनंद वाटतो तो हजारो पटीने मोठा असतो.

रत्नात ज्याप्रमाणे तेज, साखरेत ज्याप्रमाणे गोडी, अत्तरात ज्याप्रमाणे सुवास त्याप्रमाणे शांतरसात खरा पारमार्थिक आनंद असतो.

शांतरसातील प्रश्नोत्तरांचा सुवास देखील नितांत मनोहर असतो.

प्रश्न– खर म्हणजे जे चांगले वागतात त्यांना जास्त सुख मिळाले पाहिजे, पण ह्या जगात असे दिसते की सुष्टांना जास्त सुख न मिळता दुष्टांना

जास्त सुख मिळते. मानवी जीवनाचें वस्त्र सुखदु:खाच्या धाग्यांनी विणले आहे. मनुष्याच्या पाठीमागे सुख व दु:ख दोन्ही लागले आहे, पण मला वाटते खर म्हणजे ईश्वर न्यायी असेल तर सुष्टाना जास्ती सुख व दुष्टाना कमी सुख, हाच न्याय योग्य आहे, पण ह्या जगांत असे दृष्टोत्पत्तीस येते की दुष्टाना जास्त सुख व सुष्टाना कमी सुख— असें कां ?

उत्तर– मनुष्याला दोन जीवन असतात— ( १ ) बाह्य जीवन ( २ ) आंतरिक जीवन.

एखादा मनुष्य बाह्य जीवनांत सुखी दिसत असला तरी तो आंतरिक जीवनांत फार दु:खी असतो. माझ्या माहितीचे काही अधिकारी आहेत, ते खूप पैसा खातात. त्याचे बाह्य जीवन सुखी दिसते. लोक त्यांच्या जीवनाचा खूप हेवा करतात, पण ते आतून पराकाष्टेचे दु:खी आहेत. त्याना शांत झोपेचे देखील सुख मिळत नाही.

सुखदु:ख मापण्याची खरी फूटपट्टी म्हणजे मनुष्याचे बाह्य जीवन नव्हे तर खरी फूटपट्टी म्हणजे मनुष्याचे आंतरिक जीवन.

एकादा लठ्ठ मनुष्य पाहून लोकाना वाटते तो निरोगी आहे, त्याचे आरोग्य चांगले आहे आरोग्य मापण्याची फूटपट्टी लठ्ठपणा असत नाही पुष्कळ वेळा लठ्ठ मनुष्य निरोगी असत नाही, त्याचे आरोग्य बिघडलेले असते

जहाजाचा जितका भाग पाण्याच्या वर असतो त्यापेक्षा कितीतरी जास्त भाग पाण्याच्या खाली असतो. मनुष्याच्या बाह्य जीवनापेक्षा त्याचे आंतरिक जीवन फार मोठे असते.

मनुष्याचे आंतरिक जीवन पाहिले म्हणजे कळून येते की—

—जे चांगले वागतात त्याना जास्त सुख मिळते.

ईश्वर न्यायी आहे. त्याच्या दरबाराचा न्याय असाच आहे की—

सुष्टाना जास्त सुख व दुष्टाना कमी सुख

मात्र हा न्याय पहाताना मनुष्याचे आंतरिक जीवन तपासले पाहिजे.

लोकमान्य टिळकाना राजद्रोहाच्या खटल्यात फार कडक शिक्षा देण्यात झाली. लोकाना वाटले की—

इतकें चांगले वागणाऱ्या मनुष्याला इतके मोठे दु:ख का ?

पण ती शिक्षा ऐकून लोकमान्यांना आतून अवर्णनीय सुख वाटू लागले. त्या रात्री त्यांना शांत झोप लागलेली पाहून गोरा सार्जंट आश्चर्याने अवाक् होऊन गेला.

तू असे लक्षात घे की—

चांगले वागणाऱ्याला जास्त सुख व वाईट वागणाऱ्याला कमी सुख हाच मनुष्याच्या आंतरिक जीवनाचा कायदा आहे.

प्रश्न– ह्या तुमच्या उत्तरामुळे मला नवीन प्रकाश मिळाला. पुढचा प्रश्न असा की—

मानवी जीवनात सर्वात मोठा गुण कोणता ?

उत्तर– ग्रीक लोकांना पूर्वी वाटत होते की—

सुसगति हा सर्वात मोठा गुण आहे

मध्ययुगीन लोकांना स्त्रियाविषयी आदर हा सर्वात मोठा गुण वाटत होता.

अठराव्या शतकात परोपकार हा सर्वात मोठा गुण मानण्यात येऊ लागला, तर एकोणिसाव्या शतकात समता हा सर्वात मोठा गुण मानण्यात येऊ लागला.

प्लेटोला वाटते की न्याय सर्वात मोठा गुण आहे, तर ॲरिस्टॉटला वाटते की—

Magnanimity मोठे मन हा सर्वात मोठा गुण आहे.

स्पायनोझा, कांट, सिज्वीक वगैरे नीतिशास्त्रज्ञांनी निरनिराळे विचार मांडले आहेत

खूप खूप वाचून व माझा अनुभव मुख्यत. लक्षांत घेऊन मला वाटते की–

मनुष्याच्या जीवनात ईश्वरभक्ति हा सर्वात मोठा गुण आहे

गीतेमध्ये कृष्णकन्हय्याने भक्तिवरच फार जोर दिला आहे

ईश्वरभक्तिच्या वेलीला निरनिराळ्या सद्‌गुणांची फुले फुलतात

आपल्या अंतरंगात असलेल्या ईश्वराची भक्ति आपण करू लागलो म्हणजे मनुष्याच्या पाठीमागून साउलीने यावे त्याप्रमाणे समता, परोपकार, न्याय, मोठे मन हे सारे गुण आपल्या मागून येऊ लागतात. ह्या भक्तीमुळे आपले जीवन सुकोल, सुंदर, सुगंधी व सुमधुर होते.

प्रश्न— आपणाला देव भेटला असे केव्हा म्हणता येते ? साक्षात्कार म्हणजे काय ? माणसाला ईश्वराचा संपूर्ण साक्षात्कार होऊ शकतो का ? ह्या प्रश्नाच्या अनुषगाने तुम्ही खूप खूप बोला, मी साऱ्या इंद्रियांचे कान करून तुमचे भाषण ऐकते.

उत्तर— आपण ध्यान करू लागलो म्हणजे आपणाला अनाहत नाद ऐकू येतो. केव्हा रंग, केव्हा प्रकाश, केव्हा सुवास ह्याचा अनुभव आपणाला येतो.

आपणाला वाटते की आपणाला देव भेटला किंवा आपणाला साक्षात्कार झाला.

पण ही समजूत चुकीची आहे.

केव्हा केव्हा चमत्कार करण्याची शक्ति आपल्या अंगात येते. आपणाला भविष्यातील काही काही गोष्टी कळतात. आपल्या स्पर्शाने किंवा आपल्या आशिर्वादाने केव्हा केव्हा लोकांच्या व्याधी दूर होतात. आपणाला नाना तऱ्हेच्या सिद्धि प्राप्त होतात.

आपणाला वाटते की—

आपल्याला देव भेटला. आपणाला साक्षात्कार झाला.

पण ही समजूत चुकीची आहे.

आपण सिद्धीच्या मागे कदापि लागू नये

चमत्काराच्या जोरावर लोकांना आपणाकडे आकृष्ट करून घेण्याचा प्रकार करणे म्हणजे परमार्थाच्या प्रांतांत वेश्यागिरी करण्याप्रमाणे आहे.

एकादी सिद्धी प्राप्त झाली तर देवाला आपण विनंती करावी की—

देवा, ही सिद्धि मला नको. मला तुझे दर्शन पाहिजे.

आत्यंतिक तळमळ निर्माण झाली व देवाच्या दर्शनाकरता आपण पाण्याच्या बाहेर काढलेल्या माशाप्रमाणे तडफडू लागलो म्हणजे सोन्याच्या शाईने हिऱ्याच्या लेखणीने मोत्यांच्या कागदावर लिहिण्याच्या योग्यतेचा असा एक भाग्याचा काळ येतो की त्यावेळी आपल्या अंतःकरणात असलेला ईश्वर आपणाशी बोलू लागतो.

हीच ती देवाची भेट. हाच तो साक्षात्कार.

भक्तीने ही भेट होते. भक्तीने हा साक्षात्कार होतो

तत्त्वज्ञान म्हणते की भ्रमनिरास झाल्याशिवाय देवदर्शन घडत नाही.

भक्तिच्या प्रांतात प्रथम देव दर्शन घडते, मग भ्रमनिरास होतो

पण तू असे लक्ष्यात घे की—

देव अनंत आहे. अमर्याद आहे.

तू कबीर वाचला आहेस. कबिराची बेहदची कल्पना व ॲनॅक्झिमँडरने प्रतिपादलेली अनंतत्वाची कल्पना ह्यामध्ये बरेच साम्य आहे.

मनुष्याला देवाचा संपूर्ण साक्षात्कार होत नाही.

देव ब्रह्मांड व्यापून राहिला आहे. तो अनंत आहे, अमर्याद आहे.

माणसाची शक्ति मर्यादित आहे. तो आपल्या अंतरंगातील देव पाहतो.

माणसाला जो साक्षात्कार होतो तो आंशिक साक्षात्कार होतो.

साक्षात्काराचा चंद्र कोणी शुक्ल पक्षातील प्रतिपदेचा पाहील तर कोणी द्वितीयेचा पाहील, तर कोणी अष्टमीचा पाहील, पण कोणीच पौर्णिमेचा पाहणार नाही !

× × ×

या वेळपर्यंत आम्ही घोड्यावरून खिलनमर्गहून गुलमर्गला आलो व मग तेथून घोड्यावरून टनमर्गला निघालो.

सौभाग्यवतीने मला विचारले—

'परमार्थाच्या प्रांतात देवाच्या भेटीसाठी तळमळणाऱ्याना खूप मोठा आनंद मिळतो हे खरें आहे. असे लोक अपवादात्मक असतात. सर्वसामान्य लोकांच्याबद्दल पुराणांत एखादी, नितांत मार्मिक गोष्ट आहे का ?'

मी सांगू लागलो—

'अशी गोष्ट आहे. एकदा मनुष्य, बैल, कुत्रा व घुबड ब्रह्मदेवाकडे गेले. ब्रह्मदेव त्याना म्हणाला—

तुम्हा साऱ्याना मी चाळीस चाळीस वर्षांचे आयुष्य दिले आहे.'

हे प्राणी परत पृथ्वीवर आल्यावर माणसाला वाटले—

मी सर्वांत शहाणा असून मला देखील फक्त चाळीस वर्षांचे आयुष्य हे ब्रह्मदेवाचे करणे बरोबर नाही.

तो पुन एकटाच ब्रह्मदेवाकडे गेला व त्याने आपली तक्रार सांगितली. ब्रह्मदेव म्हणाला—

" मी समतेचा भोक्ता आहे तुला इतरांपेक्षा जास्त शहाणपण असल्यामुळे त्या शहाणपणाच्या जोरावर तू इतरांपासून आयुष्य मागून घे म्हणजे झाले. "

माणूस खूष झाला. तो बैलाकडे गेला व म्हणाला—

" तू खाण्यापिण्याची व रहाण्याची काळजी निष्कारण कशाला करतोस. मी तुझी सारी व्यवस्था करीन. "

माणसाच्या गोड बोलण्यावर बैल खूष झाला माणूस म्हणाला—

" मी तुझी सारी व्यवस्था करीन पण तू मला आपले वर्षं आयुष्य देणेस पाहिजे. "

बैल कबूल झाला. माणसाचे आयुष्य साठ वर्षांचे झाले.

नतर माणूस कुत्र्याकडे गेला. त्याचे गोड बोलणे ऐकून तो आपल्या करता काय करणेस तयार आहे हे पाहून कुत्र्याने त्याला आपले वर्षं आयुष्य दिले.

माणसाचे आयुष्य ऐंशी वर्षांचे झाले.

नंतर माणूस घुबडाकडे गेला. त्याचे गोड बोलणे ऐकून, घुबडाने देखील आपले वर्षं आयुष्य त्याला दिले.

माणसाचे आयुष्य शभर वर्षांचे झाले.

मग पुराणात म्हटले आहे—

माणूस पहिली चाळीस वर्षे माणसासारखा वागतो तो मस्त असतो. तो आनंदी असतो.

पुढच्या वीस वर्षांत तो आपल्या मुलाबाळांच्यासाठी बैलासारखा राबराब राबतो. त्याने ही वीस वर्षे बैलापासून मागून घेतलेली असतात.

पुढची वीस वर्ष तो कुत्र्याप्रमाणे जगतो.

लोक त्याला हुट हुट करतात. तरी तो लाळघोटेपणा करतो. आपली झोपडी हुलबीत मालकाच्या नजरेप्रमाणे कुत्रा फिरत असतो व मालकाने दिलेल्या पोळीच्या किंवा भाकरीच्या तुकड्यावर खूष असतो.

माणूस देखील सारा अपमान गिळून मुलांच्या नजरेप्रमाणे फिरत असतो व मिळेल त्या अन्नावर खूष असतो. मुले सुना त्याचा अपमान करतात, पण त्याचे जिणे कुत्र्याचे असते, कारण ही वीस वर्षे त्याने कुत्र्याकडून मागून घेतलेली असतात.

त्यानंतर पुढची वीस वर्षे म्हणजे ऐंशी ते शंभर ही वर्षे माणूस घुबडाचे जीवन जगतो.

हा म्हातारा दिवसा लोकांची नजर टाळतो. त्याला पाहून इतरांना अपशकून वाटतो. घुबड दिवाभीत असते, पण रात्री त्याचे अस्तित्व जाणवते.

हा म्हातारा दिवसा बाजूबाजूला असतो. तो दिवसाला भीत असतो, पण रात्र झाली म्हणजे त्याचा खोकला जोरात सुरू होतो व इतरांना तो त्रास नकोसा होतो. हा म्हातारा लवकर मरेल तर बरे होईल असे इतरांना वाटूं लागते

माणसाला वाटू लागते की आपण शहाणपणाच्या जोरावर इतर प्राण्यांच्याकडून आयुष्य मागून घेतले पण—

दीर्घायुष्य म्हणजे वर नसून शाप आहे. ''

ही गोष्ट ऐकून सौभाग्यवती म्हणाली—

खरंच किती मार्मिक गोष्ट आहे गोष्ट असावी तर अशी असावी. '

× × ×

आम्ही टनमर्गहून बसने श्रीनगरला आलो व आजचा कार्यक्रम संपला.

गणेश,

उद्या आम्ही यसमर्गला जाणार आहो

पुढचे पत्र मग पाठवीन.

तुझा

राम

×

## पत्र १० वे

प्रिय गणेश,

आज आम्ही सकाळी यूसमर्गला जाण्यासाठी तयार झालो. बसेस येईस थोडा अवकाश होता म्हणून आम्ही गप्पा मारत बसलो होतो. लोक मला प्रश्न विचारत होते आणि मी उत्तर देत होतो

प्रश्न– ज्ञानसाधना करून माणसाला शांति मिळते का ? का ज्ञानसाधनाच्या उच्च टोकाला जाऊनहि मनुष्य अशांत राहतो ?

उत्तर— प्रश्न चांगला आहे. भागवतात ह्या प्रश्नाचे उत्तर दिले आहे.

महर्षी व्यास सरस्वतीच्या तीरावर विचारमग्न बसले होते. त्यांच्या चित्तात अशांतता होती. ते खूप ज्ञानसंपन्न होते. वेदांचे विभाग पाडून त्यांनी वेदाध्ययन सुकर केले होते. महाभारतासारखा पाचवा वेद रचून त्यात सर्व वेदांचा अर्थ आणून स्त्रीशूद्रादिकांना मोक्षाचा मार्ग त्यांनी मोकळा करून दिला होता तरी पण ते अशांत होते.

त्यावेळी वीणापाणी नारदाची स्वारी तेथे उपस्थित झाली. त्यांनी व्यासांना प्रश्न विचारल्यावर व्यास म्हणाले—

नारदा, ज्ञानसाधना करून व ज्ञानसाधनेच्या उच्च टोकाला जाऊनहि माझे मन अशांत का ? माझ्यात काय न्यून राहिले आहे ?

नारद म्हणाले—

' तुमच्यात एक न्यून राहिले आहे. तुम्ही ज्ञानसंपन्न आहा. ज्ञानसाधनेच्या उच्च टोकाला गेला आहा, पण तुम्ही असे लक्ष्यात घ्या की भक्तिशिवाय ज्ञानाला शोभा नाही. भक्तीने भरलेले भगवच्चरित्र आपण लिहा म्हणजे तुमच्या मनाला शांति लाभेल. '

नारदाच्या उपदेशाप्रमाणे व्यासांनी भगवत् चिंतन केलें त्यांचे हृदय कृष्णभक्तीने भरून गेले. त्यांनी मग भागवत रचले आणि त्यांच्या मनाला शांति प्राप्त झाली

प्रश्न– भागवत आबालवृद्धांना फार प्रिय आहे, पण कांही लोकांचा आक्षेप असा आहे की—

गोकुळात कृष्णाने गोपींशी व्यभिचार केला हे बरे नाही. ह्या बाबतीत तुम्हाला काय वाटते ?

उत्तर– अहो, गोकुळात कृष्ण लहान होता. तो बाळकृष्ण होता. तो सात वर्षांचा होता. वैषयिक प्रेम निर्माण व्हायला मनुष्य वयात यावा लागतो. तुम्ही हें मान्य कराल की—

लहान मुलाला वैषयिक प्रेम माहित नसते

शुकाचार्य भागवत सांगत आहेत राजा परीक्षित भागवत ऐकतो आहे. त्याला व्यभिचाराची शंका आली नाही त्याला शंका आली ती अशी की—

कृष्णावर गोपी मातेपेक्षा जास्त प्रेम कशा करु शकल्या ?

गोपींचे हे मातृप्रेम पाहून सारे संत म्हणतात की—

भक्तिप्रेमाचा विषय निघाला म्हणजे पहिल्या प्रथम जर कुणाची आठवण होत असेल तर ती म्हणजे गोपींची

कबीराचे उद्गार आपण लक्ष्यात घ्या. कबीर म्हणतो—

कबीर कबीर क्या कहते है कबीर ।
एकेक गोपीके प्रेममें बह गये कोटि कबीर ॥

अहो, माता जेव्हा आपल्या मुलाचा पापा घेते तेव्हा त्या पाप्यात ज्याला पाप दिसते तो स्वत: पापी असतो

गोपींचे कृष्णावरील मातृप्रेम प्रेमाचे प्रेम आहे. ते पराप्रेम आहे. ते अपरपार प्रेम आहे. त्या प्रेमाचा हिमालय न पहाता जो त्या प्रेमात विषयाची दरी पाहतो तो अज्ञानाच्या दरीत पडतो.

प्रश्न– कृष्ण किंवा राम हा विष्णूचा अवतार आहे. विष्णु मोठा का शंकर मोठा ? हरि मोठा का हर मोठा ?

उत्तर– ह्या बाबतीत खूप वाद आहे. नुसता वाद नाही तर विवाद देखील आहे. इतकेच काय प्रवाद देखील आहे. हे सर्व वाद विवाद प्रवाद पाहून लवाद नेमून निकाल द्यायचा झाला तर जो निकाल होईल तो असा–

विष्णु व शिव दोघेहि मोठे आहेत. विष्णु शिवाला मोठा म्हणतो व शिव विष्णुला मोठा म्हणतो. ह्यातच दोघांचे मोठेपण साठवले आहे. एक लहान एक महान असा प्रकार नसून दोघांची कार्ये परस्पराचा पुरक आहेत.

इंग्लिशमध्ये असे म्हणता येईल—

Both of them are complimentary to each other; none of them is supplementary to another.

भागवताच्या दहाव्या स्कंधात अशी एक कथा आहे की—

एकदा सरस्वतीच्या तीरावर मोठमोठे ऋषीमुनी जमले असताना चर्चा सुरु झाली की—

ब्रह्मा, विष्णु व महेश ह्यामध्ये श्रेष्ठ कोण ?

शेवटी न्यायाधीश म्हणून भृगु ऋषींची नेमणूक झाली. ते ब्रह्मसभेत गले व त्यानी ब्रह्मदेवाची परीक्षा घेतली.

मग ते कैलासात गेले व त्यानी शंकराची परीक्षा घेतली.

शेवटी ते वैकुंठात गेले व त्यानी विष्णूची परीक्षा घेतली.

साऱ्यांची परीक्षा घेऊन झाल्यावर भृगुऋषींचा जो निकाल झाला तो असा की—

साऱ्यामध्ये विष्णु श्रेष्ठ आहे.

भागवतातील ह्या निकालापेक्षा हरिवंशाचा निकाल चांगला आहे.

हरिवंशात म्हटले आहे—

रुद्रश्च परमो विष्णु. विष्णुश्च परमः शिव ।
एक एव द्विधा भूतो लोके चरति नित्यशः ॥
न विना शंकर विष्णु न विना केशवं शिव ।
तस्मादेकत्वमायातो रुद्रोपेंद्रो तु तौ पुरा ॥

हरिवंशाच्या निकालाप्रमाणे शिव व विष्णु, हरि व हर एकच आहेत. हा लहान तो महान असें म्हणणे बरोबर नाही.

प्रश्न— माणसाने एकच गुरु करावा का अनेक गुरु करण्यास हरकत नाही ?

उत्तर— भागवताच्या अकराव्या स्कंधात असें सांगितले आहे की—

अवधूताने चोवीस गुरु केले. अवधूत हे नाव दत्तात्रेयाला लावण्यात येते व असे म्हणण्यात येते दत्तात्रयाने चोवीस गुरु केले. भागवतात मात्र दत्तात्रेयाचा उल्लेख नसून अवधूताचा उल्लेख आहे.

अवधूताचें म्हणणे असे आहे की—

एका गुरुपासून संपूर्ण ज्ञान मिळेलच असें नाही, त्यासाठी अनेक गुरु करण्यास हरकत नाही.

प्रश्न— रामायण, महाभारत व भागवत ही आपली प्रस्थानत्रयी आहे. त्यामध्ये मूलभूत फरक काय आहे ?

उत्तर— रामायण ही कथा आहे महाभारत हा इतिहास आहे व भागवत हे पुराण आहे.

× × ×

इतक्यात बसेस आल्या व आम्ही युसमर्गकडे निघालो.

युसमर्ग हे श्रीनगरच्या दक्षिणेस २८ मैल अंतरावर आहे. हे रम्य एक ठिकाण पिर पुंजलच्या पायथ्याशी आहे समुद्र-सपाटीपासून हे ठिकाण ७८०० फूट उंचावर आहे.

बसमध्ये जेव्हा चर्चा सुरू झाली तेव्हा एका गृहस्थाने मला विचारले—

' निधर्मी राज्यात शासनाने धर्मराज्य स्थापण्याचा प्रयत्न केला पाहिजे असें तुमचे मत आहे. हें मत विसंगत वाटते. नीट खुलासा करा. '

सविस्तर खुलासा करताना मी सांगितले—

आपण आपली घटना पास केली व आपले राज्य सेक्युलर स्टेट आहे असें जाहीर केले. सेक्युलर स्टेट ह्या अर्थी निधर्मी राज्य असा प्रयोग पुष्कळदा केला जातो

निधर्मी राज्यात मनुष्य हिंदु आहे का मुसलमान आहे हें पाहून त्याला अधिकार देण्यात येत नाहीत, ह्याबद्दल वाद नाहीं, पण निधर्मी राज्यात धर्मराज्य स्थापणेस पाहिजे असें जेव्हा म्हणण्यात येते तेव्हा धर्मराज्य ह्याचा अर्थ समजून घेणे जरूरीचे आहे.

महाभारतात कृष्णाने धर्माची व्याख्या करताना असें म्हटले आहे—

धारणाद्धर्ममित्याहु धर्मो धारयते प्रजाः ।
यस्याद्धारणसंयुक्तं स धर्म इति,निश्चय ॥

धर्म हा शब्द धृ = धारण करणे ह्या धातुपासून निघाला आहे. धर्माने प्रजा धारण केली आहे. ज्याने सर्व प्रजेचे धारण होते तो धर्म होय हें निश्चित आहे.

धर्म ह्याचा अर्थ न्याय नीति असा आहे. धर्म अर्थ काम मोक्ष-हे जे चार पुरुषार्थ आहेत त्यामध्ये धर्म ह्याचा अर्थ न्याय नीति असा आहे

महाभारताच्या शेवटी व्यासांचा आक्रोश आहे त्यात ते म्हणतात—

ऊर्ध्वबाहुर्विरोम्येष: न कश्चित् शृणोति माम् ।
धर्मादर्थश्च कामश्च स धर्म किं न सेव्यते ॥

अरे, बाहू उंच करून मी आक्रोश करत आहे पण माझे कोणी ऐकत नाही. धर्माने अर्थ प्राप्त होतो. धर्माने काम प्राप्त होतो असा धर्म तुम्ही का आचरत नाही।

ह्या ठिकाणी धर्म ह्याचा अर्थ हिंदुधर्म असा नसुन धर्म ह्याचा अर्थ न्याय नीति असा आहे

व्यासांना असे म्हणावयाचे नाही की तुम्ही पैसा मिळवू नका किंवा भोग घेऊ नका त्यांना असे म्हणायचे आहे की—

तुम्ही वाटेल तितका पैसा मिळवा, वाटेल तितके भोग घ्या, पण हें सारे न्यायाने नीतीने होऊ द्या.

तेव्हा गेला होता कोठे राधासुता तुझा धर्म ।

ह्या ठिकाणी धर्म ह्याचा अर्थ हिंदुधर्म असा नसून धर्म म्हणजे न्याय नीति असा अर्थ आहे.

महाभारतात देखील अशा प्रसंगी ' क्व ते धर्मस्तदा गतः ' असें म्हटले आहे.

निधर्मी राज्यात ( सेक्यूलर स्टेटमध्ये ) शासनाने जास्तीत जास्त धर्मराज्य स्थापण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ह्याचा अर्थ असा की जेणेकरून आपले राज्य न्यायाचे होईल, नीतीचे होईल याबद्दल शासनाने जास्तीत जास्त प्रयत्न केला पाहिजे.

एका गृहस्थाने विचारले—

' तुमचे प्रवचन चांगले झाले, गीता चांगली आहे, पण गीता मोक्षाकरता आहे. आज आम्हाला मोक्ष नको आहे आम्हाला लक्ष्मी पाहिजे आहे, विजय पाहिजे आहे व ऐश्वर्य पाहिजे आहे. '

' अहो, ह्याचसाठी गीता आहे. गीतेचा शेवटचा श्लोक म्हणजे गीतेचे सार आहे असे तज्ञाना वाटते. तो शेवटचा श्लोक असा—

यत्र योगेश्वर. कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।

तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥

जेथे योगेश्वर कृष्ण आहे व धनुर्धारी अर्जुन आहे तेथे लक्ष्मी आहे, विजय आहे व ऐश्वर्य आहे व तेथेच शाश्वत नीति आहे.

नीति हा शब्द महत्वाचा आहे. गीता हा नीतिग्रंथ आहे, तो धर्मग्रंथ आहे. हा धर्म समजला व त्याप्रमाणे आचरण केले म्हणजे लक्ष्मी प्राप्त होते, विजय प्राप्त होतो व ऐश्वर्यही प्राप्त होते.

काही लोकांची शंका अशी होती की—

गीताग्रंथ हा हिंदूच्यासाठी आहे. '

मी सांगू लागलो—

' ही समजूत चुकीची आहे. गीताग्रंथ हा साऱ्या मानवजातीकरता नीतिग्रंथ आहे. धर्म म्हणजे न्याय नीति हा अर्थ लक्ष्यात घेऊन असे म्हणता येईल की—

गीताग्रंथ हा साऱ्या जगाचा महान् धर्मग्रंथ आहे

असे आहे म्हणूनच जगातील बडे बडे विद्वान् या ग्रंथापासून स्फूर्ति घेतात व आपले नैतिक विचार मांडतात.

कार्लाईलला जेव्हा इमर्सन भेटायला आला तेव्हा कार्लाईलने आपला स्फूर्तिग्रंथ जो गीताग्रंथ तो इमर्सनला भेट म्हणून दिला.

शाकुंतल वाचून ज्याप्रमाणे जर्मन कवि गटे आनंदाने नाचूं लागला त्याप्रमाणे इमर्सन गीता वाचून आनंदाने नाचू लागला व म्हणू लागला की—

धर्माचे, न्यायाचे, नीतीचे हे विचार म्हणजे विचारांचे साम्राज्य आहे

प्रख्यात अमेरिकन तत्वज्ञ थोरो ह्याला विचारण्यात आले—

' तुमचे नैतिक विचार धार्मिक विचार इतके उच्च कसे ? ह्याचे रहस्य काय आहे ? '

थोरो म्हणाला—

ह्याचे रहस्य इतकेच की– मी रोज पहाटे उठल्यावर गीता वाचतो. '

आज जगात हयात असलेल्या विद्वानामध्ये ज्याला अग्रपूजेचा मान दिला जातो तो डॉ टॉयनबी म्हणतो की—

जगातील नीतिग्रंथामध्ये सर्वोत्कृष्ट ग्रंथ म्हणजे गीताग्रंथ.

आपण असें लक्ष्यात घ्या की—

ह्याच नीतिग्रंथामुळे आपणाला लक्ष्मी मिळेल, विजय मिळेल व ऐश्वर्यही मिळेल

ता. १६ डिसेंबर १९७१ रोजी आपणाला पाकिस्तान विरुद्ध जो नेत्रदीपक सोनेरी विजय मिळाला, त्याच्या दुसऱ्या दिवशी पंतप्रधान इंदिरा गांधींनी पार्लमेंटमध्ये जे ऐतिहासिक निवेदन केले, त्यामध्ये ज्या एकाच ग्रंथाचा उल्लेख केला तो ग्रंथ म्हणजे गीताग्रंथ.

भारताला विजय मिळाल्यानंतर संरक्षण मंत्र्यांचा दिल्लीमध्ये जो महान् सत्कार झाला त्यावेळी त्यांना भेट म्हणून जो ग्रंथ दिला तो गीताग्रंथ.

या महान् युद्धाच्या हकिकती वाचल्या म्हणजे एक अतिशय महत्वाची गोष्ट समजून येते ती ही की आपले जवान गीतेपासूनच स्फूर्ति घेऊन प्राणपणाने लढत होते.

धारातीर्थावर अफाट पराक्रम करून प्राण अर्पण करणाऱ्या प्रकाश पेठेच्या माणानांत जे एकच पुस्तक मिळाले ते म्हणजे गीतेचें पुस्तक

आपल्या हाताखालच्या लोकाना वाचवणारे व स्वत. मृत्यूला सामोरे जाणारे कुकरीचे कॅप्टन मुल्ला मरताना गीतेचे श्लोक म्हणत होते.

असे आहे म्हणूनच पाश्चात्य विद्वान् म्हणतात की—

जोपर्यंत गीता भारताला स्फूर्ति देत राहील तोपर्यंत भारत विजयाच्या व ऐश्वर्याच्या मार्गावर पुढे पुढे जात राहील.

गीतेवर गधफुले वाहिली म्हणजे आपण धार्मिक होत नाही, तर त्यातील दिव्य विचार अंगी बाणले म्हणजे आपण धार्मिक होतो. ह्या दिव्य विचारा-शिवाय धार्मिक होऊ पाहणे म्हणजे सुराविना संगीत, शब्दाविना साहित्य व टाळचाविना गाणे होय. निधर्मी राज्यात धर्मराज्य स्थापणे म्हणजे नीति-मत्तेच्या बाबतीत अग्रेसर असलेल्या गीतेचे राज्य स्थापणे, व विरोधातून विकासाकडे, भेदातून अभेदाकडे व अंधारातून अतःकरणाकडे जाणे असे राज्य स्थापन झाले म्हणजे भारताचा महाभारत होईल आणि त्या महाभारताच्या मदिरावर सोनेरी अक्षरात कोरले जाईल—

Taj for Beauty and Geeta for Duty.

× × ×

इतक्यात गुलमर्ग आले व आम्ही सारे प्रवासी बसमधून खाली उतरलो.

गुलमर्ग हे ठिकाण फारच रम्य आहे. जिकडे तिकडे निसर्गाने आपले सौंदर्यभांडार खुले केले आहे येथून थोडचा अंतरावर दूधगंगा ( Milk stream ) आहे व दुसऱ्या बाजूस नीलनाग आहे.

थोडा पाऊस पडत होता आणि आम्ही सारे प्रवासी पावसातून इकडे तिकडे बागडत होतो व निसर्ग सौंदर्य पाहून डोळयाना भरपूर मेजवानी देत होतो.

इतक्यात साबुदाण्याएवढ्या लहान लहान गारा पडू लागल्या सारे प्रवासी आपापले वय विसरून लहान मुलाप्रमाणे गारा खाऊ लागले

इकडे तिकडे बरेच बागडून झाल्यावर व गारा खाल्यावर गुलमर्गच्या विश्राम स्थानावर सगळे प्रवासी गोळा झाले व खाता खाता गप्पा मारू लागले

मी काश्मीर पहात होतो, आणि मला गोव्याची आठवण येत होती. मी बोलून गेलो—

हिरण्यागार वनश्रीने नटलेली सह्याद्रीची उत्तुंग शिखरे, सुंदर व स्वच्छ रस्ते, निरनिराळे पाण्याचे प्रवाह, पाहुण्याच्या स्वागतासाठी केळ्यांचा लोंगर डोक्यावर घेऊन नम्र झालेल्या केळी, नेत्रांना तृप्ति देणारे वृक्ष व अमाप निसर्ग सौंदर्य पाहून वाटते की—

गोवा म्हणजे महाराष्ट्राचे काश्मीर आहे

एकाने विचारले—

ज्याप्रमाणे काश्मीरात खूप प्रवासी येतात, त्याप्रमाणे गोव्यात देखील खूप प्रवासी जात असतील

मी म्हटले—

होय. तसच पाहाल तर १३०० चौरस मैलाचा व साडेसहा लाख लोकवस्तीचा गोवा हा चिमुकला प्रदेश, पण ह्या प्रदेशाविषयी साऱ्या भारतातच नव्हे तर साऱ्या जगांत असामान्य कुतुहल निर्माण झाले आहे. ता. १९ डिसेंबर १९६१ रोजी साडेचारशे वर्षांची परकीय पोर्तुगीज सरकारची सत्ता नष्ट होऊन गोवा भारतात आला. तेव्हापासून हा चिमुकला प्रदेश वर्षातून आठ महिने प्रवाशामुळे नेहमी गजबजलेला असतो

एका स्त्रीने विचारले—

गोवा अथवा गोमंतक ह्याबद्दल पूर्वीची आख्यायिका काय आहे ?

मी सांगू लागलो—

भगवान् परशुरामाने सर्व पृथ्वी दान दिल्यावर दान दिलेल्या जमिनीत राहणेचे नसलेमुळे परशुरामाने समुद्र हटवून राहणेकरिता नवीन भूमि निर्माण केली तो भूमि म्हणजे कोकण. या कोकणामध्ये जुवारी नदीच्या किनाऱ्यालगत गोमंत नावाची टेकडी आहे. या टेकडीच्या भागात जो वस्ती झाली त्याला गोमतक असें नांव मिळाले

गोव्यामध्ये खूप देवळे आहेत. श्रीमंगेश हे गोव्यातील मुख्य देवस्थान आहे. त्याबद्दल विषय निघाल्यावर मी सांगू लागलो—

ह्या बाबतीत स्कंद पुराणात सह्याद्रि खंडात जी माहिती आहे ती ऐकणीय-श्रवणीय आहे

एकदा कैलासात शंकर व पार्वती द्यूत खेळत असता पार्वतीचा जय झाला व शंकराचा पराजय झाला

त्या पराभवामुळे शंकराला फार वाईट वाटले व कैलास सोडून तो निघून गेला

प्रथम शंकर कृष्णावेण्यासंगमी येऊन राहिला. तेथे ' संगमेश्वर ' म्हणून त्याची ख्याति झाली. नंतर शंकर चंपावतीला आला. तेथें ' रामेश्वर ' म्हणून त्याची प्रसिद्धि झाली. पुढे तो हरिहरेश्वरला गेला तेथे त्याची ' हरिहरेश्वर ' म्हणून ख्याति झाली

मग शंकर गोमंतकामध्ये गेल्यावर ते ठिकाण त्याला फारच आवडू लागले व तो तेथें राहू लागला

शंकर निघून गेल्यामुळे पार्वती फार दुःखी कष्टी झाली. शंकराच्या शोधाकरिता ती निघाली. हातात वीणा घेऊन शंकराची स्तुति करत ती पृथ्वीतलावर हिंडू लागली. हिंडता हिंडता ती गोमंतकामध्यें आली.

शंकराला वाटले की—

पार्वतीची आपण थोडीशी गम्मत करु.

शंकराने व्याघ्राचे रूप घेतले व हा भयंकर वाघ पार्वतीच्या अंगावर धावून गेला

पार्वती भ्याली. तिने शंकराची प्रार्थना केली व आपणाला संरक्षण देण्याची विनंति केली पण ती फार भ्याली असल्यामुळे—

त्राहि मां गिरीश

असे म्हणण्याच्या ऐवजी तिच्या तोंडून शब्द बाहेर पडले ते म्हणजे—

त्राहि मंगेश

मग शंकराने व्याघ्राचे रूप टाकून आपले पूर्वीचें रूप धारण केले.

पार्वती म्हणाली—

' माझ्या तोंडून जे शब्द बाहेर पडले तेंच तुमचे नाव येथे प्रसिद्ध होऊ द्या.

म्हणून गोमंतकात शंकराला मंगेश म्हणतात.

× × ×

गणेश,

मगेशच्या खालोखाल गोव्यात शांतादुर्गेचे मंदिर प्रसिद्ध आहे श्री छत्रपती सरकारचे मंत्री नारो राम शेणवी रेगे ह्यानीं हे मंदिर बांधले. गोव्यात खूप मंदिरे आहेत पण विशेष महत्वाची गोष्ट म्हणजे तेथें असे एक मंदिर आहे की तसें मंदिर भारतात इतरत्र नाही

माशेल येथे देवकी कृष्ण मंदिर आहे भारतात कृष्णाची मंदिरे पुष्कळ आहेत, पण

## देवकी कृष्ण मंदिर

फक्त गोव्यात आहे. ज्याना मूल होत नाही अशा कितीतरी बायका या मंदिरात जाऊन नवस करतात व कृष्ण नवसाला पावला म्हणजे त्याना मूल होते.

× × ×

आम्ही गुलमर्ग येथे गप्पा मारत असताना राजकारणात रस घेणाऱ्या एका विद्वान् गृहस्थाने मला विचारले—

' आपण काश्मीर पहातो आहे. हे भूलोकीचे नंदनवन आहे. हे नंदनवन पहात असताना मनाला एक गोष्ट खटकते. पाकिस्तानने काश्मीरवर आक्रमण केले असताना आपल्या सैन्याने प्राणपणाने लढा देऊन दोन तृतीयांश काश्मीर मुक्त केले आपले सेनापती म्हणत होते की आणखी दोन तीन दिवसात राहिलेले काश्मीर आपण मुक्त करतो, पण आपल्या सरकारने सैन्याला थांबण्यास हुकूम दिला. याचा परिणाम असा झाला की आज इतकी वर्षे एक तृतीयांश काश्मीर पाकिस्तान बेकायदा बळकावून बसला आहे, व तो भाग मिळण्याच्या आपल्या आशेवर पाणी पडले आहे. काश्मीर पहात असताना ही गोष्ट मनाला सारखी खटकते गोवा पहात असतांना अशी एकादी गोष्ट मनाला खटकते का ? '

मी सांगू लागलो—

' एक गोष्ट खटकते ती अशी की—

गोवा भारतात आल्यावर तेथे ता. ९ डिसेंबर १९६३ रोजी सार्वत्रिक निवडणुका झाल्या व महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष अधिकारावर आला ह्या पक्षाचे म्हणणे असें की गोवा महाराष्ट्रात विलीन करावा

त्यानंतर २८ मार्च १९६९ रोजी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाला बहुमत मिळाले व त्या पक्षाचे सरकार अधिकारावर आले, आणि अगदी अलीकडच्या सार्वत्रिक निवडणुकीत देखील महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाला बहुमत मिळाले, व त्या पक्षाचे सरकार अधिकारावर आले

गोवा पाहून असे वाटते की गोवा हा महाराष्ट्राचा एक भाग आहे, व गोव्याचे महाराष्ट्रात विलीनीकरण होणे अगदी न्याय आहे, पण ता. १६ जानेवारी १९६७ रोजी गोव्याने महाराष्ट्रात विलीन व्हावे का केंद्रशासित राहावे ह्याबद्दल जनमताचा कौल घेण्यात आला, त्यावेळी ३,१७,६३३ इतके मतदान झाले कांही मते बाद झाली. गोव्याने महाराष्ट्रात विलीन व्हावे ह्या बाजूने १,३८,१७० मते पडली व गोवा केंद्रशासित राहवा ह्या बाजूने १,७२,१९१ मते पडली

अशा तऱ्हेने गोवा महाराष्ट्रात विलीन होण्याच्या आशेवर पाणी पडले.

लोक म्हणाले—

काश्मीरमध्ये हिंडत असताना एक तृतियांश काश्मीर आपल्या ताब्यात नाही गोष्ट जशी मनाला सारखी खटकते, त्याप्रमाणे गोव्याच्या बाबतीत तुम्ही सांगितलेली गोष्ट मनाला फार खटकण्यासारखी आहे हे अगदी खरे आहे '

× × ×

खाणे व गप्पा संपल्यावर आम्ही बसमधून परत श्रीनगरला आलो.

रात्री भोजन झाल्यावर मी व सौभाग्यवती आपल्या खोलीत आलो.

सौभाग्यवती म्हणाली—

' काश्मीर म्हणजे खरोखर पृथ्वीवरील स्वर्ग आहे. हा स्वर्ग पाहून मोगल बादशहा फार प्रसन्न झाले. बादशहा बिरबलच्या बऱ्याच गोष्टी मी वाचल्या आहेत. आज तुम्ही मला बादशहा बिरबलची एकादी नवीन गोष्ट सांगा

मी आठवल्यासारखे केले व सांगू लागलो—

ऐक, बादशहा बिरबलची गोष्ट. '

गोष्ट ह्या शब्दात मोठी जादू भरली आहे मनुष्य बाल असो तरुण असो वृद्ध असो त्याला गोष्ट ऐकण्याचे विलक्षण आकर्षण असते

सौभाग्यवती मोठ्या उत्सुकतेने ऐकू लागली व मी सांगू लागलो—

' एकदा बादशहाला वाटलं— रामाच्या चरित्रावर वाल्मीकीनी रामायण रचलं. हिंदुस्थानात रामायण फार लोकप्रिय आहे. मी देखील फार पराक्रमी व खूप लोकप्रिय आहे. माझ्या चरित्रावर देखील असेच बादशाही रामायण का रचले जाऊ नये ?

बादशहाने बिरबलाला बोलावले व आपला विचार सांगितला.

बिरबल म्हणाला—

' खाविंद, बादशाही रामायण रचता येईल पण त्या गोष्टीला सहा महिने वेळ लागेल व खूप खर्च लागेल. '

बादशहाने बिरबलाला पचवीस हजार मोहरा दिल्या व सहा महिन्यानी बादशाही रामायण तयार करून आणण्यास सांगितले

पाच महिन्यानतर बिरबल एक जाडें बाड घेऊन आला व म्हणाला—

' हुजूर, काम बरच पूर्ण झालं आहे. फक्त बेगमसाहेबाकडून थोडी माहिती घ्यावयाची आहे ती माहिती घेऊन ग्रथ पूर्ण करता येईल '

बादशहा म्हणाला—

' जा, बेगम साहेबाकडे जाऊन माहिती घे व ग्रथ लवकर पूर्ण होऊ दे.

मग बिरबल बेगमकडे गेला व म्हणाला—

' बादशहाच्या आज्ञेवरून हे जाडजूड रामायण तयार करण्यात आले आहे. आपणाला विचारून त्यात एक माहिती घालणेची आहे रामायणात रावणाने सीतेला पळवून नेऊन लकेत ठेवले होते, त्याप्रमाणे आपणाला कोणी पळवून नेले होते तें कृपा करून सांगा.

तें ऐकून बेगमसाहेबा इतक्या रागावल्या की त्यानी तो जाडजूड ग्रथ घेतला व अग्निमध्ये टाकून भस्मसात केला.

तो प्रकार जेव्हा बादशहाला कळला तेव्हा तो खजील झाला व म्हणाला—
'बादशाही रामायणाचे शेवटी असें रामायण झाले तर.'
ही गोष्ट ऐकून सौभाग्यवती म्हणाली—
'गोष्ट फारच छान आहे हं मला ती फार फार आवडली.'

× × ×

गणेश, रात्री निजण्यापूर्वी श्रीकृष्णाला नमस्कार करून मी माझ्या कॉटवर डोळे मिटून अर्धा तास बसलो व मग झोपी गेलो. या अर्ध्या तासात माझ्या मनात विचारांच्या लाटावर लाटा आल्या.

भारताबाहेरच्या कितीतरी महाभागानी पृथ्वीवरच्या निरनिराळ्या भागाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला

पृथ्वी वाटोळी आहे म्हणून एकच दिशा धरून आपण पश्चिमेकडून निघालो तर आज ना उद्या नक्की हिंदुस्थानला पोचू अशी महान् महत्वाकांक्षा धरून अटलांटिक महासागर ओलांडणारा पहिला धाडसी प्रवासी म्हणजे इटली देशात जिनोव्हा शहरात इ सन १४५१ साली जन्मलेला महात्मा कोलंबस. हा हिंदुस्थानला आला नाही तरी त्याने वेस्ट इंडीज व अमेरिका शोधून काढली.

दक्षिण अमेरिकेला वळसा घालून पहिले पृथ्वीपर्यटन करणारा व आपल्या धाडसात आपल्या प्राणाची आहुती देणारा इ. सन १४८० मध्ये जन्मलेला पोर्तुगीझ महात्मा मॅगेलन.

कोलंबस इटालियन व मॅगेलन पोर्तुगीझ, पण त्यांच्या प्रवासात मदत केली ती स्पेनने

निव्वळ शास्त्रीय ज्ञानासाठी ज्याने पृथ्वीच्या तीन सफरी केल्या व ज्याने आस्ट्रेलियाचा शोध लावला तो धाडसी महात्मा म्हणजे इ. सन १७२८ मध्ये इंग्लंडमध्ये जन्मलेला कॅप्टन कुक.

आफ्रिकेला अज्ञात खंड म्हणत असत. या अज्ञात खंडाचा शोध लावण्याचा प्रयत्न बऱ्याच लोकानी केला ज्याने सर्व प्रकारच्या सुखावर लाथ मारून दक्षिण व मध्य आफ्रिकेचा शोध केला तो महात्मा म्हणजे इ. सन १८१३ साली

जन्मलेला लंडन मिशनरी सोसायटीचा धर्मोपदेशक लिव्हिंग्स्टन. ह्या महात्म्याने सुमारे तेवीस वर्षे त्या काळचा खंडात घालवून जगाच्या इतिहासात महान् कार्य केले.

भारताबाहेरच्या लोकांनी पृथ्वीवरच्या विरविराळ्या भागाचा शोध केला व भारतातील महात्म्यांनी अंतरंगाचा शोध केला. हा शोध करताना त्याना कळून आले की ईश्वर दुसरीकडे कोठे नसून तो आपल्या अंतःकरणात आहे.

( १ ) यम ( २ ) नियम ( ३ ) आसन ( ४ ) प्राणायाम( ५ ) प्रत्याहार ( ६ ) धारणा ( ७ ) ध्यान व ( ८ ) समाधि—

हा अष्टांग योग फार कठीण आहे. आपल्या पूर्वजांना असेहि कळून आले की—

### ईश्वरप्रणिधानात् वा

अष्टांग योगाने समाधि साधते, पण हा योग कठीण आहे. सोपा मार्ग म्हणजे भक्तिमार्ग. ईश्वराची परमोच्च व निस्सीम भक्ति केल्यानेहि समाधि साधते.

माणसाला चमत्काराची फार आवड असते त्याला वाटते आपल्याला एखादी सिद्धि प्राप्त झाली तर किती मजा होईल !

आपल्या पुर्वजांनी अष्टांग योगाबरोबर आठ सिद्धीचा विचार केला आहे व त्या कशा प्राप्त होतात त्याचे विवेचन केले आहे. ह्या आठ सिद्धींची नुसती नांवे वाचली तरी मन मोहून जाते.

( १ ) अणिमा सिद्धि– ( अणुएवढा सूक्ष्म आकार धारण करण्याची सिद्धि )

( २ ) लघिमा सिद्धि– ( वाऱ्याबरोबर सहज जाता येईल असा हलकेपणा शरीरास येणे )

( ३ ) गरिमा सिद्धि– ( दगडाप्रमाणे शरीरास घट्ट आकार येणे )

( ४ ) महिमा सिद्धि– ( चंद्रासारख्या वाटेल तेवढ्या दूरच्या ठिकाणास स्पर्श करण्याची शक्ति प्राप्त होणे )

( ५ ) प्राकम्य सिद्धि– (वाचासिद्धि– आपण जे जे बोलू ते ते खरे होणे )

( ६ ) ईशत्व सिद्धि– ( शरीर व मन ह्यावर विजय मिळविणे )

( ७ ) वशित्व सिद्धि– ( सर्व प्राणिमात्रावर सत्ता चालवता येण्याची शक्ति प्राप्त होणे )

( ८ ) ईशित्व सिद्धि– ( निराळे प्राणी उत्पन्न करणेची शक्ति प्राप्त होणे )

अशा महान् सिद्धींचा विचार करून आपल्या पूर्वजानी बजावले की—

ईश्वर प्राप्तीच्या मार्गात ह्या सिद्धी म्हणजे अडथळे आहेत.

× × ×

रामकृष्ण परमहंस विवेकानंदाना म्हणाले—

' मला अष्टसिद्धि प्राप्त झाल्या आहेत, पण त्यांचा मी उपयोग केला नाही. तुला त्यांचा उपयोग होऊ शकेल ह्या सिद्धि मी तुला देऊ का ? '

विवेकानंद म्हणाले— ' ह्या सिद्धीमुळे ईश्वर प्राप्ति होऊ शकेल का ? '

रामकृष्ण म्हणाले—

' नाही. '

विवेकानंद म्हणाले—

' तर मग मला त्या सिद्धि नकोत '

× × ×

आपल्या अंतरंगात असलेल्या ईश्वराचा शोध व बोध घेणे ह्यातच आनंदाचा कंद, आनंदाचा आनंद व परमानंद असतो.

गीता सांगणाऱ्या कृष्ण कन्हय्याचा हाच महान् सिद्धांत आहे. त्या कन्हय्याला नमस्कार करून कितीतरी लोकानी मानवतेचे मंदिर उभारले आहे.

नमुनी ज्यानी गीता कृष्णेश्वर ।
उभारिले मानवतेचे मंदिर ।
परी जयांच्या स्मशानभूमीवर ।
नाही कांही स्मारक जरी ।
राम तेथे नमन करी ॥

× × ×

×

गणेश,

रोज झोपण्यापूर्वी कृष्णाला नमस्कार करून डोळे मिटून मी विचार सागरात बुडून जातो. मला वाटते—

डोळे उघडून आपण जितके पाहू शकतो त्यापेक्षा डोळे मिटून जास्त पाहू शकतो

असो.

यापुढे आम्ही पहलगावला जाणार आहो.

पुढचे पत्र पहलगावला गेल्यावर

तुझा

राम

# पत्र ११ वे

प्रिय गणेश,

आम्ही श्रीनगरहून बसने पहलगावला निघालो. पश्चिम महाराष्ट्राचे महाबळेश्वर हें थंड हवेचे ठिकाण आहे. त्याप्रमाणे पहलगाव हें काश्मीरचे थंड हवेचे ठिकाण आहे.

उन्हाळ्यात देखील आपणाला काश्मीर थंड वाटते. अशा ह्या थंड काश्मीरचे थंड हवेचे ठिकाण म्हणजे पहलगाव.

पहलगाव हे श्रीनगरपासून ९६ किलोमिटर आहे व समुद्रसपाटीपासून सात हजार फुटावर आहे.

काश्मीरमध्ये कांही लोक गीतेला गीतामय्या म्हणतात म्हणून आम्ही पहलगावला निघालो असताना माझ्या मनात कृष्णकन्हय्या व गीतामय्या ह्याबद्दल विचारांच्या लाटावर लाटा येत होत्या. केव्हा केव्हा ह्या विचारांना परतत्त्वाचा स्पर्श होत होता. त्यावेळचा आनंद शब्दांनी सांगण्याच्या पलीकडचा होता

मुक्याने साखर खावी, पण त्याबद्दल त्याला सांगता येऊ नये असा प्रकार होत होता

× × ×

कृष्णाने गीतेत जे विचार सांगितले आहेत, त्यामध्ये सर्वोत्कृष्ट विचार म्हणजे ईश्वर आपल्या अंतःकरणात आहे.

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।

परमार्थाच्या प्रांतात आपण वर वर गेलो म्हणजे हा ईश्वर आपणाला दिसतो व तो आपल्याशी बोलू लागतो. एकांती तो आपला सांगाती होतो व लोकांती त्याच्या आदेशाप्रमाणे आपण वागण्याचा प्रयत्न करतो.

ईश्वर आहे कां नाही ? ह्या प्रश्नाचे उत्तर तत्वज्ञानी तर्कवितर्कांचे जाळे विणून देतात. कोणी म्हणतात ईश्वर असला पाहिजे तर कोणी म्हणतात ईश्वर नसला पाहिजे

आपणाला ईश्वर अंतःकरणात दिसू लागला म्हणजे, तर्कवितर्काला जागाच रहात नाहीं.

मला समोर टेबल दिसत आहे लोकांनी कितीहि तर्कवितर्क लढवून असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला की येथे टेबल नाही तर मला ते कसे पटावे ?

मी प्रत्यक्ष टेबल पहात असताना तर्कवितर्कांची मला आवश्यकताच नसते. ज्याना टेबल दिसत नाही ते अंधारात चाचपडतात व तर्कवितर्क लढवून टेबलाच्या अस्तित्वाबद्दल निर्णय करतात. विशेष आश्चर्याची गोष्ट अशी की अंधारात चाचपडत असताना टेबलाला स्पर्श देखील न करता हे लोक जो प्रकाश देत नाहीं, असा तर्कवितर्कांचा टॉर्च घेऊन टेबलाच्या अस्तित्वाबद्दल आपलें मत देतात

अंतःकरणातला हा देव आपणाला दिसू लागला म्हणजे लोकाना आपण खऱ्या अर्थाने कांही देऊ शकतो.

आपण व्याकरणशुद्ध बोलतो, कां आपली भाषा लालित्याने नटलेली वा नटवलेली आहे ह्या गोष्टीला महत्व नसून, लोकाना देण्यासारखे आपल्याजवळ कांही आहे का ह्या गोष्टीला खरें महत्व आहे.

आपल्या अंतःकरणातील देवाचे आपणाला दर्शन झाले म्हणजे केव्हा केव्हा असा चमत्कार होतो की आपण कांहीहि न बोलता आपल्या मनातील भाव दुसऱ्याच्या मनात–संचारित करतो. आपले मौन हेच व्याख्यान होते.

संस्कृतमध्ये एक सुंदर श्लोक आहे—

चित्रं वटतरोर्मूले वृद्धाशिष्या गुरुर्युवा ।
गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्यास्तु छिन्नसंशयाः ।।

( केवढे आश्चर्य आहे वटवृक्षाखाली एक तरुण गुरु व त्याचे वृद्ध शिष्य बसले आहेत मौन हेच गुरुचे व्याख्यान आहे, पण तशल्या व्याख्यानानेच शिष्यांच्या शंका फिटल्या आहेत )

आपण एकादा गुरु करतो. जो गुरु आपणाला अंत:करणातील देवाकडे नेण्याचा प्रयत्न करतो व सांगतो की तो देवच तुझा गुरु आहे– तोच गुरु, गुरु ह्या पदवीला पात्र आहे

आपण एकदा गुरु करतो व त्याला सर्वस्व अर्पण करतो. तो गुरु म्हणतो की—

तू माझे ऐक मीच ब्रह्म आहे, मीच विष्णु आहे, मीच महेश आहे. मी सारे काही करत आहे तू फक्त माझी सेवा करणेची. मग तुला काही करणेचे नाही

असला गुरु परमार्थाच्या प्रांतात बुवाबाजी करत असतो व कितीतरी अजाण लोकाना आपल्या जाळयात ओढून स्वत:चा धंदा चालवत असतो. हा धर्माचा धंदा करतो.

गीता वाचून आपणाला कळते की—

धर्माचा धंदा न करता आपण धंद्याचा धर्म करावा.

× × ×

गोपीनी कृष्णकन्हय्यावर जे प्रेम केले ते प्रेमोच्च प्रेम होते, पराप्रेम होते, अपरंपार प्रेम होते ते प्रेमाकरता प्रेम होते गोपीना कसलीहि अपेक्षा नव्हती, त्याना स्वर्गसुखाची अभिलाषा नव्हती; त्याना इहलोकांतील किंवा परलोकांतील कोणत्याहि सुखाची कामना नव्हती.

ज्याना गोपींचे अगाध अपार व अफाट प्रेम कळले, त्याना गीतेचा गाभा कळू शकतो

गोपीनी ज्याप्रमाणे कोणत्याहि फलाची अपेक्षा न करतां प्रेमाकरता प्रेम केले, त्याप्रमाणे फलाची अपेक्षा न करता आपण कर्तव्याकरता कर्तव्य करणेचे आहे.

Duty for Duty's sake हा गीतेचा महान् संदेश आहे.

अंत:करणातील देवाला स्मरून आपण कर्म करू लागलो म्हणजे ते कर्म करताना आपणाला परमानद होत असतो. हा परमानंद हेंच त्या कर्मांचे मुख्य फळ असते ते कर्म करताना कांही लाभ होणे हे त्या कर्माचे दुय्यम फळ असते.

आपली सारी मदार असल्या दुय्यम फळावर असते. त्यामुळे आपण मुख्य फळाला आंचवतो.

दुय्यम फळ मिळो वा न मिळो, आपण मुख्य फळ सोडता कामा नये.

आपण देवाची पूजा करतो ती पूजा करताना आपणाला परमानद होत असेल तरच त्या पूजेला अर्थ आहे. परमानद हेंच त्या पूजेचे खरे फळ आहे. देवा मी तुझी पूजा करतो, तू मला अमूक अमूक दे असे म्हणून जेव्हा आपण देवाची पूजा करतो, तेव्हा त्या पूजेतील परमानद आपण हिरावून बसतो

आपण कर्तव्यकर्मांच्या पुष्पानी अंत:करणातील देवाची पूजा करावी ही पूजा करत असताना परमानंद होत असतो, तेंच त्या कर्मांचे खरे फळ आहे. हें फळ आपण कदापि सोडता कामा नये. आपली सारी आसक्ति ह्या फळावर ठेवावी. ह्या फळावर आपली आसक्ति केंद्रित झाली, म्हणजे दुय्यम फळा-बद्दल अनासक्ति निर्माण होते. जय होवो, पराजय होवो आपणाला त्याबद्दल फारसे कांही वाटत नाही.

गूह्य गोष्ट अशी आहे की दुय्यम फळावर आसक्ति ठेवून व मुख्य फळावर आसक्ति न ठेवता आपण कर्म करू लागलो म्हणजे जितके दुय्यम फळ मिळण्याचा संभव असतो त्यापेक्षा मुख्य फळावर आसक्ति ठेवून व दुय्यम फळावर आसक्ति न ठेवता आपण कर्म करु लागलो म्हणजे जास्त दुय्यम फळ मिळण्याचा संभव असतो

× × ×

आपण शारीरिक खेळ खेळतो खेळताना आनद होतो. आनद होणे हे खेळाचे मुख्य फळ आहे. शारीरिक प्रकृती सुधारणे हे दुय्यम फळ आहे. ह्या दुय्यम फळाची आसक्ति न करता मुख्य फळावर आसक्ति ठेवून आपण खेळ खेळला तरच त्या खेळाला मजा येते. दुय्यम फळावर आसक्ति न ठेवता

मुख्य फळावर आसक्ति ठेऊन आपण शारीरिक खेळ खेळू लागलो तर शारीरिक प्रकृति सुधारणे हे दुय्यम फळ मिळण्याचा जास्त संभव असतो. ह्या उलट मुख्य फळावर आसक्ति न करता दुय्यम फळावर आसक्ति करून आपण शारीरिक खेळ खेळूं लागलो तर दुय्यम फळ मिळण्याचा संभव पूर्वीपेक्षा कमी असतो.

आपले जीवन देखील एक खेळ आहे. कृष्ण कन्हय्याचा संदेश असा आहे की—

मुख्य फळाबद्दल आसक्ति
दुय्यम फळाबद्दल अनासक्ति
हीच कन्हय्याची भक्ति
याने मिळेल शांति

× × ×

आपण चालतो तेव्हा प्रथम पोट पुढे जाते, मग डोके पोटाची विवंचना संपल्यानतरहि चालताना प्रथम पोट पुढे जाते मग डोके. गीता वाचून आपणाला कळू लागते की—

पोटाची विवंचना जरूर करा, पण ती संपल्यानतर प्रथम डोके पुढे जाऊ द्या.

आपले डोके पुढे जाते पण ते केव्हा ? तर म्हातारपणी कंबर वाकली व वाकून आपण चालू लागतो तेव्हा ? पण आता फार उशीर झालेला असतो. आता जगाला रामराम ठोकण्याची वेळ आलेली असते.

× × ×

धर्माच्या नावावर आजपर्यंत जगात जितका छळ झाला आहे तितका दुसऱ्या कोणत्याहि नावावर नाही.

जो धर्म दुसऱ्यांचा द्वेष करावयास शिकवतो तो धर्मच नव्हे. जो धर्म आपल्या अंतरंगातील देवाचा शोध व बोध घेण्यास शिकवतो तोच धर्म. माणसे जोपर्यंत बहिर्मुख आहेत तोपर्यंत खऱ्या अर्थाने तो धार्मिक होणार नाहीत. मनुष्य अंतर्मुख झाल्याशिवाय तो धार्मिक होत नाही.

× × ×

आपण आपल्याच रंगाने सर्व जग रंगवून टाकतो. पोवाड्यात ' जी जी र जी ' हे पालूपद असते त्याप्रमाणे आपल्या जीवनात ' मी मी र मी ' हे पालूपद असते रेशमी किडा स्वतःच्याच शरीरातून धागा काढून जाळे तयार करतो आणि आश्चर्य म्हणजे केव्हा केव्हा स्वतःच त्यांत अडकतो. मनुष्य मी च्या स्वार्थाचा धागा काढून जाळे तयार करतो व आपल्या कर्मानेच त्यात बद्ध होतो. गीतेची मदार निष्कर्मी होण्यावर आहे. ' मी ' नाहीसा करून जो कर्म करतो तो निष्कर्मी. कर्म बंधनातून सुटका होण्याकरता कर्म सोडणेचे नाही, तर मी सोडून कर्म करणेचे.

× × ×

आपण दुसऱ्याना सहाय्य करतो, दुसऱ्यावर उपकार करतो, ह्या भावनेने कर्म केले म्हणजे अपेक्षाभंगाचे दुःख येण्याचा संभव असतो

उपकार अथवा सहाय्य ह्या भावनेला तिलांजली देऊन आपण आपल्या कर्मांनी आपल्याच अंतरंगातील देवाची पूजा करत आहो ह्या भावनेने कर्म केले म्हणजे अपेक्षा भंग न होता अभंग आनंद प्राप्त होतो.

× × ×

वासनेच्या पलीकडे गेल्याशिवाय देव भेटत नाही आपणाला अनुभव येतो की—

जेथे राम तेथे काम नाही,
जेथे काम तेथे राम नाही

× × ×

कृष्णाने आपल्या जीवनांत जे तत्वज्ञान आचरून दाखविले त्या तत्वज्ञानाची गाथा म्हणजे गीता.

ह्या गीतामंदिराचा पाया आहे अनासक्ति. ह्या मंदिराचे चार स्तंभ आहेत— ज्ञान, ध्यान, कर्म व भक्ति आणि ह्या मंदिराचा सुवर्णकळस आहे पराशांती.

× × ×

पहलगावला जात असताना वाटेत आम्ही अवंतीपुरला उतरलो. अवंतीपूर श्रीनगरपासून ३० किलोमिटर अंतरावर आहे. महाराजा अवंतीवर्मनने

( इ. स. ८५५–८८३ ) अवंतीपुर गाव वसवले व येथे त्याने एक विष्णूचे सुंदर मंदिर बांधले. आता त्या ठिकाणी मंदिराचे भग्न अवशेष दिसतात.

महाराजा अवंतीवर्मनने एक शिवाचे मंदिर देखील बांधले होते

कांही लोक शिव भक्त असतात, तर कांही लोक विष्णु भक्त असतात. एका काळी स्मार्त व वैष्णव ह्यामध्ये फार वाद होता.

एकदा मी व एक मिनिस्टर फिरायला निघालो होतो. हे मंत्रिमहाशय वैष्णव होते वाटेंत एक शिवालय लागले तेव्हा मी आत जाऊन नमस्कार केला पण मंत्रिमहाशय आत आले नाहीत. त्यांची अशी समजूत होती की—

वैष्णवानी विष्णूच्या, कृष्णाच्या, रामाच्या देवळात जावयाचे, पण शंकराच्या देवळात जाणेचे नाही

मला वाटले—

हिंदू धर्माचे जर कोणी नुकसान केले असेल तर असल्या कोत्या समजुतींनी.

अवंतीपूरला विष्णूच्या देवळाचे भग्न अवशेष पहात फिरत असताना एकाने मला विचारले—

'संत प्रवृत्तिमार्गी कां निवृत्तिमार्गी ? अध्यात्माच्या प्रांतात द्वैत खरे कां अद्वैत खरे ? '

मी सांगू लागलो—

" संत प्रवृत्तिमार्गी कां निवृत्तिमार्गी ? ह्याचे उत्तर ' कां ' च्या जागी ' व ' घालून द्यावे लागेल व असें म्हणावे लागेल की ' संत प्रवृत्तिमार्गी व निवृत्तिमार्गी. '

स्त्रिचे कार्यक्षेत्र सासरी असते पण तिचा ओढा माहेराकडे असतो. संतांचे निवृत्ति हें माहेर असते तर प्रवृत्ति हें सासर असते. मनी निवृत्त जनी प्रवृत्त–असे ते असतात.

पक्ष्याला दोन पंख असल्याशिवाय आकाशांत उडता येत नाही. एका पखाने तो आकाशांत उडू शकत नाहीं संतांना दोन पख असतात. एका पंखाचे नाव प्रवृत्ति व दुसऱ्या पंखाचे नांव निवृत्ति. ह्या दोन पंखांच्या आधारावर संत परमार्थाच्या आकाशांत उंच उडतात.

द्वैत व अद्वैत ह्या बाबतीत अनुभवाचे बोल असे की—

भक्ति करत असताना मी भक्त तो देव असा द्वैतभाव असतो, पण नंतर जिवा-शिवाचे मीलन होते, आत्मा परमात्मा ह्यांचे ऐक्य होते असा अनुभव येतो म्हणून सूत्रबद्ध भाषेत सांगायचे म्हणजे—

भक्तित द्वैत, पण अनुभूतीत अद्वैत.'

× × ×

अवंतीपूर पाहून आम्ही कोकरनागला गेलो. येथे फार मोठा गोड पाण्याचा झरा आहे हे ठिकाण श्रीनगरपासून ७९ किलोमिटर अंतरावर आहे.

या गोड पाण्याचा गुण असा आहे की—

हे पाणी प्याल्याने भूक वाढते व अन्न पचते.

किती तरी लोक मुद्दाम हे पाणी पिण्यासाठी येतात

आम्ही सारे प्रवासी मोठ्या आनंदाने हे पाणी प्यालो त्यावेळी आणखी कितीतरी लोक हे पाणी पिण्यासाठी आले होते.

मनुष्य कोणत्याहि जातीचा असो, कोणत्याहि धर्माचा असो, महार असो, चांभार असो—

त्याला येथे पाणी पिण्यास मज्जाव नाही.

येथे कोणालाहि मज्जाव नाही हे पाहून आम्हाला फार बरे वाटले.

ज्यांनी महाभारताचा खूप अभ्यास केला आहे असे एक विद्वान् गृहस्थ मला म्हणाले—

'भारताचा उत्कर्ष होण्यासाठी जातीवाद गाडला पाहिजे मनुष्य हीन जातीचा म्हणून त्याला वेगळी वागणूक, हा प्रकार बंद व्हायला पाहिजे. महाभारतात एकलव्याची जी गोष्ट आहे ती म्हणजे आपल्या संस्कृतीवर कालिमा फासणारी आहे. एकलव्य हीन जातीचा म्हणून द्रोणाचार्य त्याला विद्या शिकवत नाहीत, व तो अर्जुनापेक्षा वरचढ होऊ नये म्हणून त्याच्यापासून अंगठा तोडून मागतात, हा सारा प्रकार नितांत निंद्य आहे. तुम्हाला काय वाटते ?'

मी म्हटले—

'मनुष्य हीन जातीचा म्हणून त्याला विद्येपासून वंचित करणे बरे नाही ह्यात वाद नाही, पण ती जी गोष्ट सांगण्यात आली आहे त्याचा मुख्य उद्देश भक्तिचा महिमा सांगणे हा आहे

ती गोष्ट अशी आहे—

हिरण्यधेनुक नावाच्या निषादपतीला एकलव्य नावाचा मुलगा होता. त्याला वाटत होते की आपण पांडवांच्याप्रमाणे द्रोणाचार्यांचे शिष्य व्हावे पण द्रोणाचार्यांनी तें कबूल केले नाही मात्र द्रोणाचार्यांनी आपल्या पादुका त्यास दिल्या. त्याने त्या पादुका घेतल्या, द्रोणाचार्यांची मातीची मूर्ति तयार केली. त्या मूर्तीपुढे पादुका ठेवून निस्सीम भक्तिभावनेने तो धनुर्विद्या शिकू लागला. प्रत्यक्ष द्रोणाचार्य अर्जुनाला धनुर्विद्या शिकवत होते, पण हा एकलव्य द्रोणाचार्यांचे नाव घेऊन व त्यांच्या मूर्तीला व पादुकांना भक्तिभावनेने नमस्कार करून धनुर्विद्या शिकत होता. परिणाम असा झाला की भक्तीच्या जोरावर एकलव्य धनुर्विद्येमध्ये अर्जुनापेक्षा श्रेष्ठ झाला. रामायणात असे सांगण्यात आले आहे की सेतु बांधण्याच्या वेळी प्रत्यक्ष रामाने समुद्रात धोंडे टाकून पाहिले पण ते तरले नाहीत, मात्र वानरांनी रामाचे नाव घेऊन धोंडे समुद्रात टाकले व ते धोंडे तरले. ह्या गोष्टीचे जें रहस्य आहे तेंच रहस्य एकलव्याच्या गोष्टीचे आहे—'

ते विद्वान् गृहस्थ म्हणाले—

'तुम्ही मला नवीन प्रकाश दाखवला पण द्रोणाचार्यांनी एकलव्याकडून गुरुदक्षिणा म्हणून त्याचा अंगठा तोडून मागितला हे निंद्य नाही का ?'

मी म्हटले—

'पूर्वीच्या लोकांची भाषा समजण्याकरता वरवर पाहून चालत नाही तर सखोल विचार करावा लागतो असें सांगण्यात आले आहे की कृष्ण एकशेवीस वर्षांचा झाल्यानंतर व यादवी झाल्यानंतर तो एका झाडाखाली प्राणाचा निरोध करून जगाला राम राम ठोकण्याकरता बसला असताना एका व्याधाने त्याच्या पायाचा तळवा मृगाचे तोंड समजून तेथे बाण मारला व त्यामुळे कृष्णाचा प्राण गेला शंका अशी की पायाच्या तळव्याला बाण मारला तर मनुष्य कसा मरेल ? सखोल अभ्यास केला म्हणजे कळून येते की—

त्या व्याधाचे नाव 'जरा' असे देण्यात आले आहे तें रूपक आहे. जरा म्हणजे म्हातारपण. कृष्ण वृद्ध झाला होता. म्हातारपणाचा बाण लागला. कृष्णाने बळरामाप्रमाणे प्राणांचे निरोधन करून जगाचा निरोप घेतला.

आता आपण एकलव्याकडे येऊ. गुरुदक्षिणा म्हणून द्रोणाचार्यांनी एकलव्याकडे त्याचा अंगठा मागितला याचा अर्थ एकलव्याने आपला अंगठा तोडून द्रोणाचार्यांना दिला असे नव्हे, तर ह्यापुढे बाण मारताना आपण आंगठ्याचा उपयोग करणार नाही असें कबूल केले.

तुम्हाला माहित असेल की—

कोळी व किरात हे बाणाला आंगठ्याचा स्पर्श न करता बाण मारतात.

भक्तीच्या जोरावर एकलव्य धनर्विद्येमध्ये इतका प्रवीण झाला होता की बाणाला आंगठ्याचा स्पर्श न करताहि त्याला उत्तम तऱ्हेने बाण मारता येत असे.

एकलव्याची गोष्ट म्हणजे जातीची व्यथा नसुन भक्तीची कथा आहे

माझे हें उत्तर एकून ते विद्वान् गृहस्थ म्हणाले—

' साहेब, तुम्ही जी मला नवीन दृष्टि दिली त्याबद्दल शतश. आभार

× × ×

कोकरनागपाहून आम्ही वाटेत अच्छाबल पाहिले.

अच्छाबल श्रीनगरपासुन ४० मैल अंतरावर आहे पूर्वी राजा अक्ष काश्मीरवर राज्य करत होता. त्याच्या नावावरून या जागेला अक्षाबल असें नाव पडले. पुढे अक्षाबलचे अच्छाबल झाले. शहाजहानच्या मुलीने येथे इ. स. १६४० मध्ये सुंदर बाग तयार केली ही बाग पहाणेकरता प्रवासी मोठ्या संख्येने येथे येतात. ही बाग ४६७ फूट लांब व ४५ फूट रुंद आहे चारी बाजूला दगडाच्या भिंती आहेत. चारी बाजूला पर्वतमाला दिसते. कितीतरी पाण्याचे झरे वाहतात आणि त्याचे पाणी ह्या बागेतून खेळवले आहे. हा देखावा पहात असताना मन अगदी प्रसन्न होते.

अच्छाबल पहात असताना माझ्या मनात विचार आले—

' वैदिक वाङ्मयातुन निरनिराळे झरे वाहू लागले. वैदिक वाङ्मय प्रवाही परिवर्तनशील व समावेशक आहे, पण ह्या वाङ्मयातुन निघणारे कांही झरे समतेचा पाठपुरावा करणारे तर काही झरे विषमतेचा पाठपुरावा करणारे आहेत हे विरोधी झरे कांही काळ समांतर वाहतात, तर कांही काळ एकमेकात मिसळून पुन. विरोधी स्वरूपात वेगवेगळे वाहतात.

वैदिक वाङ्मयापासून स्फूर्ति घेऊन धर्म सुधारणा करणाऱ्यामध्ये सर्वश्रेष्ठ धर्मसुधारक म्हणजे श्रीकृष्ण Revival ( पुनरुज्जीवन ), Reform ( परिवर्तन ) व Revolution ( क्रांती ) ह्या तीन्हींचा आधार घेऊन त्याने जो गीताधर्म सांगितला तो विश्वधर्म आहे. गीता ही भारतासाठी आहे असे ज्याना वाटते त्याना गीता कळली नाही गीता ही साऱ्या जगासाठी आहे. गीता म्हणजे मांगल्याचे माहेर, दिव्य विचाराचे भांडार, आनंदाचे आगार व विश्वधर्माचा आधार आहे. '

× × ×

अच्छाबल पाहून झाल्यावर आम्ही पहलगांवला आलो व येथे दोन दिवस मुक्काम केला.

श्रीनगरमध्ये राहत असताना आम्हाला जो आनंद होत होता, त्यापेक्षा काश्मीरच्या ह्या थंड हवेच्या ठिकाणी आम्हाला जास्त आनंद वाटू लागला

आमचे हॉटेल फार चांगले आहे. मला व सौभाग्यवतीला एक स्वतंत्र खोली मिळाली. ह्या दोन दिवसात आम्ही आसपासची छोटी छोटी ठिकाणे पाहिली जवळच ममलेश्वराचे देऊळ आहे. थोड्या अंतरावर पांडवांनी बांधलेले एक देऊळ आहे.

पहलगावला लोक येतात व काही लोक अमरनाथच्या यात्रेकरता निघतात अमरनाथला जाण्याकरता घोडे व डांडी मिळते. काही लोक अमरनाथपर्यंत पायी देखील प्रवास करतात.

अमरस्थान समुद्रसपाटीपासून १३००० फूट ऊंचावर आहे

श्रावणाच्या पौर्णिमेला अमरनाथच्या शिवलिंगाचे दर्शन घेण्याकरता खूप यात्रेकरू जातात

श्रीनगरपासून अमरनाथ ८८ मैल अंतरावर आहे.

अमरनाथची गुहा ६० फूट लांब व २५ फूट रुंद व १५ फूट उंच आहे. या ठिकाणी बर्फाचे शिवलिंग बनते.

कितीतरी यात्रेकरू व खूप साधु लोक या यात्रेला जातात व श्रावण पौर्णिमेला बनणारे बर्फाचे शिवलिंग पाहून पावन होतात.

आम्ही अमरनाथला गेलो नाही कारण आम्ही मे मध्ये काश्मीर सहल केली त्यावेळी अमरनाथला यात्रा जात नव्हती आम्ही अमरनाथला गेलो नाही पण त्याबद्दल माहिती घेऊन दुधाची तहान ताकावर भागवली.

अमरनाथबद्दल स्वामी विवेकानंदांनी जे म्हटले आहे ते मला आठवले.

स्वामी विवेकानंद म्हणत की—

अमरनाथची यात्रा पाहिली म्हणजे धर्माचा जोर किती जबरदस्त असतो ते कळून येते. अमरनाथने अध्यात्माची ज्योत लोकांच्या हृदयात तेवत ठेवली आहे.

पहलगावच्या मुक्कामात कृष्ण कन्हय्याच्या शिकवणीबद्दल माझ्या मनात नाना तऱ्हेचे विचार येत होते. पहिल्या रात्री झोपण्यापूर्वी मी माझ्या डायरीत लिहिले—

In the teachings of Shrikrishna, we find the quintessance of religion. The religion propounded by Krishna in the Geeta is world religion, which is both practical and philosophical, material and spiritual, human and divine.

× × ×

दुसऱ्या दिवशी आम्ही गप्पा मारत असताना एका विद्वान् गृहस्थाने मला विचारले—

साहेब, काही लोक म्हणतात की जो कोणी एखाद्या गोष्टीत श्रेष्ठ असतो, तो सर्वच गोष्टीत श्रेष्ठ असतो म्हणूनच कार्लाइलने म्हटले आहे की

A hero is a hero at all points

तुम्हाला काय वाटते ? तुम्ही गीता सांगणाऱ्या कृष्ण कन्हय्यांच्या चष्म्यातून मानवी जीवनाकडे पहाता. ह्या मताबद्दल तुम्हाला काय वाटते?'

मी म्हटले—

हे मत बरोबर नाही. उदाहरणार्थ किती तरी लोकांच्या गोष्टी सांगता येतील तुम्ही न्यूटनला फार मोठे मानता. न्यूटन फार मोठा होता यात वाद नाही त्याने गुरुत्वाकर्षणाचा शोध लावला त्यामुळे लोक त्याला फार मोठा मानत होते, पण सर्वच बाबतीत तो मोठा नव्हता—

ते विद्वान् म्हणाले—

'तुमच्या म्हणण्याच्या पुष्टयर्थ न्यूटनच्या दोन तीन गोष्टी सांगू शकाल कां ?—'

मी सांगू लागलो—

फार मोठा असणारा न्यूटन वक्तृत्वाच्या बाबतीत अगदीच कच्चा होता पार्लमेंटमध्ये तो मेंबर झाला लोकांना वाटले की आता न्यूटनचे भाषण म्हणजे वक्तृत्वाची मेजवानी होईल पण पार्लमेंन्टमध्ये बोलणे न्यूटनला जमले नाही. एकदा न्यूटन आपल्या जागेवर उभा राहिला. लोकांना वाटले—आता न्यूटन बोलणार. लोक कान टवकारून त्याचे भाषण ऐकण्याकरता उत्सुक झाले न्यूटन इतकेच म्हणाला—

वारा अंगाला झोंबतो आहे. कृपा करून त्या खिडक्या बंद करा.

इतकेच बोलून न्यूटन खाली बसला.—'

ते विद्वान् गृहस्थ म्हणाले—

साहेब, तुमची ही गोष्ट फार मार्मिक आहे; न्यूटनची आणखी एकादी गोष्ट सांगा.'

मी सांगू लागलो—

'फार मोठा असणारा न्यूटन स्मरणशक्तीच्या बाबतीत कच्चा होता. एकदा न्यूटन कामात होता. एक मनुष्य त्याला भेटायला आला. न्यूटन आत कामात होता. तो मनष्य बाहेर बसून राहिला. बराच वेळ तो मनुष्य बाहेर आला नाही जेवणेची वेळ झाली तरी न्यूटन आतच. न्यूटनच्या नोकराने बाहेरच्या खोलीत जेवणाचे ताट आणले व एका टेबलावर आणून ठेवून ते झाकून ठेवले. त्या माणसाला वाटले—उशीर झाल्यामुळे आपल्याच करता हे ताट आणले आहे. त्याने जेवून घेतले व ताट पूर्वीप्रमाणे झाकून ठेवले.

थोड्या वेळाने न्यूटन बाहेर आला व नमस्कार चमत्कार झाल्यावर त्या गृहस्थाला म्हणाला—

तुम्ही बसा. मी जेऊन घेतो. माझी जेवणाची वेळ झाली आहे
न्यूटन जेवणाच्या टेबलाजवळ गेला.

त्या गृहस्थाला वाटले— आपण फार चूक केली न्यूटनकरता आणलेले जेवण आपणच फस्त केले. आता बोलावे काय ते त्या गृहस्थाला कळेना

न्यूटन जेवणाच्या टेबलाजवळ गेला त्याने झाकण काढून पाहिले व त्याला कळले की कोणीतरी जेवले आहे.

न्यूटन त्या गृहस्थास म्हणाला—

" हे पहा. माझे पुष्कळ वेळा असं होत. स्मरणशक्ति मला दगा देते. आताच पहाना. खरं म्हणजे जेवण करून मीच ताट झाकून ठेवले, पण ते मी विसरलो व पुन जेवणेस बसलो "

ही गोष्ट ऐकून ते विद्वान गृहस्थ म्हणाले—

" साहेब, ही गोष्ट तर फारच बहारदार आहे आता न्यूटनची आणखी एक गोष्ट सांगा "

मी सांगू लागलो—

" तिसरी गोष्ट अशी की— न्यूटनच्या घरांत एक मांजरी होती रात्री ती व तिचे पिल्लू बाहेर असायचे व रात्री केव्हातरी आत येण्याकरता म्यांव म्यांव असा पुकारा करायचे बिचारा न्यूटन उठायचा व दार काढून त्यांना आत घ्यायचा

हा त्रास चुकवण्याकरता त्याने सुताराला बोलावले व सांगितले—

दाराला दोन भोके पाड, एक मोठे व दुसरे लहान रात्री मोठ्या भोकातून मांजरी आत येईल व लहान भोकातून तिचे पिल्लू आत येईल.

सुताराने दाराला एकच मोठे भोक पाडले.

ते पाहून न्यूटन म्हणाला—

' तुला मी दोन भोके पाडण्यास सांगितली होती ना ? '

सुतार म्हणाला—

' मोठ्या भोकातून मांजरी आत येईल व त्याच भोकातून पिल्लू देखील आत येईल. '

न्यूटन म्हणाला— ' अरे खरच तुझ म्हणण बरोबर आहे. '

एवढ्या मोठ्या न्यूटनला ही साधी गोष्ट देखील सुचली नाही "

ते विद्वान् गृहस्थ म्हणाले— साहेब, गोष्ट असावी तर अशी असावी. तुम्ही सांगितलेल्या गोष्टी ऐकून माझी खात्री झाली की— A hero is a hero at all points हे कार्लाइलचे मत बरोबर नाही. ''

× × ×

गणेश

पहलगामची हवा मस्त आहे. येथील सृष्टिसौंदर्य नयनमनोहर आहे. मला व सौभाग्यवतीला देण्यात आलेली खोली सर्व सोयींनी परिपूर्ण आहे.

हनीमूनसाठी नवरा बायको महाबळेश्वराला जातात व शृंगाराची मजा लुटतात

आमच्या खोलीत सारे गार गार आहे, पण शृंगार नाहीं. आम्ही दोघे कृष्णप्रेमाने भारून गेलो आहे व कामाच्या पलीकडे गेलो आहे. या अवस्थेत जो आनंद आहे तो कामसुखाने प्राप्त होणाऱ्या आनंदापेक्षा हजारोपटीने मोठा आहे

जो सेवी तोचि चवी जाणे ।

हेंच खरें. आम्हाला आता अनुभव येतो आहे की—

मनांत संपतो जेव्हा काम
जीवनांत येतो तेव्हा राम

जेव्हा भावना दाटून येतात, तेव्हा काव्य आपोआप स्फुरते.

या खोलीत कृष्णप्रेमाने भारून गेल्यामुळे मी गुणगुणू लागलो व माझे गुणगुणणे ऐकून तेच शब्द सौभाग्यवती आपल्या गोड गळ्यामधून सुरेल सुरम्य आवाजात म्हणू लागली—

कृष्ण माझी माऊली कृष्ण माझी साऊली ।
कृष्ण माझा छंद कृष्ण माझा आनंद ।
कृष्ण माझी आवड कृष्ण माझी रोकड ।
कृष्ण माझे ध्यान कृष्ण माझा प्राण ।
राम म्हणे देवा घडो तुझी सेवा ॥

× × ×

×

सौभाग्यवतीने विचारले—

' सर्वोपनिषदो गावो- हा जो गीतेच्या ध्यानात श्लोक आहे त्यावरून असे दिसते की—

गीता म्हणजे उपनिषदांचे उत्कृष्ट सार किंवा तात्पर्य आहे.

विद्वान् देखील असेंच म्हणतात तुम्हाला काय वाटते ? '

मी सांगू लागलो—

' ह्या मताला पुस्ती किंवा दुरुस्ती जोडायला पाहिजे. कृष्णाने फक्त उपनिषदाचे सार काढले नसून उपनिषदाच्या तत्वज्ञानामध्ये स्वतःच्या तत्वज्ञानाची फार मोठी मौलिक भर घातली आहे- '

सौभाग्यवतीने ह्याबद्दल खुलासा करण्याची विनंती केल्यावरून मी सांगू लागलो—

' ईशावास्योपनिषद सांगते की—

या लोकी कर्मे करीत शंभर वर्षे जगण्याची माणसाने इच्छा करावी. अशा रीतीने जगले असता कर्माचा लेप लागणार नाही.

त्याच्या थोडे पुढे जाऊन कृष्णकन्हय्याने गीतेत सांगितले की—

कर्म हें केवळ कर्तव्य म्हणून फळाची अपेक्षा न करता करावयाचे

कर्माचे स्वतन्त्र माहात्म्य सांगणारा हा तात्विक सिद्धांत कृष्णाने प्रथम प्रतिपादला. प्रख्यात तत्वज्ञानी कांट ह्याने नियत कर्तव्याचा महान् सिद्धांत मांडला, पण त्याच्याहि पूर्वी खूप वर्षे अगोदर गीतेने कर्तव्याकरता कर्तव्य—

( Duty for Duty's sake ) हा मौलिक सिद्धांत प्रस्थापित केला

कठोपनिषदात अश्वत्थ वृक्षाचे वर्णन आहे. गीतेंत देखील अश्वत्थ वृक्षाचे वर्णन आहे. फरक असा आहे की—

कठोपनिषदातील अश्वत्थ म्हणजे ब्रह्म, तर गीतेतील अश्वत्थवृक्ष म्हणजे संसारवृक्ष कृष्णाने सांगितले की हा वृक्ष तोडताना असंगशस्त्राचा वापर करणेचा

मुंडकोपनिषदात् विश्वरूपाचे थोडेसे वर्णन आहे, पण गीतेमध्ये खूप मोठे वर्णन आहे

छांदोग्योपनिषदात तप, दान, आर्जव, अहिंसा व सत्य ह्या पाचच गुणांचा उल्लेख आहे, पण गीतेने दैवी संपत्तीमध्ये हे पांचच गुण केवळ न सांगता सत्तावीस गुणांचा उल्लेख केला आहे

आणखी कितीतरी आधार देता येतील. तुला आता कळून आले असेल की उपनिषदांच्या तत्वज्ञानामध्ये कृष्णाने स्वतःची फार मोठी मौलिक भर घातली

उपनिषदाना दूध मानले तर कृष्णाने त्यात स्वतःच्या तत्वज्ञानाची साखर व केशर घातले आहे

' सर्वोपनिषदो गावो – ह्यात अलंकारिक भाषा आहे अलंकारिक भाषेत बोलायचे म्हणजे—

उपनिषद्रूपी दुध आटवून त्यात साखर व केशर घालून कृष्णाने केलेली बासुदी म्हणजे गीता, किंवा उपनिषद्रूपी दुधाचा चक्का करून त्यात साखर व केशर घालून कृष्णाने बनवलेले श्रीखंड म्हणजे गीतोपनिषद्. '

सौभाग्यवती म्हणाली—

' उपमा जेव्हा पक्वानाच्या असतात तेव्हा लोकाना त्या फार आवडतात. तुमची मार्मिक उपमा मला खरोखरच फार फार आवडली— '

× × ×

थोडा वेळ थांबून सौभाग्यवती लाडात येऊन म्हणाली—

' गीतेने मानवी जीवनात क्रांति होते, ह्याबद्दल एकादी गोष्ट सांगा ना– '

मी म्हटले—

' ती गोष्ट म्हणजे तुझीच गोष्ट— '

सौभाग्यवती उत्तरली—

' अस नाही हं चालायचं. माझा हा इवलासा हट्ट तुम्ही नाही का पुरवणार ? '

स्त्रीहट्ट केव्हा केव्हा डावलता येतो, पण त्यावेळी तशा वातावरणात स्त्रीहट्ट मला डावलता आला नाही. मी सांगू लागलो—

' तुला एकनाथ फार आवडतात. कारण त्यांचा ससार आदर्श होता. महाराष्ट्राचे परमार्थाचे पंचप्राण म्हणजे ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ,

तुकाराम व रामदास ह्यांपैकी ज्ञानेश्वर व रामदास ह्यांचे लग्नच झाले नाही. नामदेव व तुकाराम ह्यांचे लग्न झाले, पण त्यांना परमार्थात पत्नीची साथ मिळाली नाही. एकनाथ मात्र सर्वांत भाग्यवान् त्यांना त्यांच्या पत्नीने जी साथ दिली त्याला तोड नाही.

एकनाथाची पहिली मुलगी गोदावरी पैठणातच राहाणाऱ्या चिंतामणी-शास्त्री ह्यांना दिली होती. चिंतामणी विद्वान् होता, पंडित होता, व्युत्पन्न होता, पण तो बाहेरख्याली होता पती व्यसनाधीन झाला म्हणजे पत्नी दुःखाधीन होते.

गोदावरीचें दुःख पाहून नाथ आपल्या जामातांना म्हणाले—

' तुम्ही पुरुष आहा. आपल्या मर्जीप्रमाणे रात्री बाहेर जाण्यास मुखत्यार आहा. त्याबद्दल तक्रार करण्यास मी तुमच्याकडे आलो नाही. तुम्ही अतिथी धर्म जाणता तुमच्या दारी मी भीक मागणेस आलो आहे. मला एवढीच भीक घाला की—

रात्री बाहेर जाण्यापूर्वी माझ्या मुलीला गीतेचा एक तरी अध्याय वाचून दाखवा, व तिला त्याचा अर्थ समजाऊन सांगून मग खुशाल बाहेर जा '

जावईबुवांनी ते मागणे मान्य केले व त्याप्रमाणे क्रम सुरू झाला.

लहानपणी कृष्णाने मुरली वाजवून पशूपक्ष्यांना मुग्ध केले, मोठेपणी कृष्णाने गीता मुरली वाजवून साऱ्या मानवांना मुग्ध केले. ह्या गीता मुरलीचा नाद ज्याच्या कानात व मनात घुमला तो मानव सुमानव होतो व दानव देखील मानव होतो.

Logic of Geeta is Magic of Mata.

चिंतामणीशास्त्री रोज रात्री गोदावरीला गीता वाचून दाखवू लागले व अर्थ समजाऊन देऊ लागले; आणि मग—

चमत्कार असा झाला की हा बाहेरख्याली अंतरख्याली झाला. वेश्या रमणीच्या नादात रमणारा हा शास्त्री गीता रमणीत रमू लागला.

आणि मग—

ह्या जोडप्याला जो मुलगा झाला तो म्हणजे रामायण, भारत, भागवत ह्यावर उत्कृष्ट काव्य करणारा प्रख्यात महान् कवी मुक्तेश्वर.'

× × ×

एखादी चांगली गोष्ट ऐकून लहान मूल आनंदाने डोलू लागते त्याप्रमाणे ही गोष्टी ऐकून सौभाग्यवती आनंदाने डोलू लागली व म्हणाली—

'छान, छान, फारच छान.'

× × ×

रात्री झोपण्यापूर्वी सौभाग्यवती आपली डायरी लिहू लागली डायरीत नोंद करण्याकरता तिला एक चांगले वाक्य पाहिजे होते. मी म्हटले—

"लिही. तुला चांगले वाक्य पाहिजे आहे ना? लिही—

मनाला नवी दृष्टी आली म्हणजे नवी सृष्टि निर्माण होते व मग नवी तुष्टि प्राप्त होते."

× × ×

गणेश,

उद्या आम्ही पठाणकोटला जाऊन अमृतसरला जाणार आहो. तिकडे गेल्यावर पुढचे पत्र पाठवीन

तुझा

राम

# पत्र १२ वे

प्रिय गणेश

पहलगावहून आम्ही सारे प्रवासी चार स्पेशल बसमधून निघालो व पठाणकोटला आलो.

पठाणकोटला आम्ही रात्री मुक्काम केला. दुसरे दिवशी पहाटे अमृतसरला आम्हाला जावयाचे होते.

आमच्या काश्मीर–सहलीमध्ये नवराबायकोंच्या खूप जोड्या होत्या.

रात्री मला काही लोक म्हणाले—

'साहेब, ह्या काश्मीर–सहलीत तुम्ही आम्हाला कथा [illegible] चष्म्यातून जीवनाबद्दल खूप गोष्टी सांगितल्या, त्यामुळे आम्ही ह्या सहलीला 'काश्मीर कन्हय्या' असें म्हणतो. आज आम्हाला नवरा–बायकोचे उच्च, फार उच्च, अति उच्च प्रेम कोणते त्याबद्दल कृपाकरून सांगा'

मी सांगू लागलो—

'नवरा–बायकोच्या प्रेमाच्या चार पायऱ्या आहेत. पहिली पायरी म्हणजे शारिरिक प्रेम. ह्याच्या वरची पायरी म्हणजे मानसिक प्रेम. मानसिक प्रेम शारिरिक प्रेमापेक्षा उच्च असते. तिसरी पायरी म्हणजे बौद्धिक प्रेम. हे प्रेम उच्चतर असते व चौथी नि शेवटची पायरी म्हणजे आध्यात्मिक प्रेम हे उच्चतम प्रेम आहे.

( १ ) शारिरिक प्रेम ( २ ) मानसिक प्रेम ( ३ ) बौद्धिक प्रेम व ( ४ ) आध्यात्मिक प्रेम— प्रेमाच्या एकापेक्षा एक वरचढ अशा ह्या चार पायऱ्या आहेत. चौथ्या म्हणजे आध्यात्मिक प्रेमाच्या पायरीवर गेल्यावर आपणाला दिव्य अनुभव येतो व आपण पत्नीला म्हणतो—

' तू माझी माता आणि मी तुझा पिता '

आपल्या अंतरंगात जो देव आहे त्याचा स्पर्श झाल्याशिवाय हा अनुभव येत नाही

हा अनुभव म्हणजे प्रेमाचा कद, प्रेमाचा आनंद, परमानंद आहे

रामकृष्ण परमहंसाना हा अनुभव फार लवकर आला. लग्न झाल्यावर ते आपल्या पत्नीकडे माता म्हणून पाहू लागले.

महात्मा गांधी एकदा सिलोनला गेले होते. बरोबर कस्तुरबा होत्या महात्माजी कस्तुरबाना ' बा ' म्हणत असत कस्तुरबा दिसायला गांधीपेक्षा मोठ्या होत्या तेथल्या संयोजकाना वाटले की— ह्या गांधींच्या आई आहेत. गांधीजी व्यासपीठावर बसले होते त्याची ओळख करून देताना प्रास्ताविक भाषणात संयोजक म्हणाला—

' आमचे भाग्य थोर म्हणून आज आपल्याकडे म. गांधी आले आहेत, आणि विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे त्यांच्या बरोबर त्यांची आई देखील आली आहे '

हा प्रकार पाहून गांधीजींचे चिटणीस घाबरून गेले. त्याना वाटले— आपण अगोदरच संयोजकाना कस्तुरबांची ओळख करून द्यायला पाहिजे होती. पण आता उशीर झाला होता सभा सुरू झाली होती.

गांधीजी बोलू लागले—

' संयोजकानी आपल्या प्रास्ताविक भाषणात चुकून एक सत्य गोष्ट सांगितली. कस्तुरबा माझी लग्नाची पत्नी आहे बरीच वर्षे ती माझी पत्नी होती, पण गेल्या कांही वर्षांपासून ती माझी आई झाली आहे. एकेकाळची ही माझी पत्नी आज माझी आई आहे. '

मित्रहो, ज्यावेळी पतीपत्नीमध्ये आध्यात्मिक प्रेम निर्माण होते व पतीला वाटते की पत्नी ही आपली आई आहे व पत्नीला वाटते की पती हा आपला

पिता आहे, त्यावेळी निर्माण होणारे प्रेम अति उच्च प्रेम आहे, पराप्रेम आहे, अपरंपार प्रेम आहे, अगाध, अफाट, अमाप प्रेम आहे

तुम्ही लक्षात ठेवा की— ' प्रेमी ' मधला ' मी ' मरतो तेव्हा तो दिव्यप्रेमी होतो.

× × ×

कृष्ण कन्हय्या म्हणजे भक्तिप्रेमाचा पुतळा. बोलता बोलता गाडी प्रेमाच्या रुळावरून भक्तिच्या रुळावर आली. एकाने मला विचारले—

' भक्त लाजाळू असतो असे म्हणतात, साहेब, तुम्हाला काय वाटते ? '

मी सांगू लागलो—

' भक्त नुसता लाजाळू नसतो तर खाजाळू देखील असतो. खाज सुटल्यावर ज्याप्रमाणे खाजवल्याशिवाय भागतच नाही त्याप्रमाणे भक्ताला भक्तिची खाज असल्यामुळे भक्ति केल्याशिवाय त्याला बरेच वाटत नाही '

आम्ही काही गोरे लोक पाहिले होते. ते कृष्णभक्त होते. तुळतुळीत केलेल्या डोक्यावर लांब शेंडी, कपाळावर वैष्णवतिलक, गळ्यात कंठी, नावे भारतीय, वेषभूषेच्या बाबतीत भारतमय झालेले असे ते लोक पाहून, आम्हाला मोठी मौज वाटली. एका गृहस्थाने मला त्याबद्दल विचारल्यावर सर्वच लोकांना त्याबद्दलची हकिकत एकण्यास उत्सुकता निर्माण झाली. मी सांगू लागलो—

' भारतातील एक कृष्णभक्त प्रभूपाद ए. स. भक्तिवेदांत, हे १९६६ साली वयाच्या ७० व्या वर्षी अमेरिकेत गेले. स्वामीजींचे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व होते गीता, महाभारताचे ते गाढे अभ्यासी होते. अमेरिकेत त्यांनी कृष्ण-भक्तीचा प्रचार व प्रसार करण्यास सुरवात केली. न्यूयॉर्कमध्ये ' इंटर नॅशनल सोसायटी फार कृष्ण कान्शासनेस ' ह्या संस्थेची स्थापना केली. त्यांच्या ह्या कृष्णभक्तीचा प्रसार साऱ्या अमेरिकेत फार मोठ्या प्रमाणात होऊ लागला, व सहा वर्षात त्याच्या सोसायटीच्या तीनशे शाखा निघाल्या

इंग्लंड, पॅरिस, कोलंबिया, ओंटेरिओ येथे देखील ह्या मोहिमेने जोर धरला आहे. समाजाच्या सर्व थरातील लोक कृष्णभक्तीने भारावून गेले आहेत.

लॉज एंजल्समध्ये ह्या संघटनेचे प्रमुख केंद्र आहे. तेथून स्वामी भक्ति-वेदांतजी इतर केंद्राचे संचालन करतात.

ह्या संघटनेचा होणारा सभासद मद्य, धूम्रपान करत नाही, इतकेच नव्हे तर तो चहा कॉफीसुद्धा घेत नाही. या मार्गात स्वैराचाराला अजिबात थारा नाही, असे स्वामीजींचे सांगणे आहे. शुद्ध शाकाहार, गाईचे दूध व कृष्णभक्ति ह्यामुळे ह्या संघटनेच्या सभासदांना कमालीची मानसिक शांति मिळू लागली आहे.

अमेरिकेंत पैसा पुष्कळ आहे. पैशाचा सुकाळ आहे, पण मनःशांतीचा दुष्काळ आहे. कृष्णभक्ति म्हणजे मनःशांति मिळवण्याचे रामबाण औषध आहे, असा लोकांना अनुभव येऊ लागला आहे

हरेकृष्ण मोहिमेतील पाश्चात्य लोक दीक्षा घेताना आपली मूळ नांवे टाकून गुरुदास, प्रभुदास, कीर्तनानंद, तुळशीदेवी, यमुनादेवी, पद्मावती, मालती—असली भारतीय नावे घेतात

कृष्ण म्हटले की वृंदावन आलेच आता अमेरिकेंत व्हर्जिनियामध्ये ६९० एकर जमिनीवर न्यू वृंदावन वसवले जाणार आहे येथे एक विशाल गोशाळा होणार आहे

हरेकृष्ण संघटनेमार्फत Back to God-head ह्या नांवाचे मासिक प्रकाशित होते त्याच्या लाखो प्रती खपतात

हरेकृष्ण चळवळीला टेलिव्हिजन, रेडिओ नियतकालिके ह्यांच्या सहाय्याने फार जोर येत आहे.

अमेरिका व ब्रिटनमध्ये कृष्णाची मोठी मंदिरे बांधण्यात आली आहेत. तेथे पाश्चात्य लोक मोठ्या भक्तिभावनेने मूर्तिपूजा करतात ह्या लोकांची खात्री झाली आहे की—

कृष्ण समजून घेणे व त्याच्या उपदेशाप्रमाणे वागणे ह्यामुळेच मनुष्य सुखी समाधानी होऊ शकतो '

ही हकिकत ऐकून लोक म्हणाले---

' साहेब, आपल्या ह्या काश्मीर कन्हय्या सहलीमध्ये आपण फार मोठी उपयुक्त माहिती सांगितली. ही हकिकत ऐकून आम्हाला फार फार आनंद झाला. '

× × ×

रात्री निजण्यापूर्वी सौभाग्यवती मला म्हणाली—

' येथे आपणा दोघांना चांगली खोली देण्यात आली आहे. तुम्ही आज कृष्णभक्तीची फार उत्तम माहिती सांगितली. मला वाटते आहे की— ह्या खोलींत देखील कृष्णभक्तीचा सुगंध पसरला आहे कृष्णभक्तीने मनुष्य सुखी होतो. हें खरे असलें तरी भक्तावर संकटेही येतातच जो खरा कृष्णभक्त आहे तो संकटांना भीत नाही संकटांमुळे त्याची भक्ती उजळून निघते व मग संकटे संपल्यावर तो सुखाच्या वरच्या पायरीवर जातो. आज डायरीत लिहिण्याकरता मला एकादा चांगला दोहा सांगा ''

मी म्हटले— ' घे लिहून घे. तो दोहा असा—

खुदीको कर इतना बुलंद के हर तकदीरके पहले

खुदा बंदेसे खुद पूछे तेरी रजा क्या है ? '

( माणसाने स्वतःला एवढे मोठे बनवावे की संकट पाठवण्याच्या आधी, परमेश्वराने स्वतःहून विचारावे—

' तुला कोणत संकट पाठवू ? ' )

× × ×

पहाटे उठून आम्ही पठाणकोटहून गाडीने अमृतसरला गेलो व तेथे सुवर्णमंदिर जालियनवाला बाग वगैरे ठिकाणे पाहिली.

अमृतसरमध्ये हिंडत असतांना माझ्या मनःचक्षूसमोर इतिहासातील पूर्वीच्या घटना दृग्गोचर होत होत्या.

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात अमृतसरच्या जालियनवाला बागेला अनन्य साधारण महत्त्व आहे.

१९०८ मध्ये सहा वर्षांची दिलेली कडक शिक्षा भोगून लोकमान्य टिळक सुटायला व युरोपात पहिल्या महायुद्धाचा भडका उडायला एकच गाठ पडली.

लोकमान्य म्हणजे देशभक्तीचा ज्वलंत ज्वालामुखी

पहिले महायुद्ध सुरु झाल्यावर भारतात रिक्रूट भरती सुरु झाली. पंजाब ही तर लष्कर भरतीसाठी सोन्याची नव्हे तर हिऱ्या माणकांची खाण, पण देशभक्तीच्या वाऱ्याने हा शूर शिखांचा पंजाब वेगळा झाला होता.

१८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामात आपण कोणत्या भावनांच्या आहारी जाऊन आपण इंग्रजांना साह्य केले, हा आपला देशद्रोहीपणा झाला असे शिखांना वाटू लागले होते.

पहिले महायुद्ध सुरु झाल्यावर अकोल्याचा मामलेदार जुलुमशाही गाजवू लागला क्रुद्ध झालेल्या पंजाबी जमावाने त्याच्या बंगल्याला वेढा घातला, त्याच्या बायका मुलांना सुखरूपपणे बाहेर जाऊन दिले व जुलमी दुष्ट मामलेदाराला बंगल्यात कोंडून बंगल्यासकट जाळून भस्मसात केले.

पहिले महायुद्ध सुरु झाल्यावर लोकमान्य टिळक, बाबू चित्तरंजन दास सरकारला सांगू लागले—

'खरेखुरे स्वराज्य पाच वर्षांत देऊ असे निश्चित वचन देत असाल तर ह्या युद्धात आम्ही साह्य करतो, नाही तर नाही.'

पण महात्मा गांधी सरकारला बिनशर्त सहाय्य करायला तयार झाले. ते म्हणू लागले—

'शत्रू झाला तरी त्याला अडचणीत गाठून आपण आपले कार्य करून घेऊ नये त्याला त्याच्या अडचणीत सहाय्य करावे व त्याचा हृदयपालट करण्याचा प्रयत्न करावा.'

म. गांधींचा हा विचार भारताला मंजूर झाला नाही.

खेड जिल्हा हा गांधींचा सत्याग्रहाचा बालेकिल्ला. लष्कर भरतीचा प्रचार करण्यासाठी गांधी आपल्या खात्रीच्या बालेकिल्यात गेले. त्यांना वाटले— आपल्या हाकेला हा जिल्हा खात्रीने ओ देईल.

पण त्यांना आता अनुभव आला की—

रिक्रूट मिळण्याचे तर दूरच राहिले, पण वाटेल तितके भाडे देऊनहि कोणीहि त्यांना प्रवासासाठी बैलगाडी देखील देईना.

पूर्वी ह्या जिल्ह्यात त्यांना वाटेल तितके स्वयंसेवक मिळत असत, पण आता त्यांनी दाताच्या कण्या केल्या तरी प्रचारासाठी त्यांना स्वयंसेवक मिळेनात. प्रवासात त्यांना कोणी अन्नपाणी देखील देण्यास तयार होईना

१९१८ च्या नोव्हेंबर महिन्यात पहिले महायुद्ध संपले व दोस्तांचा विजय झाला. लोकांच्या तोंडाला पाने पुसण्यासाठी सरकारने भारताला मॉटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणा दिल्या.

पण देशात असंतोष व अशांतता ओतप्रोत भरून वाहत होती.

सरकारने रौलट समिति नेमली होती. ह्या समीतीला शोध लागला की—

क्रांतिकारकांचे महाविद्यापीठ महाराष्ट्रात आहे व त्याचे कुलगुरु लोकमान्य टिळक आहेत टिळकांनी गणेशोत्सव सुरु केला होता. रौलट समितीला वाटले की क्रांतिकारक बंडखोर चळवळीचा हा श्रीगणेशा आहे.

रौलट समीतीचे असें मत झाले की—

प्लेगच्या कहरात चाफेकर बंधूंनी पुण्यात रँड व आयर्स्ट ह्यांचा खून केला त्याच्या बुडाशी लोकमान्य टिळक आहेत.

रौलट समीतीच्या मते भारतात क्रांतिकारक वर्ग हा मुख्यत्वेकरून ब्राह्मणवर्ग आहे, कारण शेकडा साठ टक्के क्रांतिकारक ब्राह्मण आहेत.

रौलटच्या काळ्या कायद्याविरुद्ध म. गांधी देखील संतापले त्यांनी त्या कायद्याला सत्याग्रहाने उत्तर देण्याचे ठरवले.

Master of Unrest – सार्‍या असंतोषाचे स्वामी असे जे लोकमान्य टिळक त्यांच्यावर सरकार भाषणबंदी प्रवेशबंदी असे हुकूम बजावत होते. शेवटी लोकमान्य चिरोल विरुद्ध अब्रू नुकसानीचा खटला चालवण्यासाठी व विलायतेत होमरूलच्या वतीने राजकीय प्रचार करण्यासाठी ' एक पंथ दो काज ' असा हेतु मनात धरून विलायतेला गेले.

१९१९ साली अमृतसरला कॉंग्रेसचे अधिवेशन भरण्याचे ठरले मार्च १९१९ मध्ये रौलटचा काळा कायदा सरकारने पास केला. ह्या कायद्याविरुद्ध ता. ६ एप्रिल ते १३ एप्रिल पावेतो देशभर राष्ट्रीय सप्ताह पाळला गेला

अमृतसर धुमसत होते. ता. १३ एप्रिल हा महत्त्वाचा दिवस उगवला त्या दिवशी फार मोठी जत्रा होती जत्रेच्या निमित्ताने सारे अमृतसर शहर माणसानी फुलून गेले होते.

जनरल डायरेने हुकूम काढला की—

नगरात चारापेक्षा जास्त माणसानी एकत्र जमणेचे नाही. लोकाना ह्या हुकमाची माहिती देखील झाली नाही

ता १३ एप्रिलच्या सकाळी हंसराज नावाच्या माणसाने शहरभर दवंडी दिली की—

आज जालियनवाला बागेत संध्याकाळी ६ वाजता नागरिकांची जाहीर सभा भरणार आहे व जुने काँग्रेस पुढारी राजा कन्हैय्यालाल हे सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारणार आहेत. तरी सर्वांनी उपस्थित रहावे.

हजारो लोक जालियनवाला बागेत जमले.

हा बाग म्हणजे बाग नव्हे ती एक प्रशस्त व बंदिस्त अशी बखळ आहे. ही जागा शहराच्या मध्यावर आहे तीन्ही बाजूनी ही जागा अन्य हवेल्यानी वेढली आहे एका बाजला पाच फूट उंचीची भिंत आहे आत जायला एकच अरुंद अशी वाट आहे

ह्या बागेत वीस हजार लोक जमले होते तेथे जनरल डायर आला. त्याने हुकूम सोडला—

गर्दी मोडून चालते व्हा

लोकाना त्या अरुंद वाटेतून बाहेर जायला अवसर मिळाला नाही. गोळीबाराचा हुकूम सुटला.

सटासट गोळ्या सुटल्या पटापट माणसे मेली

हजारो लोकांचा नरमेध झाला. कितीतरी पुरुष, बायका, मुले मृत्युमुखी पडली.

जनरल डायरने जालियनवाला बागेत जमलेल्या साऱ्याना ठार मारले असते, पण त्याचा दारुगोळाच संपल्यामळे त्याचा नाईलाज झाला

पुढे जनरल डायरने आपल्या जबानीत सांगितले की—

त्या दिवशी मला वाटले होते की सारे नगर जमीनदोस्त करून टाकावे, पण मी कीव केली व साऱ्यांचा जीव घेतला नाही.

जालियनवाला बागेमध्ये मनुष्याला लाजविणारे दुष्ट कृत्य करणाऱ्या डायरला बक्षिस देण्यात झाले.

इंग्लिश जनतेने पैसे गोळा केले व मोठ्या सन्मानाने ती थैली डायरला देण्यात आली.

× × ×

हा सारा काळाकुट्ट इतिहास अमृतसरमध्ये हिंडत असताना माझ्या मन:श्चक्षुसमोर दिसत होता.

सर मायकेल ओडवायर हा पंजाबचा त्यावेळचा गव्हर्नर. ओडवायरने डायरच्या मदतीने पंजाबात धुमाकूळ घातला व लोकांचे हाल हाल केले. ओडवायरच्या कारकिर्दीत फटके खाऊन रक्तबबाळ झालेला, होरपळून निघालेला त्यावेळी सतरा वर्षांचा असलेला उधमसिंग पुढे विलायतेत गेला व उच्च शिक्षण घेऊन इंजिनियर झाला.

त्याला ओडवायरचा सूड घ्यायचा होता.

ता १३ एप्रिल १९१९ रोजी जालियनवाला बागेचे हत्याकांड झाले. ता. १३ मार्च १९४० रोजी कॅक्स्टन हॉलमध्ये ओडवायरचे व्याख्यान होते. उधमसिंग त्यावेळी विलायतेत होता. पंजाबला छळणाऱ्या ओडवायरला मारण्याची आपली प्रतिज्ञा त्याला पुरी करायची होती. रिव्हॉल्व्हर घेऊन तो व्याख्यानाला गेला. व्याख्यान संपल्यावर ओडवायर भारतमंत्री लॉर्ड झेटलंड याच्याशी गप्पागोष्टी करत होता, इतक्यात उधमसिंगाच्या रिव्हॉल्व्हरमधून भराभर गोळ्या सुटल्या.

ओडवायर तत्काळ ठार झाला. झेटलंडला एक गोळी निसटती लागली.

उधमसिंगाला फाशीची शिक्षा झाली व हसतमुखाने हातात गीता घेऊन गोपालकृष्ण महाराज की जय असें म्हणत ता. ३१ जुलै १९४० रोजी उधमसिंग फाशी गेला.

× × ×

अमृतसरहून पठाणकोटला येत असताना माझ्या डोळ्यापुढे क्रांतिकारक उधमसिंग दिसत होता.

सेशन्स जज्ज असताना मी कित्येकांना फाशी दिले आहे. अट्टल बदमाश देखील फाशी जाण्याच्या वेळी गर्भगळीत होतात. त्यांना उचलून फाशीच्या जागेकडे न्यावे लागते. आपल्या पायाने चालत जाण्याचे त्राण त्यांच्या अंगात नसते. पण भारतातले क्रांतिकारक हातात गीता घेऊन आनंदाने फाशीच्या जागेकडे चालत जातात व फास लावल्यावर गोपालकृष्ण महाराजकी जय म्हणून प्राण सोडतात.

ह्या आश्चर्यकारक अद्‌भूत प्रकाराबद्दल विलायतेहून विचारणा झाली असताना येथल्या गोऱ्या अधिकाऱ्यांनी जो गुप्त रिपोर्ट इंग्लंडला पाठवला व जो आता प्रसिद्ध झाला आहे त्यात म्हटले आहे की—

भारतात पूर्वी कृष्ण नावाचा एक बंडखोर होऊन गेला त्याचे हे क्रांतिकारक भक्त आहेत.

× × ×

गणेश,

त्या बंडखोर कृष्णकन्हय्याला नमस्कार करत मी पठाणकोटला आलो

आता पठाणकोटहून मुंबईला येऊन आमची काश्मीरसहल संपणार होती. पठाणकोटहून मुंबईकडे जाणाऱ्या गाडीला अद्याप बराच अवकाश होता.

आम्ही प्रवासी एके ठिकाणी बोलत बसलो होतो.

लोक मला म्हणाले—

" साहेब, कृष्णकन्हय्याचे तुम्ही भक्त. ह्या काश्मीर सहलीत तुम्ही वेळोवेळी जे विचार सांगितले त्यामुळे मानवी जीवन उच्च, उदात्त, उत्तुंग, कसे करावे, हें कळल्यामुळे आम्ही भारावून गेलो आहे. आता मुंबईला गेल्यावर तुमची आमची ताटातूट होणार. आज तुम्हाला आम्ही एक प्रेमाची आदराची आग्रहाची विनंति करणार आहो.

मनुष्याने स्वतःचा स्वार्थ सोडून तो देवाकरिता काम करु लागला म्हणजे त्याच्या अंगी विशेष शक्ति निर्माण होते, हा तुमचा विचार आम्ही आमच्या हृदयात कोरून ठेवला आहे. लहानपणी माणसाला देवाची बरोबर ओळख असत नाही. त्याला आई देवाच्या ठिकाणी असते आपण आईकरता काम करु लागलो म्हणजे देखील आपल्या अंगात विशेष शक्ति निर्माण होत असली पाहिजे. ह्या बाबतीत तुमचा एकादा अनुभव ऐकण्यास आम्ही फार उत्सुक आहो. पचपक्वान्नाचे जेवण झाले तरी विडा खाल्याशिवाय चैन पडत नाही. तुम्ही आजपर्यंत आम्हाला पचपक्वान्नाचे जेवण दिले आता अनुभवाचा विडा द्या इतकीच प्रार्थना."

× × ×

आईला नमस्कार करून मी सांगू लागलो. साऱ्या इंद्रियांचे कान करून लोक ऐकू लागले. भरलेल्या मनाने व भारावलेल्या अंतःकरणाने सौभाग्यवती ऐकू लागली.

त्यावेळी मी सांगलीच्या सिटी हायस्कूलमध्ये शिकत होतो. पाटीलशास्त्री ह्यांचा शंकरशेठचा क्लास होता. त्या क्लासमध्ये मी जात होतो. त्यावेळी एस्. एस्. सी. च्या ऐवजी मॅट्रिक म्हणत असत मॅट्रिकच्या परीक्षेला बसण्याच्या अगोदर शास्त्रीबुवा निवडक विद्यार्थ्यांना दोन वर्षे संस्कृत शिकवत असत व त्यांची शंकरशेठची तयारी करून घेत असत.

मुंबई प्रांतात त्यावेळी महाराष्ट्र, गुजराथ व कर्नाटकचे चार जिल्हे ह्यांचा समावेश होता. साऱ्या मुंबई प्रांतात मॅट्रिकच्या परीक्षेत संस्कृतमध्ये जो पहिला येईल तो पहिला शंकर शेठ व जो दुसरा येईल तो दुसरा शंकर शेठ. ह्या दोघानाहि दोन वर्षेपर्यंत मोठी स्कॉलरशिप मिळत असे

त्यावेळी हुशार विद्यार्थ्यांची महत्त्वाकांक्षा म्हणजे शंकर शेठ येणे. शंकर शेठ आलेल्या विद्यार्थ्याला ही मानाची उपाधी जन्मभर लागत असे.

तात्या ( माझे वडील ) ह्यांना मनापासून वाटे की मी शंकर शेठ यावे. त्यांच्या इच्छेप्रमाणे मी पाटीलशास्त्र्यांच्या क्लासमध्ये नांव घातले व जोरात अभ्यास करू लागलो.

त्यावेळी मॅट्रिकच्या परीक्षेत संस्कृत विषयाला कोणतेच टेक्स्टबुक नेमले जात नसे सारा शंभर मार्कांचा पेपर जनरल असे. त्यामुळे शास्त्रीबुवा आमच्याकडून खूप अभ्यास करून घेत असत.

शास्त्रीबुवा दर पंधरा दिवसांनी संस्कृतचा पेपर घालत असत व एखाद्या विद्वानाकडून पेपर तपासून घेत असत.

शास्त्रीबुवांच्या क्लासमध्ये सरकारी सांगली हायस्कूलमध्ये शिकत असलेला शंकर देसाई ( आता मुंबई कोर्पोरेशनचा सेवा निवृत्त मुख्य इन्जिनिअर ) हा विद्यार्थी होता. हा माझा मित्र शंकर फार हुशार होता. त्याच्या मानाने माझी हुशारी कमी होती.

शास्त्रीबुवानी खूप पेपर घातले. त्या सर्व पेपरमध्ये शंकर पहिला व मी दुसरा असा क्रम लागला.

एकदा तात्या फिरायला गेले होते. वाटेत कांही सरकारी हायस्कूलचे विद्यार्थी व सिटी हायस्कूलचे विद्यार्थी ह्यांचा वाद विवाद सुरू होता

सिटीहायस्कूलचे विद्यार्थी म्हणत होते—

' यंदा आमचा रानडे शंकर शेठ येणार '

सरकारी हायस्कूलचे विद्यार्थी म्हणाले—

' तोंड बघा तुमच्या रानडयाचं. यंदा आमचा शंकर देसाई शंकर शेठ येणार. '

तात्यांनी हा वाद–विवाद ऐकला. त्याना फार वाईट वाटले—ते घरी आले. देवघरात गेले व कोळघात पाणी आणून म्हणाले—

' कृष्णा, माय बापा, माझ्या रामला शंकर शेठ आण. कृष्णा, कृपा कर, दया कर, मेहेरबानगी कर. माझ्या रामला शंकर शेठ आण. ह्या दासाची एवढी इच्छा पूर्ण कर. '

तात्याना वाईट वाटणे साहजिक होते. प्रेमापोटी त्याना वाटे की आपला मुलगा शंकर शेठ येईल पण—

ते कसे शक्य होते ? एका सांगली गावात जो संस्कृतमध्ये पहिला येत नाही, तो सान्या मुंबई प्रांतात कसा पहिला येणार ?

+

पण प्रेम आंधळं असतं. तात्याना प्रेमाच्या पोटी वाटे की आपला राम शंकर शेठ येणार.

मी खूप अभ्यास करत होतो, पण पधरवड्याच्या परीक्षेत शंकर पहिला येत होता व मी दुसरा येत होतो.

मग माझी आई खूप आजारी पडली दिवसेंदिवस खंगत चालली. ती आता फार दिवसांची सोबती नाही अशी आमची सर्वांची खात्री झाली. मी आईची मनापासून सेवा करत होतो, पण ती थोड्या दिवसांची सोबती आहे ह्या विचाराने खिन्न होतो.

एका रात्री मी माजघरात झोपलो होतो कडेला कॉटवर आई झोपली होती रात्री बारा वाजण्याच्या सुमारास मला जाग आली

तात्या आईच्या कॉटवर बसले होते. आई तात्याना म्हणत होती—

' आता मी जाणार, माझ्या रामला सांभाळा हो. तो फार आईवेडा आहे.

तात्या आईला म्हणाले—

' अग, इतक्यात जाऊ नकोस. आपला राम शंकरशेठ येईल. त्याला शंकरशेठ आलेला पाहून मग तू जा. '

आई म्हणाली—

' माझी देखील तीच इच्छा आहे. मला फार फार वाटत की रामला शंकरशेठ आलेला पहावं व मग जगाला रामराम ठोकावा मी कृष्णाला रोज प्रार्थना करते की राम शंकरशेठ येईपर्यंत माझ्या कुडीतून प्राण जाऊ नयेत. '

तात्या आईचे ते शब्द ऐकले. माझ्या डोळ्यातून घळघळा अश्रू वाहू लागले मी डोक्यावरुन पांघरुण घेतल व मनसोक्त रडलो.

सकाळी उठलो देवघरांत गेलो. कृष्णाला साष्टांग नमस्कार घातला, व प्रार्थना केली की—

' कृष्णा, यशोदेच्या लाडक्या, माझ्यावर कृपा कर रे. माझी आई आता मला सोडून जाणार. तिची शेवटची इच्छा पुरी कर रे. अरे तुझ्याशिवाय तिची इच्छा कोण पुरी करणार ! '

× × ×

मी जोराने अभ्यास करू लागलो. इतके दिवस मला वाटायचे की शंकर शेठ यायचे व मान मिळवायचा शंकर शेठच्या बाबतीत मी माझाच विचार, माझाच मान, माझेच यश याबद्दल मनांत मांडे खात होतो, पण आता —

आईची-माझ्या प्रेमळ मातेची-शेवटची इच्छा पुरी करण्याचा विचार सुरू झाला

माझा मी पणा नाहीसा झाला त्याठिकाणी आई आली.

मी पणा सोडून जेव्हा मी साऱ्या शक्तीनिशी आईकरता अभ्यास करू लागलो तेव्हा मला आगळा नि वेगळा अनुभव येऊ लागला. अंतःकरणातील दिव्य शक्ति माझा सांगाती नि सोबती आहे असे मला वाटू लागले

मॅट्रिकची परीक्षा सुरू झाली. संस्कृतचा पेपर गुरुवारी होता. माझ्या पत्रिकेत गुरुवार घातवार होता.

परीक्षेला जाण्यापूर्वी मी कृष्णाला नमस्कार केला, तात्यांना नमस्कार केला तात्या माझ्या पाठीवरून हात फिरवत म्हणाले—

' राम, आज तुझा घातवार आहे पेपर जपून लिही '

मी आईला नमस्कार केला व आशिर्वाद मागितला. तिने आपला क्षीण हात माझ्या पाठीवर ठेवला व म्हटले—

' राम, माझ्या लाडक्या रामा, तुला माझा आशिर्वाद आहे '

मी परीक्षेच्या मंडपात गेलो संस्कृतचा पेपर लिहू लागलो माझ्या डोळ्यापुढे सारखी आई येत होती व तिला कॉटवर आसन्नमरण पडलेली पाहून माझ्या डोळ्यात अश्रू येत होते. मी आजपर्यंत खूप पेपर लिहिले आहेत पण डोळे अश्रूंनी भरले असताना लिहिलेला तो पेपर पहिला, नि शेवटला.

× × ×

निकाल जाहीर झाला संस्कृतच्या पेपरमध्ये मला शंभरपैकी त्र्याण्णव ( ९३ ) व शंकर देसाई झाला एकूणनव्वद ( ८९ ) — मी पहिला शंकरशेठ व शंकर देसाई दुसरा शंकरशेठ हा निकाल ऐकून सांगली गाव आनंदाने

गाजू लागले. एकाच गावचे दोन्ही शंकरशेठ हा मॅट्रिकच्या इतिहासात अपूर्व असा प्रकार होता. सांगलीला आनंदाचे उधाण आले.

आमच्या शाळेने लगेच शाळेला सुट्टी जाहीर केली.

सिटीहायस्कूलचे सुपरिटेंडट, पाटीलशास्त्री, इतर शिक्षक व कितीतरी विद्यार्थी आमच्या घरी माझे अभिनंदन करण्याकरता आले.

सिटीहायस्कूलचे सुपरिटेंडट मला म्हणाले—

" राम तू नुसताच पहिला शंकरशेठ आला नाहीस तर सांगली सेंटरला पहिला व सान्या मुंबईप्रांतात टोटलमध्ये तिसरा आला आहेस."

सारे वातावरण आनंदाने भरून गेले होते. त्या अत्युच्च आनंदाच्या वातावरणात माझ्या डोळ्यात अश्रू आले.

सुख आणि दुःख ह्यांचा शिवाशिवीचा खेळ म्हणजेच जीवन.

उभ्या नि आडव्या धाग्याशिवाय वस्त्र बनत नाही. सुखदु:खाचे योग म्हणजेच जीवनवस्त्राचे उभे नि आडवे धागे.

मी पहिला शंकरशेठ आलो होतो. सर्व विषयात मिळून मुंबई प्रांतात तिसरा आलो होतो. माझ्या एका डोळ्यात आनंदाश्रु आले होते, पण दुसऱ्या डोळ्यात दु:खाश्रू येत होते.

मला शंकरशेठ आलेला पहाण्याकरता माझी आई जिवंत राहिली होती. तिने आपले प्राण अडवून ठेवले होते. माझी आई मला अजून पुष्कळ दिवस पाहिजे होती. ती जाणार – मला सोडून जाणार – ही कल्पना मला सहन होत नव्हती.

मी आईला नमस्कार केला. तिला अश्रूंनी न्हाऊ घातले व म्हटले—

" आई, तुझ्या आशीर्वादाने मी शंकरशेठ आलो. आता मला तू मला सोडून जाऊ नकोस ग — जाऊ नकोस ग — "

× × ×

लोक ऐकत होते. त्याचे डोळे पाणावले होते. सौभाग्यवतीच्या डोळ्यात अश्रू आलें होते.

मी डोळे मिटले कृष्णाला नमस्कार केला व मनात म्हटले—

" कृष्णा,

माता मला नाही भ्राता नाही पिता,
तूच माझी माता तूच माझा पिता

× × ×

गणेश,

अशी झाली माझी काश्मीर सहल. हा काश्मीर कन्हय्या तुला आवडो इतकीच इच्छा !

तुझा
राम

इति शम्
गोपालकृष्ण महाराजकी जय

REFBK-0020762